म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
वा. क्र. 33

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
( ... जिल्हा वाचनालय ) वाचनालय/नौपाडा.

१४०

विचार... बांधव

निबंध

# विचारसाधन,

म्हणजे,

हिंदुस्थानाच्या सांप्रतच्या स्थितीचें मनन
करण्यास साहित्य.

हें

कितीएक पुस्तकांच्या आधारानें तयार केलें आहे.

मुंबईंत,
"निर्णयसागर" छापखान्याचे मालक यांनीं
छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १८९०.

किंमत ५ आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें
रजिस्टर केलें आहे.

# प्रस्तावना.

आलीकडच्या व्यवहारांत असा एक सिद्धांत ठरला आहे कीं, कोण-त्याही विषयाचा जो विचार करावयाचा, तो, नुसता कल्पनांनीं करूं नये, तर आधारपूर्वक करावा; ह्मणजे, त्यास कांहीं तरी उघड कारणें पाहिजेत. तो आधार ह्मणजे माहिती होय. आणि ती माहिती हेंच विचारास अत्युत्तम साधन होय. ह्मणून, आमच्या ह्या देशाच्या सांप्रतच्या स्थितीविषयीं ज्या कोणांस विचार करावयाचा असेल, त्यांस असें अल्प तरी साधन सिद्ध करून थोडक्यांत द्यावें, अशा हेतूनें हें पुस्तक तयार करून त्यास **विचारसाधन** हें नांव दिलें आहे. तेव्हां ह्यांत सर्व विषयांची माहिती यावयास पाहिजे हें खरें आहे. परंतु कितीएक महत्वाच्या विषयांची माहिती ह्यांत घालावयाची राहिली आहे, हें आह्मी जाणून आहों. तरी, ह्याच्या अवलोकनानें आमच्या देशबांधवांस स्वदेशाविषयीं विचार करण्यास अल्प तरी साधन मिळेल, अशी आह्मांस आशा आहे. ती परमेश्वरानें पूर्ण करावी.

सत्य संकल्पाचा दाता भगवान
सर्व करी पूर्ण मनोरथ.

**तुकाराम.**

## चुकीची दुरुस्ती.

पृष्ठ ८. खालून साहाव्या ओळींत "तीन" ह्या शब्दाबद्दल "चार" हा शब्द दाखल करावा; आणि "मद्रासचें" ह्या शब्दा नंतर "अलाहाबादचें" हा शब्द दाखल करावा.

विचारशील देशबांधवांस

पूज्यबुद्धिपूर्वक

हें

लहानसें पुस्तक

अर्पण केलें आहे.

# अनुक्रमणिका.


विषय. पृष्ठ.

१. आपली अवस्था आहे काय?.... .... .... १

१. राज्यसत्ताविभाग. ... ... ... ... ,,

२. क्षेत्रफळ व लोकसंख्या. ... ... ... २

ब्रिटिश मुलूख. ... ... ... ... ... ,,

देशी संस्थानें. ... ... ... ... ... ५

३. ब्रिटिश हिंदुस्थानाचा राज्यकारभार. ... ६

४. हिंदुस्थान सरकारचा जमाखर्च. ... .. ९

५. खर्चाच्या मुख्य बाबी... ... ... ... १०

हिंदुस्थानाचा इंग्लंडांत खर्च. ... ... ... ,,

लष्करी खर्च. ... ... ... ... १४

गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांचे खर्च. ... ... १६

कर्ज आणि त्याचें व्याज. ... ... ... ... १७

६. उत्पन्नाच्या मुख्य बाबी. ... ... ... १९

जमीनमहसूल—शेतकी. ... ... ... ... २०

मीठ... ... ... ... ... ... ... २९

अबकारी ... ... ... ... ... ... ३१

७. व्यापार... ... ... ... ... ... ३२

कापसाच्या गिरण्या... ... ... ... ... ४०

जाइन्टस्टाक कंपन्या ... ... ... ... ४१

८. दारिद्र्य. ... ... ... ... ... ... ४३

९. विद्याभ्यास. ... ... ... ... ... ४४

१०. सैन्य. ... ... ... ... ... ... ४८

११. सरकारी नौकऱ्या. ... ... ... ... ५०
१२. आगगाड्या. ... ... ... ... ... ५२
१३. डांक. ... ... ... ... ... ... ५६
१४. म्युनिसिपालिट्या. ... ... ... ... ५९
१५. सेव्हिंग ब्यांकी... ... ... ... ... ६१
१६. इंग्लंडच्या वसाहती व ताबेदार संस्थानें ... ६२
१७. राष्ट्रीयसभा. ... ... ... ... ... ६४
राष्ट्रीयसभेच्या ठरावांचा सारांश. ... ... ... ६६
१८. लेडी डफरीन्स फंड... ... ... ... ७४
१९. राज्यकारभाराच्या शाहाणपणाविषयीं गर्व. ७५
२०. हिंदुस्थानाच्या दारिद्र्याचीं कारणें ... ... ७७
२१. हिंदुस्थानाचें बरें आणि वाईट. ... ... ७९
बरें काय झालें आहे तें ... ... ... ... ८०
वाईट काय झालें आहे तें... ... ... ... ८१
२२. सामान्य जनावस्था ... ... ... ... ८२
२. आपण करावें काय ?.... .... .... .... ८४

# विचारसाधन.

ना नि १५८

## १.

## आपली अवस्था आहे काय?

### १. राज्यसत्ताविभाग.

हिंदुस्थानामध्यें खुद्द इंग्लिश सरकारचा अमल ९४७८८७ चौरस मैलांवर आहे; इंग्लिश सरकाराच्या ताब्यांतल्या एतद्देशीय संस्थानांचा अमल ५८७५८४ चौरस मैलांवर आहे; पोर्तुगीज लोकांचा अमल १४४७ चौरस मैलांवर आहे; आणि फ्रेंच लोकांचा अमल ५०९ चौरस मैलांवर आहे.

एतद्देशीय लहानमोठीं संस्थानें सुमारें एक हजार आहेत. त्यांवर आमचे राजे राज्य करितात खरे; तरी, त्यांचें सगळें सूत्र इंग्लिश सरकारच्या हातीं आहे. ह्या राज्यांमध्यें इंग्लिश सरकारचे पोलिटिकल एजंट किंवा रेसिडेंट असतात. त्यांच्या धोरणानें त्या राज्यांच्या सत्ताधीशांस राज्यकारभार चालवावा लागतो. ह्या राजांमध्यें निजाम, शिंदे, म्हैसूरचे महाराज, गायकवाड आणि होळकर, हे मोठे आहेत. ह्या एकंदर सगळ्या एतद्देशीय संस्थानांचें उत्पन्न सुमारें १६००००००० रुपयांचें आहे; त्यांतले ७२५०००० रुपये, खंडणी किंवा करभार ह्मणून, इंग्लिश सरकाराकडे येतात. ह्या संस्थानांपैकीं भोपाळचें संस्थान आज तीन पिढ्या स्त्रियांच्या अमलाखालीं आहे; आणि त्याची व्यवस्था उत्तम आहे. ह्या सगळ्या संस्थानांत एकंदर सैन्य ३४९८३५ आहे. व एकंदर तोफा ४२३७ आहेत. हें लष्कर वाढविण्यास आमच्या राजेरजवाड्यांस अधिकार नाहीं. ह्यांतलें बहुतेक सैन्य अव्यवस्थित व कवाईत न शिकलेलें असें आहे. आलीकडे कितीएक संस्थानिकांनीं आपापल्या सैन्यांचा कांहीं भाग इंग्रजसरकारच्या राज्याच्या रक्षणार्थ देण्याचें कबूल केलें आहे, व त्याप्रमाणें त्या सैन्यांवर इंग्रजी अमलदारांची योजना होत आहे.

# २. क्षेत्रफळ व लोकसंख्या.

## ब्रिटिश मुलूख.

हिंदुस्थानांतली लोकसंख्या युरोपांतल्या लोकसंख्येप्रमाणें वाढत चालेली नाहीं. इ० स० १८५१ ह्या वर्षी हिंदुस्थानची लोकसंख्या १८४०००००० होती, आणि इंग्लंडची १७९२०००० होती. आतां, हिंदुस्थानची २६९०००००० आहे, आणि इंग्लंडची २६०००००० आहे. हिंदुस्थानांतल्या इंग्लिश राज्याची मर्यादा गेल्या ३३ वर्षांत कसकशी वाढत गेली, आणि तींतली लोक संख्या कसकशी वाढली, हें एके ठिकाणीं दर्शविलें आहे, तें असें:—

| वर्ष | क्षेत्रफळ चौरस मैल. | लोकसंख्या. |
|---|---|---|
| १८५५ | ८५६००० | १९६०००००० |
| १८७१ | ८६०००० | १९५८४०००० |
| १८८१ | ८६८२५६ | १९८७९०००० |
| १८८८ | ९४७८८७ | २०८७९३३५० |

सन १८८८ ची लोकसंख्या जी वर सांगितली आहे, ती सन १८८१ च्या खानेसुमारीवरून अनुमानानें लिहिली आहे.

सध्याची इलाखेवार माहिती येणेंप्रमाणें:—

| प्रांत व इलाखे. | क्षेत्रफळ, चौरसमैल. | शहरें व गांवें यांची संख्या. | सन १८८१च्या खानेसुमारीबरहुकूम लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| खुद्द गव्हर्नर जनरल ह्यांच्या ताब्यांतले, अजमीर, मर्हीरवाडा, वऱ्हाड, कुर्ग, व अंडमन बेटें हे प्रांत. | २२८८५ | ६८७८ | ३३३६३२५ |
| मुंबई इलाखा, सिंध व एडन धरून. | १२४१९२ | २४६०५ | १६४८९२७४ |
| मद्रास इलाखा. | १३९९०० | ५२०५१ | ३०८६८५०४ |
| बंगाला. | १५०५८८ | २४८७०६ | ६६६९१४५६ |

| प्रांत व इलाखे. | क्षेत्रफळ, चौरसमैल. | शहरें व गांवें यांची संख्या. | सन १८८१ च्या खानेसुमारी वरहुकूम लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| पंजाब. | १०६६३२ | ३४३२४ | १८८५०४३७ |
| वायव्यप्रांत व अयोध्या. | १०६१११ | १०५४२२ | ४४१०७८६९ |
| आसाम. | ४६३४१ | २२४०८ | ४८८१४२६ |
| मध्यप्रांत. | ८४४४५ | ३४६१२ | ९८३८७९१ |
| ब्रम्हदेश { दक्षिण. | ८७२२० | १५८५७ | ३७३६७७१ |
| ब्रम्हदेश { उत्तर (तुकता घेतलेला). | ७९६३१ | | ३०००००० सरासरी. |

हिंदुस्थानांतील लोकसंख्येचें मान युरोपांतल्या राष्ट्रांच्या माना-च्या मागें पडण्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांत दुष्काळ हें एक कारण फार मोठें आहे. आणि ह्या दुष्काळांशीं संबंध आगगाडीचा आहे, असें कितीएकांस वाटतें. त्यावरून त्या संबंधाची माहिती काढिली आहे. तीवरून असें कळतें कीं, इ० स० १८०२ पासून इ० स० १८५४ पर्यंत जीं बावन वर्षें आगगाड्या नसून गेलीं, त्यांत एकंदर लहानमोठे १३ दुष्काळ हिंदुस्थानांत पडले, आणि त्यांत एकंदर सुमारें ५०००००० माणसें मेलीं. आणि इ० स० १८६१ पासून आगगाड्या चालू झाल्या, तेव्हांपासून इ० स० १८७८ पर्यंत गेलेल्या १७ वर्षांत १६ दुष्काळ पडले, आणि त्यांच्या योगानें ११८२१४२० माणसें प्राणांस मुकलीं. परंतु प्रतिपक्षाचें असें म्हणणें आहे कीं, १८०२ पासून १८५४ पावेतों जी मुदत तुम्ही घेतां, त्या मुदतींत लोकगणतीवरून, लोक किती मरण पावले तें जाणण्याचीं चांगलीं साधनें नव्हतीं, म्हणून त्या वेळचे आंकडे घेणें रास्त नाहीं.

शिवाय, लोकसंख्या इंग्लंडाप्रमाणें न वाढण्यास दुसरें एक कारण असें आहे कीं, ह्या देशांतल्या लोकांस आजारीपणांत औषधाचें साह्य इंग्लंडच्या लोकांइतकें मिळत नाहीं. ह्यामुळें माणसें फार मरतात. आणखी, गरिबीमुळें एकंदर राष्ट्राची अशक्तता फार वाढली आहे, हें एक कारण आहेच. आसामचे चीफ कमिशनर मि. ईलियट ह्यांनीं

एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, "आमच्या शेतकऱ्यांतल्या अर्ध्या शेतकऱ्यांस, वर्षानुवर्ष, पोटभर असें खायास कसें तें मुळींच मिळत नाहीं." त्याप्रमाणेंच डाक्टर हंटर ह्यांनीं लिहिलें आहे कीं, "हिंदुस्थानांतल्या चार कोटि माणसांस जन्मांत कधीं पोटभर अन्न मिळत नाहीं." आणखी डिगबी ह्मणून एक थोर गृहस्थ आहेत, त्यांनीं आपल्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, "हिंदुस्थानांत काम करून आलेले जितके धर्मोपदेशक मला भेटले, तितक्यांनीं स्वतःच्या माहितीवरून मला असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांतल्या लोकांस खायास अन्न नाहीं." असा प्रकार ज्या देशामध्यें आहे, त्या देशांतली लोकसंख्या कशी वाढावी ?

हिंदुस्थानांत अनेक धर्मांचे लोक आहेत. एडन व अंडमन बेटें शिवाय करून त्यांचा तपशील येणेंप्रमाणें:—

| | |
|---|---|
| हिंदु. ... ... ... ... ... ... | १८७९३७४३८ |
| मुसलमान. ... ... ... ... ... | ५०१२१५९५ |
| मूळचे राहाणारे. ( भील, कोळी, वगैरे. ) ... ... | ६४२६५११ |
| बौद्ध. ... ... ... ... ... ... ... | ३४१८८९५ |
| ख्रिस्ती. ... ... ... ... ... ... ... | १८६२६२६ |
| शीक. ... ... ... ... ... ... ... | १८५३४२६ |
| जैन. ... ... ... ... ... ... ... | १२२१८८५ |
| पारशी. ... ... ... ... ... ... ... | ८५३९७ |
| यहुदी. ... ... ... ... ... ... ... | १२००९ |
| इतर. ... ... ... ... ... ... ... | ९५२०३९ |
| एकूण.— | २५३८९१८२१. |

सगळ्या हिंदुस्थानांत एकंदर १४२६१२ युरोपियन व ६२०८५ युरेजियन आहेत. भाषांप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांचे ११० विभाग करितां येतात. पैकीं कांहीं मुख्य भाषा बोलणारांची संख्या येणेंप्रमाणें:— हिंदुस्थानी, ८२४९७१६८; बंगाली, ३८९६५४८२; मराठी, १७०४४६३४; तेलगु, १७०००३५८; कानडी, ८३३७०२७; गुजराती, ९६२०६८८; तामिळ, १३०६८२७९; पंजाबी १५७५४७९३; सिंधी, ३७१८९६१, आणि हिंदी, १८८०७७७. हे आंकडे, सन १८८१ च्या खानेसुमारीवरून दिले आहेत.

# देशी संस्थानें.

कांहीं प्रमुख देशी संस्थानांची माहिती येथें दिली आहे:—

| संस्थानाचें नांव. | क्षेत्रफळ, चौरसमैल. | शहरें व गांवें यांचीसंख्या | सन १८८१ च्या खानेसुमारीवरहुकूम लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| **मुंबईसरकारच्या** ताब्यांतील.[1] | | | |
| कच्छ. | ६५०० | ८९७ | ५१२०८४ |
| काठेवाड. | २०५५९ | ४१६८ | २३४३८९९ |
| पालणपूर. | ७७७५ | ११०८ | ५७६४७८ |
| जंजीरा. | ३२४ | २२६ | ७६३६१ |
| डांगसंस्थानें. | ३८४० | ४८६ | ६०२७० |
| सातारा जाहागिरी. | ३३१४ | ७३६ | ३१८६८७ |
| अक्कलकोट. | ४९८ | १०५ | ५८०४० |
| कोल्हापुर. | २८१६ | १०६१ | ८००१८९ |
| सावंतवाडी. | ९२६ | २२६ | १७४४३३ |
| दक्षिणमहाराष्ट्र जहागिरी. | २७३४ | ६०२ | ५२३७५३ |
| सावनूर. | ७० | २४ | १४७६३ |
| खैरपुर. | ६१०९ | माहीतनाहीं | १२९१५३ |
| सांगली. | १०८३ | ......... | १९६८३२ |
| **बंगालसरकारच्या** ताब्यांतील | | | |
| कूचबिहार. | १३०७ | १२१४ | ६०२६२४ |
| **पंजाबसरकारच्या** ताब्यांतील | | | |
| फरिदकोट. | ६१२ | १६८ | ९७०३४ |
| जिंद. | १२३२ | ४२३ | २४९८६२ |
| पतिआळा. | ५८८७ | २६०१ | १४६७४३३ |
| भावलपुर. | १५००० | ९२२ | ५७३४९४ |
| **मद्राससरकारच्या** ताब्यांतील | | | |
| त्रावणकोर. | ६७३० | ३७१९ | २४०११५८ |
| कोचिन. | १३६१ | ६५५ | ६००२७८ |

१ कच्छ संस्थानाचें वार्षिक उत्पन्न साडेअठरा लाख; काठेवाडचें दीड कोट; पालनपुरचें तेरा लाख; जंजीऱ्याचें पावणेपांच लाख; अक्कलकोटचें पावणेतीन लाख; कोल्हापूरचें सवाएकुतीस लाख; सावंतवाडीचें सवाचार लाख; सांगलीचें पावणेदहा लाख; व खैरपुरचें सात लाख.

| संस्थानाचें नांव. | क्षेत्रफळ, चौरसमैल. | शहरें व गांवें ह्यांची संख्या. | सन १८८१ च्या खानेसुमारीवरहुकूम लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| **हिंदुस्थानसरकारच्या किंवा त्याच्या एजंटाच्या** ताब्यांतील. | | | |
| वडोदें. | ८५७० | ३०१२ | २१८५००५ |
| निजाम हैदराबाद. | ८१८०७ | २०३९८ | ९८४५५९४ |
| म्हैसुर. | २४७२३ | १७६५५ | ४१८६१८८ |
| काश्मीर. | ७०००० | | १०००००० |
| भरतपुर. | १९७४ | १३५९ | ६४५५४० |
| बिकानेर. | २२३४० | १७३९ | ५०९०२१ |
| जयपुर. | १४४६५ | ५९६४ | २५३४३५७ |
| जोधपुर. | ३७००० | ३७८५ | १७५०४०३ |
| उदेपुर. | १२६७० | ५७२२ | १४४३१४८<br>भील ५१०७६ |
| बुंदेलखंड. | १०२४१ | ३६४९ | १४०३०८६ |
| ग्वालेर. | २९०६७ | १०३४६ | ३११५८५७ |
| भोपाळ. | ६८७४ | ३०१० | ९५४९०१ |
| देवास. | २८९ | ४५७ | १४२१६२ |
| इंदूर. | ८४०२ | ३७३४ | १०५५२१७ |
| रतलाम. | ७२९ | १६३ | ८७३१४ |

इतर वारीकसारीक संस्थानें मिळून एकंदर सर्व संस्थानांचें क्षेत्रफळ ५८७५८४ चौरसमैल व लोकसंख्या सरासरीनें ६०८३४३७८ आहे.

---

## ३. ब्रिटिशहिंदुस्थानाचा राज्यकारभार.

ब्रिटिशहिंदुस्थानाचा राज्यकारभार सुरळीत रीतीनें चालावा म्हणून त्याचे बारा राजकीय विभाग केले आहेत. त्यांस स्थानिक किंवा प्रांतिक सरकार म्हणतात:—

१. बंगाला (दक्षिणभाग) हा लेफ्टनेंट गव्हर्नरच्या ताब्यांत असतो.

२. आसाम.—यावर कमिशनर असतो.

३. मद्रास इलाखा.—यावर गव्हर्नर असतो.

४. मुंबई इलाखा (यांत सिंध व एडन हीं येतात).—यावर गव्हर्नर असतो.

५. वायव्यप्रांत व अयोध्या.—यांवर लेफ्टनेंट गव्हर्नर असतो.

६. पंजाब.—यावरही लेफ्टनेंट गव्हर्नर असतो.

७. मध्यप्रांत.—यावर चीफ कमिशनर असतो.

८. ब्रह्मदेश.—यावरही चीफ कमिशनर असतो.

९. अजमीर.
१०. वऱ्हाड.
११. कुर्ग व बंगळूर.
१२. अंडमनबेटें.
} हे खुद्द गव्हर्नर जनरलांच्या ताब्यांत आहेत.

मुंबई व मद्रास या दोन इलाख्यांच्या गव्हर्नरांस मात्र एक एक्झिक्यूटिव व दुसरें लेजिस्लेटिव (कायदेकौन्सिल) अशीं दोन कौन्सिलें आहेत. बंगाला व वायव्यप्रांत यांच्या लेफ्टनेंट गव्हर्नरांस कायदे कौन्सिलें मात्र आहेत. व बाकीच्या प्रांतांच्या सरकारांस कायदे करण्याचा मुळींच अधिकार नाहीं; त्यांच्या प्रांतांच्या संबंधाचे कायदे व्हाइसरायांच्या कौन्सिलांत आणावे लागतात.

ह्या सर्व स्थानिक सरकारांवर गव्हर्नरजनरल इन् कौन्सिल यांचा अमल चालतो; व त्या सरकारांनीं आपल्या वहिवाटींतल्या प्रांतांतल्या सर्व गोष्टी गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस कळवून, ते हरएक बाबतींत जो काय हुकूम करितील तो अमलांत आणिलाच पाहिजे, असा पार्लमेंटाचा ठराव आहे. मुंबईच्या व मद्रासच्या सरकारांस मात्र स्टेट सेक्रेटरीकडे परभारें पत्रव्यवहार करण्याचा अधिकार आहे.

सुप्रीम कौन्सिलाच्या एक्झेक्यूटिव शाखेचे मेंबर हे असतातः—कमांडर इंचीफ, लीगल मेंबर, होम डिपार्टमेंटचा सेक्रेटरी, फिनांशियल मेंबर, पब्लिकवर्क्सचा मेंबर, व मिलिटरी मेंबर. यांपैकीं एक निदान पांच वर्षे काम केलेला वारिस्टर असावा लागतो. या मेंबरांस दरमाहा ६,४०० रु० पगार मिळतो.

मद्रास व मुंबई यांच्या एक्झेक्यूटिव कौन्सिलांत कायमचे दोनच मेंबर असावेत असा कायदा आहे; व ते सिव्हिल सर्वंटच असले पाहिजेत; परंतु यांशिवाय कमांडर इंचीफ देखील ह्या कौन्सिलांचा मेंबर नेमिला जातो. या मेंबरांस दरमाहां ५१२० रु० पगार मिळतो.

**कायदे कौन्सिलें.**—या कौन्सिलांत स्वतंत्र युरोपियनांस व एतद्देशीयांस नेमण्याचा कायदा पहिल्यानें सन १८६१ त झाला. मुंबई व मद्रास यांच्या कायदे कौन्सिलांत, एक्झेक्यूटिव कौन्सिलचे मेंबर, इलाख्याचा आड्व्होकेट जनरल, आणि गव्हर्नर नेमील ते चोहोंपेक्षां कमी नाहींत व आठांपेक्षां जास्त नाहींत असे जादा मेंबर, यांचा समावेश होतो. मात्र याप्रमाणें गव्हर्नरानें नेमिलेल्या जादा मेंबरांपैकीं निदान अर्धे मेंबर सरकारी नोकर नाहींत असे लोक असावे लागतात. या जादा मेंबरांस कौन्सिलांत बसण्याची मुदत दोन वर्षांची असते, परंतु त्यांस पुनः पुनः नेमितां येतें. कायदे कौन्सिलाचें काम चालायास गव्हर्नरासुद्धां निदान पांच मेंबर हजर असावे लागतात. गव्हर्नरास निर्णायक मत देण्याचा अधिकार असतो. जादा मेंबरांस नवीन कायद्याचा मसुदा कौन्सिलांत रुजू करण्याचा अधिकार आहे; परंतु आजपर्यंत तो कोणी चालविला नाहीं.

कायदे कौन्सिलांत कोणताही कायदा मंजूर झाल्यावर त्यास गव्हर्नराची (किंवा लेफ्टनेंट गव्हर्नराची) स्वतःची मंजुरी लागते. ती मिळाल्यावर तो कायदा गव्हर्नर जनरलांकडे पाठवून त्यांची मंजुरी, आणि नंतर सेक्रेटरी आफ स्टेटच्या द्वारें राणीची मंजुरी मिळवावी लागते. सन १८६१ पासून हिंदुस्थान सरकारानें केलेल्या कायद्यांत प्रांतिक कायदे कौन्सिलांस बिलकुल हात घालतां येत नाहीं.

याप्रमाणें झालेले कायदे अमलांत आणणारी सर्वांत मुख्य संस्था **हैकोर्ट** ही होय. हीं हैकोर्टें तीन आहेत; मुंबईचें, मद्रासचें व कलकत्त्याचें. प्रत्येक हैकोर्टांत एक चीफ जस्टिस, व राणीसरकाराच्या मर्जीप्रमाणें पंधरांहून जास्त नाहींत इतके दुसरे जज्ज असतात. हे जज्ज, पांच वर्षांपेक्षां जास्त दिवस वकिलीचें काम केलेल्या बारिस्टरांमधून, सदर कोर्टांत अगर हैकोर्टांत दाहा वर्षांपेक्षां जास्त काम केलेल्या वकिलांमधून, दाहा वर्षें काम केलेल्या व त्यांपैकीं निदान तीन वर्षें

जिल्हा जज्जाचें काम केलेल्या सनदी सिव्हिल सर्व्हेंटांमधून, किंवा प्रिन्सिपाल सदर अमीन अगर स्मालकाज कोर्टाचा जज्ज यांपेक्षां कमी दर्जाची नाहीं अशी न्यायखात्यांतली नोकरी ज्यांनीं निदान पांच वर्षें केली आहे त्यांमधून, निवडतात. मात्र चीफ जस्टिस धरून सर्व जज्जांपैकीं निदान एक तृतीयांश जज्ज बारिस्टर व तितकेच सनदी सिव्हिल सर्व्हेंट असावे, अशी अट आहे.

देशीसंस्थानांचा कारभार बहुत करून राजेरजवाडे व त्यांचे दिवाण यांच्या ताब्यांत असतो. अशा संस्थानांत म्हैसुर बडोदें व त्रावणकोर हीं चांगलीं सुधारलेलीं आहेत. पैकीं म्हैसुरांत तर एक पार्लमेंटासारखी संस्था स्थापिलेली आहे.

---

## ४. हिंदुस्थानसरकारचा जमाखर्च.

ब्रिटिश हिंदुस्थानाचें एकंदर क्षेत्रफळ ९४७८८७ चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या सुमारें २०८७९३३५० आहे. या राज्याचें वार्षिक उत्पन्न सुमारें पावणेएकूणऐंशीं कोटि रुपये होत असून, तें बहुतेक सर्व खरचतें. गेल्या दाहा वर्षांचा जमाखर्च येथें दिला आहे; त्यांत रेलवे, सडका वगैरे सार्वजनिक कामांकरितां काढिलेलें कर्ज जमेस धरलेलें नाहीं.

| वर्ष. | उत्पन्न रु० | खर्च रु० | तूट किंवा शिलक. | |
|---|---|---|---|---|
| १८७९–८० | ६८४३३१५७० | ६९६६१०५०० | १२२७८९३० | तूट |
| १८८०–१ | ७४२९०११२० | ७७९२१५०६० | ३६३१३९४० | ,, |
| १८८१–२ | ७५६८४९८७० | ७२०८९५३६० | ३५९५४५१० | शिलक |
| १८८२–३ | ७०२७८३३७० | ६९६०३५००० | ६७४८३७० | ,, |
| १८८३–४ | ७१८४१७९०० | ६९९६२३१३० | १८७९४७७० | ,, |
| १८८४–५ | ७०६९०६८१० | ७१०७७१२७० | ३८६४४६० | तूट |
| १८८५–६ | ७४४६४१९७० | ७७२६५९२३० | २८०१७२६० | ,, |
| १८८६–७ | ७७३३७१३४० | ७७१५८७०७० | १७८४२७० | शिलक |
| १८८७–८ | ७८७५९७४४० | ८०७८८५७६० | २०२८८३२० | तूट |
| १८८८–९ | ८१६९६६७८० | ८१६५९६६०० | ३७०००० | शिलक |

सन १८८९–९० सालीं ३७६८२००० रु० शिलक राहिले आहेत.

# ५. खर्चाच्या मुख्य मुख्य बाबी.

## हिंदुस्थानाचा इंग्लंडांत खर्च.

हिंदुस्थानाच्या उत्पन्नावर मोठा बोजा हिंदुस्थानसरकारच्या तर्फेनें जो खर्च विलायतेंत होतो, तो होय; त्यापैकीं बहुतेक पैशाचा मोबदला हिंदुस्थानास मुळींच मिळत नाहीं; या द्वारानें जो पैसा बाहेर जातो, त्यास हिंदुस्थान मुकतें. याप्रमाणें गेल्या तीस वर्षांत, व्याज धरून, एकंदर बहात्तर कोटि तीस लक्ष पौंड हिंदुस्थानांतून विलायतेस गेले आहेत!!!

एका कर्त्या पुरुषाकडे एकाद्या अनाथ संपन्न कुटुंबाचा प्रपंच चालविण्याचा अधिकार यावा, आणि त्यानें आपलें तें आपलें आणि त्या कुटुंबाचें तें आपलेंच असें समजून, आपल्या सुखास उत्पन्न खर्चावें, तशांतला प्रकार चालला आहे. आणखी त्यांत विशेष हें आहे कीं, याविषयीं कोणी च बोलतां कामास नये. कायद्याप्रमाणें म्हटलें तर, हिंदुस्थानाच्या जमाखर्चावर विलायतच्या पार्लमेंट सभेचा निर्बंध आहे. पण त्या निर्बंधाचा अधिकार तें पार्लमेंट कसें चालवितें याचा मासला दरसाल आगष्ट महिन्याच्या सुमारास दिसून येतो. पार्लमेंटास सुटी व्हावयाची वेळ अगदीं जवळ आलेली असते; आणि बहुतेक मेंबर लंडन सोडून गेलेले असतात. अशा वेळेस हिंदुस्थानाच्या जमाखर्चाचा खर्डा वाचिला जातो. एक दोन डोकीं हजर असतात तीं कांहीं तरी बोलतात, आणि काम आटपतें. ग्रेटब्रिटनचा जमाखर्चाचा खर्डा पार्लमेंटापुढें रुजू होण्याच्या पूर्वीं लोकांचीं दुःखें व त्यांच्या तक्रारी यांचा विचार झालाच पाहिजे असें आहे; आणि सन १८८८ पर्यंत तसाच अधिकार हिंदुस्थानास होता; परंतु त्यावर्षीं तो अधिकार काढून टाकिला!!!

नुकतीच सन १८८६ त फायनान्शिअल कमिटी नेमिली होती, परंतु खर्चाच्या या मोठ्या तोंडाविषयीं विचार करण्याचा तिला मुळींच अधिकार नव्हता. या खर्चावर एकादी कमिटी नेमून जर चांगली छाटाछाट केली, तर दरसाल लाखों रुपये वांचतील अशी खातरी आहे. या खर्चाच्या संबंधाचे कांहीं ठोकळ आंकडे येथें दिले आहेत; त्यांवरून तो खर्च कसा वाढत चालला आहे तें दिसून येईल; परंतु ही वाढ थांबविण्याचें साधन आपल्या हातीं नाहीं, म्हणून वाईट वाटेल.

| खर्चाच्या मुख्य बाबी. | १८८३–४ | १८८४–५ | १८८५–६ | १८८६–७ | १८८७–८ |
|---|---|---|---|---|---|
| | पौंड. | पौंड. | पौंड. | पौंड. | पौंड. |
| विलायतेंत काढलेल्या कर्जावर व्याज. | २४४७३३३ | २६१२६५७ | २४२९२४३ | २५९७१९३ | ३३६५५१० |
| त्या कर्जाचा हिशेब राखण्याबद्दल इंग्लंडच्या व ऐरलंडच्या ब्यांकांस. | २७२८३ | २९३२६ | ३१०५५ | ३५९३२ | ५७६६६ |
| इंग्लंड, बसोरा, बगदाद व हिंदुस्थान यांच्या दरमियानच्या टपालाबद्दल. | ७३६०० | ७२१७० | ६८००० | ६८००० | ६५००० |
| सरकारी, हमी दिलेल्या, वगैरे रेलवेंच्या संबंधाचें व्याज. | ४८२६७५३ | ४८२७५४४ | ५०६६८०७ | ५२८४३५६ | ५३९९३९२ |
| लष्करीखर्च (गोऱ्या शिपायांचा पगार, त्यांस इकडे आणण्याचा खर्च, फर्लो रजेच्या नेमणुका, वगैरे.) | ११५८९९० | ११५१७६१ | १०६६४२६ | १२९९३२४ | ११८५८०१ |
| गोऱ्या शिपायांस, अमलदारांस, व बायकामाणसांस पेन्शनें. | ३३२९६११ | २३६०२८४ | १६९३३११ | १७७७५६५ | १८९७६६८ |
| सेक्रेटरी आफ स्टेट फार इंडिया व कौन्सिल, त्याचे क्लार्क, अंडरसेक्रेटरी, आडिटर यांचे पगार वगैरे. | ११४२९९ | ११५२८७ | ११६४२९ | ११६२२६ | ११६३३६ |
| पोस्टेज व तारा यांबाबद खर्च. | १०५४४ | ११८४२ | २३४०७ | १३३०० | १०१५० |
| कोळसे, कर, वगैरे. | १४३७४ | १०६५१ | १०६८९ | १०६०२ | ९६१८ |
| कूपर्सहिल एंजिनिअरिंग कालेज. | ३२२५७ | २४८६० | २६६१३ | २८३५७ | ३१९५५ |

| खर्चाच्या मुख्य बाबी. | १८८३–४ | १८८४–५ | १८८५–६ | १८८६–७ | १८८७–८ |
|---|---|---|---|---|---|
| | पौंड. | पौंड. | पौंड. | पौंड. | पौंड. |
| फर्लोचा पगार (सनदी अमलदार, सिव्हिलखात्यांतले लष्करी अमलदार, यांचा.) | २१६९१६ | १९८२७५ | १९६१९१ | १८७७४२ | २१०५६० |
| पेन्शनें (राजकीय, ईस्टइंडिया कंपनीच्या नोकरांचीं, जज्जांची, वगैरे.) | १४८९८०४ | १४४२४६० | १५२६२३७ | १५९२५६४ | १६१०६२५ |
| किरकोळ. | १५४२७ | १६२४५ | १७२३७ | २०३५१ | २१६४० |
| हिंदुस्थानसरकारास स्टेशनरी, टेलिग्राफचें साहित्य, वगैरे पुरविण्यासाठीं डायरेक्टरजनरल आफ स्टोर्स म्हणून एक अमलदार आहे त्यांचा, व त्याच्या हाताखालच्या लोकांचा यांचे पगार, वगैरे. | ५१११११ | ५३०१९ | ५६८६४ | ५२००० | ५४६६० |
| हा सगळा व कांहीं बाबी वर नमूद केल्या नाहींत त्यांबाबदचा पैसा विलायतेस पाठविण्यासाठीं हुंडणावळ. | ३४३४५५७ | ३४२६४२४ | ४४११४३७ | ५४१९०८६ | ६४६६६३३ |
| एकूण (वर कांहीं बाबी नमूद केल्या नाहींत त्या धरून). | १८४६४७५२ | १७५२७४०६ | १८४२६१७० | १९८२९०३५ | २१८५५६९८ |

या वर दिलेल्या आंकड्यांत, विलायतच्या टपालाबद्दलचा खर्च कम-कमी होत आहे असें दाखविलें आहे. आगबोटींच्या कंपन्यांमध्यें चढा-ओढ लागल्याचा व आगबोटींत एकंदर सुधारणा झाल्याचा हा परिणाम आहे. ह्या पुढची ठळक बाब म्हटली म्हणजे इंग्लंडांत हिंदुस्थानाच्या पैशाचा खर्च लष्कराकडे होतो ती होय. आम्हांवर जेथवर परकी राज्य आहे, तेथवर हें असेंच चालणार; परंतु त्यांतल्यात्यांत, आमच्यांत मराठे, मुसलमान, पंजाबी वगैरे ज्या जाती शौर्याबद्दल प्रसिद्ध आहेत, त्यांतल्या लोकांस जर हल्लींच्यापेक्षां मोठ्या दर्जाच्या जागा दिल्या, तर हल्लीं इंग्रज सरकारास इंग्रज अमलदारांच्या झुंडींच्याझुंडी पोसाव्या लागत असून त्यामुळें जो कोट्यवधि रुपयांचा प्रवाह इंग्लंडांत वाहात आहे, तो बराच कमी होणार नाहीं काय? परराष्ट्र जिंकावयाचें म्हटलें म्हणजे कोट्यवधि रुपये खर्चावे लागत असतात. परंतु सगळा हिंदुस्थानदेश पदरची एक कवडीही न खरचितां इंग्लंडच्या हातीं आला आहे. असें असतां इंग्लंडानें स्वहिताकडे इतकी नजर द्यावी हें त्यास शोभतें काय?

दुसरी विनाकारण खर्चाची बाब सेक्रेटरी आफ स्टेट फार इंडिया, त्याचें कौन्सिल, व त्याची कचेरी हें होय. सन १८५८ सालीं जेव्हां बोर्ड आफ डायरेक्टर्स काढून टाकिलें, तेव्हां, हिंदुस्थान सरकारच्या खर्चावर वगैरे निर्बंध ठेवण्याकरितां हें कौन्सिल स्थापन केलें. परंतु तें कौन्सिल आपलें काम गुप्तपणें चालवीत असल्यामुळें, आणि पार्लमेंटाशीं त्याचा संबंध नसल्यामुळें, त्याच्या योगानें हिंदुस्थानचा तोटाच होत आहे. ही संस्था काढून टाकून तिच्याजागीं पार्लमेंटाच्या कांहीं सभासदांची जर एक कमिटी नेमण्यांत आली, तर हिंदुस्थानचें हित होईल असें लोकांस वाटूं लागलें आहे. सेक्रेटरी आफ स्टेट यांस वर्षाचे ५००० पौंड; कायमचे अंडर सेक्रेटरी, २००० पौंड; पार्लमेंटरी अंडर-सेक्रेटरी, १५०० पौंड; असिस्टंट अंडरसेक्रेटरी, १२०० पौंड; कौन्सिलचे १५ मेंबर (हे इकडून पेन्शन घेऊन गेलेले अमलदार असतात) दरेकास, १२०० पौंड; यांशिवाय कारकून मंडळी, जासूद, वगैरे सुमारें ६१७ नोकर लोक आहेत. या सर्वांकरितां दरसाल सुमारें

**एक लक्ष तीस हजार पौंड** खर्च होत आहेत. ह्या खर्चास पैसा मनस्वी लागतो, नव्हे काय? आस्ट्रेलिआ, नेटल वगैरे ज्या इंग्लंडाच्या वसाहती आहेत, त्यांच्या सेक्रेटरींचा खर्च इंग्लंड देतें; त्या वसाहती देत नाहींत!!!

तिसरी एक खर्चाची बाब ह्मटली म्हणजे लंडन येथील कूपर्सहिल एंजिनिअरिंग कालेज होय. ह्याबद्दल हिंदुस्थानाच्या पैशांतून होणारा खर्च वरील कोष्टकांत दिलाच आहे; त्याचा तपशील पाहातां सन १८८६–७ सालीं पिण्याच्या दारूकडे वगैरे ३९७३ पौंड खर्च झालेला दिसतो!! ह्याचा अर्थ काय तो समजत नाहीं. परंतु सर्वांत मोठ्या दिलगिरीची गोष्ट ही कीं, इकडच्या एंजिनियरिंग कालेजांतल्या ग्राज्वेटांच्या डोक्यांवर त्या कूपर्सहिल कालेजमधले लोक आणून ठेवितात, आणि आमच्या कांहीं ग्राज्वेटांस रेव्हिन्युडिपार्टमेंटमध्यें शिरून पोट भरावें लागतें! आतां एवढें खरें कीं त्या कालेजांत फीचें उत्पन्न बरेंच होतें, परंतु पहिल्यानें खर्च हिंदुस्थानाच्या गरीब प्रजाजनांच्या पैशांतूनच करावा लागतो.

पुढची खर्चाची बाब सिव्हिल पेन्शनें होत; सरकार एतद्देशीय लोकांस जोंपर्यंत जास्त नोकऱ्या देणार नाहीं तोंपर्यंत ही बाब वाढतच जाणार.

कर्जाच्या व्याजाबद्दलची रकम फार मोठी आहे खरी; परंतु लढाईच्या कामाकरितां काढिलेलें कर्ज शिवाय करून बाकीचें कर्ज अगदीं थोड्या व्याजानें देशांत खेळतें आहे ही चांगली गोष्ट आहे.

---

## लष्करी खर्च.

खर्चाचें दुसरें मोठें तोंड म्हटलें म्हणजे लष्करी खर्च होय. हिंदुस्थानांत होत असलेल्या व विलायतेंत होत असलेल्या लष्करी खर्चाचे आंकडे हे असे आहेतः—

| वर्ष. | हिंदुस्थानांत खर्च. रु० | विलायतेंत खर्च. रु० | एकूण खर्च. रु० |
|---|---|---|---|
| १८७८–९ | १३१०९५५३० | ४८२९२३१० | १७९३८७८४० |
| १८८०–१ | २३९११३९४० | ५०२११०३० | २८९३२४९७० |
| १८८२–३ | १३४३३२३१० | ४९२६२०२० | १८३५९४३३० |
| १८८४–५ | १२०२३६२९० | ४९४०१७४० | १६९६३८०३० |
| १८८६–७ | १४७४३६२६० | ५१०७०४२० | १९८५०६६८० |
| १८८७–८ | १५४७६०४५० | ५३९७९०६० | २०८७३९५१० |
| १८८८–९ | १४८१२५९१० | ३७४६२०५० | २०३०१८४१० |

म्हणजे, जमीन महसुलापासून जें नक्की उत्पन्न होतें, तें सगळें लष्करी खर्चांत गडप होतें.

सन १८६३–४ सालीं एकंदर खर्च **साडेचौदा कोटि** रुपये झाला होता, आणि आजपर्यंत त्याच मानाचा खर्च राहिला असता. परंतु सन १८७६ सालापासून, रशियाशीं टक्कर द्यावयाची ती हिंदुस्थानाच्या सीमेच्या बाहेर द्यावयाची असा बूट निघून, त्यापायीं हिंदुस्थानच्या प्रजेचा पैसा या लष्करी कामांत पाण्यासारखा खर्च होत आहे. ह्या वर दिलेल्या खर्चांत, केवळ लष्करी कामाकरितां बांधिलेल्या रेलवेंच्या खर्चाचा, व युरोपियन शिपायांकरितां बांधिलेल्या राजगृहोपम बराकींच्या खर्चाचा समावेश केलेला नाहीं. सन १८८७ सालीं लष्करी रेलवेंवर उत्पन्नापेक्षां १ कोटि २९ लाख रुपये अधिक खर्च झाला. लष्करी इमारती व सडका बांधण्यांत सन १८७८–९ पासून तों १८८७–८ पर्यंत दाहा वर्षांत १०३९३०६२० रु० म्हणजे, दरसाल एक कोट रुपयांवर खर्च झाला आहे. ह्या सर्व बाबी जमेस धरून, जर पाहिलें तर दरसाल हिंदुस्थानच्या सुमारें ७८ कोटींच्या उत्पन्नांतून सुमारें २३ कोटि रुपये लष्करी खर्चांत गडप होतात, असें दिसून येतें.

हा जो अवाढव्य खर्च चालला आहे त्यास कारण आमचे देशी शिपाई नाहींत; त्यांस दरमाहां सात रुपयांवरच आपला काल क्रमावा लागतो. हिंदुस्थानच्या लोकांच्या निढळाचा पैसा असा पाण्याप्रमाणें खर्च होण्यास मुख्य कारण हिंदुस्थानांत आणून ठेविलेली गोरी फौज व काळ्या फौजेवरचे गोरे अमलदार होत. गोऱ्या फौजेपैकीं प्रत्येक

शिपायासाठीं हिंदुस्थानचे दर साल **तीन हजार रुपये** व प्रत्येक अमलदारासाठीं **साडे नऊ हजार रुपये** खर्च होतात, ही गोष्ट कोणास खरी वाटेल काय ? पण ती अक्षरशः खरी आहे. काळ्या फौजेंतील प्रत्येक गोऱ्या अमलदाराचा खर्च सन १८६२ त ६७०० रु० होता. तो सन १८७२ त ९५५० रु० झाला, व आतां किती झाला असेल कोण जाणे ! ! सन १८८० त एक आर्मी कमिशन नेमिलें होतें; त्यानें आपल्या रिपोर्टांत असें म्हटलें आहे कीं, "हिंदुस्थानावर लष्करी खर्चाचा बोजा इतका अनावर पडत आहे कीं, हिंदुस्थान हें फौजेच्या चैनीकरितां उत्पन्न केलें आहे कीं काय अशी पुष्कळ वेळां शंका येते." परंतु गंमत अशी कीं, पुष्कळ मोठमोठे लोक, ह्या खर्चाविषयीं ओरडत आहेत, परंतु त्यांत काटकसर करण्याचें कोणाच्याही मनांत येत नाहीं.

सुमारें दाहा हजार लोक विलायतेस "रिझर्व फोर्स" म्हणून ठेविलेले असतात, त्यांना पाहिजे तेव्हां इंग्लंडांतल्या ताब्यांतल्या कोणत्याही देशास पाठवितां येतें. परंतु त्यांचा सगळा खर्च हिंदुस्थानास द्यावा लागतो !!!

ज्या पोरांस तिकडे खावयास देखील मिळायाची पंचाईत, तीं इकडे येऊन किती मिजासीनें राहातात !!! उत्तम प्रकारच्या बराकी, उत्तम प्रकारचें खाणें, उष्णता जास्त जाहाली म्हणजे थंड हवेंत प्रयाण, चाकर, नोकर, आणखी गृहस्थाश्रमांतल्या सगळ्या सोई हें सर्व अगदीं तुच्छ मानलेल्या "काला अदमींच्या" खर्चानें चालतें. ह्या मंडळींची प्रकृति बिघडूं नये म्हणून त्यांस वेळोवेळीं विलायतेंत नेण्याकरितां पांच आगबोटी बांधिलेल्या आहेत. त्यांवर एकंदर खर्च १,१७,४४,११० रु० झाला आहे.

---

## गव्हर्नर व गव्हर्नरजनरल ह्यांचे खर्च.

आणखी खर्चाचें दुसरें मोठें तोंड म्हटलें म्हणजे इतर सरकारी कामदारांचा—आणि त्यांत युरोपियन लोकांचा—पगार होय. ह्या संबंधाची माहिती, ह्या पुस्तकांत "सरकारी नौकऱ्या" ह्या सदराखालीं दिली आहे, ती पाहावी. ती एकंदर आणि मोघम आहे. म्हणून आप-

त्या ह्या देशांतल्या प्रांतांच्या मुख्य गव्हरनरांचा स्वतःचा दरसालचा खर्च केवढा आहे, तो येथें दाखवितों.

| बाब. | मुंबई. | बंगाला. | पंजाब. | मद्रास. | वायव्यप्रांत. |
|---|---|---|---|---|---|
| गव्हरनरांचा पगार. | १२०००० | ९५००० | ९६००० | १२०००० | ९६००० |
| गव्हरनरांचा घरखर्च. | १०३००० | २०००० | २२००० | ३९००० | ३५५०० |

गव्हरनर जनरल ह्यांस पगार दरमाहां २०८३३ रुपये आहे; शिवाय त्यांचा घरखर्च महिन्याच्या कांठीं निदान दहा बारा हजार रुपये असेलच.

महाराणी सरकारचे मुख्य प्रधान ह्यांस दरसाल अवघे ५०००० रुपये वेतन आहे; आणि सगळ्या पृथ्वीमध्यें जें राज्य सध्यां अत्यंत बलिष्ठ आहे, त्याच्या—म्हणजे जर्मनीच्या—मुख्य प्रधानास वर्षाचें वेतन अवघें ३६००० रुपये आहे.

ह्यावरून आमच्या ह्या हिंदुस्थानांत पगाराच्या संबंधानें पैशाची कशी लूट आहे ती पाहा.

शिवाय राज्यकारस्थानाचा खर्च वेगळाच आहे. अफगाणिस्थानाचे अमीर अबदुलरहिमान ह्यांस, संतुष्ट ठेवण्याकरितां, दरसाल बारालक्ष रुपये रोख हिंदुस्थानच्या उत्पन्नांतून द्यावे लागतात. त्याशिवाय, वेळोवेळीं नजराणे जातात ते वेगळेच.

---

## कर्ज आणि त्याचें व्याज.

स्वराज्याच्या वेळीं हिंदुस्थानास कर्ज थोडें असे; परंतु वर सांगितल्याप्रमाणें सध्यांच्या सरकारचा खर्च फार वाढल्यानें, व वेळोवेळीं इंग्लंडाच्या हितासाठीं हिंदुस्थानच्या पैशानें लढाया चालविण्याचा सपाटा चालत असल्यानें सरकाराला कर्ज मनस्वी झालें आहे, आणि तें दिवसानुदिवस वाढत जाऊन त्याच्या व्याजाचीही रकम वाढत आहे.

| वर्ष. | हिंदुस्थानांत कर्ज. रु. | विलायतेस कर्ज. रु. | एकूण. रु. |
|---|---|---|---|
| १८७८–९ | ७८८३८९२६० | ५९०२९११७० | १३७८६८०४३० |
| १८८०–१ | ८५९५९७४६० | ७१४२९१३३० | १५७३८८८७९० |
| १८८२–३ | ९०६८८७६६० | ६८५८५६९४० | १५९२३४४६०० |
| १८८४–५ | ९३१८३६६०० | ६९२७१०८८० | १६२४५४७४८० |
| १८८७–८ | ९८०८९८६२० | ८४१४०१४८० | १८२२३००१०० |

ह्या एवढाल्या रकमांबद्दल शेंकडा चार व साडेतीन ह्या दरांनीं व्याज द्यावें लागत असतें. तें येणेंप्रमाणें:—

| साल. | व्याज रु. |
|---|---|
| १८७८–९ | ५४०१००१० |
| १८८०–१ | ४६३३५३६० |
| १८८२–३ | ४७७०३४६० |
| १८८४–५ | ४६१९४४३० |
| १८८७–८ | ५४४१७५४० |

हे कर्ज काढिलेले सर्वच पैसे उधळले नाहींत, ह्यांतली बरीच रकम आगगाड्यांचे रस्ते, सडका, वगैरे लोकोपयोगी कामांकडे लाविलेली आहे; आणि तिचें व्याज जमा होत आहे. परंतु “राज्यरक्षणार्थ” म्हणजे, अफगाणिस्थानाच्या लढाईसारख्या विनाकारण केलेल्या लढायांत ह्यांतला जो पैसा लागला, तो मात्र हातचा गेला आहे.

इंग्लंडास, तेथें स्वराज्य असतांही, साडेसत्तरकोटि पौंड, म्हणजे, हिंदुस्थानाच्या कर्जापेक्षां सुमारें चौपट कर्ज आहे.

कर्ज असणें हें चांगलें नाहीं; परंतु राज्यांतल्या बऱ्यालोकांचे पुष्कळ पैसे सरकाराकडे गुंतलेले असले, म्हणजे, त्यांस त्या सरकारावर उठतां येत नाहीं; ह्मणून सरकारास कर्ज असणें ही गोष्ट वाईट नाहीं; असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे.

## ६. उत्पन्नाच्या मुख्य बाबी.

वर सांगितल्याप्रमाणें, हिंदुस्थानांतल्या इंग्लिश सरकारचें उत्पन्न हल्लीं सुमारें पावणेएक्रूणऐंशीं कोटि रुपयांचें आहे. त्याच्या बाबी अनेक आहेत. त्यांतल्या मुख्य मुख्य बाबींचें उत्पन्न, खर्च वजा न जातां, गेल्या दाहा वर्षांत कसकसें वाढत गेलें आहे, तें खालीं दाखविलें आहे:—

| बाबी | १८७८–९ रु. | १८८७–८ रु. | १८८८–९ रु. |
|---|---|---|---|
| जमीन-महसूल. | २२३२३८६८० | २३१८९२९२० | २३०१६४०४० |
| अफू. | ९३९९४०१० | ८५१५४६२० | ८५६२३१९० |
| मीठ. | ६९४११२०० | ६६७०७२८० | ७६७५६३४० |
| स्टांप. | ३११०५४०० | ३८७६२९८० | ३९२७०८८० |
| अबकारी. | २६१९३४९० | ४५३४६५५ | ४७०५३४६ |
| रेलवे. | ६२५५६१२० | १४५३३३६०० | १५५२०६९६० |
| पाटबंधारेवगैरे. | ९१७८२६० | १७१४२७४० | १९०१७१८० |
| जंगलखातें. | ६०५७५०० | ११२४१२५० | १३४९०४७० |
| कस्टम्स | २३२६५६१० | १३४८८३७० | १३३२७८४० |

हें जें वर निरनिराळ्या बाबींचें उत्पन्न दिलें आहे, तें सर्व स्थानिक सरकारांचीं निरनिराळीं उत्पन्नें एकत्र करून दिलें आहे. स्थानिक सरकारांस आपल्या हद्दींतलें सगळें उत्पन्न खरचण्याचा अधिकार नाहीं; त्यांतलें बहुतेक उत्पन्न हिंदुस्थानसरकाराकडे जातें; आणि तें सरकार त्याचा विनियोग लष्कर, विलायतेचा खर्च, संरक्षणाचीं कामें, इत्यादि बाबींकडे करितें. मुंबई सरकारच्या जमीन–महसुलापैकीं ३/४ भाग, स्टांप–महसुलापैकीं १/४ भाग, अबकारीपैकीं ३/४ भाग, इनकमट्याक्सपैकीं १/२ भाग, जंगलखात्याच्या उत्पन्नापैकीं १/२ भाग, रेजिस्ट्रेशनच्या उत्प-

न्नापैकीं ½ भाग, आणि अफूचें, मिठाचें, व कस्टम्सचें उत्पन्न सगळें, इतकें हिंदुस्थानसरकार घेतें.

जमीन महसूल, सारा चढल्यानें व जास्त जमीन लागवडीस आल्यानें वाढत आहे; अफूचा खप चिनांत कमी होऊं लागल्यामुळें तें उत्पन्न कमी झालें आहे, व मिठाचा कर जास्त वाढल्यानें तें उत्पन्न जास्त झालें आहे. हा मिठावरचा कर गरीबांस फार जाणवतो. अबकारीचें उत्पन्न, दारूचा खप जास्त होऊं लागल्यामुळें वाढलें आहे. दळणवळण वाढल्यानें रेलवेचें उत्पन्न वाढलें आहे, परंतु एकंदरींत पैशाच्या संबंधानें रेलवेपासून तोटाच होत आहे; ही गोष्ट रेलवेच्या संबंधानें स्वतंत्र मजकूर दिला आहे त्यावरून दिसून येईल. पाटबंधाऱ्यांचें उत्पन्न वाढत आहे. परंतु त्या कामांत घातलेल्या पैशाचें व्याज अजून सुटत नाहीं.

शोध केल्यावरून असें दिसून येत आहे कीं, सांप्रतकाळीं पृथ्वीवरच्या बहुतेक राष्ट्रांचें उत्पन्न वाढत चाललें आहे; परंतु त्यांचा राज्य कारभार स्वदेशी लोकांच्या हातांत असल्यामुळें तिकडे पैशाची उधळपट्टी होण्याचें भय कमी.

आतां, उत्पन्नाच्या मुख्य बाबींपैकीं कांहींचें जास्त तपशीलवार विवेचन करितों.—उत्पन्नाची सर्वांत मोठी व महत्त्वाची बाब म्हटली म्हणजे

## जमीन-महसूल.—शेतकी.

आपणां हिंदुस्थानवासी लोकांस उपजीविकेला मुख्य आधार काय तो शेतकीचा आहे. साक्षात् म्हणा किंवा परंपरेनें ह्मणा, ह्या देशांतलीं शेंकडा ऐंशीं मनुष्यें आपला चरितार्थ शेतकीवर चालवितात, असें अनुमान निघालें आहे. देशांत लोकांची संख्या दिवसानुदिवस वाढत चालली आहे, परंतु धान्याच्या उत्पन्नाचें मान, रयतेच्या अज्ञानामुळें आणि उत्पन्न जास्ती केलें कीं त्यावर सरकारचा घाला येत असल्यामुळें, बहुधा आहे तसेंच आहे. तेव्हां दिवसेंदिवस अन्नाचा तोटा पडावा, हें अगदीं साहजिक आहे.

मद्रासेस एक नमुन्याचें सरकारी शेत आहे. त्यावरचे मुख्य अधि-

कारी राबर्टसनसाहेब म्हणतात—"पूर्वी जमीन चांगली कसदार होती, तींत थोडेंबहुत जें उत्पन्न होत असे, तें मूळच्या थोड्या लोकांस पुष्कळ होत असे. परंतु, आतां, लोकसंख्या वाढली आहे, व जमीन निकस होत चालली आहे, तेव्हां, सध्यांचें उत्पन्न सध्यांचा लोकांस पुरूं नये, हें साहजिक आहे."

ज्या देशांमध्यें स्वराज्य असतें, त्या देशांतली गोष्ट अगदीं वेगळी असते; म्हणजे तेथें राजा आणि प्रजा ह्यांचें नातें पिता आणि पुत्र ह्यांच्या नात्यासारखें असतें. तेथें प्रजेच्या हितार्थ वेगळी तजवीज करावी लागत नसते. परंतु, हिंदुस्थानांत हें नातें सापत्नाचें आहे; म्हणून, प्रजेच्या हितार्थ वेगळे उद्योग सरकारानें केले पाहिजेत. ह्या शेतकीच्या सुधारणेच्या संबंधानें डाक्टर हंटर म्हणतात कीं, "वेळ आली म्हणजे सगळें आपोआप होईल, हें जें म्हणणें आहे, तें स्वराज्यें आहेत अशा देशांच्या संबंधानें बरोबर आहे. तसा प्रकार हिंदुस्थानांत नाहीं. हिंदुस्थानांतल्या इंग्लिश लोकांस, सहस्रावधि एतद्देशीय गरीब लोक अन्न अन्न करून तळमळत असतां पाहाणें भाग आहे एक, किंवा, कसातरी अन्नाचा पुरवठा त्यांस करणें प्राप्त आहे एक; तिसरा मार्ग नाहीं." गोष्ट खरी आहे.

हिंदुस्थानांतली जमीन चांगली आहे. पण, तिजपासून पुष्कळ पिकें काढून घेऊन आपलें कल्याण कसें करून घ्यावें, हें ह्या देशांतल्या शेतकऱ्यांस ठाऊक नसल्यामुळें त्यांचें आणि परंपरया सगळ्या राष्ट्राचें फार नुकसान होत आहे. ह्याविषयी सर रिचर्ड टेंपल हे असें ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांत सरासरीनें दरएकरास[1] अकरा बुशिल धान्य उत्पन्न होतें; आणि इंग्लंडांत दरएकरास तीस बुशिल होतें." हें केवढें मोठें अंतर आहे बरें! तरी एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ही उत्तम स्थिति इंग्लंडांतल्या शेतीस एकदम प्राप्त झालेली नाहीं. त्या देशांत आन राणी राज्य करीत होती तेव्हां, म्हणजे इ० स० १७०२ पासून इ० स० १७१४ पर्यंत गेलेल्या मुदतींत, दरएकरास सरासरीनें १५ बुशिल धान्य उत्पन्न होत असे; आणि गेल्या शतकाच्या शेवटीं

१. एक बुशील ह्मणजे १३ $\frac{४}{२५}$ पायली.

२० बुशिल होत असे. सध्यां इंग्लंडांतलें मान ३२ बुशिलांपर्यंत चढलें आहे, आणि स्काटलंडांतलें मान ४० बुशिलांपर्यंत चढलें आहे.

त्याप्रमाणें हिंदुस्थानांतही पिकांची वाढ एकदम मोठी व्हावयाची नाहीं. ती हळूहळूच व्हावयाची. डाक्टर हंटर ह्यांचा अजमास असा आहे कीं, दरसाल शेंकडा दीडप्रमाणें जर पिकाची वृद्धि होत गेली, तर, तेवढी वृद्धि, दिवसेंदिवस वाढणाऱ्या सर्व प्रजेस सहज पुरेल.

आतां, ही सुधारणा करण्यास जीं मुख्य साधनें आहेत, त्यांत मुख्य दोन आहेत. म्हणजे, शेतकऱ्यांची स्थिति कशी आहे ती पाहाणें हें एक; आणि शेतकऱ्यांच्या साऱ्याच्या संबंधानें सरकाराची जी व्यवस्था आहे, ती बरोबर आहे कीं नाहीं, ती पाहाणें, हें दुसरें. ह्या संबंधानें डाक्टर हंटर प्रांजलपणें म्हणतात कीं, "ह्या प्रकारच्या माहितीची गरज जितकी हिंदुस्थान सरकारास आहे, तितकी गरज जगांतल्या दुसऱ्या कोणत्याही सरकारास नाहीं. आणि हें ज्ञान त्या सरकारास फारच थोडें आहे." ही गोष्ट जर खरी आहे, तर, हा दोष सरकाराचा आहे, असें म्हटलें पाहिजे. कां कीं, ही सगळी माहिती त्यांस उगाच सहज तोंड हालविल्याबरोबर मिळण्यासारखी आहे. पण, तोंड हालेल केव्हां ? खरी आस्था असेल तेव्हां !

हिंदुस्थानांतल्या साऱ्याच्या दरांविषयीं मतभेद मनस्वी आहे. रा० रा० मुदलियार म्हणून जे गृहस्थ मद्रास इलाख्याच्या वतीनें विलायतेस गेले होते, त्यांनीं तिकडच्या एका सभेंत असें सांगितलें कीं, "एकंदर उत्पन्नाचा तिसरा हिसा सरकार घेतें, असें नुसतें म्हणतात मात्र; पण, कधीं कधीं तें मान शेंकडा चाळीस चाळीस, पन्नास पन्नास पर्यंत चढलेलें आहे. प्रति तीस वर्षांनीं नवी मोजणी होऊन जी प्रतबंदी होते, तींत, सारा नेहमीं वाढत जातो."

अहमदनगर जिल्ह्यांतल्या एका मित्रानें जी माहिती दिली आहे, तीवरून असें दिसतें कीं, प्रत्येक मोजणीच्या वेळीं सरकारदस्तानें मान निदान सवाईच्या मानानें वाढत चाललें आहे. सोलापूर जिल्ह्यांत तर कमाल झाली आहे. पहा:—इंदापुर तालुक्यांत शेंकडा ५३, पंढरपुर तालुक्यांत शेंकडा ६७, भिमथडीतालुक्यांत शेंकडा ६९, आणि

सोलापूर व माढें ह्या तालुक्यांत शेंकडा ७७, ह्याप्रमाणें जमाबंदी वाढली आहे! त्यानें लोक त्रासून फार बोभाट झाला; तेव्हां, इ० स० १८७४ च्या आक्तोबरच्या २९ व्या तारखेस सरकारानें ठराव केला कीं, फेर मोजणीच्या प्रसंगीं, कांहीं झालें तरी, शेंकडा ३३ पेक्षां अधिक सरकारसारा वाढतां कामास नये. हें देखील मान फार आहे. मि. पेडर ह्यांचें म्हणणें असें आहे कीं, हें मान ३३ न ठेवितां २५ ठेविलें, तरी वस होईल.

ह्या फेर तपासणीच्या संबंधाची एक चमत्कारिक गोष्ट आमच्या ऐकण्यांत आली. खानदेश जिल्ह्यांतल्या अमळनेर तालुक्यांत फेर मोजणी होऊन सारा पुष्कळ वाढला तरी रयतेचे तकार अर्ज सरकाराकडे मुळींच आले नाहींत, अशा मजकुराचें पत्र एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें; त्या संबंधानें असें म्हणतात कीं, शंभरावर अर्ज गेले होते, परंतु कांहीं ना कांहीं हरकत घेऊन ते परत पाठविले होते.

ह्या फेरपाहाणीमुळें सारा वाढून त्रास होतोच, परंतु त्याशिवाय आणखी पाहाणीचे लोक येऊन त्यांजकडून पुष्कळ प्रसंगीं असा कांहीं जुलूम होतो, कीं रयतेस दे माय धरणी ठाय होतें. सरकारानें कायम धाऱ्याची पद्धति सुरू केली तर रयतेच्या श्रमांचें फळ तिला मिळेल एवढेंच नाहीं, तर मुदतीमुदतीनें पाहाणी झाल्यामुळें होत असतो तो अमलदारांचा त्रासही चुकेल. कायम धारा केल्यानें सरकारचेंही फारसें नुकसान होईल असेंही वाटत नाहीं. कारण, फेर पाहाणीच्या वेळेस जो मनस्वी खर्च लागतो, तो कायम धाऱ्याच्या पद्धतीनें लागणार नाहीं; आणि रेव्हेन्यू खात्यांत काम कमी होऊन पगारांचे वगैरे बरेच पैसे शिलक राहातील. कायम धाऱ्याच्या पद्धतीच्या संबंधानें आजपर्यंत पुष्कळ विचार झाला आहे; आणि ती पद्धति बहुतेक सर्वांत पसंत पडली आहे. सन १८६७ सालाच्या सुमारास वायव्य प्रांतांत दुष्काळ पडला होता, त्या संबंधानें नेमिलेल्या कमिशनानें अशी शिफारस केली कीं, कायम धाऱ्याची पद्धति सुरू केली असतां दुष्काळाचे जे भयंकर परिणाम होतात, ते पुष्कळ कमी होतील, आणि शेतकरी लोकांची एकंदर स्थिति बरी होऊन ते सुखी होतील. हें मत लार्ड क्यानिंग व्हाइसराय ह्यांस प-

संत पडलें. त्यांनीं आपल्या एका ठरावांत असें म्हटलें आहे कीं, आपली जमीन आपल्याकडे राहाण्याबद्दल व सरकारधारा न चढण्याबद्दल लोकांत जर भरवंसा उत्पन्न झाला, जर ते इंग्रजी राज्यावर जास्त प्रीति करूं लागतील आणि त्याची मजबुती वाढेल. लार्ड क्यानिंग साहेबांच्या या सूचनेस त्या वेळच्या सेक्रेटरी आफ् स्टेटनीं पूर्ण अनुमोदन दिलें; आणि सन १८६२ च्या एका खलित्यांत असें लिहून पाठविलें कीं, सारा कायम केल्यापासून लोकहित होईलच अशी खात्री आहे; म्हणून, सरकारचें पुढचें उत्पन्न बुडालें तरी हरकत नाहीं; ज्या एस्टेटीपैकीं तिन चतुर्थांश शेत जमिनींत लागवड होत असेल, त्या जमिनीचा सारा कायम करावा. परंतु हा ठराव अमलांत येण्याच्या अगोदरच लार्ड क्यानिंग गेले, व सेक्रेटरी आफ् स्टेट बदलून दुसरे आले; त्या सेक्रेटरींस सल्ला उलटा मिळाला; आणि कायम धारा करण्याच्या संबंधानें कांहीं अगदीं अशक्य अशा अटी दाखल केल्यामुळें, तशी पद्धति सुरू करण्याचें मागें पडलें तें पडलेंच. आतां त्याची आठवणही नाहींशी झाली आहे.

शेतांचें उत्पन्न व सरकारधारा ह्यांच्या मधल्या प्रमाणाच्या संबंधानें पुष्कळ मतभेद आहे. कांहीं लोकांचें म्हणणें आहे कीं जमिनीवरचा सारा अगदीं हलका आहे. उदाहरणार्थ, दुष्काळकारणशोधाच्या मंडळींतले विद्वान गृहस्थ जस्तिस कनिंगहाम हे म्हणतात कीं, "एतद्देशीय राजांच्या कारकीर्दींत शेताच्या उत्पन्नाचे तीनपंचमांश सरकारांत घेत, आणि दोनपंचमांश शेतकऱ्याजवळ राहूं देत. तेवढ्यांत त्याला शेताचा सगळा खर्चेंच भागवून आपला निर्वाह करावा लागत असे. हा सारा आतां, इंग्लिश सरकारच्या अमलाखालीं; शेंकडा तीन साडेतीन पासून आठपर्यंत आहे." परंतु दुसऱ्या बाजूसही तसेच वजनदार व अनुभविक गृहस्थ आहेत. सन १८६० चें फिनान्शिल स्टेटमेंट सुप्रीम कौन्सिलांत दाखल करितांना रैट आनरेबल जेम्स विल्सन म्हणाले:— आजपर्यंत ह्या राज्याचें उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न जेव्हां म्हणून आपण केला, तेव्हां दुसऱ्या बाबींकडे लक्ष न देतां आपण जमीन–महसूलाची रकम वाढविली आहे. ह्यामुळें उत्पन्नास तर विशेष भर पडली नाहींच,

परंतु रयत लोकांस मात्र त्रास झाला आहे. सारा फाजील वाढल्यामुळें काय वाईट परिणाम झाले आहेत, त्याचीं कांहीं उदाहरणें मद्रासेकडे दृष्टोत्पत्तीस आलीं आहेत.

खरें कोणतेंही असो. पण, जिकडे जावें तिकडे शेतकरी ह्मटला म्हणजे कर्जभरी दिसतो. ह्यूमसाहेब तर असें म्हणतात कीं, "शेतकऱ्यांचीं गांवांचींगावेंच काय, पण प्रांतांचेप्रांत कर्जांत इतके बुडाले आहेत कीं, ते कधीं कर्जमुक्त होतील कीं नाहीं, ह्याचा संशय वाटतो." डाक्टर हंटर म्हणतात कीं, "शेतकऱ्यांस सावकार लोक जो पैसा देतात, त्याच्या दराची चौकशी करितां मला असें समजलें कीं, त्याचें मान कधीं कधीं दरसाल दरशेंकडा साडेसदतीस रुपयेपर्यंत चढलेलें असतें." ह्यांत कांहीं नवल नव्हे. खेड्यापाड्यांत, लहान लहान रकमांवर, शेतकरी लोक रुपयास महिन्याचा एक आणा देण्याचें कबूल करून पैसे घेतात, हें आम्हांला ठाऊक आहे. म्हणजे, दरसाल दरशेंकडा ७५ रुपये व्याज पडलें!! आणि म्हणूनच, खेड्यापाड्यांत जवळ पांचशें रुपये असले म्हणजे मनुष्य सावकार बनतो.

हिंदुस्थानांतल्या इंग्लिश राज्यांत किती जमीन कोणकोणत्या पिकाकडे लाविली आहे, ह्याचें स्थूल मान इ० स० १८८७ सालांतलें काढलें आहे, तें असें:—

६०९७१७६४ एकर, भात.
१९१५६८७० एकर, गहूं.
८०५०४०३.० एकर, दुसरीं धान्यें.
९५९४०४० एकर, करडी वगैरे तैलधान्यें.
१९७१०९३ एकर, ऊंस.
११५९१५१६ एकर, कापूस, ताग, आंबाडी वगैरे.
२११२७९२ एकर, नीळ.
१०९०३६०५ एकर, काफी, चाहा वगैरे पदार्थ.

जमिनीच्या साऱ्याविषयीं रत्नागिरी जिल्ह्यांतल्या आमच्या एका माहीतगार मित्रानें आम्हांस कांहीं माहिती सांगितली. तींतल्या कांहीं गोष्टी आम्ही येथें सांगतों:—

| | | |
|---|---|---|
| उत्तम भातजमिनीस दर एकरास सरकारदस्त | ८ | रुपये. |
| मध्यम ——— | ५ | ,, |
| कनिष्ठ ——— | ३ | ,, |
| उत्तम बागाइतास दर एकरास सरकारदस्त | १५ | रुपये. |
| मध्यम ——— | ८ | ,, |
| कनिष्ठ ——— | ५ | ,, |

उत्तम भातजमिनींत दर एकरास भात दोन खंडी पिकतें; मध्यम जमिनींत दीड खंडी पिकतें; आणि कनिष्ठ जमिनींत पंधरा मण पिकतें. तरी, सरकारदस्त वारून बाकी राहातें त्यानें साधारण कुटुंबाचा देखील निर्वाह होण्याची मारामार पडते.

लार्ड मेयो ह्यांच्या मनांत फार भरलें होतें कीं, हिंदुस्थानांत शेतकीचें खातें चांगलें टोलेजंग स्थापित केल्यावांचून हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांची सुधारणा व्हावयाची नाहीं, व त्यांस साह्यही मिळावयाचें नाहीं. आणि त्याप्रमाणें योजना करण्याची शिफारस विलायत सरकारास त्यांनीं केली देखील होती. परंतु, विलायत सरकारानें त्यांत हात घालून त्याचा अगदीं विचका करून टाकिला; आणखी त्यासंबंधानें त्यांस सेक्रेटरी आफ स्टेट ह्यांजकडून असें खरमरीत लिहून आलें कीं, सरकारचें लक्ष, **शेतकीकडे** नव्हे, तर **उत्पन्नाकडे** असलें पाहिजे. ह्या देशाच्या राज्यकारभाराचीं मुख्य सूत्रें विलायतेंतल्या अधिकाऱ्यांच्या हातीं आहेत; त्यांस इकडच्या गोष्टींचें अज्ञान असल्यामुळें कसे परिणाम होतात ते पाहा!

ह्या अरिष्टांचें निवारण होण्यास आधीं एक कोणी तरी चांगले चतुर गृहस्थ सगळ्या हिंदुस्थानभर फिरले पाहिजेत; आणि जमिनीवर सारा बसविला आहे तो यथार्थ आहे कीं नाहीं, आणि तो वसूल करण्याची रीति बरोबर आहे कीं नाहीं, व ती बरोबर नसली तर तींत काय फेरफार केले पाहिजेत, हें त्यांनीं पाहिलें पाहिजे.

शिवाय, सध्या ह्या देशांत होत नाहींत, परंतु, लागवड केली असतां होतील, अशीं झाडें परदेशांत कोणतीं आहेत, तीं पाहून येथें आणिलीं पाहिजेत, आणि त्यांचा उपयोग लोकांस दाखवून, तीं तयार करावयाची रीति त्यांस शिकविली पाहिजे.

डाक्टर मर्डक ह्या नामांकित विद्वानांचें म्हणणें असें आहे कीं, "हिंदुस्थानांतल्या सगळ्या शेतकीची चांगली बारीक पाहाणी झाली पाहिजे. जमिनीवर सारा बसला आहे तो बरोबर आहे कीं नाहीं, व सारा वसूल करण्याची पद्धति बरोबर आहे कीं नाहीं, हें पाहिलें पाहिजे. चीन आणि जपान ह्या देशांतून कांहीं नवीन प्रकारची थोडीशी लागवड ह्या देशांत आणिली आहे, आणि तिचा पुष्कळ उपयोग झाला आहे, तशीं आणखी पुष्कळ झाडें तिकडून आणतां येतील." होय. खरें आहे. पण तें करावें कोणीं? आमचे शेतकरी म्हणजे दरिद्री आणि विहिरींतले बेडूक; त्यांस गांवाच्या बाहेर पडायास नको. आणि इतर मंडळी शब्द घोकण्यांत, पदव्या मिरविण्यांत, आणि चाकरी करून भाकरी मिळविण्यांत गुंतली आहे! आटपलें!

ह्या संबंधानें खरें आस्थेनें काम करावयाचें असल्यास, आमच्या विद्वान मंडळींतल्या दाहाबारा गृहस्थांस पांचचार वर्षे इकडच्या शेतकींत घालून सर्व माहिती करून द्यावी; मग, त्यांनीं, त्या विषयावरचीं पुस्तकें वाचावीं; नंतर, चीन, जपान इत्यादि देशांत जावें; तेथलीं झाडें-माडें पाहावीं; त्यांच्या लागवडीची रीति तपासावी; आणि त्यांतलीं कोणतीं झाडें इकडे चांगलीं होण्यासारखीं आहेत, तीं पाहून इकडे आणून, त्यांची लागवड करावी. तरच खरोखर लाभ होतील.

गरीब शेतकरी लोकांस लबाड सावकार बुडवितात, ह्याकरितां, शेतकऱ्यांच्या साह्यार्थ सरकारी पेढ्या काढाव्या, अशी खटपट मध्यंतरीं चालली होती. परंतु, ती तितकीच राहिली. ती कां मागें पडली हें समजत नाहीं. हिंदुस्थानांत स्त्रिया वैदिणी तयार करण्याच्या अवश्यकतेपेक्षां शेतकऱ्यांकरितां पेढ्या काढण्याची अवश्यकता फार मोठी आहे. पण तिकडे पाहतो कोण?

शेतकीस कांहीं शाप आहे कीं काय नकळे. इतर देशांतल्या शेतकऱ्यांचीही स्थिति वाईट आहे. हिंडमन हे साहेब म्हणतात कीं "फ्रान्सांत, शेतकऱ्यांची अवस्था शेतांतल्या मजुरांपेक्षां फार वाईट आहे. आणि जर्मनींतही अशीच स्थिति आहे, असें व्हेनें ह्या बाईनें समक्ष पाहून लिहिलें आहे."

परंतु, इ० स० १७३९ त विलियम गार्डन साहेबानें प्रत्यक्ष पाहून, पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या राज्याच्या स्थितीविषयीं असें लिहिलें आहे कीं, "त्यांच्या राज्यांतल्या शेतकऱ्यांवर सारा फार कमी असल्यामुळें ते सुखी आहेत." ही गोष्ट आमच्या स्वराज्यकर्त्यांस अत्यंत भूषणावह आहे.

सरकारधाऱ्याच्या संबंधानें आपल्या मुंबईइलाख्याची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. सन १८४०-५० च्या रिपोर्टावरून असें स्पष्ट दिसतें कीं, शेतकरी लोकांच्या सामर्थ्याच्या खोट्या कल्पना कलेक्टरांच्या मनांत भरल्यावरून त्यांनीं जबर सारा बसविला होता, आणि तेणेंकरून शेतकरीलोक भुकेबंगाल होऊन पुष्कळ जमिनी ओस पडल्या होत्या. हें सरकारच्या लक्षांत येऊन चुकलें, आणि त्यांनीं पुनः पाहाणी करतेवेळेस सरकारचा सारा पुष्कळ कमी करण्याबद्दल हुकूम केला. परंतु सन १८६२-३-४ सालीं अमेरिकेंत जेव्हां युद्ध चालू झालें, तेव्हां इकडच्या धान्यास व कापसास तेजी येऊन शेतकऱ्यांस बराच पैसा मिळाला. हें पाहून व त्या सुमारास कंपनीचें राज्य राणीसरकारांकडे जाऊन खर्च जास्त होऊं लागल्यामुळें, फेर तपासणीच्या वेळेस सरकारानें पुनः सारा वाढविण्यास हुकूम केला, आणि सरासरीनें शेंकडा साठ याप्रमाणें सारा वाढला. इकडे अमेरिकेंतली लढाई बंद होऊन कापसास व धान्यास पूर्वीप्रमाणें हळू हळू मंदाई आली, व पैसा मिळेनासा झाला. परंतु इकडे सरकार देणीं वाढलीं. याचा परिणाम, शेंकडों शेतकऱ्यांस त्यांच्या जमिनींतून हांकून द्यावें लागलें असा झाला. सन १८७३ त गुजराथेंत २५०३५ एकर जमीन ओस पडली. इकडचे लोक निराश होऊन दंगे होऊं लागले. राघू भांगऱ्या वगैरे लोकांचे सन १८७४तले दंगे याच संबंधाचे होत. या दंग्यांवर एक कमिशन बसलें होतें त्यांत सर अकलंड काल्व्हिन यांनीं अभिप्राय दिला कीं, दंगे होण्याच्या मुख्य कारणांपैकीं साऱ्याची फेरतपासणीच्यावेळी झालेली मनस्वी वाढ हें एक आहे.

याप्रमाणें शेतकऱ्यांची कंगाल स्थिति झालेली असतांना १८७६-७७ चा दुष्काळ पडला. अशा स्थितींत लाखों माणसें प्राणास मुकलीं, यांत काय आश्चर्य आहे बरें?

मुंबईइलाख्याच्या नक्की जमीन महसुलाचे कांहीं आंकडे खालीं दिले आहेतः—

| वर्ष. | महसूल, रुपये. | वर्ष. | महसूल, रुपये. |
|---|---|---|---|
| १८७८–९ | ३०२८३५४० | १८८३–८४ | ३२८३९५७० |
| १८७९–८० | ३२४९०९९० | १८८४–८५ | ३१८११८१० |
| १८८०–८१ | ३०९७८५४० | १८८५–८६ | ३५१३५९५० |
| १८८१–८२ | ३१८०४७६० | १८८६–८७ | ३५२८८९४० |
| १८८२–८३ | ३०४२७३९० | १८८७–८८ | ३६१५५००० |

**जमिनदारी व रयतवारीः**—आपल्या मुंबई इलाख्यांत बहुतकरून रयतवारी चालू आहे. कोंकणांतले खोत हे मात्र इकडचे जमीनदार होत. सरकारांत दरसाल ५०००० रुपयांपेक्षां जास्त रकम भरणाऱ्या जमीनदाऱ्या वायव्यप्रांतांत २६१० आहेत आणि त्यांत एकंदर ४४३६ गांवें व जमीन १६९३९६७ एकर आहे; अयोध्येंत तशा जमिनदाऱ्या ४० असून त्यांत एकंदर ७२५२ गांवें व जमीन ५११२२१६ एकर आहे; मद्रास इलाख्यांत तशा जमिनदाऱ्या १५ असून त्यांत गांवें ९४५२ व जमीन ६८९९५२८ एकर आहे.

---

## मीठ.

सर्व लोकांस व जनांवरांस अत्यंत उपयोगी व त्यांच्या आरोग्याशीं अत्यंत निकट संबंध असलेला असा पदार्थ जबर कर बसवून महाग केल्याचें श्रेय इंग्रज सरकारास आहे. इंग्रजी कापडावरची जकात काढण्याची जरूरी मुळींच नव्हती. त्या जकातीमुळें विलायती कापड महाग होतें म्हणून आम्हांस ती जकात नको असें हिंदुस्थानांतल्या लोकांचें म्हणणें कधींही नव्हतें; तरी, केवळ इंग्रज लोकांस खूष करण्याकरितां ती जकात काढून दरसाल कोट दीड कोट रुपयांचें नुकसान करून घेण्यास सरकारानें मागेंपुढें पाहिलें नाहीं. परंतु ज्या कराविषयीं सगळ्या हिंदुस्थानाची हाकाटी आहे, तो कर वाढविण्यास सरकारास कांहींच वाटत नाहीं.

एक मण मीठ पिकविण्यास इकडे खर्च सुमारें **दोन आणे** लागतो; त्या एका मणावर **अडीचरुपये** कर!! सन १८८१ सालांत लार्ड रिपन यांनीं हा कर आठ आणे कमी केला होता, परंतु, **विलायतचा** व्यापार वाढविण्याच्या उद्देशानें लार्ड डफरिन यांनीं ब्रह्मदेश घेतला, आणि त्यांत झालेला अतोनात खर्च भरून काढण्याकरितां त्यांनीं सन १८८७–८ त मिठावरचा कर वाढवून **हिंदुस्थानच्या** लोकांपासून पैसा उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु यामुळें मिठाचा खप कमी झाला आहे; आणि याच्या योगानें मनुष्यांच्या व जनावरांच्या प्रकृतीवर जो अनिष्ट परिणाम झाला असला पाहिजे, त्याचें खापर इंग्रजसरकारच्या डोक्यावर न फोडावें तर कोणाच्या?

| साल. | ब्रिटिशहिंदुस्थानांत किती मण मीठ खपलें. | मुंबई इलाख्यांत किती मण मीठ खपलें. |
|---|---|---|
| १८७९–८० | २८७९७९७७ | ६२२२३३९ |
| १८८०–१ | २८६२१०८९ | ६२४२७३६ |
| १८८१–२ | २९६२०७१५ | ६३०९८०५ |
| १८८२–३ | ३१०६०६५१ | ६९२१९७० |
| १८८३–४ | ३१५७४४२६ | ७१५०६४४ |
| १८८४–५ | ३२५३१०२० | ७१६९८९५ |
| १८८५–६ | ३२०६४८२२ | ९१४६७५० |
| १८८६–७ | ३४०७४०८८ | ८५१०७९४ |
| १८८७–८ | ३३२१६६१५ | ८२६८९१९ |
| १८८८–९ | ३१३९५००० | ६८१५९२२ |
| १८८९–९० | ३३०९३००० | ७५५१००८ |

आलीकडे मिठाचा खप थोडा वाढत चालला आहे खरा; तरी, जकात कमी होती तेव्हां ज्या मानानें तो खप वाढत होता, त्या मानानें तो आतां वाढत आहे काय? तसेंच, सरकार म्हणतें त्याप्रमाणें लोकांस मिठाचा कर जर बिलकुल जाचत नसता, तर, मिठाची माती घेणारांस, मिठाच्या मातीची पुरचुंडी भाजीच्या भांड्यांत घालून भाजीला चव आणणारांस शिक्षा करण्याचा प्रसंग सरकारास आला नसता,

आणखी अशी माती गरीबांनीं घेऊं नये म्हणून पाहाऱ्याकरितां सरकारास जें मोठें खातें ठेवावें लागलें आहे, तें ठेवावें लागलें नसतें.

या मिठावरच्या जकातीमुळें लोकांचें नुकसान झालें आहे, कीं नाहीं तें थोडेंसें कळण्यास आतां येत्यावर्षी खानेसुमारी व्हावयाची आहे, तिच्यावरून समजलेली लोकसंख्या चांगलें साधन होईल.

ठाणे.

## अबकारी.

यांत गांजा व दारू यांचा समावेश होतो. यांपासून उत्पन्न पुष्कळ वाढलें आहे व वाढत चाललें आहे. अबकारीव्यवस्थेच्या संबंधानें मि. केन, मि. वाचा, वगैरे गृहस्थांनीं पुष्कळ टीका केल्यावरून सरकारानें नुकताच त्यांस जबाब म्हणून एक मोठा खरीता प्रसिद्ध केला आहे. त्यांत सरकार म्हणतें कीं, उत्पन्न वाढत चाललें आहे, तें जनसमूह जास्त दारूबाज झाल्यामुळें नव्हे, तर लपून दारू तयार करण्याचा प्रतिबंध केल्यामुळें, दारूवरचा कर एकंदरींत वाढविल्यामुळें, व इंग्रजी शिकलेल्या लोकांत मद्यप्राशनाचा प्रसार होऊन विलायती दारूचा खप जास्त झाल्यामुळें वाढलें आहे.

विलायती दारूवरचा कर सन १८७१ पासून १८७५ पर्यंत दर ग्यालनास ३ रु० होता, सन १८७६ पासून सन १८८६ पर्यंत ४रु० होता; व १८८६ पासून ५ रुपयांप्रमाणें कर घेतला जात आहे. तरी ती कशी जास्त खपत आहे, तें खालीं दिलेल्या कोष्टकावरून दिसेल:—

| वर्ष. | ग्यालन. | कस्टम्सचें उत्पन्न. |
|---|---|---|
| १८७०–१ | ४६१३२३ | १८४३०९० |
| १८७५–६ | ७०४८७४ | २२५६६७० |
| १८८०–१ | ८४८२३८ | ३०७९०५० |
| १८८५–६ | ९३६९८४ | ३६३०७५० |
| १८८६–७ | १०६४३८६ | ४२९७०८० |
| १८८७–८ | १०८४४८७ | ४६२९३५० |
| १८८८–९ | १११९३६७ | ४८६८५४० |

म्हणजे, या १८ वर्षांत जकातीचा दर शेंकडा ६६ वाढविला; तरी खप शेंकडा १४२ प्रमाणें वाढून, उत्पन्न शेंकडा १६१ प्रमाणें वाढलें !

तुकताच परवां गेल्या एप्रिलच्या आरंभापासून सदरील कर १ रुपया वाढवून ६ रुपये केला आहे.

या आपल्या इलाख्यांतल्या देशी दारूच्या व ताडीच्या दुकानांची संख्या येथें खालीं दिली आहे:—

| साल | दारूचीं दुकानें. | ताडीचीं दुकानें. |
|---|---|---|
| १८७४–५ | ३८३२ | ११३७ |
| १८७९–८० | ३२९५ | ५५३ |
| १८८४–५ | ३४४० | १०७६ |
| १८८५–६ | ४६६७ | १३२६ |
| १८८६–७ | २६७७ | १२४१ |
| १८८७–८ | ३३४८ | १६८१ |

मुंबईसरकारचें देशी दारूपासून उत्पन्न किती आहे, तें खालीं जिल्हेवार दाखविलें आहे.

| | रु० | | रु० |
|---|---|---|---|
| मुंबईशहर. | २१८०००० | विजापुर. | १९०००० |
| सुरत. | ८४६००० | नाशिक. | १७७००० |
| टाणें. | ६६१००० | सोलापुर. | १७१००० |
| खानदेश. | ५३१००० | भडोच. | १५५००० |
| पुणें. | ५०००००० | अमदाबाद. | १४०००० |
| धारवाड. | ४५८००० | सातारा. | १०५००० |
| बेळगांव. | ४३६००० | अहमदनगर. | ७०००० |
| कुलाबा. | २९३००० | खेडा. | ६१००० |
| कानडा. | २२२००० | पंचमहाल. | ४७००० |
| रत्नागिरी. | १९८००० | एकूण. | ७४४१००० |

## ७. व्यापार.

व्यापार म्हणजे माल विकणें आणि माल विकत घेणें. हा व्यापार हिंदुस्थानांत पूर्वी जो होता, त्यापेक्षां आतां पुष्कळ अधिक झाला

आहे, आणि तो दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तो पूर्वींच्या राज्यांत वाढला नाहीं, आणि आतां वाढत आहे, ह्याचें कारण हें कीं, पूर्वींच्या राज्यांत शांतता कमी असे, आणि तेव्हांच्या राज्यकर्त्यांचें लक्ष व्यापाराकडे नव्हतें. परंतु सध्याच्या राज्यकर्त्यांचें लक्ष व्यापाराकडे फार आहे आणि तसें असणें योग्य आहे. चाळीस पन्नास वर्षांच्या मागें **लार्ड मेकाले** ह्यांनीं पार्लमेंटामध्यें स्पष्ट ह्मणून दाखविलें कीं, "**हिंदुस्थानांतल्या लोकांनीं आमचा राज्याधिकार न मानिला, तरी त्याविषयीं फारशी परवा करण्याचें प्रयोजन नाहीं; त्यांनीं आमचा माल विकत घेतला ह्मणजे झालें.**" एवढा ओढा व्यापाराकडे असल्यावर, आणि राजसत्ता स्वाधीन असल्यावर, समुद्रावरचा व्यापार मोठ्या झपाट्यानें वाढावा, ह्यांत कांहीं नवल नाहीं. तो कसा वाढत चालला आहे तो पाहा. यांत सोन्यारुप्याचाही समावेश केला आहे.

| वर्ष. | माल बाहेरून आला, रु०. | माल बाहेर गेला, रु०. |
|---|---|---|
| १८६०–१ | ३४१७०७९८० | ३४०९०१५४० |
| १८८०–१ | ६२१०४९८४० | ७६०२१०४३० |
| १८८३–४ | ६८१५७२११० | ८९१८६३९७० |
| १८८६–७ | ७२८३०६७०० | ९०१९०६३३० |
| १८८७–८ | ७८८३०४६८० | ९२१४८२७९० |

बाहेरचा कांहीं माल हिंदुस्थानच्या बंदरांत येऊन पुनः इराणासारख्या जवळच्या देशांस पाठविला जातो, त्याचीही किंमत वर दिलेल्या आंकड्यांत आली आहे.

या वर दिलेल्या एकंदर आंकड्यांवरून बाहेरच्या देशांशीं आपल्या हिंदुस्थानाचा व्यापार किती झपाट्यानें वाढत आहे तें स्पष्ट आहे. तशीच दुसरी एक गोष्ट लक्षांत येते. ती ही कीं, आयात मालाच्या किंमतीपेक्षां हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या मालाची किंमत जास्त होत आहे. असें होणें हें देशास कल्याणकारक आहे, किंवा देशामध्यें जास्त किंमतीचा माल येणें हें कल्याणकारक आहे, या संबंधाचा विचार करितांना, जकातीच्या वगैरे संबंधानें आपला देश ग्रेटब्रिटन व ऐ-

रलंड देशांसारखाच आहे ह्मणून, त्या देशांच्या व्यापाराची काय स्थिति आहे तें पाहाणें अवश्य आहे. त्या देशांचे कांहीं वर्षांचे आंकडे येणेप्रमाणें:—

| वर्ष. | बाहेरचा माल देशांत खपला–पौंड. | देशांत उत्पन्न झालेला माल बाहेर पाठविला–पौंड. |
|---|---|---|
| १८७९ | ३०५७४०२६९ | १९१५३१७५८ |
| १८८२ | ३४७८२६०५६ | २४१४६७१६२ |
| १८८५ | ३१३६०८७६१ | २१३०४४५०० |
| १८८८ | ३२१९६८५७९ | २३३७२३९३७ |

म्हणजे, ग्रेटाब्रिटन व ऐरलंड यांतून दरसाल जो माल बाहेर जातो, त्याच्यापेक्षां कोट्यवधि रुपयांचा जास्त माल त्या देशांत येतो. आणि देशांतून बाहेर पाठविलेल्या एकंदर मालाच्या मोबदला बाहेरचा माल देशांत येतो, हें संपत्तिशास्त्राचें तत्व जर खरें धरलें तर त्या देशांस त्यांच्या व्यापारापासून फार मोठा फायदा होत आहे असें म्हटलें पाहिजे. खरें म्हटलें असतां सर्व देशांचें असेंच होत असलें पाहिजे. कारण व्यापारीलोक माल बाहेर पाठवितात, ते कमी किंमतीचा माल मोबदला मिळावा ह्मणून पाठवीत नाहींत, तर, जास्त किंमतीचा माल येऊन नफा व्हावा म्हणून पाठवितात. बेलजम, डेन्मार्क, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, इटली इत्यादि देशांत तयार करून बाहेर पाठविलेला माल व त्या देशांत खपण्याकरितां बाहेरून आणिलेला माल यांच्या किंमतीचे आंकडे जर ताडून पाहिले, तर आयात मालाचीच किंमत जास्त आहे असें दिसून येतें. आणि हिंदुस्थानाचेंही तसेंच होत असलें पाहिजे. परंतु हिंदुस्थानाला विलायतेस जो कोट्यवधि रुपयांचा खर्च करावा लागतो, त्यासारखा खर्च दुसऱ्या कोणत्याही देशास करावा लागत नसेल. या खर्चाबद्दल मालाची एक तनसुडीदेखील परत येत नाहीं. शिवाय आमचा माल परदेशांत नेऊन पोंचविण्याचीं जीं साधनें आहेत, तीं सर्व परकीयांच्या हातांत आहेत. म्हणजे समजा, इकडून विलायतेस गेलेलें धान्य मूळ किंमतीच्या दुपटीनें जरी विकत

असलें, तरी या फेरापैकीं बहुतेक भाग आगबोटवाले व रेलवे कंपन्या यांच्या पदरांत पडतो. इंग्लंडाची गोष्ट अगदीं उलटी आहे; पेन्शनांच्या वगैरे रूपानें कोट्यवधि रुपये अनायासें ( कारण हिंदुस्थान काबीज करण्यांत इंग्लंडाची **एक कवडीही** खर्च झालेली नाहीं ) घरांत येतात, स्वतःच्या सैन्याचा बराच खर्च हिंदुस्थानांतून भागतच असतो, शिवाय, इंग्रजांनीं बाहेरच्या राष्ट्रांस जे कोट्यवधि रुपये कर्जाऊ दिलेले आहेत, व जें भांडवल परदेशांत घातलेलें आहे, त्याचें व्याज येतच असतें.

परंतु याठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं, युनैटेड स्टेट्सच्या आयात व निर्गत मालाचे आंकडे पाहिले तर सन १८८८ शिवाय करून गेल्या दाहा वर्षांत निर्गतमालाची किंमत जास्त आहे असें दिसतें. यावरून असें म्हणावें लागतें कीं, देशांत जास्त किंमतीचा माल येणें चांगलें किंवा देशांतून जास्त किंमतीचा माल जाणें चांगलें, याचा विचार करण्यास हल्लीं मिळतात त्यापेक्षां जास्त तपशीलवार आंकडे मिळाले पाहिजेत.

निरनिराळ्या देशांचा माल इकडून तिकडे नेण्याचें काम इंग्लिश तारवें करतात तितकीं दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राचीं तारवें करीत नाहींत. ह्मणून त्यांचें व्यापारी तारवांचें आरमार फारच मोठें झालें आहे. सध्या, आगबोटी व गलबतें धरून, एकंदर १७७२३ इंग्लिश तारवें व्यापारांत गुंतलीं आहेत, आणि त्यांवर एकंदर २०२५४३ लोक कामावर आहेत.

हिंदुस्थानाच्या व्यापाराची मुख्य घडामोड इंग्लंडाशीं चालू आहे. सन १८८७–८ त हिंदुस्थानांतून समुद्रमार्गें सुमारें ब्याण्णव कोटींचा माल परदेशास गेला, त्यापैकीं सवापस्तीस कोटींचा माल विलायतेस गेला; सवासात कोटींचा फ्रान्सास, साडेचार कोटींचा इटालीस, तीन कोटींचा बेल्जमास, सवातीन कोटींचा ईजिप्तदेशास, पावणेचार कोटींचा अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांत, व तेरा कोटींचा चीनदेशास गेला.

बाहेर जाणाऱ्या मालाचें मान कसें वाढत चाललें आहे, तें खालीं दिलेल्या कांहीं ठोक आंकड्यांवरून दिसून येईल.

| जिन्नस. | किती गेला तें. | | जिन्नस. | किती गेला तें. | |
|---|---|---|---|---|---|
| | १८७८–९ | १८८७–८ | | १८७८–९ | १८८७–८ |
| | रु० | रु० | | रु० | रु० |
| काफी. | १५४८०००० | १५३९०००० | कातडीं. | ३०९७०००० | ४८६००००० |
| चाहा. | ३१७००८०० | ५३०२०००० | शिंगें. | १३९८००० | १६८१००० |
| कापूस. | ७९१४०००० | १४४१३०००० | सोरा. | ३६२०००० | ३६४०००० |
| कापसाचें सूत. | ९३७७००० | ४१४७०००० | तेलाचीं धान्यें. | ४६८२०००० | ९३९९०००० |
| कापसाचें कापड. | १६४४०००० | २७९९०००० | लाख. | ३०००००० | ५०००००० |
| नीळ. | २९६००००० | ३८९००००० | ताग. | ३८००४२६० | ६०४०३७९० |
| तांदूळ. | ८९७९०००० | ९२९१०००० | तागाचे पदार्थ. | १०९८४३४० | १७४६४०७० |
| गहूं. | ५२०००००० | ५५६२००१० | मसाल्याचे पदार्थ. | ३९७३६४० | ७४३५६३० |
| अफू. | १२९९४०००० | १००६७०००० | | | |
| लोंकर. | १११००००० | १४९५०००० | लोंकरीचे पदार्थ | २०२२८९० | १६९७२८० |

व्यापाराच्या संबंधानें पुष्कळ माल बाहेर जाणें हें अकल्याणकारक नाहीं, असें इतर राष्ट्रांच्या स्थितीवरून अनुभवास आलें आहे. ह्याचें उत्तम उदाहरण आस्त्रेलिआ आहे. हें प्रथम शोधून काढिलें तेव्हां तेथले लोक रानटी होते. शेतकी नव्हती, रस्ते नव्हते, आगगाड्या नव्हत्या, इमारती नव्हत्या, कांहीं नव्हतें. तेथले लोक आपला माल बाहेर पाठवीत नसत, आणि बाहेरचा माल आणीत नसत. परंतु आतां तेथें हजारों मैल आगगाडीची सडक आहे, मोठालीं शहरें वसलीं आहेत, व कोट्यावधि रुपयांची घडामोड इतर देशांशीं चालली आहे. आतां हा देश मूळच्यापेक्षां दरिद्री झाला आहे असें म्हणावयाचें काय? नाहीं; परंतु आतां प्रत्येक मनुष्यास श्रम करून व आपला पैसा उत्पादक कृत्यांकडे लावून त्यांपासून आपणास जास्त सुख करून घेतां येत आहे.

सन १८८७–८ सालीं, समुद्रमार्गें, एकंदर सुमारें शाहात्तर कोटि रुपयांचा माल हिंदुस्थानांत आला. पैकीं छप्पन कोटि सत्याऐशीं लक्षांचा माल एकट्या विलायतेहून आला; व मारिशस बेटांतून दीड कोटींचा, अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांतून दोन कोटींचा, चीनदेशांतून पांच कोटींचा, व सुमात्रा वगैरे बेटांतून सवादोन कोटींचा माल आला.

या आयात मालाचें मान कसें वाढलें आहे तें खालीं दिलेल्या कोष्टकावरून समजण्यांत येईल:—

| जिन्नस. | १८७८–९ | १८८७–८ |
|---|---|---|
| | रु० | रु० |
| कापसाचें कापड. | १४१२६७८४० | २३९२४४६७० |
| सूत. | २७७९७७२० | ३५८१९०६० |
| दगडीकोळसा, कोक वगैरे. | ८८९४७७० | १६६३९११० |
| पुस्तकें, कागद व स्टेशनरी. | ५११७२८० | ८१९१४५० |
| औषधें. | २७७४६३० | ३३७६७७० |
| रंग. | ९६३७७० | ३८१४५५० |
| कांच. | ३१८७०४० | ५७८९५९० |
| यंत्रें. | ८६३४५५० | १८००२१८० |
| लोखंड. | १४४६०१५० | २४४७३९५० |
| तांबें. | १२८४१६९० | २००१९२८० |
| तेलें. | ३६९८६५० | १४८६७९०० |
| रेशमी कापड. | ९२४०४४० | १७४३८१८० |
| साखर. | १४८०८८१० | २११३६१७० |
| चाहा. | १३०५२८० | २६०४१८० |
| छत्र्या. | २३७९५८० | ३७१३००० |
| लोंकरीचें कापड. | ८७८०४२० | १७१५७५५० |

वर दिलेल्या आंकड्यांवरून, आयात मालाच्या किंमतीची कल्पना होते; परंतु त्यांचें परिमाण कसें वाढत चाललें आहे तें समजत नाहीं. म्हणून खालीं कांहीं ठोक आंकडे दिले आहेत—

| जिन्नस. | १८७८–९ | १८८७–८ |
|---|---|---|
| कोळसा, कोक, वगैरे. | पावणेपांच लक्ष टन. | साडेआठ लक्ष टन. |
| कापसाचें सूत. | तीन कोटि एकतीस लक्ष पौंड. | पांच कोटि पंधरा लक्ष पौंड. |
| ,, कापड. | एक अब्ज पावणेतेरा कोटि यार्ड. | एक अब्ज त्र्यायशीं कोटि यार्ड. |
| कांच. | पावणे सत्तावीस लक्ष चौरस फूट. | पावणे साठ लक्ष चौरस फूट. |
| दारू. | साडे बावीस लक्ष ग्या०. | छत्तीस लक्ष ग्यालन. |
| लोंकरीचें कापड. | शाहात्तर लक्ष यार्ड. | एक कोटि अडतीस लक्ष यार्ड. |
| लोंकर. | सवा सत्तावीस लक्ष पौंड. | पावणे पस्तीस लक्ष पौंड. |
| शाली. | सवा चार लक्ष. | पांच लक्ष पंधरा हजार. |
| लोखंड. | एक लक्ष अठरा हजार टन. | दोन लक्ष सोळा हजार टन. |
| केरोसीन. | ७९–८० सालीं पांसष्ट लक्ष ग्यालन. | तीन कोटि ग्यालन. |
| मीठ. | पावणे तीन लक्ष टन. | सवाचार लक्ष टन. |
| कच्चें रेशीम. | अठरा लक्ष पौंड. | सव्वीस लक्ष पौंड. |
| रेशमी कापड. | पावणेएकुणनव्वद लक्ष यार्ड. | दीड कोटि यार्ड. |
| मसाल्याचे पदार्थ. | साडे तीन कोटि पौंड. | चार कोटि पौंड. |
| साखर. | सवानऊ लक्ष हंड्रेडवेट. | अठरा लक्ष हंड्रेवेट. |
| चाहा. | अठरा लक्ष पौंड. | छत्तीस लक्ष पौंड. |

हिंदुस्थान हें एक फार मोठें गिऱ्हाईक इंग्लंडाला सांपडलें आहे. आणि त्याच्या योगानें इंग्लंडास लाखों रुपये मिळत आहेत. आणखी हा पर्याय दिवसेंदिवस वाढत चालला आहे असें दिसतें. [illegible]नसन साहेब ह्मणतात कीं, "गेल्या पांच वर्षांत विलायतेंत व हिंदुस्थानांत पहिल्याच्या दुप्पट खपूं लागले आहेत." हें मान जर वाढत चाललें तर शेवटीं होणार तरी काय ?

आमच्या देशाचा व्यापार फार मोठा आहे, असें पुष्कळ लोकांच्या बोलण्यांत येतें. परंतु, इतर देशांच्या व्यापाराच्या मानानें पाहिलें असतां, त्याची अवस्था वाईट आहे, असें दिसतें. त्याचें सरासरी मान असें:—

| | पौं. | शि. | पे. | |
|---|---|---|---|---|
| हालंड ह्याच्या व्यापाराचें सरासरी दरमाणशीं मान ... ... | ३० | २ | ० | पडतें. |
| बेलजम ... ... ... ... ... | २१ | १ | ० | —. |
| ग्रेटब्रिटन ... ... ... ... ... | १६ | ० | ० | —. |
| फ्रान्स ... ... ... ... ... | ९ | ० | ० | —. |
| जर्मनी ... ... ... ... ... | ७ | ० | ० | —. |
| रशिआ ... ... ... ... ... | १ | १० | ० | —. |
| आणि **हिंदुस्थान** ... ... ... | ० | १० | ० | —. |

ह्यावरून एक गोष्ट लक्षांत ठेवावी. ती ही कीं, आपल्या ह्या देशाचा व्यापार जरी आपणांस एवढा मोठा दिसत आहे, तरी तो इतर राष्ट्रांच्या मानानें अगदीं लहान आहे. आतां, हा व्यापार वाढविण्यास सरकारानें व लोकांनींही प्रयत्न केला पाहिजे. मांचेस्टरच्या व्यापाऱ्यांच्या केवळ आपलपोट्या ओरडीस भिऊन सरकारानें कारखान्यांच्या कामांत विनाकारण प्रतिबंध आणूं नयेत. आस्ट्रेलिआ, कानडा, वगैरे इंग्लंडांतल्या ताब्यांतील देशांनीं, आपले कारखाने चांगले चालण्याकरितां आयात मालावर जबर जकात बसवावी, आणि आमच्या सरकारानें निराश्रित हिंदुस्थानाची आयात मालावरची जकात काढून, मिठासारख्या अत्यंत आवश्यक पदार्थावरची जकात वाढवावी, हें त्या सरकारास शोभतें

काय ? महाबळेश्वरचे धावडी लोक तेथें लोखंड काढून उत्तम प्रकारचे तवे करीत असत हें पाहून सर रिचर्ड टेंपल यांचें डोकें उठून त्यांनीं त्या उद्योगास आडकाठी आणिली. याच रीतीनें उद्योगास आश्रय द्याव-याचा काय ? सरकारानें असें करूं नये. शिवाय त्यांनीं निरनिराळ्या प्रकारचे धंदे शिकण्याकरितां लोक बाहेर देशीं पाठविले पाहिजेत.

लोकांनींही आपलें लक्ष उद्योगाकडे जास्त लाविलें पाहिजे. उ-त्तम प्रकारचा कापूस पिकवून विलायतेसारखें तलम कापड काढ-ण्याचा, चहाची, काफीची वगैरे लागवड करण्याचा, कांच काम, घड्याळें व इतर यंत्रें तयार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असा उद्योग पार्शी व भाटे लोकांनीं बराच चालविला आहे, त्यांचें अनुकरण इतरांनीं केलें पाहिजे. सोन्यारुप्याचा खप हिंदुस्थानांत फारच आहे; बाहेर देशांतून दरसाल येणाऱ्या एकंदर सोन्यारुप्याचें मान हिंदुस्थांतल्या प्रत्येक म-नुष्यास सुमारें आठ आणे बसतें; आणि विलायतेंतल्या प्रत्येक मनुष्यास केवळ पांच आणे बसतें ! ! आणि उत्पन्न पाहिलें तर या देशांत प्र-त्येक मनुष्याचें उत्पन्न सत्तावीस रुपये आहे, आणि विलायतेंतल्या प्रत्येक मनुष्याचें उत्पन्न तीनशें तीस रुपयांचें आहे ! ! यावरून, आह्मी पैसा व्यापाराकडे न लावतां सोन्यारुप्यांत फार गुंतवून ठेवितों हें उघड आहे.

---

## कापसाच्या गिरण्या.

आपल्या हिंदुस्थानांत जे नवीन कारखाने चालू झाले आहेत त्यांत कापसाच्या गिरण्या प्रमुख होत. चाहा, नीळ, काफी इत्यादिकांचे कारखान्यांची पुष्कळ भरभराट आहे, परंतु ते कारखाने बहुतकरून सर्व परकीयांच्या हातांत आहेत. कापसाच्या गिरण्या मात्र बऱ्याच आमच्या लोकांच्या हातीं आहेत. सगळ्या हिंदुस्थानांत एकंदर ११४ कापसाच्या गिरण्या आहेत; त्यांत एकंदर २४८८८५१ चात्या व १९४९६ माग आहेत आणि एकंदर ८२३७९ लोक कामावर आहेत. गेल्या वर्षी त्यांत एकंदर एक लाख अडतीस हजार टन कापूस ख-पला. या गिरण्यांत तयार झालेल्या सुताचा व कापडाचा विशेष खप हिंदुस्थानांत नसून चीन, जपान, आफ्रिकेचा पूर्व किनारा येथें होत असतो. ह्मणून, या उद्योगाची शाश्वती सांगतां येत नाहीं.

वर सांगितलेल्या ११४ गिरण्यांपैकीं ५२ मुंबई बेटांत आहेत; त्यांत १४५७०१५ चात्या व १२७५२ माग चालू असून ४७७८९ लोक कामावर आहेत. शिवाय नवीन ९ गिरण्यांचें काम अजून पुरें झालेलें नाहीं. मुंबई बेटव्यतिरिक्त बाकीच्या मुंबई इलाख्यांत २२, वऱ्हाडमध्यें २, मध्य प्रांतांत ३, निजामशाहींत २, मध्यहिंदुस्थानांत १, बंगाल्यांत ६, वायव्य प्रांतांत ५, मद्रास इलाख्यांत ९, त्रावणकोरांत १, म्हैसुरांत २, आणि पांडिचेरींत १, येणें प्रमाणें कापसाच्या गिरण्या आहेत.

सगळ्या हिंदुस्थानांत सन १८७६ सालीं ४७ गिरण्या होत्या, त्या १८८० सालीं ५६ झाल्या, त्या १८८५ सालीं ७९ व १८८८ सालीं ११४ झाल्या.

मुंबई इलाख्यांत कापसाच्या गिरण्या सन १८६९ पर्यंत १३ होत्या, त्या सन १८७२ त १५, सन १८७५ त ३६, सन १८८३ त ५१, व सन १८८८ त ७४ झाल्या.

या संबंधानें, विलायतेंतल्या सुताच्या व कापडाच्या गिरण्यांचे कांहीं आंकडे दिले असतां तुलना करण्यास बरें पडेल. ह्मणून ते आंकडे देतों. ग्रेट ब्रिटन व आयर्लंड हीं मिळून अशा एकंदर ७४६५ गिरण्या आहेत. त्यांत एकंदर ५३०८०११२ चात्या असून, ७७३७०४ माग आहेत, आणि स्त्रीपुरुष मिळून १०३४९११ लोक कामावर असतात. तिकडे एक स्त्री सहा माग चालविते, आणि आमच्याकडे एक पुरुष फक्त दोन माग चालवितो!

---

## जाइंटस्टाक कंपन्या.

लहान लहान पुष्कळ भांडवलें एके ठिकाणीं करून एक मोठें भांडवल उभारण्याची कल्पना आतां लोकांत बरीच पसरत चालली आहे, तरी या कल्पनेचा आम्हां दाक्षिणात्यांवर अजून चांगलासा परिणाम झालेला दिसत नाहीं.

याप्रमाणें अनेक भांडवलें एके ठिकाणीं करून स्थापिलेल्या मंडळ्यांपैकीं ज्यांस कंपनीच्या आक्टाबरहुकूम रजिस्टर केलें आहे, त्यांची संख्या सगळ्या हिंदुस्थानाची मिळून सन १८८८–९सालीं ८९५ होती,

आणि त्यांत एकंदर भांडवल २२९९७५०७७ रु० गुंतलेलें होतें. या ८९५ मंडळ्यांपैकीं २३४ बंगाल्यांत, २२३ मुंबई इलाख्यांत, २६६ मद्रास इलाख्यांत, व बाकीच्या पंजाब, आसाम, वगैरे प्रांतांत होत्या. ह्मणजे, मंडळ्यांच्या संख्येच्या मानानें मद्रास इलाखा पहिला येतो, आणि बंगाला दुसरा येऊन मुंबई तिसरी येते. परंतु भांडवलाच्या मानानें अनुक्रम वेगळाच लागतो:—

| इलाखा. | भांडवल रु०. |
|---|---|
| मुंबई. | ९८७४३३८२ |
| बंगाला. | ९७७८७०६८ |
| मद्रास. | १६७९०३५८ |

या रजिस्टर केलेल्या मंडळ्यांचे वर्ग धंद्यांप्रमाणें केले असतां या गोष्टी दिसून येतातः— **पेढ्या** व पैसा कर्जाऊ देणाऱ्या कंपन्या ३१४ आहेत, व त्यांचें भांडवल सवातीन कोटि रुपयांचें आहे. **विम्याच्या** मंडळ्या १७ असून त्यांचें भांडवल साडे एकवीस लाखांचें आहे. **कोऑपरेटिव मंडळ्या** सगळ्या **वीस** आहेत. या मंडळ्यांची संख्या हिंदुस्थानास फारच लहान आहे. अशा मंडळ्यांच्या योगानें अगदीं गरीब लोकांस आपली दीडकीदुगाणी व्यापारांत घालण्यास मार्ग सांपडतो, आणि त्यांस माल चांगला मिळून त्यांचें हित होतें. युरोपांत आशा लहान लहान मंडळ्या असंख्य असून त्यांपासून तिकडच्या गरीब लोकांचा फार नफा होत आहे. रजिस्टर केलेल्या **कापसाच्या गिरण्या** ५८ आहेत, व त्यांचें भांडवल सुमारें चार कोट रुपयांचें आहे. **चाहाची** लागवड करणाऱ्या मंडळ्या १२९ असून त्यांचें भांडवल सुमारें साडे तीन कोटि रुपयांचें आहे; **काफी** व सिंकोना, ह्यांच्या ७ असून भांडवल ५ लाख आहे; व या दोन्ही बहुतकरून युरोपियन लोकांच्या हातांत आहेत. बाकी **खाणकामाच्या २०, बर्फाच्या १३, व साखरेची १** अशा रजिस्टर केलेल्या मंडळ्या आहेत.

जाइंट स्टाक मंडळ्यांची संख्या येणेंप्रमाणें वाढली आहे:-इ०स०

१८८०–८१ त ४७५ होती, ती १८८४–५ त ९६ झाली; नंतर १८८६–७ मध्यें ८८८ होऊन १८८८–९ सालीं ८९५ झाली आहे. सुधारणा पुष्कळ झाली आहे, परंतु आणखी व्हावयास पाहिजे आहे. एतद्देशीय लोकांच्या मंडळ्या जास्त निघाल्या पाहिजेत.

---

## ८. दारिद्र्य.

हिंदुस्थानांतले लोक फार गरीब आहेत. त्यांचें वार्षिक उत्पन्न, सरासरीच्या मानानें फार कमी आहे. तें इतर देशांपेक्षां किती कमी आहे तें पाहाः—

| | पौं. | शि. | पे. | |
|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन ह्यांत दरमाणसाचें सारासरीचें उत्पन्न ... ... | ३३ | १० | ४ | आहे. |
| हालंड ... ... ... ... ... | २६ | १ | २ | —. |
| फ्रान्स ... ... ... ... ... | २३ | १ | ० | —. |
| डेनमार्क ... ... ... ... ... | २२ | १ | ६ | —. |
| बेलजम ... ... ... ... ... | २१ | ३ | ४ | —. |
| जर्मनी ... ... ... ... ... | १८ | १४ | ६ | —. |
| स्वीडन व नार्वे.... ... ... ... | १६ | ३ | १ | —. |
| आस्त्रिया ... ... ... ... | ११ | १५ | ८ | —. |
| रशिया ... ... ... ... | ७ | १८ | ० | —. |
| तुर्कस्थान ... ... ... ... | ४ | ० | ० | —. |
| आणि **हिंदुस्थान** ... ... ... | २ | ० | ० | —. |

ह्यावरून, आपला देश उत्पन्नाच्या मानानें फार कमी आहे, हें स्पष्ट दिसून येईल.

ह्यांत एक गोष्ट विसरतां कामास नये. ती ही कीं, ही जी सरासरी काढिली आहे, ती आलीकडची आहे; म्हणजे, परदेशाच्या लोकांचा व्यापार ह्या देशांत वाढून आमच्या लोकांचा व्यापार बसल्यावरची आहे. हीच सरासरी, त्या वेळेच्या आधीं, ह्यापेक्षां पुष्कळ चांगली निघाली असती.

---

## ९. विद्याभ्यास.

हिंदुस्थानांतल्या लोकांच्या विद्याभ्यासाविषयीं फार हाल आहेत. पहाः—

| | पौं. | शि. | पे. | |
|---|---|---|---|---|
| आस्ट्रेलियांतल्या प्रत्येक विद्यार्थ्यावर दरसाल... ... ... | ५ | ८ | ० | खर्च होतो. |
| ग्रेटब्रिटनांतल्या ... ... ... ... | १ | १७ | ० | —. |
| अमेरिकेंतल्या स्वतंत्र सं०... ... ... | १ | १५ | ० | —. |
| रशियांतल्या ... ... ... ... | ० | १७ | ० | —. |
| फ्रान्सांतल्या ... ... ... ... | ० | १२ | ० | —. |
| आणि हिंदुस्थानांतल्या ... ... ... | ० | १ | ३ | —. |

आणखी लोकसंख्येच्या मानानें आमच्या देशांत विद्याभ्यास किती कमी आहे, हें पहाः—

| देश. | लोकसंख्या. | प्राथमिक शिक्षणाच्या शाळा. | विद्यार्थी. |
|---|---|---|---|
| ग्रेटब्रिटन. | २९७१००१५ | २२२६५ | ४०१९११६ |
| फ्रान्स. | ३८२१८९०३ | ८५०८७ | ६२६५५८९* |
| जर्मनी | ४६८५५७०४ | ५७४०० | ७१००००० |
| अमेरिकेंतलीं स्वतंत्र संस्थानें. | ५०४९७०५७ | ... ... ... | ११८०५६६० |
| जपान. | ३८५०७१७७ | २८५५६ | २८०२६३९ |
| बेलजम. | ५९७४७४३ | ६४०४ | ६९५१७३ |
| हिंदुस्थान. | २५३९८२५९५ | ११०२९१ | ६०३१०३१ |

* ह्यांतले २३९८०३६ इतके विद्यार्थी नादार—फी न देतां शिकत आहेत. आणखी हिंदुस्थानांत शेंकडा **पांच** विद्यार्थ्यांस फुकट शिकवितात !!

युरोपांतील कांहीं देशांतल्या मुलांपैकीं शेंकडा किती मुलें शाळेंत जात असतात हें दर्शविण्यास कोष्टक खालीं दिलें आहे:—

| देश. | शेंकडा. | देश. | शेंकडा. |
|---|---|---|---|
| ग्रेटब्रिटन. | ९० | आस्ट्रिआ–हंगारी. | ८५·६ |
| फ्रान्स. | १०० | डेन्मार्क. | ७४ |
| स्वित्सर्लंड. | १०० | पोर्तुगाल. | ४२·४ |
| जर्मनी. | ९४·५ | रशिआ. | १२·१ |
| बेलजम. | ७४·९ | स्पेन. | ६२ |
| स्वीडन. | ९४ | | |
| नार्वे. | ९३·३ | | |

आणि **हिंदुस्थानांत** शेंकडा १०·६ मुलें शिकत असतात!!

आणखी दुसरें पाहा. लिहिणें वाचणें शिकविण्याविषयीं.—

**इंग्लंडांत** सक्ती आहे; गरीबांच्या मुलांस पैसा पडत नाहीं.

**फ्रान्सांत** सक्ती आहे; पैसा पडत नाहीं.

**स्वित्सर्लंडांत** सक्ती आहे; पैसा पडत नाहीं.

**जर्मनींत** सक्ती आहे; पैसा पडत नाहीं.

**आस्त्रियांत** सक्ती आहे; गरीबांस पैसा पडत नाहीं.

**बेलजमांत** सक्ती नाहीं; पैसा पडत नाहीं.

**इतालींत** सक्ती आहे; पैसा पडत नाहीं.

**हिंदुस्थानांत** सक्ती नाहीं; पैशाशिवाय शिकवीत नाहींत.

खालीं, ब्रिटिश हिंदुस्थानांत शिक्षणाकरितां होणाऱ्या खर्चाचे व फीच्या उत्पन्नाचे कांहीं आंकडे दिले आहेत.

| साल. | सरकाराकडून झालेला खर्च रु. | लोकलफंडांतून वगैरे झालेला खर्च रु. | म्युनिसिपालिट्यांनीं दिलेला पैसा रु. | फीचें उत्पन्न. |
|---|---|---|---|---|
| १८७९–८० | ७०३४७४५ | २३७४३८२ | ३६०४८४ | ३१७८१७१ |
| १८८२–३ | ७४०१२६६ | ३४७३७६४ | ६३९५६० | ५१६९२५० |
| १८८५–६ | ८०५०१९९ | ३७०६२५१ | ११४४६६१ | ६३७६७२२ |
| १८८६–७ | ८६२८७१६ | ३७२३२५८ | १२१९९८९ | ६६३६८८६ |
| १८८७–८ | ७३६९५५६ | ४६४६६१५ | १३०९४६६ | ७३३४४६१ |

यावरून एकंदरीनें पाहतां असें दिसून येईल कीं, सरकारच्या एकंदर उत्पन्नाच्या वाढीच्या प्रमाणानें शिक्षणावर केलेला खर्च वाढत गेलेला नाहीं, परंतु स्थानिक करांचा व म्युनिसिपालिट्यांचा मात्र पैसा शिक्षणाकडे विलक्षण चढत्यामानानें खरचिला जात आहे. फीचें उत्पन्न गेल्या दाहा वर्षांत **दुपटीपेक्षां जास्त** वाढलें आहे, हें सरकारास भूषणावह व लोकांस हितावह आहे काय?

प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाचें सगळें ओझें सरकारानें लोकलफंड आणि म्युनिसिपालिट्या ह्यांजवर घातलें आहे; आणि हायस्कुलेंही कोणातरी मंडळ्यांच्या गळ्यांत अडकविण्याचा विचार चालला आहे. त्याच्या योगानें लोकांच्या मनांत असें आलें आहे कीं, हिंदुस्थानचे लोक विद्या शिकून उद्धट झाले आहेत, ह्मणून एकदांची विद्या बंद करावयाची, असें सरकारानें मनांत आणिलें आहे. पण तें खरें नाहीं.

अशी जर स्थिति आहे, तर, विद्येनें आपला देश मागें असावा, ह्यांत आश्चर्य तें कोणतें आहे? बरें; विद्या शिकण्याची लोकांत इच्छा नाहीं, असें नाहीं. इजुकेशनल कमिशनाच्या रिपोर्टांत साफ असें म्हटलें आहे कीं, "सरकारास खर्चास जर आणखी पैसा असता, तर, एकट्या मुंबईइलाख्यांत, आज ५०००० नवीं मुलें शाळांत येण्यास तयार आहेत." म्हणजे, इतकी मंडळी शिकायास तयार असून त्यांस शिकवायास कोणी नाहीं, म्हणून ती अज्ञानांत राहिली आहे. ह्याचा विचार सरकारानें–किंवा समजदार लोकांनीं अवश्य केला पाहिजे.

वरची माहिती सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानची झाली. मुंबईइलाख्याची माहिती खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

| साल. | सरकाराकडून झालेला खर्च रु. | लोकलफंडांतून झालेला खर्च रु. | म्युनिसिपालिट्यांनीं दिलेला पैसा. रु. | फीचें उत्पन्न रु. | वर्गण्या, देणग्या, कर. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|
| १८७९–८० | ११०२६३० | ६९०१३८ | ७१७९५ | २८३६१० | ९९००७९ | ३१३८२५२ |
| १८८२–३ | १२३१४४५ | ८६५२२७ | ९१५०३ | ६२७०६९ | ९९५९७८ | ३८११२२२ |
| १८८५–६ | १४०९१३८ | ६८५१५३ | २४१९९९ | ९१२०१३ | १२६८८४८ | ४५१७१५१ |
| १८८६–७ | १७८८८९१ | ७०५३७८ | २१३८२५ | ९५१३७६ | १३३६५०० | ४९९५९७० |
| १८८७–८ | १६२०१०७ | ८२०८५५ | २७८००८ | १०७५०२५ | १४१९९२५ | ५२१३९२० |
| १८८८–९ | १६५२९१६ | ८५३४६३ | ३०५२९१ | ११५४२८३ | १४८७३८४ | ५४५३३२८ |

शिक्षणावर होणाऱ्या एकंदर खर्चावरून जर मुख्य इलाख्यांचा अ-

नुक्रम लाविला, तर बंगाला पहिला येतो, मुंबई इलाखा दुसरा येतो, मद्रास इलाखा तिसरा, वायव्यप्रांत चवथा, व पंजाब पांचवा येतो.

हिंदुस्थानांत एकंदर पांच विश्वविद्यालयें आहेत; त्यांपैकीं कलकत्ता, मद्रास व मुंबई विश्वविद्यालयें जुनीं असून पंजाब व अलाहाबाद विश्वविद्यालयें नवीन आहेत.

सन १८७८–९ पासून तों १८८७–८ या दाहा वर्षांत एकंदर किती उमेदवार पास झाले त्याची माहिती खालीं दिली आहे:—

| विश्वविद्यालय. | प्रवेशपरीक्षा. | बी.ए. | एम्.ए. | कायदा. | वैद्यकी. | एंजिनिअरिंग. |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई. | ५७१२ | ११६९ | ४१ | १४५ | ७०३ | ३०३ |
| मद्रास. | १४९५१ | २०५५ | ४२ | २०७ | २९५ | ३३ |
| कलकत्ता. | ११७६८ | १८४२ | ३३९ | ७८३ | ३७७ | ४० |

## १० सैन्य.

हिंदुस्थानांतलें सैन्य मोठें आहे. त्यांत मुख्य प्रकार दोन; गोरें आणि काळें. तें कसें कमजास्त होत चाललें आहे पहाः—

| | गोरें. | काळें. | एकूण. | खर्च रु० |
|---|---|---|---|---|
| इ०स०१८५० | त.४९२८०. | २२८४४८. | २७७७२८. | ११३९००००. |
| इ०स०१८८३ | त.६३०७१. | १२७४०५. | १९०४७६. | १७४४००००. |
| इ०स०१८८८ | त.७३५५२. | १४५१७७. | २०८०७४. | २०१९१००००. |

बंड होण्याच्या आधीं काळें सैन्य पुष्कळ होतें, आणि गोरें थोडें होतें; पण बंड झाल्यापासून तें मान अगदीं उलटें करून टाकिलें आहे. एकंदरीच्या मानानें मागच्या तेतीस वर्षांत सैन्य कमी झालें आहे, पण अलीकडच्या पांच वर्षांत वाढलें आहे. ह्यांत दाहा हजार गोरें सैन्य आणि वीस हजार काळें सैन्य केवळ अफगाणिस्थानाच्या व रशियाच्या भयास्तव ठेविलें आहे.

म्यागझीन रैफल म्हणून एक नवीन बंदूक निघाली आहे, तिनें एकसारख्या एकामागून एक अशा दाहा गोळ्या सोडितां येतात. तशा बंदुका आतां इकडच्या गोऱ्या शिपायांस देत आहेत. त्या काळ्या सैन्यास देण्याचा विचार नाहीं.

ठाणे.

काळ्या लोकांवर सरकाराचा विश्वास नाहीं, म्हणून त्यांस सैन्यांतल्या मोटमोठ्या जागा मिळत नाहींत. डाक्टर मर्डक म्हणतात कीं, "काळ्या लोकांस लष्करी काम येथें शिकवावें, किंवा तें शिकण्यास विलायतेस पाठवावें. विलायतेंतल्या सैन्यशाळांत काळे लोक गेल्यानें दोन तीन लाभ होतील.

१. इंग्लिश राज्याचें सैन्यबळ कळेल, आणि त्यांस बंड वगैरे करण्याची इच्छा होणार नाहीं.

२. इंग्लिश कामदारांवर त्यांची निष्ठा विशेष बसेल, आणि ते त्यांस आपलेसे वाटूं लागतील.

३. त्यांचीं मनें प्रशस्त होतील, आणि त्यांस इंग्लिश लोकांच्या मंडळींत मिसळून राहण्याची योग्यता प्राप्त होईल."

हें पुष्कळ अंशीं खरें आहे. तें सरकारानें अवश्य करावें,

इ० स० १८५७ त बंड झालें, तेव्हां इंग्लिश सरकारानें हिंदुस्थानांतल्या सगळ्या प्रजेचीं सगळीं हत्यारें घेतलीं. असा प्रकार पूर्वीं कधीं कोठें झालेला नव्हता. असो. अशीं हत्यारें घेतल्यामुळें, हिंदुस्थानांतल्या सर्व लोकांचा अत्यंत अपमान झाला आहे, आणि त्यांस स्वसंरक्षणाची मोठी पंचाईत पडली आहे. हत्यारें नसल्यामुळें ब्रिटिश हिंदुस्थानांत माणसांचा व गुरांचा कसा संहार चालला आहे तें खालीं दिलेल्या कोष्टकावरून दिसेल—

| वर्ष. | माणसें. | | | गुरें. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जनावरांकडून. | सर्पांकडून. | एकूण. | जनावरांकडून. | सर्पांकडून. | एकूण. |
| १८७९ | २९२४ | १७३८८ | २०३१२ | ५३१३४ | १८७८ | ५५०१२ |
| १८८७ | २६०८ | १९७४० | २२३८४ | ६६१२४ | २७१६ | ६८८४० |

पुष्कळ लोकांचें म्हणणें असें आहे कीं, रयतेजवळ हत्यारें असतीं, तर सिंहव्याघ्रांकडून इतकीं माणसें व गुरें मेलीं नसतीं. तें खरें आहे.

हिंदुस्थानावर जर परचक्र आलें, तर लष्करी शिपाई लढण्याच्या कामांत गुंततील, आणि व्हालंटियर लोक युरोपियन बायकामुलांचें संर-

क्षण करितील. आणि मग आमच्या गरीब बापड्या लोकांचें काय व्हावयाचें ? कांहीं कां होईना त्यांची सरकाराला कोठें काळजी आहे ?

इंग्लिश सरकारानें प्रजेस शस्त्रें घेऊं द्यावीं. कांहीं भय नाहीं. मुसलमानी राज्यांत धर्मादिकांच्या संबंधानें एवढाले जुलूम होत असत, तरी देखील जर आह्मीं बंड केलें नाहीं, तर, तसा जुलमाचा प्रकार ह्या राज्यांत काहींएक नसतां, असल्या सुखदायक राज्यावर आम्ही उठूं, हें होईल तरी कसें ? विश्वास ही एक अजब चीज आहे. तिचा उपयोग सरकारानें करून पहावा.

---

## ११. सरकारी नौकऱ्या.

ह्या नौकऱ्यांकडे पुष्कळ पैसा उडतो; आणि त्यांतला बहुतेक पैसा युरोपियन लोकांच्या घरांत जातो.

सरकारी नोकऱ्यांच्या संबंधानें महाराणी साहेबांच्या सन १८५८ सालच्या जाहिरनाम्यांत म्हटलें आहे कीं, “आमची अशी आज्ञा आहे कीं, आमच्या रयत लोकांपैकीं जे कोणी विद्येनें, हुशारीनें व प्रामाणिकपणानें जीं जीं कामें यस्थास्थितपणें चालविण्यास लायक असतील, तीं तीं कामें, सवड असेल त्याप्रमाणें, विनदिकत व निःपक्षपातानें त्या लोकांस ज्ञात किंवा धर्म मनांत न आणतां द्यावीं.” तसें व्हावें.

डिगबी ह्या साहेबांनीं म्हटलें आहे कीं, “पगार आणि पेनशनें ह्यांजकडे एकंदर दरसाल १४००००००० रुपये उडतात. त्यांतले, हिंदुस्थानच्या लोकांच्या घरांत फारच थोडे जातात. जमिनीपासून जें उत्पन्न सरकारास होतें, तें बहुतेक सगळें इकडे जातें.”

हिंदुस्थानांतल्या सरकारी कामदारांस जे पगार मिळतात, त्यांच्या वांटणीचा तपशील कितीएक वर्षांमागें ग्रैंट साहेबांनीं मोठ्या प्रयत्नानें मिळविला होता. तो असाः—

| दरसाल पगार रु०. | युरोपियन. | युरेजियन. | आमचे लोक. |
|---|---|---|---|
| १००० पासून २४९० पर्यंत. | १८८७ | १०२१ | ५९५४ |
| २५०० पासून ४९९० पर्यंत. | १३६६ | ५२५ | १२८६ |
| ५००० पासून ९९९० पर्यंत. | २०३६ | १२९ | ३०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०००० पासून १९९९० पर्यंत. | १०५२ | १८ | ५८ |
| २०००० पासून २९९९० पर्यंत. | ३६० | २ | ० |
| ३०००० पासून ३९९९० पर्यंत. | १३५ | ० | ० |
| ४०००० पासून ४९९९० पर्यंत. | ४७ | ० | ० |
| ५०००० पासून ५९९९० पर्यंत. | २४ | ० | ० |
| ६०००० पासून ७९९९० पर्यंत. | ८ | ० | ० |
| ८०००० पेक्षां अधिक | १२ | ० | ० |

ह्यावरून सहज लक्षांत येईल कीं, ६,९२७ गोरे लोकांस ७,३३, ६७,९९० रुपये पगार मिळतो; आणि ७,६०१ आमच्या लोकांस २४,८२,९२९ रुपये पगार मिळतो. आणखी पगाराचें मान जसजसें वाढत जातें, तसतशी आमच्या लोकांची संख्या कमी कमी होत जाते, हेंही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. हें इतर खात्यांविषयीं झालें.

आतां, सर्वांत मोठ्या खर्चाचें खातें म्हटलें म्हणजे लष्करी खातें. त्यांतल्या पगारांची वांटणी कशी आहे ती पाहा.

| दरसाल पगार रु० | युरोपियन. | युरेजियन. | आमचे लोक. |
|---|---|---|---|
| १००० पासून २४९० पर्यंत, | ११२२ | १७३ | १३६५ |
| २५०० पासून ४९९० पर्यंत. | १४२४ | ६२ | २११ |
| ५००० पासून ९९९० पर्यंत. | १७३१ | १७ | १० |
| १०००० पासून १९९९० पर्यंत. | ११६७ | १ | ० |
| २०००० पासून २९९९० पर्यंत. | १०७ | १ | ० |
| ३०००० पासून ३९९९० पर्यंत. | २३ | ० | ० |
| ४०००० पासून ४९९९० पर्यंत. | ६ | ० | ० |
| ५०००० पासून ७९९९० पर्यंत. | ८ | ० | ० |
| ८०००० पेक्षां अधिक | १ | ० | ० |

जमाबंदीच्या खात्यांत इ० स० १८७० ह्या वर्षी जो पैसा पगाराकडे लागला, त्याचें सरासरीचें स्थूलमान काढिलें तर असें निघतें कीं, तेव्हां त्या खात्यांत लहानमोठे एकंदर १०९९ युरोपियन लोक होते; आणि त्यांतल्या प्रत्येकास पगार सरासरीनें ८३९० रुपये पडला; आणि त्या खात्यांत आमचे लोक एकंदर २९२८२ होते; त्यांतल्या प्रत्येकास सरा-

सरीनें पगार ३३० रुपये पडला. किंवा स्थूलमान म्हटलें म्हणजे, आमच्या २६ लोकांस, एक युरोपियन पडला; म्हणजे आमच्या सव्वीस लोकांचा पगार एका युरोपियनास लागला !

इकडे चाकऱ्या करून सुमारें आठ हजार साहेब लोक विलायतेस जाऊन राहिले आहेत. त्यांत हिंदुस्थानाच्या उत्पन्नांतून दरसाल ३५०८५९३० रुपये पावते होतात. शिवाय हिंदुस्थानाचा राज्यकारभार पाहायास सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया म्हणून एक अधिकारी विलायतेस आहे. त्याच्या कचेरीकडे दरसाल तेवीस लक्ष रुपये खरचतात. शिवाय दारुगोळा वगैरे लष्करी सामान इकडे येतें; ह्या सगळ्या बाबी मिळून विलायतेस दरसाल सोळा कोटि रुपये जातात; आणि इतकी रकम पाठविण्यास चार कोटि रुपये हुंडणावळ पडते. कोटींशिवाय बोलणें नाहीं ! !

हिंदुस्थानांत जे गोरे लोक सरकारी कामावर येतात, त्यांस ख्रिस्ती धर्माचा बोध करण्यास वेगळें ख्रिस्ती धर्मखातें आहे. त्याजकडे दरसाल १७००००० रुपये खर्च होतो. हा बहुतेक सगळा पैसा युरोपियन लोकांच्या वरांत जातो. गोऱ्या ख्रिस्ती कामदारांस धर्मोपदेश करण्यास सरकार इतका पैसा खरचतें. तसा, हिंदु, मुसलमान, पारशी कामदारांस धर्मबोध करण्यास एक पैसाही खर्चांत नाहीं. असें कां? सिलोनबेटांतला अशा प्रकारचा खर्च थोड्या दिवसांपूर्वी अगदीं बंद करून टाकिला आहे.

---

## १२. आगगाड्या.

आगगाड्यांचा रस्ता बांधण्यास आरंभ इ० स० १८४५ त झाला. तेव्हांपासून हा रस्ता वाढत वाढत चालला आहे. तो असा:—इ० स० १८५३ त २०½ मैल चालू होता; इ० स० १८६३ त २५१९ मैल चालू होता; इ० स० १८७३–४ त ५६९५ मैल चालू होता; इ० स० १८८३–४ त १०,७८४ मैल चालू होता; १८८६–७ त १४३८३ मैल चालू होता; आणि १८८८–९ त १५२४५¾ मैल चालू होता; आणखी रस्ता बांधण्याचें काम चालून आहे.

ह्या रस्त्यापैकीं सरकारचा १०,४१० मैल आहे;
कंपन्यांचा ३,८९६ ,, ,, आहे, आणि
देशी संस्थानांचा ९३९¼ ,, ,, आहे.

सन १८८८ च्या अखेरपर्यंत या लोखंडीरस्त्यांत सरकारचे रु० १,१२,०१,०६,७७६, कंपन्यांचे रु० ८०,६९,१९,८७७, व देशी संस्थानांचे रु० ६,२३,६५,७४०, एकूण रु० १,९८,९३,९२,२९३ इतकें भांडवल गुंतलेलें होतें.

सन १८८८ सालीं सर्व रेलवेनें मिळून एकंदर उत्पन्न रु० १९,७६,४४,७४९ झालें आणि काम चालविण्याचा खर्च रु० ९,८७,४३,४७४ वजा जाऊन निवळ नफा रु० ९,८९,०१,२७५ राहिला.

सन १८८७ सालीं एकंदर उत्पन्न रु० १८,४६,४७,९३७ झालें होतें आणि काम चालविण्याचा खर्च रु० ९,१५,६८,८४९ होऊन निवळ नफा रु० ९,३०,७९,०८८ राहिला होता.

या वरच्या आंकड्यावरून पाहातां एकंदरींत रेलवेंत गुंतलेल्या भांडवलावर बराच चांगला नफा (सुमारें ५ टक्के) मिळत आहे हें उघड आहे. परंतु हिंदुस्थानाच्या संबंधानें खरी गोष्ट तशी नाहीं. ह्या सर्व रेलवे बांधण्याकरितां लागलेलें बहुतेक सगळें भांडवल विलायतेंतलें असून त्याचें व्याज विलायतेस पाठवावें लागतें. आणि हुंडणावळीचा मनस्वी खर्च लागून हिंदुस्थानाचा कोट्यवधि रुपयांचा तोटा होत आहे.

सन १८४५ सालीं हिंदुस्थानांत रेलवे बांधण्याचा विचार निघाला तेव्हां इंग्लंडांतील लोकांनीं आपलें भांडवल त्या कामांत घालावें म्हणून हिंदुस्थानसरकारानें शेंकडा पांच टक्यांची हमी दिली. ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे, मद्रास रेलवे, औंध रोहिलखंड रेलवे, बडोदा रेलवे, सिंध पंजाब व दिल्ली रेलवे, पूर्वबंगाल रेलवे, आणि दक्षिणहिंदुस्थान रेलवे, (एकून ३,४६३ मैल), यांस या प्रकारची हमी आहे. या रेलवेंवर सन १८८८ च्या अखेरपर्यंत एकंदर ६२,३३,२८,३२४ रु० भांडवल गुंतलें असून त्या वर्षी त्यांवर शेंकडा ५ टक्केप्रमाणें ३,९६,८३,८५५ रुपये व्याज विलायतेस द्यावें लागलें. परंतु खर्च-

वेंच वगैरे जाऊन बाकी ३,१४,१३,२३८ रु० मात्र राहिल्यामुळें ८२,७०,६१७ रु० सरकारास आपल्या खिशांतून द्यावे लागले.

सरकारानें विलायतेंतून स्वतः कर्ज काढून बांधिलेल्या कांहीं रेलवेच्या लैनी कंपन्यांकडे दिलेल्या आहेत. त्यांचा खर्चवेंच जाऊन बाकी राहिलेला पैसा कर्जाचें व्याज विलायतेंत देण्यास पुरत नाहीं. या बाबतींत सन १८८८ सालीं सरकारास ६८,११,९९० रु० भरावे लागले.

तसेंच, कर्ज काढून सरकारानें व्यापाराच्या संबंधानें ज्या लैनी बांधिल्या आहेत, त्यांपासून मात्र बराच नफा सरकारास होतो; सन१८८८ सालीं अशा लैनींपासून २७,४०,०८९ रु० नफा झाला.

ईस्ट इंडियन रेलवे सन १८८० त सरकारानें विकत घेतली तींत गुंतलेल्या ३९,२३,६३,०६० रुपयांचें व्याज सुटून सन १८८८ सालीं ३२,७०,४९० रु० नफा राहिला.

परंतु खर्चाचें मोठें तोंड म्हटलें म्हणजे, राज्यरक्षणार्थ पश्चिम सरहद्दीवर केलेल्या लष्करी रेलवे होत. यांची एकंदर लांबी २,३८१$\frac{1}{4}$ मैल असून त्यांवर सन१८८८अखेरपर्यंत सरकारानें३९,५४,६३,४८५ रु० खर्चिले आहेत. परंतु त्यांपासून होणाऱ्या उत्पन्नानें त्या रकमेवरचें व्याज फिटत नसल्यामुळें दरसाल सरकारचें व परंपरया लोकांचें नुकसान अतोनात होत आहे. सन १८८८ सालीं या प्रकारच्या रेलवेपासून १,११,८१,७७७ रु० सरकारास तोटा झाला.

एकूण, सन १८८८ सालीं रेलवेंमुळें सरकारास २,०२,५३,४२५ रु० तोटा आला.

येणेंप्रमाणें कित्येक वर्षेंपर्यंत वर्षानुवर्ष रेलवेच्या संबंधानें हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस खळगे पडत होते; परंतु सरकार आपला जो जमाखर्च जगापुढें ठेवीत असे, त्यांत, रेलवेचें व्याज विलायतेस भरण्याच्या संबंधानें वगैरे जो लाखों रुपये खर्च होत असे, तो साधारण बाबतींत दाखल करून रेलवेंपासून लाखों रुपये नफा होत आहे असें दाखविलें जात असे. परंतु ही हातचलाखी उघडकीस आणल्याबरोबर, परदेशीं व्याज भरावें लागतें म्हणून रेलवे हें केवढें मोठें लोढणें आहे तें दिसूं लागलें आहे.

हुंडणावळीचा खर्च धरला नाहीं तर,—

सन

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८८०–१ त, | रेलवेपासून | तोटा | ५०६१२ | पौंड |
| १८८१–८२ | ,, | ,, | नफा | १०३५३४२ | ,, |
| १८८२–८३ | ,, | ,, | ,, | ४१९३४३ | ,, |
| १८८३–८४ | ,, | ,, | ,, | ७८७५३० | ,, |
| १८८४–८५ | ,, | ,, | ,, | १०७९२४० | ,, |

पांच वर्षांत निवळ नफा ३२,७०८४३ पौंड

हुंडणावळीचा वगैरे खर्च धरला तर,—

सन

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८८०–८१ | त रेलवेंपासून | | १०४४२०३ | पौंड | तोटा झाला. |
| १८८१–८२ | ,, | ,, | २८५९५५ | ,, | ,, |
| १८८२–८३ | ,, | ,, | १३०६१९४ | ,, | ,, |
| १८८३–८४ | ,, | ,, | ३०५२३९ | ,, | ,, |
| १८८४–८५ | ,, | ,, | १०५१७५१ | ,, | ,, |

पांच वर्षांत निवळ तोटा. ३,९९३,३४२ पौंड

याप्रमाणें या रेलवेंच्या पायीं आजपर्यंत हिंदुस्थानच्या प्रजेचें सुमारें **एकेचाळीस कोटि** रुपये नुकसान झालें आहे. तरी, सरकारानें व्याजाबद्दल हमी देऊन हिंदुस्थानभर रेलवेचें जाळें पसरवावें अशी इंग्रज व्यापाऱ्यांची ओरड आहेच.

हिंदुस्थान सरकारनें सार्वजनिक कामाकरितां विलायतेस होईल तितकेंकरून कर्ज काढूं नयेच असा ठराव सेक्रेटरी आफ् स्टेट यांनीं नुकताच केला आहे असें समजतें ठराव योग्य आहे.

**रेलवेचे नोकर लोक** यांच्या संबंधाची माहिती.—

| साल | नोकरांची संख्या. | | | | चालू मैल. | स्टेशनांची संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|
| | युरोपियन. | युरेजियन. | नेटिव | एकूण. | | |
| १८८७अखेर. | ४६८४ | ५०७७ | २१५२८६ | २२५०४७ | १४०६५ | १९८८ |
| १८८८अखेर. | ४६७४ | ५६०४ | २३३३०७ | २४३५८५ | १४४६३ | २०९६ |

सन १८८७ व सन १८८८ सालीं रेलवेवरून किती माल व उतारू गेले हें खालीं दाखविलें आहे;—

| साल. | उतारू. | उतारूं पासून उत्पन्न. | माल जनावरें वगैरे. | मालापासून उत्पन्न. |
|---|---|---|---|---|
| १८८७ | ९६२८९३१४ | ६०२८३४९८ रु० | २०१९५६७७ टन | ११९२७०९८९रु. |
| १८८८ | १०३१५६०१३ | ६४३५०३२१ रु० | २२३९३२०२ टन | १२७९०३९९४रु. |

दर उतारूस दर मैलास ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवेवर सरासरी १.४१ पै, वडोदा रेलवेवर सरासरी १.१७ पै, सदर्न मराठा रेलवेवर सरासरी १·७४ पै, ( सर्वांत जास्त ) आणि पूर्व बंगाल रेलवेवर सरासरी ·६ पै ( सर्वांत कमी ) इतकें भाडें पडतें. दर टन मालास दर मैलास सदरील रेलवेंवर अनुक्रमें ३·७४,३·४५,६·६१ व ४·७ पै इतकें भाडें पडतें.

आगगाड्यांच्या स्थापनेनें देशांत उद्योग वाढला आहे, आणि लोकांतलें दळणवळण वाढलें आहे, हें तर खरेंच. पण ह्याशिवाय दोन गोष्टी विशेष झाल्या आहेत. त्यांतली एक ही कीं, लोकांस वेळचे वेळीं काम करण्याची संवय अधिकाधिक लागत चालली आहे; आणि दुसरी ही कीं, जातिभेदाच्या संबंधाची चिकित्सा कमी कमी होत चालली आहे. आगगाडीच्या स्टेशनावर जायाचें म्हटलें म्हणजे आधींचीं सगळीं कामें वेळचे वेळीं करून, तेथें मनुष्यें नियमित वेळीं तयार असतात; आणि तेथें जाऊन गाडींत बसल्यावर, मी ब्राह्मण आणि हा चाम्हार, ह्यास शिवावें कसें हें विसरावें लागून, त्याला खेटून बसावें लागतें. त्याप्रमाणेंच खाण्यापिण्याच्या इतर व्यवहारांतही पुष्कळ ढिलेपणा येत चालला आहे.

---

## १३. डांक.

सन १८३७ त आपल्या महाराणीसाहेब सिंहासनारूढ झाल्या, व त्याच वर्षी हिंदुस्थानचा पोस्ट आफिसांबाबदचा कायदा पसार होऊन टपालखातें सार्वजनिक झालें. त्या वर्षापूर्वीचीं सरकारें आपापल्या उपयोगाकरितां स्वतंत्र टपाल ठेवीत असत परंतु साधारण लोकांस त्याचा उपयोग करितां येत नसे. म्हैसुरांत मात्र फार प्राचीनकाळची एक

चांगली पत्रें पोंचविण्याची सार्वजनिक व्यवस्था परवांपर्यंत चालू होती. ती आतां इंग्रजसरकारानें आपल्या खात्यांत सामील केली आहे.

सन १८५४ पर्यंत पोस्टआफिसांचें काम जिल्ह्याजिल्ह्यांतल्या कलेक्टराकडे सोंपविलेलें असे, आणि पत्रें वगैरे यांच्या हांशिलाबद्दल अंतरांच्या मानानें रोख पैसे भरावे लागत. मुंबईहून कलकत्त्यास पत्र पाठविणें झाल्यास दर तोळ्यामागें एक रुपया पडत असे.

सन १८५४ सालीं एक नवीन कायदा पसार होऊन पोस्टाची तिकिटें चालू झालीं व सर्व हिंदुस्थानभर एकच दर चालू झाला. तेव्हांपासून लोकांमधला पत्रव्यवहार एकसारखा वाढत चालला आहे. इ० स० १८५५ सालापेक्षां इ० स० १८६५ त दुप्पट पत्रें, इ० स० १८७५ त चौपट, इ० स० १८८५ त सातपट, व गेल्या वर्षी नऊ पट या वाढत्या प्रमाणानें हिंदुस्थानातला परस्परांमधला पत्रव्यवहार वाढला आहे.

इ० स० १८५८ त सगळ्या हिंदुस्थानांत एकंदर ८१० पोस्ट हपिसें होतीं व टपाल एकंदर ३६९३३ मैलांवरून न्यावें लागत असे; इ० स० १८६८ त पोस्ट हपिसें २२०५ होऊन मेललैनींची एकंदर लांबी ४९६७८ मैल झाली; इ० स० १८७८ त पोस्ट हपिसें ४१०७ होऊन, मैललैनींची एकंदर लांबी ५७,९६३ झाली; आणि इ० स० १८८८ त पोस्ट हपिसें ७,२६३ होऊन, मेललैनींची लांबी ६६९६० मैल झाली; पैकीं १४,०४३ मैल रेलवेंतून, १२,४८३ मैल आगबोटींतून वगैरे, व ४०,४३४ मैल गाड्या, घोडे, रनर्स, वगैरेंकडून टपाल न्यावें लागलें. सरकारी कामाकरितां बुद्ध्या वसविलेलीं पोस्ट हपिसें जर धरिलीं तर एकंदर पोष्ट हपिसांची संख्या आज ९,०६५ आहे; आणि एकंदर मेललैनींची लांबी १०३००० मैल आहे. शिवाय पोस्टाच्या पेट्या ११,८७८ आहेत, या सर्व पोस्ट हपिसांत आलेलीं पत्रें वंग्यावगैरे वांटण्याकरितां सुमारें १७००० पोस्टमेन व गांवपोस्टमेन आहेत.

हिंदुस्थानच्या पोस्टखात्याची लोकांच्या संबंधाची व्यवस्था अप्रतिम आहे असें म्हटलें असतां चालेल. विलायतेंत पोस्टांतून पार्सलें पाठविण्याची व्यवस्था सन १८८३ त चालू झाली. परंतु त्याच्या पूर्वी सुमारें पन्नास वर्षें तशी व्यवस्था हिंदुस्थानांत चालू होती. मनुष्यानें ठिकाण

वदललें असतां त्याच्या पत्रांवरचा पत्ता वदलून तीं पुनः पोस्टांत टाकिलीं म्हणजे त्यास जाऊन पोंचतात. विलायतेस असें करण्यावदल वेगळें हांशिल घेतात. मनीआर्डरीची सोय फार सुलभ झाली आहे. एकंदर ९,०६५ पोस्ट हपिसांपैकीं सुमारें ३०० खेरीज करून वाकी सर्व पोस्टहपिसांत मनीआर्डरी घेतात. मनीआर्डरींच्या द्वारें दरसाल सुमारें **बारा कोट** रुपये पाठविले जातात.

लोक या डांकखात्याचा कसा जास्त जास्त उपभोग घेत आहेत तें खालच्या कोष्टकावरून दिसून येईल:—

| साल. | पत्रेंवगैरे. | उत्पन्न रु० | खर्च रु० |
|---|---|---|---|
| १८७४–५ | ११६११९२३१ | ७१९५८७० | ७२९१९१० |
| १८७७–८ | १२८८२६०८० | ८३२६६६० | ७६८०८८० |
| १८८०–१ | १५८६६६८५६ | ९९९२३३० | ९६२५९१० |
| १८८३–४ | २०३३४०१९५ | १११४१९९० | १०१३४२९० |
| १८८६–७ | २५९५७०८६१ | ११५७८७८० | १३५३८६३० |
| १८८७–८ | २७४३९८६२२ | १२१४१९६० | १३७५२१५० |

तीन तोळ्यांवर वजन नसणाऱ्या वर्तमानपत्रांवरचें हांशिल सन १८८१ पासून एक पैसा केल्यामुळें वर्तमानपत्रांचा प्रसार फार वाढला आहे; ही गोष्ट खालीं दिलेल्या कोष्टकांत स्पष्ट होत आहे:—

| साल. | वर्तमानपत्रें पोस्टांतून गेलीं. ( सगळें हिंदुस्थान. ) | वर्तमानपत्रें पोस्टांतून गेलीं. ( मुंबई इलाखा. ) |
|---|---|---|
| १८८०–१ | ११९४२३०४ | १७१३१२७ |
| १८८१–२ | १२५२६८०० | १९०७८०३ |
| १८८२–३ | १४०७५६७७ | २२८९०९८ |
| १८८३–४ | १५८४८५८६ | २२९३०८६ |
| १८८४–५ | १७५०७४०७ | २५४६४४९ |
| १८८५–६ | २०३१४८१४ | २९४६९३२ |
| १८८६–७ | २१६०६६९७ | ३२५२९८४ |
| १८८७–८ | २१८३२७७५ | ३३३८१३४ |

सन १८८७–८ सालीं मद्रास व बंगाल इलाख्यांत अनुक्रमें ३२५७८६० व ३५३७२४१ वर्तमानपत्रें पोस्टांतून पाठविण्यांत आली.

## १४. म्युनिसिपालिट्या.

स्थानिक स्वराज्याची व्यवस्था लोकांकडे येण्यास मूळकारण लार्ड रिपन झाले. सध्या लार्ड रिपन यांस आवडतील अशा जरी स्थापित झालेल्या सर्वच म्युनिसिपालिट्या नाहींत, तरी, त्यांतल्या बहुतेकांतून काम चांगल्या रीतीनें व लोकहितबुद्धीनें चाललें आहे यांत शंका नाहीं असें वाटतें.

| प्रांत. | सन | म्युनिसिपालिट्यांची संख्या. | म्युनिसिपालिट्यांच्या हद्दींतील लोकांची संख्या. | उत्पन्न रुपये. | दर माणशीं उत्पन्न. |
|---|---|---|---|---|---|
| खुद्द हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांतले प्रांत. | १८८७-८ | १० | २६८२०५ | ३२७६३० | १·२२ |
| बंगाला. | १८८७-८ | १४२ | ३१२८७३२ | ६७५३९९० | २·१६ |
| आसाम. | १८८७-८ | १४ | ६७६९६ | १२१२७० | १·७९ |
| पंजाब. | १८८७-८ | १६१ | २१४१९९८ | ३२०९४६० | १·४९ |
| वायव्यप्रांत व अयोध्या. | १८८७-८ | १०९ | ३१७५९५१ | २९०५९५० | ०·९१ |
| मध्यप्रांत. | १८८७-८ | ५९ | ६९०४२६ | ७९८८४० | १·१५ |
| मद्रासइलाखा. | १८८७-८ | ५५ | १७२९८१८ | २६४१४३० | १·५३ |
| मुंबईइलाखा. | १८८६-८ | १५३ | २६७२२५० | ८४०९९६० | ३·१४ |
| ब्रह्मदेश. | १८८७-८ | २२ | ३४१६८३ | २३८६८१० | ६·९८ |
| एकूण. | १८८७-८ | ७२५ | १४४००५७१ | २७५५५३४० | १·९४ |

सन १८८७–८८ सालीं या इलाख्यांत मुंबई शिवाय करून १५३ म्युनिसिपालिट्या होत्या म्हणून वर सांगितलें. त्यांपैकीं २६ सिंधमध्यें होत्या, २९ उत्तरभागांत, ६१ मध्यभागांत व ३७ दक्षिणभागांत होत्या.

सिंधपैकीं ६ म्युनिसिपालिव्यांत मात्र लोकांकडून निवडणूक होत असते. म्हणून तिकडल्या एकंदर ३६० म्युनिसिपल कमिशनरांपैकीं ७१ मात्र लोकांनीं निवडलेले होते. उत्तरभागांतल्या म्युनिसिपालिट्यांच्या एकंदर ४२७ कमिशनरांपैकीं २४१ सरकाराकडून व १८६ लोकांकडून निवडलेले होते. मध्यभागांतल्या एकंदर ८९६ कमिशनरांपैकीं ४०८ लोकांनीं व बाकीचे सरकारानें निवडलेले होते. दक्षिणभागांतल्या एकंदर ५१५ कमिशनरांपैकीं २३१ लोकांनीं व बाकीचे सरकारानें निवडलेले होते.

म्युनिसिपालिट्यांच्या सरकाराविरुद्ध कांहीं विशेष तक्रारी नाहींत. परंतु लोकांचा एक साधारण ग्रह झालेला दिसतो कीं, सरकारच्या वतीनें जे मेंबर म्युनिसिपालिट्यांतून नेमिले जातात, ते बहुतकरून सरकारच्या म्हणण्यास नेहमीं हां म्हणणारे अज्ञान लोक असतात. पुणें व मुंबई या शहरांतून असें होत नाहीं खरें परंतु इतर गांवांतून या कागाळ्या नेहमीं ऐकूं येतात.

या इलाख्यांत मुंबईची म्युनिसिपालिटी सर्वांत मोठी आहे. मुंबई शहरची लोकसंख्या सुमारें आठ लाख आहे; व क्षेत्रफळ २२ मैल आहे. या शहरच्या म्युनिसिपल वहिवाट करणाऱ्या सभेस कार्पोरेशन म्हणतात. त्यांत एकंदर ७२ सभासद असतात. त्यांपैकीं ३६ सभासद लोकांनीं, १६ जस्टिस आफ् धि पीस यांनीं, २ युनिव्हर्सिटीनें २ चेंबर आफ् कामर्सनें निवडलेले असून बाकीचे १६ सरकारानें नेमिलेले असतात. यांपैकीं १२ सभासदांची स्टांडिंग कमिटी असते. कांहीं महत्वाचें खर्चाचें वगैरे काम अगोदर या कमिटीपुढें येऊन मग कार्पोरेशन सभेपुढें येतें. मुंबई म्युनिसिपालिटीचें उत्पन्न १८८७–८ या वर्षी ५१६६५२९ रुपये होऊन खर्च ५८१२६९० रु० झाला; व सन १८८८–९ या वर्षी उत्पन्न ४९६६१९२ रुपये होऊन खर्च ५२०१२५८ रुपये झाला.

याप्रमाणें उत्पन्नापेक्षां खर्च जास्त होत आहे. असेंच आणखी कांहीं वर्षें चाललें तर म्युनिसिपालिटीचें दिवाळें निघेल.

सध्या, मुंबईस पाणी पुरविण्यासाठीं मुंबईपासून साठ मैलांच्या अं-

तरावर तान्सा तलाव तयार होत आहे. या तलावाच्या बांधाची उंची १३० फूट व लांबी ९००० फूट असून तलावाचा विस्तार आठ चौरसमैल होणार आहे. सर्व काम १८९२ त तयार होईल. एकंदर बांधाचा, बोगद्यांचा व नळांचा वगैरे खर्च एक कोट चाळीस लाख रुपये होईल. शिवाय, आणखी ४७ लाख रुपये लागतील असा नुकताच बूट निघाला आहे!!!

## १५. सेव्हिंग ब्यांकी.

ही ब्रिटिश सरकारची एक अत्युत्तम संस्था आहे. हिच्या योगानें अगदीं गरीब माणसांस आपल्या शिलकेचा चांगला उपयोग करितां येऊं लागला आहे, आणि पैसा वाढविण्याचें एक साधन त्यांच्या आटोक्यांत आलें आहे.

सध्या चार प्रकारच्या सेव्हिंग ब्यांका चालू आहेत. प्रेसिडेन्सी ह्मणजे इलाखा शहरांतल्या ब्यांकी, रेलवे ब्यांकी, पोस्ट आफिस ब्यांकी, व लष्करी ब्यांकी. डिस्ट्रिक्ट ब्यांकी सन १८८५–६ सालापर्यंत चालू होत्या; परंतु त्यानंतर त्यांचें काम पोस्ट आफिस सेव्हिंग ब्यांकांनीं आपल्या हातांत घेतलें आहे. हल्लीं ब्यांकांची एकंदर संख्या ६१५१ आहे; पैकीं प्रेसिडेन्सी ब्यांका ३ आहेत, रेलवे ब्यांका १२ आहेत, पोस्ट आफिस ब्यांका ५९६६ आहेत, आणि लष्करी ब्यांका १७० आहेत. त्यांत लोक दिवसानुदिवस पैसा किती ठेवीत आहेत तें खालीं दाखविलें आहे:—

| साल. | पैसा ठेवणाऱ्या लोकांची संख्या. | देशीलोकांची ब्यांकेंत शिलक रु. | पैसा ठेवणाऱ्या युरोपियनवयुरेजियन लो. सं. | युरोपियन व युरेजियन यांची ब्यांकेंत शिलक रु. | सेव्हिंग ब्यांकांत एकंदर पैसा. रु. |
|---|---|---|---|---|---|
| १८८४-५ | १९०६६७ | ३५१९३८२८ | ५२३७० | ११७८५८८५ | ४६९७९७१३ |
| १८८५-६ | २०७०७० | ३७९४६३०८ | ५५८१३ | १२५२४३८५ | ५०४७०६९३ |
| १८८६-७ | २३०२२२ | ४३६२९५३२ | ५८८४३ | १३६८५७७३ | ५७३१५३०५ |
| १८८७-८ | २६६३०८ | ५०९९२७२१ | ६५४०३ | १४७८४६५४ | ६५७७७३७५ |

लोक हळू हळू सेव्हिंग ब्यांकांचा जास्त उपयोग करून घेत आहेत, हें वरील कोष्टकावरून कळून येतें. या सर्व लोकांस वर निर्दिष्ट केलेल्या सालांत पंधरापासून बावीस लाख रुपये व्याजादाखल वांटण्यांत आले.

# १६. इंग्लंडच्या वसाहती व ताबेदार संस्थानें.

ईश्वरसंकेतानुरूप ज्या देशाच्या ताब्यांत हा आमचा देश आला आहे, त्या देशांतील लोकांच्या पराक्रमाच्या योगानें त्यांस केवढें वैभव प्राप्त झालें आहे, आणि त्यांचा बादशाही अमल किती विस्तृत झाला आहे, हें खालीं दिलेल्या कोष्टकांत दर्शविलें आहे. आपलें राज्य गेलें ही वाईट गोष्ट खरी, परंतु तें जाऊन आपण या अशा अवाढव्य परंतु व्यवस्थित व जगत्प्रसिद्ध साम्राज्यांत राज्यकारणकलाकुशल राष्ट्राच्या अमलांत सामील झालों आहों, ही गोष्ट मनांत आणिली म्हणजे पुष्कळ समाधान वाटतें. आणि आह्मांस आमचे हक्क मिळून या साम्राज्याच्या राज्यप्रकरणांत हात लावण्याचा अधिकार जर मिळाला, तर आह्मांस आमच्या मागच्या राज्याची आठवणही होणार नाहीं.

महाराणीसरकारच्या एकंदर राज्यांत मिळून सुमारें दोनशें भाषा बोलणारे लोक आहेत.

खालीं दिलेल्या आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं, इतर राज्यें काबीज करण्याच्या इंग्रजलोकांच्या हांवीस युरोपांत फारच थोडी जागा मिळाली आहे. त्यांचे मनोरथ पूर्ण होण्यास माणसांनीं गजबजलेलें आमचें आशिआखंड व निर्जन असे अमेरिकेंतले, आस्ट्रेलियांतले, व आफ्रिकेंतले रानटी प्रदेश मुख्यतः साधनभूत झाले आहेत.

खालीं दिलेल्या कोष्टकांत इंग्लंडच्या वसाहती वगैरे खंडवार दिल्या आहेत.

| वसाहती वगैरे. | प्राप्त करून घेतल्याचें साल. | क्षेत्रफळ चौरसमैल. | लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| **युरोपः** | | | |
| जिब्राल्टर | १७०४ | १ ७/८ | २४२०० |
| माल्टा व गोझो | १८०० | ११७ | १६०६७९ |
| | एकूण, **युरोप** | ११८ ७/८ | १८४८७९ |

| वसाहती वगैरे. | प्राप्त करून घेतल्याचें साल. | क्षेत्रफळ चौरसमैल. | लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| **आशिआः** | | | |
| एडन | १८३८ | ७५ | ३४७११ |
| सिलोन | १७९६ | २५३६४ | २८५०००० |
| सैप्रस | १८७८ | ३५८४ | १८६१७३ |
| हांगकांग बेट | १८४३ | ३० | २००९९० |
| ब्रिटिश इंडिया | १६६५--१८८५ | १०,६४,७२० | २०१७५५९९३ |
| हिंदुस्थानांतील देशी संस्थानें | ,, | ७१४७५८ | ५५१९१७४२ |
| लाबुअन | १८४६ | ३० $\frac{१}{४}$ | ६२९८ |
| उत्तर बोर्निओ | १८८० | ३११०६ | १७५००० |
| पेरिम | १८५५ | ४ $\frac{१}{२}$ | १५० |
| सारवक | १८८८ | ३५००० | ३,००,००० |
| सुमात्रा वगैरेंतील वसाहती | १७८५--१८१९ | १४७२ | ५०६००० |
| सुमात्रांतील संस्थानें | .. | २४६६० | ५३७००० |
| इतर | | ३०२९ | माहीत नाहीं. |
| | एकूण, **आशिआ** | १९०३८३२ $\frac{३}{४}$ | २६१५६४४९१ |
| **आफ्रिका**—असेन्शन-बेट, बासुतोलँड, बेच्युअनालँड, बर्बेरा, ब्रिटिश पूर्वआफ्रिका, केपकॉलनी, ग्यांबिया, गोल्डस्कोट, लेगास, झांबेजी नदीच्या जवळचा प्रदेश, मारिशस, नेटल, सोकोट्रा, झुलूलंड इत्यादिकांचा समावेश होतो. | १६५१--१८८८. | | |
| | बेच्युअनालँड १८८५त | १६२००० | ४४१३५ |
| | पूर्वआफ्रिका १८८८त | ७५००० | माहीत नाहीं. |
| | केपकालनी १८०६-७७ | २१९७०० | १२५२३४७ |
| | झांबेजींचे प्रदेश, १८८८ त | २५०००० | माहीत नाहीं. |
| | इतर प्रदेश मिळून, एकूण, **आफ्रिका** | ७७६५६६ | ३८५७८२३ |

| वसाहती वगैरे. | प्राप्त करून घेतल्याचें साल. | क्षेत्रफळ चौरसमैल. | लोकसंख्या. |
|---|---|---|---|
| **अमेरिका**:—कानडा, बाहामा, ग्वायना, न्यूफौडलंड, जमेका वगैरें. | १५८३—१८३३ | ३६४८२५६ | ६२३५२११ |
| **आस्ट्रेलेशिआ**:—फीजिबेटें, न्यूसौथवेल्स, न्यूगिनि, न्यूझीलंड, क्वीन्सलंड, टासानिआ बेट, व्हिक्टोरिआ, वगैरे. | १७८७-१८८८ | ३२७०५३२ | ३६७५८११ |
| सर्व ब्रिटिश वसाहती व तावेदार संस्थानें मिळून— | १५८३-१८८८ | ९५९९३०५ | २७५५२०२१६ |

याशिवाय आफ्रिका खंडांत नुकताच हजारों मैल प्रदेश मिळविला आहे. म्हणजे, सध्या युरोपाच्या चारपटीहून जास्त प्रदेश इंग्लंडाच्या ताब्यांत आहे. आणि या एकंदर प्रदेशाचा महसूल दोन अब्ज रुपयांवर येत असतो.

यावरून, आपण केवढ्या मोठ्या साम्राज्यांत सामील झालों आहों, व त्या मानानें ब्रिटिश प्रजा या नात्यानें धंदा वगैरे करण्यास आम्हांपुढें केवढा मोठा प्रदेश खुला आहे तें स्पष्टपणें दिसून येईल. आमचे पारशांसारखे व भाटे लोकांसारखे जे देशबांधव या संधीचा उपयोग करून घेत आहेत, ते किती संपन्न होत आहेत तें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आतां आमच्या इतर देशबांधवांनीं त्यांचा कित्ता उचलला पाहिजे.

## १७. राष्ट्रीय सभा.

ब्रिटिश राज्यपद्धतीच्या संबंधाच्या, हिंदुस्थानांतील सर्व लोकांस नडतात अशा ज्या अडचणी आहेत, त्या कायदेशीर रीतीनें सरकारापुढें ठेवाव्या या उद्देशानें हिंदुस्थानची राष्ट्रीय सभा स्थापित झाली आहे.

या संस्थेची स्थापना होऊन आज पांच वर्षें झालीं, आणि तिच्या एकंदर पांच कचेऱ्या झाल्या. या कचेऱ्या भरण्याचा वेळ सर्वांस सोईचा असा म्हणजे नाताळचे सुटीचा धरितात. या कचेऱ्यांस सगळ्या हिंदुस्थानांतले प्रमुख लोक येतात. पैकीं कोणी लोकांनीं निवडून पाठविलेले असतात, व कोणी सभांनीं निवडून पाठविलेले असतात. एकंदरीनें, लोकहिताची कळकळ बाळगून त्या संबंधानें कायावाचामनें करून झटणाऱ्या सर्व लोकांची या संस्थेस मदत आहे. राष्ट्रीय सभेच्या कचेऱ्यांस लोकांच्या वतीनें प्रतिनिधि होऊन येणाऱ्या लोकांची संख्या कशी वाढत गेली आहे, तें खालीं दिलेल्या कोष्टकावरून दिसून येईल.

प्रतिनिधींची संख्या अनावर होत चालल्यामुळें, गेल्या कचेरींत असा ठराव झाला आहे कीं, १० लाख लोकांस ५ प्रतिनिधि, याप्रमाणानें प्रतिनिधि यावे. या प्रमाणाप्रमाणें म्हटलें म्हणजे, राष्ट्रीय सभेची सन १८९० ची कचेरी कलकत्त्यास भरणार आहे, त्या कचेरीस सुमारें एक हजार प्रतिनिधि येतील, असा अजमास आहे. सदहू कोष्टक येणेंप्रमाणें:—

| इलाखा अगर प्रांत. | प्रतिनिधींची संख्या. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पहिली कचेरी मुंबईशहरांत. इ. स. १८८५ | दुसरी कचेरी कलकत्त्यांत. इ. स. १८८६ | तिसरी कचेरी मद्रास शहरांत. इ. स. १८८७ | चवथी कचेरी प्रयागास. इ. स. १८८८ | पांचवी कचेरी मुंबई शहरांत. इ. स. १८८९. |
| मद्रास | २१ | ४७ | ३६२ | ९५ | ३३६ |
| मुंबई व सिंध | ३८ | ४८ | ९९ | १६३ | ८२१ |
| पंजाब | ३ | १७ | ९ | ८० | ६२ |
| वायव्यप्रांत व अयोध्या | ७ | ७४ | ४५ | ५८३ | २६१ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | | १० | १३ | ७३ | २१४ |
| बंगाला, बहार, ओढिया व आसाम | ३ | २४० | ७९ | २५४ | १६५ |
| एकूण | ७२ | ४३६ | ६०७ | १२४८ | १८८९ |

ह्या राष्ट्रीय सभेस प्रतिकूल लोक म्हटले म्हणजे, हिंदुस्थानांतले बहुतेक युरोपियन लोक, मुसलमान लोकांतला अशिक्षित वर्ग, आणि कांहीं पारशी लोक, हे होत. पैकीं, युरोपियन लोकांस, आम्हीं जित लोकांनीं राजकीय हक्क मागणें हें मोठें पाप आहे असें वाटतें; मुसलमान लोकांतल्या अशिक्षित वर्गास धर्मवेडामुळें हिंदूंशीं मिसळावेंसें वाटत नाहीं; आणि कांहीं पार्शी लोकांत जातिश्रेष्ठत्वाचा गर्व आला आहे, आणि कांहींस हिंदुस्थानची खरी स्थिति माहीत नसल्यामुळें हिंदूंबरोबर मिसळावेंसें वाटत नाहीं. तरी, हळू हळू, निदान मुसलमान व पार्शी या आमच्या देशबांधवांतला विरोध कमी होत चालला आहे. हें खालीं दिलेल्या आंकड्यांवरून दिसून येईल.

| कचेरी | प्रतिनिधि. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदु | मुसलमान | ख्रिस्ती: युरोपियन व युरेजियन | ख्रिस्ती: एतद्देशीय | जैन | शिक | यहुदी | पारशी | एकूण |
| पहिली | ५८ | २ | १ | २ | १ | | | ८ | ७२ |
| दुसरी | २८७ | ३३ | १ | ५ | २ | २ | | ६ | ४३६ |
| तिसरी | ४९२ | ८१ | १० | १५ | ४ | | | ५ | ६०७ |
| चवथी | ९६५ | २२१ | १६ | २२ | ११ | ६ | | ७ | १२४८ |
| पांचवी | १५०२ | २५४ | २२ | ३१ | ३१ | ३ | १ | ४४ | १८८९ |

पहिल्या कचेरीचे अध्यक्ष मि. डब्ल्यू. सी. बानर्जी होते, दुसरीचे मि. दादाभाई नवरोजी होते, तिसरीचे मि. बद्रुद्दीन तैयबजी होते, चवथीचे सर जार्ज यूल् होते, व पांचवीचे सर वि. वेडरबर्न होते.

## राष्ट्रीय सभेच्या ठरावांचा सारांश.

**पहिलीचे.**—१. हिंदुस्थानाच्या राज्यकारभाराविषयीं चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमावें. २. सेक्रेटरी आफ स्टेट यांचें कौन्सिल मोडावें. ३. सुप्रीम व स्थानिक कायदेकौन्सिलें यांत लोकांनीं

निवडलेले मेंबर घ्यावे, आणि वायव्य प्रांत व पंजाब यांकरितां कौन्सिलें स्थापावीं. जमाखर्चाचे अंदाज या कौन्सिलांपुढें सादर करावे, आणि त्यांच्या मेंबरांस, राज्यकारभारासंबंधीं प्रश्न विचारण्याचा हक्क असावा. कौन्सिलाची तक्रार ऐकण्याकरितां एक पार्लमेंटाची कमिटी असावी. ४. सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांतही व्हावी. आणि हिंदुस्थानांतल्या परीक्षेंत पास झालेल्या उमेदवारांस शिक्षण पुरें होण्याकरितां विलायतेस पाठवावें. वयाची इयत्ता २३ करावी. ५. हिंदुस्थानांतला लष्करी खर्च वाढविण्याचा जो इरादा आहे, तो बरोबर नाहीं; कारण तो खर्च वाढविण्याची जरूरी नाहीं. ६. लष्कराकरितां जास्त खर्च लागावयाचा तो काटकसर करून काढावा; तसें न होईल तर आयात मालावर पुनः कर बसवून, आणि सध्यां ज्या लोकांकडून लैसेन्सटाक्स घेत नाहींत त्यांकडून तो कर घेऊन, उत्पन्न वाढवावें; आणि हिंदुस्थानसरकारच्या कर्जास ग्रेटब्रिटनानें बादशाही हमी द्यावी. ७. उत्तर ब्रह्मदेश घेतला हें सरकारानें बरें केलें नाहीं. तो ब्रिटिश हिंदुस्थानास न जोडतां सगळा ब्रह्मदेश बादशाही वसाहत ठरवावा. ८. हे ठराव या देशांतल्या सर्व राजकीय सभांस कळवावे, आणि त्यांस या विषयांच्या संबंधानें उद्योग करायास सांगावें. ९. पुढची सभा २८ माहे डिसेंबर १८८६ रोजीं कलकत्त्यास भरावी.

**दुसरीचे.**— १ महाराणीसाहेबांच्या राज्याचें पन्नासावें वर्ष थोड्या दिवसांनीं संपणार आहे, त्याबद्दल ही राष्ट्रीय सभा त्यांचें अभिनंदन करित आहे. २. हिंदुस्थानांतल्या कोट्यवधि लोकांचें दारिद्र्य वाढत चाललें आहे, तें पाहून या सभेस पराकाष्ठेचें वाईट वाटत आहे, आणि या संबंधानें तिची अशी खात्री झाली आहे कीं, या देशांत प्रतिनिधिनिक्षिप्त राज्यसत्ता सुरू केल्यानें, लोकांची कंगाल स्थिति सुधारण्याच्या कामांतलें एक महत्वाचें कृत्य केल्यासारखें होणार आहे. ३. सन १८८५ च्या राष्ट्रीय सभेचा ३ रा ठराव यांत निर्दिष्ट केलेल्या कायदे कौन्सिलांच्या सुधारणा करण्याची वेळ आतां अगदीं येऊन ठेपली आहे. ४. ही अत्यावश्यक सुधारणा अमलांत आणतांना सरकारानें हीं धोरणें लक्षांत ठेवावीं:— ( १ ) प्रांतिक व सुप्रीम कायदे कौन्सिलांतल्या स-

भासदांची संख्या पुष्कळ वाढवावी. अशा वाढविलेल्या कौन्सिलांचे निदान अर्धे मेंबरलोकांनीं निवडावे; पराकाष्ठा एक चतुर्थांश हुद्याच्या नात्यानें मेंबर असून, पराकाष्ठा एक चतुर्थांश सरकारानें नेमिलेले असावे. ( २ ) मेंबर निवडण्याचा अधिकार, ज्यांस तो योग्य रीतीनें व स्वतंत्रपणानें चालवितां येईल, त्या लोकांस मात्र द्यावा. मात्र, सर्व वर्गांचे व सर्व प्रकारच्या हितसंबंधांचे लोक निवडले जातील अशी सावधगिरी ठेवावी. ( ३ ) प्रांतिक कायदे कौन्सिलांनीं सुप्रीम कौन्सिलांत मेंबर निवडून पाठवावे. ( ४ ) कोणत्याही मनुष्याला, निवडलेला अगर नेमिलेला मेंबर या नात्यानें पगार मिळणार नाहीं. ( ५ ) हिंदुस्थानांत राहणाऱ्या सर्व लोकांस मेंबर होण्याचा अधिकार असावा. ( ६ ) कायद्यासंबंधाच्या व जमाखर्चाच्या संबंधाच्या सर्व बाबती कौन्सिलांपुढें सादर झाल्या पाहिजेत. कोणत्याही मेंबरास, राज्यकारभाराच्या संबंधाचे प्रश्न विचारण्याचा व कागदपत्र मागण्याचा हक्क असावा. ( ७ ) कौन्सिलांत मंजूर झालेला ठराव रद्द करण्याचा सरकारास अधिकार आहे; मात्र असें करितांना तसें करण्याचीं कारणें एका महिन्याच्या आंत प्रसिद्ध केलीं पाहिजेत. आणि मताधिक्याकडच्या मेंबरांनीं स्थानिक व हिंदुस्थानसरकार ह्यांच्यामार्फत यादी पाठविली असतां पार्लमेंटाच्या स्टांडिंग कमिटीस, चौकशी करून पार्लमेंटास रिपोर्ट करण्याचा अधिकार असावा. ५. प्रतिनिधिनिक्षिप्तराज्यसभा हिंदुस्थानांत कशी सुरू करितां येईल याबद्दल पूर्णपणें चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमावें, अशी विनंती सरकाराकडे सर्व राजकीय मंडळ्यांनीं करावी. ६ सरकारी नोकऱ्यांबाबदच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमावी. ७. त्या कमिटीनें केलेला रिपोर्ट पसंत ठरला. ( या रिपोर्टांत, परीक्षा हिंदुस्थानांतही व्हावी, वय २३ असावें, वगैरे गोष्टी आहेत ). ८. जुरीच्या साह्यानें इन्साफ करण्याची पद्धति, जास्त चालू करावी. ९. जुरीनें केलेला निकाल अखेरचा नाहीं असा जो १८७२ त ठराव झाला आहे, तो बरोबर नाहीं. १०. इंग्लंडच्या कायद्यांत ठराव आहे त्याप्रमाणें, वारंटाच्या खटल्यांत, माजिस्ट्रेटाकडून इन्साफ न होतां सेशनकोर्टाकडून व्हावा असें मागण्याचा आरोपीस

हक्क असावा. ११. वजावणीचे व न्याय करण्याचे अधिकार एकमेकां-पासून अगदीं स्वतंत्र करावे; तसें करण्यांत कांहीं प्रांतांत खर्च वाढला तरी हरकत नाहीं. १२. हिंदुस्थानांतील लोकांस व्हालंटियर होण्यास परवानगी मिळावी; असें केल्यानें कठिण प्रसंगीं लोक सरकारच्या फार उपयोगीं पडतील. १३. मुख्य मुख्य जागीं स्टांडिंग कांग्रेस कमिट्यांची स्थापना व्हावी. १४ पुढची सभा मद्रास येथें तारीख २७ माहे डिसेंबर सन १८८७ रोजीं भरावी. १५. या ठरावांच्या प्रती व्हाइसराय इन् कौन्सिल यांजकडे पाठवाव्या, आणि त्यांस पहिला ठराव राणीसाहेबांकडे, व सर्व ठराव सेक्रेटरी आफ स्टेट यांकडे पाठविण्याबद्दल प्रार्थना करावी.

**तिसरीचे.**—१. राष्ट्रीय सभेच्या रचनेबद्दल व काम चालविण्याबद्दल कानू ठरविण्याकरितां कमिटी नेमावी. २. कायदेकौन्सिलांची सुधारणा करण्याबाबदचे १८८५ व १८८६ या वर्षांचे ठराव पुनः मंजूर व्हावे. ३. वजावणीचे व न्याय करण्याचे अधिकार एकमेकांपासून स्वतंत्र करावे. ४. वरच्या दर्जाच्या लष्करी जागा एतद्देशीयांस देण्यांत याव्या, आणि या देशांत लष्करी कालेजें स्थापून त्यांत एतद्देशीय लोकांस युद्धकलेचें शिक्षण मिळावें. ५. हिंदुस्थानांतील लोकांस व्हालंटियर होण्याची परवानगी मिळावी. ६. एक हजार रुपयांखालच्या उत्पन्नावर कर बसल्याच्या योगानें लोकांस त्रास झाला आहे; म्हणून त्या रकमेखालच्या उत्पन्नांवरचा कर काढून टाकावा. ७. लोकांचें दारिद्र्य लक्षांत आणून सरकारानें या देशाच्या स्थितीस अनुरूप अशी धंदेशिक्षणाची पद्धति चालू करावी; देशांत तयार केलेल्या पदार्थांचा उपयोग करण्याबद्दल सरकारचे जे कानू आहेत, ते जास्त सक्तीनें अमलांत आणून, देशी कलांस व कौशल्यांस जास्त उत्तेजन द्यावें. ८. हत्यारांचा कायदा ( सन १८७८ चा ११ वा ) असा सुधारावा कीं, त्याच्या योगानें, हिंदुस्तान सरकार प्रसिद्धपणें कारणें दर्शवून मनाई करील त्या जाती व ते लोक खेरीज करून बाकीच्या जातींस व लोकांस शस्त्रें वापरण्याची परवानगी मिळावी. ९. पहिल्या ठरावांत नेमिलेल्या कमिटीनें सुचविलेल्या कानूंचा विचार पुढच्या वर्षाच्या सभेंत व्हावा.

आणि त्यासंबंधानें स्टांडिंग कांग्रेस कमिट्यांनीं आपले विचार प्रदर्शित करावे. १०. पुढची सभा तारीख २६ माहे डिसेंबर सन १८८८ रोजीं प्रयागास भरावी. ११. या सर्व ठरावांची प्रत व्हाइसराय इन् कौन्सिल यांच्या द्वारें सेक्रेटरी आफ् स्टेट यांजकडे पाठवून त्यांस त्यांचा विचार करण्याबद्दल प्रार्थना करावी.

**चवथीचे.**—१. कायदेकौन्सिलें सुधारण्याबद्दलचा सन १८८५ चा तिसरा ठराव, या सुधारणेची आवश्यकता दाखवून पुनः पसार करावा. २. पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या रिपोर्टांत सुचविलेल्या सवलती मान्य आहेत, परंतु, सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांतही होऊं लागल्याशिवाय या देशांतील लोकांचें खरें हित होणार नाहीं. ३. वजावणीचे व न्यायकरण्याचे अधिकार एकमेकांपासून स्वतंत्र करावे. (सन१८८६ चा ठराव अकरावा व १८८७चा तिसरा). ४. सन १८८६ च्या राष्ट्रीय सभेचे ८, ९ व १० हे ठराव पुनः पसार केले आहेत. ५. हिंदुस्थानांतल्या पोलिसाच्या व्यवस्थेमुळें लोकांस त्रास होत आहे, ह्मणून, त्या व्यवस्थेबद्दल चौकशी करण्याकरितां सरकारानें एक कमिशन नेमावें. ६. सन १८८७ च्या राष्ट्रीय सभेचे ठराव ४, ५ व ८ हे पुनः पसार केले आहेत. ७. हल्लीं चालू असलेल्या अबकारी व एक्सैजच्या व्यवस्थेमुळें कैफी पदार्थांचा खप वाढत आहे. म्हणून, त्या व्यवस्थेची सुधारणा करावी. ८. एकहजार रुपयांच्या खालच्या उत्पन्नावर कर असूं नये. ९. सामान्य व धंदेशिक्षणास उत्तेजन देणें हें ब्रिटिश सरकाराचें पहिलें कर्तव्य आहे. सरकारानें या बाबींवरचा खर्च वाढवावा, निदान कमी तरी करूं नये, आणि सध्याप्रमाणें हैस्कुलें वगैरे आपल्या हातांत ठेवावीं. १०. या देशाची हल्लींची औद्योगिक अवस्था कशी आहे याची चौकशी करण्यासाठीं सरकारानें एक कमिशन नेमावें. ११. सदरील ठराव व्हाइसराय इन्कौन्सिल यांच्या द्वारें सेक्रेटरी आफस्टेट यांजकडे पाठवावे. आणि या ठरावांच्या संबंधानें कांहीं चौकशी करावयाची असल्यास ती पार्लमेंटाची कमिटी नेमून करावी. १२. वेश्यांच्या संबंधाचा हिंदुस्थानांतला कायदा काढून टाकण्याबद्दल विलायतेस जी खटपट सुरू आहे ती चांगली आहे. १३. जो विषय राष्ट्रीय सभेपुढें आणूं नये असें सर्व अगर बहुतेक सर्व हिंदू अगर मुसलमान प्रतिनिधींचें ह्मणणें

असेल, तो विषय विषयांच्या कमिटीनें पास करूं नये, अगर सभेच्या प्रेसिडेंटानें त्यावर वादविवाद होऊं देऊं नये; आणि ज्या विषयावर वादविवाद चालू झाला असेल, त्या विषयासही हाच नियम लागू आहे. मात्र, ज्या विषयांसंबंधानें आजपर्यंत राष्ट्रीय सभेनें ठराव करून आपलें मत प्रदर्शित केलेलें नाहीं, त्यांस मात्र हा नियम लागू आहे. १४. कायमच्या साऱ्याची पद्धति मुंबई व मद्रास इलाख्यांत चालू करण्याबद्दलचा प्रश्न पुढच्या सालाकरितां ठेवावा; आणि त्या अवधींत निरनिराळ्या कांग्रेस कमिट्यांनीं त्या विषयावर रिपोर्ट करावा. १५. सरकारानें मिठावरचा कर वाढविला आहे, ही गोष्ट फार वाईट केली; कारण त्यामुळें गरीब लोकांवरचा कराचा बोजा वाढला आहे. १६. पुढची राष्ट्रीय सभा, ठरेल त्याप्रमाणें, मुंबईस अगर पुण्यास तारीख २६ माहे डिसेंबर सन १८८९ रोजीं भरावी. १७. मि. ए. ओ. ह्यूम यांस येत्या वर्षाकरितां पुनः जनरल सेक्रेटरी नेमिलें आहे.

**पांचवीचे.**—१. मि. चार्लस ब्राडला, एम. पी., यांस या राष्ट्रीय सभेच्या वतीनें मानपत्र द्यावें. २. पुढें दिलेल्या सूचनांप्रमाणें सुप्रीम व प्रांतिक कायदेकौन्सिलांच्या रचनेंत सुधारणा करण्याकरितां एक कायद्याचा मसुदा तयार करण्याची व तो पार्लमेंटापुढें रुजू करण्याची विनंति मि. ब्राडला यांस करावी:– सुप्रीम व प्रांतिक कायदेकौन्सिलांच्या मेंबरांपैकीं निदान अर्धे लोकांनीं निवडलेले असावे, पराकाष्ठा एक चतुर्थांश हुद्याच्या नात्याचे असावे, व बाकीचे सरकारानें निवडलेले असावे; ब्रिटिश रयतेपैकीं २१ वर्षांच्या वरच्या वयाच्या व ठरींव लायकीच्या सर्व पुरुषांस निवडणुकींत मत देण्याचा अधिकार असावा; प्रत्येक जिल्ह्यांतील मतदार लोकांनीं, त्या जिल्ह्यांतल्या दर दाहालक्ष लोकसंख्येस १२ या प्रमाणानें ठरलेल्या लायकीचे प्रतिनिधि निवडावे; आणि या प्रतिनिधींच्या मंडळ्यांनीं आपल्या इलाख्याच्या लोकसंख्येच्या मानानें, सुप्रीम कौन्सिलास, त्या लोकसंख्येच्या दरएक पन्नास लक्ष लोकांस एक, व प्रांतिक कौन्सिलांस त्या लोकसंख्येच्या मानानें दरेक दाहा लक्ष लोकांस एक, या प्रमाणानें मेंबर निवडून पाठवावे. ३. बजावणीचे व न्याय करण्याचे अधिकार निरनिराळ्या लोकांस देणें, ज्युरीची पद्धति आणखी चालू करणें, आरोपी निरपराधी

असल्याबद्दलचा ज्युरीचा ठराव रद्द करण्याचा हैकोर्टास दिलेला अधिकार काढून घेणें, वारंटाच्या खटल्यांत आरोपीस आपला खटला सेशन कोर्टापुढें चालावा असें मागण्याचा अधिकार असणें, पोलिसची व्यवस्था, लष्करी कालेजें स्थापणें, आणि लोकांस व्हालंटियर होऊं देणें, हजार रुपयांच्या खालच्या प्राप्तीवर कर न घेणें, शिक्षणावरचा खर्च वाढविणें, आणि या देशाच्या औद्योगिक स्थितीविषयीं माहिती मिळविण्यासाठीं एक कमिशन नेमणें, मिठावरचा कर वाढविल्याचा अन्याय, आयात मालावर थोडीशी जकात ठेवण्याची आवश्यकता, आणि लष्करी खर्च न वाढवितां कमी करण्याची आवश्यकता, यांबद्दल पूर्वींच्या राष्ट्रीय सभांत जे ठराव झाले आहेत, ते पुनः मंजूर केले आहेत. ४. कामन्स सभेंत अबकारी संबंधानें जो वादविवाद झाला, त्याच्या संबंधानें मि. केम, मि. स्मिथ, वगैरे मेंबरांचे राष्ट्रीय सभेच्या तर्फेनें उपकार मानिले पाहिजेत; आणि, कांहीं स्थानिक सरकारांनीं आपली अबकारी खात्याची सुधारणा केली आहे, तीपेक्षां आणखी केली पाहिजे. ५. सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचें वय २३ केलें याबद्दलही सभा उपकारी आहे, परंतु पब्लिक सर्व्हिसच्या संबंधाच्या सरकारच्या इतर हुकुमांनीं लोकांची नाखुषी झाली आहे; आणि हिंदुस्थानांतल्या सिव्हिल नोकऱ्यांच्या संबंधानें ज्या परीक्षा विलायतेस मात्र होतात, त्या हिंदुस्थानांतही झाल्याशिवाय हिंदुस्थानाचें खरें हित होणार नाहीं. ६. हत्यारांबाबदचा कायदा असा सुधारावा कीं, हत्यारें बाळगण्याचे निर्बंध, हिंदुस्थानांत राहणाऱ्या व हिंदुस्थानांत राहून जाणाऱ्या सर्व लोकांस सारखे लागू असावे; ज्या ठिकाणीं जनावरांचें भय असतें, तेथें हत्यारें बाळगण्याचे परवाने पुष्कळ द्यावे, आणि ते सगळ्या इलाख्यास लागू असून कायमचे असावे; हत्यारांचा दुरुपयोग केल्याचा पुरावा मिळाला म्हणजे मात्र ते रद्द करण्यांत यावे. ७. पुष्कळ लोकसंख्येच्या व चांगली लागवड झालेल्या प्रदेशांत तरी कायमच्या साऱ्याची पद्धति सरकारानें विलंब न लावितां चालू करावी. ८. विलायतसरकारानें विलायतेंतली रुप्यावरची जकात काढून टाकावी, आणि रुप्याच्या उंचीपणाबद्दल हालमार्क (सरकारी दाखला) करून घेण्याचें व्यापाऱ्यांच्या मर्जीवर ठेवावें.

९. हिंदुस्थानाच्या जमाखर्चाचा अंदाज पार्लमेंटापुढें रुजू होण्यापूर्वी, हिंदुस्थानांतील लोकांच्या तक्रारी पुढें आणण्याचा पार्लमेंटाच्या मेंबरांस जो पूर्वी हक्क होता, तो हक्क त्यांस पुनः द्यावा, आणि त्या अंदाजावर चांगला वाद होईल अशा वेळीं तो रुजू करीत जावा, असा कामन्स सभेस अर्ज करावा. १०. लार्ड रे यांनीं राज्यकारभार मोठ्या कर्तबगारीनें, सचोटीनें व निष्पक्षपातानें चालविल्याबद्दल आणि त्यांनीं या देशाच्या लोकांच्या प्रयत्नांस नेहमीं साह्य केल्याबद्दल ही सभा त्यांचे उपकार मानीत आहे. ११. दुसऱ्या ठरावांतल्या ज्या गोष्टी ठरवावयाच्या राहिल्या आहेत, त्या ठरविण्याकरितां एक कमिटी नेमावी, आणि त्या कमिटीनें आपला रिपोर्ट मि. ब्राडला यांजकडे पाठवावा. १२. येत्या वर्षाकरितां मि. ह्यूम यांस राष्ट्रीय सभेचे जनरल सेक्रेटरी पुनः नेमिलें आहे. १३. आजपासून, दर दाहालाख लोकसंख्येस ५ प्रतिनिधि यापेक्षां जास्त प्रतिनिधी राष्ट्रीय सभेस येऊं नयेत; मि. ह्यूम हे विलायतेस जाण्याकरितां निघतील त्या दिवसापासून आन. पंडित अजुध्यानाथ यांस जाइंट जनरलसेक्रेटरी नेमावें, आणि त्यांस असिस्टंटसेक्रेटरींचा पगार, सादिलवार, वगैरे खर्चाकरितां ५००० रु. मंजूर केले आहेत; जनरल सेक्रेटरीच्या साह्याकरितां मि डब्ल्यू. सी. बानर्जी यांस बंगाल्यासाठीं, मि. फेरोजशा मेहता यांस मुंबईसाठीं, व मि. आनंदचार्लु यांस मद्रासेसाठीं स्टांडिंग कौन्सेल् नेमिलें आहे; राष्ट्रीय सभेच्या रचनेच्या संबंधाचे व काम चालविण्याच्या संबंधाचे नियम सुचविण्यांत आले आहेत, त्यांचा विचार स्टांडिंग कांग्रेस कमिट्यांनीं पुढच्या वर्षी करून ते पुढच्या राष्ट्रीय सभेंत अखेर मंजूर करण्यांत यावे. मेसर्स वेडरबर्न, केन, एम्. पी, ब्रैट, म्याकल्यारेन, एम्. पी, एलिस, एम्. पी, दादाभाई नौरोजी, व जार्ज यूल यांस इंग्लंडांतल्या कांग्रेस एजन्सीच्या चालविलेल्या कामावर व खर्चावर निर्बंध ठेवण्याकरितां नेमिलें आहे; मि. डिग्बी यांनीं आपलें काम फार चोख चालविल्याबद्दल त्यांचे आभार मानावे; मि. यूल, मि. ह्यूम, मि. आडाम, मि. नार्टन, मि. फेरोजशा मेहता, मि सुरेंद्रनाथ बानर्जी, मि. मनमोहन घोस, मि. शर्फुद्दीन, मि. मुधोळकर, व मि. डब्ल्यू. सी बानर्जी, व मि. हावर्ड, यांस राष्ट्रीय

सभेच्या मागण्या विलायतेस लोकांस कळविण्यासाठीं नेमलें आहे; येत्या वर्षी या देशांत व इंग्लंडांत सभेचें काम चालविण्यासाठीं ४५००० रुपये पाहिजेत आहेत, हा पैसा, ठरल्याप्रमाणें, कांग्रेस कमिट्यांनीं पाठवावा. १४. साहावी राष्ट्रीय सभा बंगाल्यांतल्या कोणत्या तरी शहरीं तारीख २६ माहे डिसेंबर सन १८९० रोजीं भरेल. १५. या सभेचे अध्यक्ष सर विल्यम वेडरबर्न यांनीं विलायतेंतून येऊन अध्यक्षपणाचें काम केलें, याबद्दल त्यांचे आभार मानावे.

---

## १८. लेडी डफरीन्स फंड.

या देशांतील स्त्रिया संकोचवृत्ति असल्यामुळें त्यांस पुरुष जातीच्या वैद्यांकडून आपल्या रोगांवर उपचार करून घेणें जिवावर येतें, आणि म्हणून त्या स्त्रियांस अनेकवेळां फार यातना भोगाव्या लागतात. ही गोष्ट लक्षांत आणून लेडी डफरीन यांनीं सन १८८५ त एक फंड काढिला. त्या फंडाचा मुख्य उद्देश हा आहे कीं, हिंदुस्थानांतील स्त्रियांस स्त्रीजातीच्या वैदिणी मिळतील अशी तजवीज करावयाची. ह्या मुख्य उद्देशाच्या सिद्ध्यर्थ कांहीं गोष्टी करावयाच्या त्या ह्या:—स्त्रीडाक्टर, स्त्रीहास्पिटल असिस्टंट, दाया व सुइणी हिंदुस्थानांत शिक्षण देऊन तयार करणें; स्त्रियांकरितां व मुलांकरितां वेगळीं इस्पितळें काढून तीं केवळ स्त्रीडाक्टरांच्या हातांत ठेवणें; हल्लीं चालू असलेल्या इस्पितळांत केवळ स्त्रियांकरितां स्वतंत्र वार्ड काढून त्यावर स्त्रीडाक्टर नेमणें; वगैरे. ह्या संस्थेच्या पेट्रन आमच्या महाराणीसाहेब व व्हाइसरायांची पत्नी या असून व्हैसपेट्रनच्या यादींत लार्ड डफरीन, लार्ड रे, लार्ड नार्थब्रुक, लार्ड र्‍यांडोलफ चर्चिल, गायकवाडमहाराज, जोधपुरचे, पतियाळाचे, उदेपुरचे, म्हैसुरचे, त्रावणकोरचे, जयपुरचे, व काश्मीरचे महाराज, निजाम सरकार, लार्ड रिपन, वगैरे मोठाली मंडळी आहे. यावरून त्या संस्थेला पैशाची फारशी पंचाईत पडत असेल असें वाटत नाहीं. हल्लीं या संस्थेच्या नांवावर सुमारें साहा लाख रुपयांच्या प्रामिसरी नोटी वगैरे आहेत; शिवाय, इतर वर्गण्यांचें एकसारखें उत्पन्न होतच आहे. या संस्थेच्या वेगवेगळ्या शाखा आहेत त्या ह्या:—वि-

लायतची, बलुचिस्तानाची, बंगाल्याची, वऱ्हाडाची, मुंबईची, ब्रह्मदेशाची, मध्यप्रांताची, मद्रासची, म्हैसूरची, वायव्यप्रांत व अयोध्या यांची, आणि पंजाबची.

सध्या सगळ्या हिंदुस्थानांत एकंदर २३८ स्त्रिया वैद्यक शिकत आहेत, आणि त्यांपैकीं पुष्कळ या फंडाखालीं नोकरी धरणार आहेत. मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजांत ३९ स्त्रिया वैद्यक शिकत आहेत.

गेल्या वर्षी, या फंडाशीं संबंध असलेल्या इस्पितळांत व दवाखान्यांत मिळून सुमारें दोन लाख स्त्रियांस वैद्यकीय मदत मिळाली.

मुंबईच्या शाखेस एकंदर १२ पोटशाखा आहेत; त्या ह्याः—मुंबई, बेळगांव, अहमदाबाद, पंचमहाल व रेवाकांठा, खानदेश, सातारा, सुरत, विजापुर, नासिक, सिंध हैद्राबाद, शिकारपुर, आणि सोलापुर.

संस्थेचे उद्देश फार चांगले आहेत; परंतु, फंडाचे पैसे घेऊन गरीब लोकांस साहाय करावयाचें नाहीं, आणि खासगी वैद्यकीचा धंदा चालवून पैसा मिळवायाचा, असें या फंडाखालीं नेमिलेल्या स्त्रीडाक्टरांनीं करूं नये याबद्दल सावधगिरी असली पाहिजे. आणि, इस्पितळांत शिकावयास ठेविलेल्या विद्यार्थिणींस व विशेषेंकरून हिंदुधर्माच्या विद्यार्थिणींस, त्यांचे धर्मसंबंधी प्रतिबंध लक्षांत आणून, जपून वागविलें पाहिजे.

---

## १९. राज्यकारभाराच्या शाहाणपणाविषयीं गर्व.

प्रजाजनांवर कोणत्याही प्रकारचें फारसें ओझें न घालतां राज्याचें उत्पन्न वाढविणें हें राज्यकारभार करणारांचें मुख्य शहाणपण आहे, असें पुष्कळ इंग्लिश लोक म्हणतात, आणि आपण तसे आहों, असा गर्व वाहून, आमचे काळे लोक तसे नाहींत, असें दर्शवितात. हें खरें नाहीं. विलियम गार्डन ह्या साहेबांनीं इ० स० १७३९ त बाजीराव पेशव्यांच्या राज्यांत प्रवास करून त्याविषयीं असें लिहिलें आहे कीं, "जें कापडचोपड हिंदुस्थानच्या लोकांस उपयोगीं पडण्यासारखें असतें, तें तयार करण्याविषयीं बाजीराव साहेब साळ्याकोष्ट्यांस फार उत्ते-

जन देतात. आणि त्यांतला पुष्कळ माल मुंबईसही येतो. त्यांच्या राज्यांत वस्ती दाट असून, लोक सुखी आहेत." ह्याविषयींचें अगदीं आलीकडचें एक उदाहरण बस आहे.

सर सालरजंग, निजाम सरकारचे दिवाण हे राज्यकारभार पाहात होते, तेव्हांची माहिती मि० डिगवी ह्यांनीं दिली आहे, ती अशीः—

| | हिंदुस्थानांतल्या इंग्लिश राज्याचें उत्पन्न. | निजामाचें उ०. |
|---|---|---|
| १८५३ | २८६१००००० रुपये. | ६८०११३० रुपये. |
| १८८० | ६८३७००००० रुपये. | ३११४०५३८ रुपये. |
| वाढ रुपये. | ३९७६००००० रुपये. | २४३३८९०८ रुपये. |
| | शेंकडा वाढ २३० | ३५७. ८४ |

इ० स० १८५३ त सर सालरजंगांस एकतीस लाख रुपयांची तूट भरून काढावयाची होती; आणि शिवाय कांहीं देणें द्यावयाचें होतें. तें देऊन, त्यांनीं हें उत्पन्न वाढविलें. ही कर्तबगारी लहान आहे काय ?

संकटसमयीं प्रजेचें रक्षण करणें हें राज्यकर्त्यांचें मुख्य कर्तव्यकर्म आहे. तें कठीण प्रसंगीं उत्तमप्रकारें दिसून येतें. दुष्काळ हें एक राष्ट्रीय संकट आहे. त्याच्या संबंधानें आमच्या ह्या देशांतल्या इंग्लिश राज्यांत आणि एतद्देशीय राज्यांत व्यवस्था कशी असते, ह्याविषयीं इंग्रज लोकच काय म्हणतात तें पहा:-इ० स० १८३२ ह्या वर्षी मोठा दुष्काळ पडत होता. त्याविषयीं कर्नल स्टुअर्ट ह्यांनीं लिहिलें आहे— "गतवर्षीच्या दुष्काळांत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी होती. ती ही कीं, मद्रास किंवा मच्छलीपट्टण ह्या ( इंग्लिश ) प्रांतांतून प्रवासी लोक शेजारच्या निजामाच्या प्रांतांत आल्याबरोबर त्यांस, दुष्काळाच्या विपत्तीचीं चिन्हें कमी दिसूं लागत. इंग्लिशांच्या मुलुखांतल्यापेक्षां निजामाच्या मुलुखांत धान्य अधिक माहाग होतें, हें खरें; तरी, इंग्रजांच्या मुलुखांत खेड्यांचींखेडीं मेलेल्या माणसांनीं भरलेलीं दृष्टीस पडत, तशीं निजामाच्या राज्यांत दृष्टीस पडत नसत."

## २०. हिंदुस्थानाच्या दारिद्र्याचीं कारणें.

हिंदुस्थानास सांप्रतकाळीं दारिद्र्य आलें आहे, ह्याविषयीं सर्व लोकांची एकवाक्यता आहे. ह्या दारिद्र्याचीं मुख्य कारणें कोणतीं तीं थोडक्यांत पाहूं.

**१. परदेशीय लोकांचा राज्याधिकार.**—हें कारण फार मोठें आहे. "राजा कालस्य कारणम्" असें एका कवीनें ह्मटलें आहे, त्याचें हें एक उदाहरण आहे. इतर गोष्टी कशाही असोत. परंतु, राज्यकारभाराच्या संबंधानें कोट्यवधि रुपये हिंदुस्थानांतून इंग्लंडास जात आहेत. हेच राज्यसत्ताधारी पुरुष ह्या देशांत राहणारे असते, तर तो सगळा पैसा कोणत्या तरी रूपानें ह्या देशांत राहिला असता. आमचे एतद्देशीय राजे आपल्या द्रव्याचा खर्च इतक्या अव्यवस्थित रीतीनें करीत असत, तरी, त्यांच्या कारकीर्दींत हा देश सधन होता. आणि सध्याच्या कारकीर्दींत तशी अव्यवस्था नाहीं; तरी लोक दरिद्री होत चालले आहेत.

**२. ज्ञानाची वृद्धि नाहीं.**—आमच्यांतले शेतकऱ्यांचे नांगर, कोष्ट्यांचे माग, आणि तेल्यांचे घाणे, हे जर पाहिले, तर, ते, शें दोनशें वर्षांमागें जसे होते, तसेच अद्याप आहेत; त्यांत काहींएक सुधारणा झालेली नाहीं. त्यामुळें, त्यांच्या योगानें काम पहिलेइतकेंच होतें, अधिक होत नाहीं; आणि लोकसंख्या तर वाढत आहे. तेव्हां गरीबी सहज जाणवते.

**३. चाकरी करून भाकरी मिळविण्याची आवड.**—ही आवड इतर देशांतल्या लोकांपेक्षां आमच्या देशच्या लोकांत फार दिसते. "मुलगा धंदा काय करतो," असें सहसा कोणी विचारीत नाहीं; तर "मुलाला चाकरी कोठें आहे," हा प्रश्न अगदीं विनचूक येतो. ह्या आवडीनें फार हानि झाली आहे. चाकऱ्या करणारे फार आणि चाकऱ्या थोड्या; तेव्हां चाकर पैशास पांसरी व्हावे, ह्यांत काय नवल आहे ?

**४. खर्चीकपणाच्या लौकिकाची इच्छा.**—ही फार घातक आहे. अगदीं सामान्य प्रसंगीं देखील, तोंडपुजे लोकांच्या बो-

लण्यास भुलून शक्तिबाह्य खर्च करणें, आणि त्याच्या पायीं कर्जभरी होणें, हें लोकांत वारंवार दिसून येतें. ही चूक कधीं कधीं चांगल्या समजदार लोकांच्या देखील हातून होते.

५. **आळशांस आश्रय.**—उद्योग करण्यास सामर्थ्य असून, जे कोणी भिक्षा मागून राहतात, त्यांस आह्मी आळशी ह्मणतों. आणि, अशा आळशांस आश्रय देणें ह्मणजे, निरुद्योगी लोकांच्या संख्येस भर घालणें आहे. असे निरुद्योगी लोक उद्योगी लोकांच्या श्रमावर निर्वाह करायास पाहातात, तेव्हां ते सगळेच भिकारी होतात.

६. **दागिन्यांत पैसा घालणें.**—हें हिंदुस्थानांत जितकें चालू आहे, तितकें दुसरे कोठेंही चालू नसेल. हिंदुस्थानांतल्या बायकांस दागिने घालण्याची हौस अतिशयित आहे. सोनारकीचें काम करणारे लोक हिंदुस्थानांमध्यें चार लाखांहून अधिक आहेत!

गेल्या तीस वर्षांत एकंदर एकशें दाहाकोटि रुपयांचें सोनें हिंदुस्थानांत आलें. त्याचें झालें काय? बहुतेक सगळ्याचे दागिने बनले!

सगळ्या हिंदुस्थानांत एकंदर सुमारें दोनशें कोटि रुपये दागिन्यांत गुंतले असावे, असा अजमास आहे. हीच रकम जर आज व्यापारांत असती, तर, अगदीं शाहाजोग, शेंकडा पांचप्रमाणें ह्मटलें तरी, दरसाल दाहाकोटि व्याज आलें असतें.

इतकें व्याज बुडालें असून, दागिन्यांच्या पायीं मुलांचे आणि बायकांचे खून होत असतात ते वेगळेच!

७. **व्यसनें.**—आलीकडे, मद्यपानाचें व्यसन अतिशयित वाढलें आहे. डाक्टर मर्डक ह्यांनीं ह्मटलें आहे कीं, "ब्रांडी ह्या मद्यानें सुशिक्षित लोकांत अगदीं अनर्थ करून सोडिला आहे." ह्यास होय ह्मणणें आह्मांस भाग पडतें, आणि त्यामुळें लाजून मान खालीं घालावी लागते.

८. **देशांतराचा तिटकारा.**—स्वैपाक चार माणसांचा, आणि जेवणारे तयार व्हावे आठ, तसा प्रकार झाला आहे. एकाच ठिकाणास धरून राहण्याची जी संवय लोकांस आहे, तीमुळें दारिद्र्य वाढलें आहे. देशांतराची ह्मणजे अगदीं परक्या देशांत जाण्याची गोष्ट क्षण-

भर एकीकडे असो; पण, आंतल्या आंत, ह्या प्रांतांतून त्या प्रांतांत जाण्याची देखील आवड नाहीं. पहा, अयोध्या प्रांतांत दर चौरस मैलास लोकसंख्या ४७० पडते, मुंबई इलाख्यांत १३३ पडते, आसामांत ९० पडते, आणि ब्रह्मदेशांत ४३ पडते.

९. **सरकारदरबार करण्याची हौस.**—थोडी घस सोसून, किंवा एकमेकांची सोय पाहून वाद मिटविण्याची जी चांगली इच्छा, ती दिवसेंदिवस नाहींशी होऊन, सरकारांत जाण्याची आवड लोकांत वाढली आहे. त्यामुळें गरीब लोकांची हानि होत आहे. पूर्वी वकील थोडे असून सरासरी खाऊन पिऊन असत; आणि आतां वकील पहिल्यांच्या दसपट होऊन, लक्षाधीश झाले आहेत. एवढें प्रमाण ह्या गोष्टीस बस आहे.

१०. **जातिभेद आणि जातिमत्सर.**—ह्यांनीं फार नासाडी केली आहे. पर्यायेंकरून जातिभेद सगळ्या राष्ट्रांत आहेत; परंतु जातिमत्सर नाहीं. सगळ्या लोकस्थितीचा विचार केला म्हणजे असें वाटतें कीं, हा जातिमत्सर इतर राष्ट्रांत कोठें नाहीं, तो आमच्या ह्या राष्ट्रांतच इतका कोठून आला? उदाहरणें देऊन उगाच कोणाचें मन दुखविणें बरें नाहीं; परंतु, आमच्यामध्यें मत्सर अतिशयित आहे, तो आमच्या नाशास कारण झाला आहे.

११. **नवीन प्रघातास विरोध.**—नवीन प्रघात कितीही चांगला वाटला, तरी तो पाडण्याविषयीं एक प्रकारचा विरोध आमच्यामध्यें आहे. तो आमच्यांत इतका कां असावा, आणि इतर देशातल्या लोकांत कां नसावा, हें कळत नाहीं.

१२. **लोकांस आपलें कर्तव्य समजत नाहीं.**—हें कारण, सर्व कारणांचें मूळ आहे, असें ह्मटलें तरी चालेल. तें समजत नाहीं कसें, आणि तें समजून करावें काय, ह्याचा थोडासा उलगडा ह्या पुस्तकाच्या उत्तरार्धात केला आहे.

---

## २१. हिंदुस्थानाचें बरें आणि वाईट.

हिंदुस्थानांत इंग्लिश राज्याची स्थापना झाल्याच्या योगानें हिंदुस्था-

नाचें वरेंवाईट काय काय झालें आहे, ह्याचें टिपण डिगवीसाहेबांनीं आपल्या पुस्तकांत केलें आहे. त्यांतल्या कांहीं गोष्टी संक्षेपतः आह्मी येथें सादर करितों.

## वरें काय काय झालें आहे तें.

१. लोकांस शांतता प्राप्त झाली आहे. पेंढाऱ्यांच्या वगैरे दंग्याचें भय नाहींसें झालें आहे. आपल्या श्रमांचें फळ खचीत आपणांस मिळेल, तें जबरीनें दुसरा कोणी घेऊं शकणार नाहीं, अशी खातरी लोकांस आली आहे.

२. सती जाणें, मुलांचे बळी देणें आणि बालहत्या ह्या हृदयभेदक परिपाठाचें समूळ उत्पाटण झालें आहे.

३. लोकांच्या शरीरप्रकृति चांगल्या राहाव्या ह्मणून पुष्कळ तजविजी झाल्या आहेत. त्यांच्या योगानें मृत्यूंची संख्या कमतावत चालली आहे.

४. लोकांत विद्येचा प्रसार होत चालला आहे. इ० स० १८८८ च्या मार्च महिन्यांत, मुलगे आणि मुली मिळून, एकंदर ३४७६१९४ मुलें शाळेंत शिकत होतीं.

५. लोकांस आणि वर्तमानपत्रकर्त्यांस आपले विचार उघडपणें बोलण्याची आणि छापून प्रसिद्ध करण्याची स्वतंत्रता मिळाली आहे.

६. सर्व माणसांस स्वेच्छेप्रमाणें वागण्याची मोकळीक मिळाली आहे; आणि न्यायाच्या दृष्टीनें, सर्व माणसें सारखीं मानण्याचा परिपाठ पडला आहे.

७. म्युनिसिपालिट्या आणि लोकलफंड कमिट्या ह्यांची व्यवस्था लोकांच्या हातीं दिली आहे. आणि लोकांनीं आपल्यापैकीं गृहस्थ निवडून काढून त्यांजकडून ती व्यवस्था करवावी, असें केलें आहे.

८. आगगाड्या, तारायंत्रें, छापखाने, गिरण्या वगैरे अनेक प्रकारचे लोकोपयोगी कारखाने देशांत चालू झाले आहेत. आणि त्यांपासून लोकांस फार सुख होत आहे.

ह्यांतच आम्ही पोष्टहपिसाच्या व्यवस्थेची गणना करितों.

९. प्राचीन कालवे उकरून काढून दुरुस्त करून, व नवे कालवे

बांधून, शेतांस व लोकांस पुष्कळ पाणी मिळण्याची सोय झाली आहे.

## वाईट काय काय झालें आहे तें.

१. राज्यव्यवस्था उत्तम मिळाली आहे खरी: पण ती हिंदुस्थानास अतिशयित महाग पडली आहे. वस्तु कितीही चांगली असली, तरी तिला अतिशयित किंमत पडणें हें कांहीं चांगलें नव्हे.

२. इंग्लिशांनीं राज्य घेतलें तेव्हां हिंदुस्थानाला कर्ज मुळींच नव्हतें. आणि आतां सुमारें एक अब्ज अठ्ठयायशीं कोटि रुपये कर्ज आहे. आणि त्यावर सुमारें साडेचार कोटि रुपये व्याज द्यावें लागतें.

३. पूर्वी हिंदुस्थानांत अत्युत्तम कापड तयार होऊन बाहेर देशांस जात असे; आणि त्यावरून येथील लोकांची मोठी आख्या असे. तें सगळें आतां नष्ट झालें आहे.

४. न्यायमनसुबी करण्याची पहिली जी पंचांची पद्धति होती, ती मोडून, आतां जागोजाग कोर्टें स्थापिलीं आहेत. त्या कोर्टांत गरीबांस न्याय मिळत नाहीं; आणि त्यांत त्यांचा सर्वस्वी नाश होतो.

५. कोर्टांच्या कामांतल्या छापी कागदांची किंमत एवढी जबरदस्त ठेविली आहे कीं, त्यांच्या किंमतींत सगळ्या जज्जांचे व त्यांच्या हाताखालच्या लोकांचे पगार भागून, पुष्कळ पैसा सरकारांत शिल्लक राहतो.

६. प्राचीन आणि सोईस पडलेली गांवकीची पद्धति मोडून टाकून तिच्या जागीं नवी पद्धति स्थापिली आहे. तरी, आतां हळू हळू जुनी पद्धति चालू करण्याचा विचार चालला आहे.

७. हिंदुस्थान हें राष्ट्र संपत्तिमान् आहे असें समजून जी भारी खर्चाची राज्यपद्धति पूर्वी चालू केली, ती आतां त्या राष्ट्रास सोसेनाशी झाली आहे.

८. इंग्लिश लोकांस खरी देशस्थिति माहीत नसल्यामुळें, राज्यव्यवस्थेच्या कामांत चुक्या आणि घोटाळे होतात. प्रजेला पाहिजे असतें एक, आणि सरकार करतें एक.

**इंदुप्रकाश**कर्त्यांनीं ह्याविषयीं म्हटलें आहे—"आमचें दुखत असावें कपाळ, आणि आम्हांस औषध द्यावें पोटशूळावरचें, असा प्रकार झाला आहे."

९. एतद्देशीय संस्थानांशीं जसें वागावें तसें इंग्लिश सरकार वागत नाहीं. निजामाचा वऱ्हाडप्रांत १८५३ त घेतला, तो घेण्याचा करार जरी सरून चुकला आहे, तरी तो प्रांत निजामास सरकार परत देत नाहींत.

---

## २२. सामान्य जनावस्था.

१. पहिले सगळे जातिधर्मपंथ कायम असून, लोकांत नवे दोन भाग झाले आहेत. **जुन्या पद्धतीचे लोक**, आणि **नव्या पद्धतीचे लोक**.

२. इंग्रजी वगैरे न शिकलेले आणि जुन्या चालीरीतीप्रमाणें चालणारे ते **जुन्या पद्धतीचे लोक**. त्यांच्यांत धर्मश्रद्धा, व्यवहारमर्यादा विशेष आहे. आणि इंग्रजी वगैरे शिकून जसें बरें वाटेल तसें मनःपूत वागणारे ते **नव्या पद्धतीचे लोक** होत. त्यांच्यांतल्या पुष्कळांत नास्तिकपणा, मद्यपान, स्वेच्छाचार हीं फार आहेत, असा समज आहे.

३. बाप जुन्या पद्धतीचे आणि मुलगे नव्या पद्धतीचे, असें झाल्यामुळें घरचे घरांत दुफळ्या झाल्या आहेत.

४. नव्या विद्येच्या प्रसारानें म्हणा, परधर्मी लोकांच्या उद्योगानें म्हणा, किंवा इंग्रजी कायद्याच्या योगानें म्हणा, धर्मश्रद्धा आणि सुशीलता ह्या दिवसेंदिवस कमी कमी होत चालल्या आहेत, आणि नास्तिकपणा व वितंडवादीपणा हे वृद्धि पावत आहेत. ह्याचें उत्तम प्रमाण म्हटलें म्हणजे हेंच कीं, बापांपासून वेगळे झालेले मुलगे, आणि नवऱ्यांस सोडून घराबाहेर पडलेल्या बायका, पूर्वींच्यापेक्षां, आतां पुष्कळ अधिक आढळतात.

५. करणें थोडें पण वटवट फार, हा एक दुर्गुण वाढत चालला आहे. ह्याचीं उत्कृष्ट उदाहरणें म्हटलीं म्हणजे वर्तमानपत्रांतले निबंध आणि सभेंतलें पांडित्य हीं होत.

६. युरोपियन लोकांची अनुकरण करण्याची इच्छा मनस्वी आहे. अनुकरण चांगल्या गोष्टींत होत नाहीं, वाईट गोष्टींत होत आहे. जॉर्ज वाशिंग्टनाचें वळण कोणांत दिसत नाहीं. व्यर्थ वितंडवाद, हातांत बाटली—आणि गटार—हें वळण फार.

७. स्वतःच्या लोकांविषयीं प्रेम नाहीं. काय चमत्कार असेल तो असो. पगार जर सारखा आहे, तर, युरोपियनाच्या हाताखालीं काम करायास खूष, आपल्या लोकांच्या हाताखालीं नको.—आमचा एक चांगला समंजस मित्र म्हणत असतो कीं, "साहेबांचे बूट बरे, पण रावसाहेबांची शालजोडी नको." असें कां असावें बरें ?

८. आपल्या लोकांच्या हितासाठीं घस सोसण्याची खरी इच्छा मुळींच नाहीं. पुनर्विवाहादि गोष्टी आम्ही लोकांस करायास सांगायाला तयार असतों; पण स्वतःवर प्रसंग आला म्हणजे तीन कोस मागें.

९. मुलांस विद्या शिकवणें हें अत्यंत आवश्यक आहे, असें बोलावयाचें मात्र. पण, आपलें काम संभाळून मुलांच्या धड्यांकडे तास दोन तास खर्चिणारे लोक, सध्या, शेंकडा दोन राहूं द्या, पण हजारीं दोन देखील मिळण्याची मारामार.

१०. इंग्रजी राज्याचीं व्यंगें काढणें आणि इंग्रजांस नांवें ठेवणें हाच काय तो स्वदेशाभिमान, असें आम्हांला वाटूं लागलें आहे.

असे प्रकार आणखी पुष्कळ सांगतां येतील. परंतु, त्याचा उपयोग काय? कोळसा उगाळावा तितका काळा!

# २.

# आपण करावें काय?

आपली हिंदुस्थानवासी जनांची अवस्था सर्व प्रकारीं निकृष्ट झाली आहे, हें सामान्यत्वें आपणां सर्वांस ज्ञात झालें आहे; आणि तेंच, मागच्या भागामध्यें, अनेक प्रकारचीं प्रमाणें देऊन स्पष्ट करून दाखविलें आहे. तें पाहून फार लाज वाटते; फार वाईट वाटतें; आणि फार दुःख होतें. परंतु, लज्जित होऊन, कष्टी होऊन आणि दुःखित होऊन स्वस्थ बसणें योग्य नाहीं; कां कीं तें मनुष्यपणास शोभत नाहीं. पायांत कांटा बोंचला ह्मणून एकादा बैल दुःखित होऊन स्वस्थ बसला, तर तें त्याला शोभेल. पण, आलेल्या अरिष्टापासून जें दुःख होत असेल, तें निमूटपणें सोसणें, आणि त्या अरिष्टाच्या निवारणाचा उपाय न करणें, हें माणसांस शोभावयाचें नाहीं. ह्मणून, आपली जी अवस्था इतकी निकृष्ट झाली आहे, तिच्या कारणांच्या निवारणाचा उद्योग करणें हें आपलें अत्यंत अवश्य कर्तव्य आहे. तो उद्योग करावयाचा, ह्मणजे त्यालाही तीन पायऱ्या आहेत; पहिली पायरी त्याविषयीं विचार करणें; दुसरी पायरी त्याविषयीं बोलणें; आणि तिसरी पायरी त्याप्रमाणें करणें. अशा जरी तीन पायऱ्या आहेत, तरी, त्या एकमेकींपासून अगदीं वेगळ्या वेगळ्या—ह्मणजे त्यांच्यामधल्या मर्यादा अगदीं स्पष्ट दाखविण्यासारख्या अशा—आहेत, असें नाहीं. एकीचा कांहीं संबंध दुसरींत असावा, आणि दुसरीचा कांहीं संबंध तिसरींत असावा, आणि त्यांत कारणकार्यभाव असावा. म्हणून, ह्या उद्योगामध्यें एक पायरी पुरी झाल्यावांचून दुसरीस जावयाचें नाहीं, असें धरून बसणें बरें नाहीं.

तर मग आतां आपण करावें काय, हा एक फार मोठा प्रश्न उत्पन्न झाला. ह्याचें उत्तर थोडक्यांत देतां यावयाचें नाहीं. कां कीं, ह्या विषयास अंगें अनेक आहेत; आणि त्या प्रत्येक अंगाच्या संबंधानें वेगळे वेगळे उद्योग करावयाचे आहेत. म्हणून त्यांविषयीं वेगळें वेगळें

सांगितलें पाहिजे. त्यांतल्या कांहीं मुख्य अंगांच्या उद्योगाचा थोडथोडा विचार करूं.

**राजसत्ता.**—हें अंग सर्वांत मोठें आणि अत्यंत अगत्याचें आहे. पण, ह्याविषयींचा उद्योग फार जपून केला पाहिजे. म्हणजे, आम्हीं एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं, सगळी राजसत्ता, स्वराज्याप्रमाणें, आपले हातीं येणें हें अगदीं अशक्य आहे. त्याचा विचार सुद्धां मनांत आणूं नये. परंतु, देशाच्या राज्यकारभारांत आपले हातीं कांहीं अधिकार येणें, हें शक्य आहे; आणि, त्या कामास आपण जितके जितके योग्य होऊं, तितके तितके ते अधिकार हळू हळू आपणांस द्यावे, असा हेतु आपल्या राजकर्त्यांचा आहे; आणि त्याप्रमाणें ते अधिकार आम्हांस देऊंही लागले आहेत. सांप्रतकाळीं ज्या पांचचार मोठ्या हुद्यांच्या जाग्यांवर आमचे लोक सरकारानें चढविले आहेत, ते हुद्दे आमच्या लोकांस मिळतील, असें, सुमारें वीस पंचवीस वर्षांमागें, आमच्या स्वप्नांत देखील आलें नव्हतें. म्हणून सध्या राज्यव्यवस्थेमध्यें आमच्या लोकांस जे अधिकार मिळत नाहींत, ते, सरकारच्या मनांत आह्मांस द्यावयाचे नाहींत म्हणून मिळत नाहींत असें म्हणण्यापेक्षां, ते अधिकार चालविण्याचें सामर्थ्य आमच्या लोकांस आलें नाहीं, म्हणून ते त्यांस मिळत नाहींत, असें म्हणावें, हें विशेष सयुक्तिक दिसतें. आन. जस्टिस काशिनाथ त्रिंबक तेलंग ह्यांस हैकोर्टांत जज्ज नेमिलें आहे, रावबहादुर माहादेव गोविंद रानडे ह्यांस, डाक्टर पोलनसाहेबांच्या जागीं, शेतकऱ्यांच्या आक्टाच्या कामावर मुख्य जज्ज नेमिलें आहे; अशा ज्या कांहीं नेमणुका सरकारानें केल्या आहेत, त्या जर त्यांनीं केल्या नसत्या, आणि त्या जागा युरोपियनलोकांस दिल्या असत्या, तर आपण त्यांचें काय करणार होतों? डाक्टर कीलहार्न ह्यांच्या जागीं डाक्टर भांडारकर ह्यांस नेमिलें आहे, तें काम, पूर्वीप्रमाणें, एकादे युरोपियन नेमून कसें बसें चाललें नसतें काय? परंतु, नाहीं. योग्यता आली कीं अधिकार द्यावयाचा, असा त्यांचा निश्चय आहे. त्याप्रमाणें चाललें आहे. आतां, योग्यता आली किंवा आली नाहीं, हें आमच्या दृष्टीनें कांहीं वेगळें दिसतें, आणि त्यांच्या दृष्टीनें कांहीं वेगळें दिसतें. आणि त्यांच्या दृष्टीनें दिसतें तें मात्र खरें ठरून त्याप्रमाणें व्यवस्था

होते; त्यास कांहीं उपाय नाहीं. आणि जोंपर्यंत मनुष्याच्या स्वभावामध्यें मी आणि तूं ह्यांचा भेद राहील, तोंपर्यंत हें असें चालावयाचेंच आहे. ह्यावर कांहीं लोकांचें ह्मणणें असें पडतें कीं, आम्ही सर्व लोकांस सारखें लेखितों, असें इंग्रजलोक बोलतात आणि लिहितात मात्र, पण त्याप्रमाणें वागत नाहींत. होय. कदाचित् हें खरें असेल. पण त्याविषयीं आपण असें समजलें पाहिजे कीं, हा सगळा दोष त्यांचा नव्हे; तर त्यांत आपलाही बराच दोष आहे. तो आपला दोष म्हणजे हाच कीं, ते जें कांहीं अभिवचनासारखें आह्मांविषयीं बोलतात, त्याप्रमाणें त्यांस वागायास लावण्याचें सामर्थ्य आमचे ठायीं नाहीं. तें सामर्थ्य येण्यास दोन गोष्टी पाहिजेत. त्यांतली पहिली ही कीं, त्या वचनांच्या संबंधानें आपलें जेवढें कर्तव्य असेल, तेवढें अशा रीतीनें परिपूर्ण करणें कीं, त्याविषयीं तोंड उघडण्यास आमच्या राज्यकर्त्यांस जागा राहूं नये. आणि दुसरी गोष्ट ही कीं, आपला कार्यभाग होईपर्यंत, कायावाचामनेंकरून असें झटणें कीं, आमची मागणी नाहीं ह्मणण्यास त्यांस संकोच उत्पन्न व्हावा. आपले राज्यकर्ते कितीही जरी स्वार्थबुद्धि असले, तरी, ते मोठे विद्याचारसंपन्न आहेत. म्हणून मनांत कांहीं असलें तरी, सामान्य व्यवहारांत, नीतिशास्त्रांतल्या घवाड नियमांचें उल्लंघन त्यांच्यानें करवत नाहीं. ह्याचा अनुभव कितीएक वेळां आला आहे. त्यापासून आपला फायदा करून घ्यावा.

आणखी, इंग्लिश लोकांची व आपली बरोबरी होण्यास जे अनेक गुण आपणांत पाहिजेत आहेत, त्यांत मुख्य दोन आहेत. काम करतां येण्याचें सामर्थ्य, हा एक, आणि राजनिष्ठा हा दुसरा. ह्मणजे, आमच्या राज्यकर्त्यांस असें खचीत वाटलें पाहिजे कीं, जें काम हिंदुस्थानचे लोक मागत आहेत तें उत्तमप्रकारें करण्याचें सामर्थ्य त्यांस आहे, आणि, ते इंग्लिश राज्याचे खरे अभीष्टचिंतक आहेत. हे दोन गुण जर उत्तम प्रकारें साधले, तर, राज्यव्यवहारांत इंग्लिश लोकांची आणि आमची बरोबरी होण्यास उशीर लागावयाचा नाहीं. कोंदण करण्याजोगा हिरा असला, ह्मणजे शाहाणा माणूस त्याला कोंदण करीलच; पण त्यानें जर त्याला कोंदण केलें नाहीं, तर तो कोंदण न करणाऱ्याचा दोष; हिऱ्याचा दोष नव्हे. ह्याहून अधिक काय सांगावें?

**व्यापार.**—हा उद्योगास फार मोठा मार्ग आहे. व्यापारावर आज लक्षावधि लहानमोठ्या लोकांचें पोट चाललें आहे. ह्याकडे आमच्या लोकांचा—आणि विशेषेंकरून ब्राह्मणलोकांचा—ओढा स्वभावतःच कमी असल्यामुळें, आणि, चाकरी करून भाकरी मिळविण्याची संवय त्यांस लागल्यामुळें, हा एवढा मार्ग ब्राह्मणजातीस नाहींसारखा झाला आहे. आणि त्यांत दारिद्र्य विशेष असण्याचें मुख्य कारण हेंच आहे. ह्या गोष्टीकडे ब्राह्मणांनीं व दुसऱ्या व्यापारांत न पडलेल्या जातींच्या लोकांनीं लक्ष पुरविलें पाहिजे. व्यापारास मुख्य गोष्टी दोन लागतात; हिय्या आणि सतत उद्योगाची संवय. शाळेंत एकत्र शिकत असून, पुढें आपापल्या स्थितीच्या अनुरोधानें, कोणी सरकारी नौकर झाले आहेत, आणि कोणी व्यापारी झाले आहेत. त्यांच्या सुखाची जर तुलना करून पाहिली, तर व्यापारी झालेले लोक अधिक सुखी आहेत, असें प्रमाण निघतें. त्यांत स्वतंत्रता हें मोठें सुख आहे. मेहेनत, हिय्या आणि काटकसरीनें खर्च करणें ह्या गुणांच्या योगानें अगदीं साधारण एक लोटा जवळ असलेला वाणी थोडक्या वेळांत कसा **शेट-साहेब** बनतो, ह्याचीं उदाहरणें आमच्या मारवाडी मंडळांत पुष्कळ मिळतील. आतां, त्यांत, "घीनो दोडियो" आणि "दोडियानो घी" असें दोनदां बोलून एका पैशाचे दोन पैसे घेणें, किंवा "तीनचोक तेरा" करून व्याजाचे कच्चे डाळणें, हें मुख्य साधन आहे, असें कांहीं लोक समजतात. परंतु, ती भ्रांति आहे. पुष्कळ व्यापाऱ्यांनीं स्वतांच्या अनुभवावरून सांगितलें आहे कीं, इमानानें जसा लाभ होतो, तसा लबाडीनें होत नाहीं.

आमच्यांत अद्याप चालू नाहीं आणि व्यापारास अत्यंत आवश्यक अशी एक गोष्ट आहे. तिजकडे आमच्या मंडळीनें लक्ष पुरविलें पाहिजे. ती गोष्ट हीच कीं, पातीनें भांडवल जमवून व्यापार करणें. आगगाड्यांच्या वगैरे मोठ्या कामांस जीं कोट्यवधि रुपयांचीं भांडवलें विलायतेस जमा होतात, तीं ह्याच रीतीनें मिळतात. ह्या पद्धतीच्या योगानें गरीबापासून मोठ्यापर्यंत सर्वांस आपल्या लहानमोठ्या पुंजीचा चांगला उपयोग करितां येतो; आणि, साहजिक रीतीनें ऐक्य वाढतें. पण अशा प्रकारच्या व्यापाराची पद्धति चालू होण्यास लोकांत एका

गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे. ती गोष्ट ही कीं, आमच्या मंडळीनें एकमेकांवर विश्वास ठेविला पाहिजे. आणि असा विश्वास उत्पन्न होण्यास सत्य आणि प्रामाणिकपणा दृढ झाला पाहिजे.

व्यापाराच्या कामांत इंग्लिश लोक फार प्रवीण आहेत. ह्यास्तव, ती विद्या संपादण्यासाठीं, आमच्या लोकांनीं त्यांचे शिष्य व्हावें. ह्मणजे, त्यांशीं पाती करावी, किंवा सहवास करावा, किंवा निदान सेवकधर्म तरी कांहीं वेळ ठेवून, व्यापार करायास शिकावें. आलीकडे व्यापारांत येणाऱ्या धर्मसंबंधींच्या अडचणी आपोआप दूर होत चालल्या आहेत, ही गोष्ट फार संतोषकारक आहे.

**शेतकी.**—ह्या कामांत फार लक्ष दिलें पाहिजे. आपल्या देशाची जमीन उत्कृष्ट आहे. तींतून पुष्कळ संपत्ति निघण्यासारखी आहे; आणि त्या संपत्तीवर खरोखर आपली सत्ता आहे. ती आपण आपले हातीं ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या देशांतला गहूं बाहेर फार खपतो, हें पूर्वी दर्शविलेंच आहे; आणि आणखी शोध केला तर, तसे दुसरेही कांहीं पदार्थ बाहेर पुष्कळ खपण्यासारखे निघतील. ते शोधून काढून जर आपण पिकविले, तर, पृथ्वीवरच्या मोठमोठ्या देशांचें अन्न आपल्या हातीं आल्यासारखें होईल. सध्या जे लोक शेतकींत गुंतले आहेत, त्यांस आपला धंदा सुधारण्याचें सामर्थ्य नाहीं. म्हणून, आमच्या सुशिक्षित मंडळीनें त्या कामांत शिरावें, आणि त्यांत सुधारणा करावी. अमेरिकेंत आणि इंग्लंडांत हा व्यवसाय फार उत्तम मानितात. केवळ शेतकीच्या संबंधाचीं अशीं कितीएक वर्तमानपत्रें आणि मासिकपुस्तकें निघतात. त्यांतून, शेतकऱ्यांचे नानाप्रकारचे अनुभव प्रसिद्ध होतात. त्यांतल्या अडचणी सर्वांस कळतात; त्या अडचणी दूर करण्याचे उपाय प्रसिद्ध होतात; त्यांत काय सुधारणा कराव्या, त्या सुचतात; आणि त्याप्रमाणें सुधारणा होऊन शेतकऱ्यांस लाभ होतात. तसें इकडे झालें पाहिजे. शोध करून पाहतां असें कळतें कीं, शेतकीच्या संबंधाच्या ज्या कांहीं युक्ति आमच्या एका प्रांतांतल्या लोकांस ठाऊक असतात, त्या, दुसऱ्या प्रांतांतल्यांस ठाऊक नसतात. त्यामुळें त्या युक्तींचा उपयोग सर्वत्र होत नाहीं. ही अड-

चण नाहींशी होण्यास वर्तमानपत्रें किंवा मासिकपुस्तकें हीं साधनें उत्तम होत. तीं हातीं घेतलीं पाहिजेत.

आणखीही शेतकीची संपत्ति आपल्या स्वाधीन राहाण्यास दुसरी एक गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. ती ही कीं, तिजवरच्या सरकारदस्तांत वारंवार चलविचल होतां कामास नये. ह्मणून, आमच्या सगळ्या शेतकऱ्यांनीं मिळून, सरकारास वरचेवर अर्ज करून, साऱ्याची रकम ही सध्या केवळ तीस वर्षांच्या मुदतीची असते, ती निदान साठ वर्षांची तरी करून घ्यावी. तितका प्रयत्न केला तर हें साधण्यासारखें आहे.

**विद्याभ्यास.**—आपल्या लोकांत लिहिणेंवाचणें आणि साधारण हिशेबटिशेब राखणें हें सर्व लोकांस चांगलें येऊन, वेगळ्या वेगळ्या लोकांस वेगळ्या वेगळ्या प्रकारचे सगळे धंदे उत्तमप्रकारें करतां येणें, ही खरी विद्या होय. तिचा प्रसार झाला पाहिजे. नुसतें शब्दपांडित्य उपयोगीं नाहीं. कालिदासाचीं नाटकें उत्तम कळलीं आणि शेक्सपियरचीं काव्यें उत्तम कळलीं म्हणजे आम्ही कृतार्थ झालों, असें नाहीं. कठिण काव्यें उत्तमप्रकारें लावितां येतात, असे पंडित हजारों आहेत, आणि चौरंगाचा पाय बसवितां येतो असा एकही मनुष्य नाहीं, तर त्या राष्ट्राची अवस्था काय होईल? इंग्लंडांत वाट्, स्टेफिन्सन इत्यादि मंडळीनें वाफेच्या वगैरे यंत्रांचे जर शोध लाविले नसते, तर, नुसत्या शेक्सपियरांनीं आणि मिल्टनांनीं तो देश इतक्या उत्तमावस्थेप्रत पावला असता काय? आपल्या देशांतला कवि कालिदास हा पृथ्वींतल्या कवींत उत्तमांपैकीं होऊन गेला, असें सगळे विद्वान लोक कबूल करितात. तें खरें आहे; पण, आपणांत कोणी वाट् किंवा स्टेफिन्सन निपजला नाहीं, त्यामुळें आपल्या राष्ट्राची अवस्था काय झाली आहे ती पाहा. ह्मणून, सांगावयाचें एवढेंच कीं, जिच्या योगानें मनुष्याचें सुख वृद्धि पावेल किंवा दुःखाचें निवारण होईल, अशी विद्या माणसास आली पाहिजे, आणि तीच खरी विद्या होय. सांप्रतकाळीं युरोप आणि अमेरिका ह्या खंडांतल्या विद्याचारसंपन्न देशांत, लांकडी काम, धातूचें काम, घड्याळें करण्याचें काम, वस्त्रें विणण्याचें काम, घरें बांधण्याचें काम, आगबोटी चालविण्याचें काम, आगगाड्या चालविण्याचें काम, शेत पिकविण्याचें काम, इत्यादि

सगळीं व्यवहारोपयोगी कामें शिकविण्याच्या वेगळ्या वेगळ्या शाळा स्थापिल्या आहेत. त्यांत केवळ पुस्तकें वाचवून तीं कामें कशीं करावीं हें सांगत नाहींत. तर, सगळें सामानसुमान प्रत्यक्ष आणून तीं कामें विद्यार्थ्यांकडून करवितात. फार काय सांगावें, लहान मुलांची जोगवण कशी करावी, हें काम देखील, शाळांत अनाथ मुलें बुद्ध्या त्यांच्या स्वाधीन करून, तरुण मुलींस शिकवितात. ह्मणजे, जितक्या म्हणून उपयुक्त कला आहे, तितक्या सगळ्या ते अगदीं पद्धतवार शिकवितात. त्यांच्या योगानें, त्यांत सगळ्या कला उत्तम प्रकारें वाढत चालल्या आहेत; आणि खरे कारागीर तयार होत आहेत. तसें आपल्या देशांत झालें पाहिजे. आणि असें शिकणें हीच खरी विद्या होय. म्हणजे, एकंदर सगळ्या राष्ट्राच्या विद्याभ्यासाचा मुख्य हेतु असा असला पाहिजे कीं, त्यास कोणत्याही गोष्टीकरितां दुसऱ्या राष्ट्राच्या तोंडाकडे पाहायाचें कारण पडूं नये. त्याप्रमाणेंच प्रत्येक माणसाला अशी कांहीं तरी विद्या येत असली पाहिजे कीं, प्रसंगीं त्यास, साधारण निर्वाहाकरितां, दुसऱ्याच्या हाताकडे पाहाण्याचें प्रयोजन पडूं नये. तरच तिचें नांव विद्या.

परंतु, सध्या आपल्या विद्येचा क्रम तसा नाहीं; तर ह्याच्या अगदीं उलट आहे. म्हणजे, आमच्या राष्ट्रांत दिवसेंदिवस जरी एका प्रकारच्या विद्येचा प्रसार अधिकाधिक होत चालला आहे, तरी, आमच्या राष्ट्रास काय, आणि आमच्या राष्ट्रांतल्या आम्हां माणसांस काय, परावलंबन अधिकाधिक जडत चाललें आहे. आमच्या राष्ट्रास, कापड, यंत्रें, आणि दुसऱ्या उपयुक्त वस्तु ह्यांसाठीं इंग्लंडाच्या तोंडाकडे पाहाणें प्राप्त झालें आहे. ह्मणजे आपणांस राज्याधिकार नाहीं तो नाहींच; पण, साधारण व्यवहारांतलें स्वनिर्वाहाचें सामर्थ्य तेंही नाहीं; अशी अत्यंत खेदकारक अवस्था आपणांस प्राप्त झाली आहे. ह्या सगळ्याचा अर्थ असा कीं, एका प्रकारें पशूंची आणि आमची गति एकसारखी होऊं पाहात आहे. हें फार वाईट आहे. हें विघ्न टाळण्यास आपणांस उपयुक्त विद्या संपादिली पाहिजे.

उपयुक्त विद्या संपादण्यास नानाप्रकारचे उद्योग करावे लागतील, हानि सोसावी लागेल, अपमान सोसावा लागेल, कदाचित् छळही सोसावा लागेल; तरी तो सोसावा. दृष्टि पायांजवळ ठेवूं नये, पुढें ठे-

चावी. युरोपखंडांतही ज्यांनीं प्रथम नव्या युक्ति काढिल्या, त्यांस नानाप्रकारच्या छलना भोगाव्या लागल्या आहेत. कष्टावांचून फल नाहीं. आणि ज्या मानानें फल मोठें असतें, त्या मानानें कष्ट अधिक करावे लागतात. आमच्या राष्ट्रांत कलाकौशल्याचा प्रसार करणें हें काम फार मोठें आहे. तें करण्यास श्रमही मोठे केले पाहिजेत. ह्या प्रकारच्या विद्या संपादतांना एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, ज्या गुरूंपासून आपण ही विद्या शिकत आहोंत, त्या गुरूंत मिसळून जाणें हें कांहीं आपलें मुख्य काम नव्हे; तर, ती विद्या हातीं लागल्याबरोबर, परत आपलें घर स्मरून, ती आपल्या मंडळीस देणें, हें मुख्य काम आहे. बृहस्पतीचा पुत्र कच ह्याचें उदाहरण मनांत आणावें.

आपली चांगली विद्या इंग्लिश लोक इतरांस शिकवीत नाहींत ह्मणतात; आणि, वर सांगितलेल्या विद्यांच्या प्रसाराकडे त्यांचें लक्ष नाहीं, हें पुष्कळ गोष्टींवरून दिसून येतें. म्हणजे, इंग्लिश लोकांनीं आह्मांला शेक्सपियर कवीचीं काव्यें शिकविण्यास उत्तम शिक्षक इंग्लंडाहून आणविले आहेत, पण, आगकाड्या, साबण, इत्यादि सामान तयार करण्याची कला शिकविण्यास कोणी आणिलें नाहीं; ह्यावरून सर्व प्रकार उघड होत आहे. तरी, ज्या पक्षीं, त्या कलांची गरज आपणांस अतिशयित आहे, त्या पक्षीं द्रव्य खर्चून म्हणा, आर्जव करून म्हणा, किंवा सेवा करून करून म्हणा, त्या कला आपणांस संपादिल्या पाहिजेत. त्यांत लाजतां कामास नये. रशियाचा झार पीटर धि ग्रेट हा गलबतें बांधण्याची कला शिकण्याकरितां, हालंडांत, इतर मजूरदार सुतारांबरोबर स्वतः काम करीत असे. हें उदाहरण लक्षांत ठेवून, आपल्या आंगचें परावलंबनाचें व्यंग घालविण्याचे उपाय योजिले पाहिजेत.

हें परावलंबन घालविण्यास उपाय एक. तो हाच कीं, सरकाराची वाट न पाहतां आमच्या लोकांनीं, हिय्या करून, आणि देशहिताकडे दृष्टि ठेवून, वर सांगितलेल्या प्रकारच्या अनेक विद्या आपल्या देशांतल्या लोकांस येतील, अशी तजवीज केली पाहिजे. ह्या कृत्यास द्रव्य पाहिजे. तें म्हणजे आज आमच्या देशांत अगदीं नाहीं असें नाहीं.

आणखी जें द्रव्य आमच्या राष्ट्रांत कोठें कोठें दिसत आहे, तें द्रव्य, जर सध्याची स्थिति अशीच कायम राहिली, तर, राज्याधिकाराच्या योगानें म्हणा किंवा व्यापाराच्या योगानें म्हणा, आमच्या देशांतून जाणार आहे. हा जर प्रकार अगदीं निर्विवाद आहे, तर, आमच्या राजेरजवाड्यांनीं आपल्या द्रव्याचा कांहीं अंश आमच्या देशांतल्या लोकांस विद्या शिकविण्यांत कां खर्चू नये? मुर्शिदाबादेहून शंभर जाहाजें भरून जो पैसा क्लैव साहेबानें कलकत्त्यास नेला, त्यास आपलें हें राष्ट्र अजीं मुकलें कीं नाहीं? त्याच पैशानें जर एकादी मोठी पाठशाळा स्थापित केलेली असती, तर तिच्या योगानें लोकांच्या ठायीं विद्या वाढली असती, आणि ती पाठशाळा व ती विद्या गलबतांत घालून नेतां आली नसती! ह्याहून अधिक स्पष्ट काय सांगावयाचें?

आणखी सध्याचा काळ असा आहे कीं, पैसा खरचिला म्हणजे पाहिजे तें मिळतें. विलायतेंतल्या सगळ्या कला शिकविणारे उत्तम शिक्षक आज पाहिजेत तितके मिळतील. पैसा पाहिजे; आणि, त्या कला प्रसाराचा निश्चय पाहिजे. ह्यांपैकीं पैसा आहे; दृढनिश्चय पाहिजे; तो गरीबांत उपयोगाचा नाहीं; श्रीमंतांत पाहिजे; तो श्रीमंतांनीं आणि महाराजांनीं धरावा. म्हणजे राष्ट्राचें मोठें काम होईल.

आणखी ह्या संबंधानें आमच्या देशबांधवांस आह्मी असें म्हणतों कीं, आपण आपल्या मुलांस खावयास अन्न आणि पांघरायास वस्त्र स्वतः देतों, तें लोकांवर सोंपवीत नाहीं, कां कीं त्यांत उपेक्षा होऊन आपल्या मुलांचे हाल होतील, असें भय आपणांस वाटतें; त्याप्रमाणें, मुलांस विद्या शिकविणें हेंही आपण लोकांवर सोंपवितां कामास नये; कां कीं त्यांतही अशी उपेक्षा होण्याचें भय आहे; आणि तशी उपेक्षा सध्या चालली आहे. ह्यास्तव आतां तरी जपावें. मुलांच्या सुखास अन्न आणि वस्त्र हीं जितकीं चांगलीं असतील तितकीं आवश्यक आहेत, तशी त्यांच्या सुखास चांगली विद्याही आवश्यक आहे. ती त्यांस देण्याचें काम आपण अगदीं परकीयांच्या स्वाधीन ठेविलें आहे, हें नीट केलें नाहीं. सध्याच्या सरकारी शाळांतला विद्याभ्यास हें खाणावळींतलें जेवण आहे. त्यानें मुलांचा निर्वाह कसावसा चालला आहे. पण, हेंच शिक्षण जसें पाहिजे आहे, तसें आपण जर आप-

त्या हातीं मुलांस दिलें, तर, तें त्यांस, घरच्या आईच्या हातच्या जेवणाप्रमाणें, फार सुखदायक होईल. सांप्रतकाळीं सगळ्या विद्याचारसंपन्न राष्ट्रांमध्यें राज्यव्यवहारशास्त्रप्रवीणतम जे नामांकित प्रिन्स बिस्मार्क ते इतके वृद्ध झाले आहेत आणि एवढे भाग्यशाली आहेत तरी, प्रति शनिवारीं दुपारीं, आपल्या मुलांच्या धड्यांची झडती घेतात. आईचें काम दाईच्यानें कधीं व्हावयाचें नाहीं; एवढ्यावरून सगळें समजावें; आणि आपल्या मुलांच्या विद्याभ्यासाची व्यवस्था करवेल तितकी चांगली करावी.

**सरकारी नौकरी**—हिजवर आशा ठेवणें व्यर्थ आहे. ह्याविषयीं पुष्कळ चांगल्या लोकांनीं आमच्या लोकांस बोध केला आहे.

त्रावणकोरचे महाराज ह्यांनीं एकदा एका व्याख्यानांत म्हटलें,—"सरकारी चाकरी मिळविण्याकरितां विद्या शिकावयाची, हें वेड विद्यार्थ्यांच्या डोक्यांतून जितकें लवकर निघेल, तितकें चांगलें. विद्यार्थीहो, हें तुह्मी खचीत समजा कीं, आपल्या निर्वाहाकरितां नांगर धरणें, पावडें घेऊन माती ओढणें, किंवा पाणी लाटणें, हें, लेखण्या तासून कारकुनीचें काम करीत बसण्यापेक्षां एक तिळभरही कमी योग्यतेचें नाहीं."

मद्रासचे आनरेबल नार्टन साहेब एकदां म्हणाले कीं, "विद्या करून करायाचें काय, तर सरकारी चाकरी मिळवावयाची, हें जें हिंदुस्थानच्या लोकांच्या डोक्यांत भरलें आहे, त्यानें त्यांची फार हानि झाली आहे."

मद्रासेंतले आन० ए. मेकंझी साहेब ह्यांनीं पाछापापाठशाळेंतल्या विद्यार्थ्यांस म्हटलें, "अहो, आपल्याच देशांतल्या शेतकऱ्यांनीं सरकारास दिलेल्या पैशांतून पगार म्हणून पैसा घेणें, ह्यानें आपल्या देशाच्या संपत्तीस भर पडत नाहीं, आणि आपल्या देशाचें कांहींएक हित होत नाहीं, हें तुमच्या मनांत देखील येत नाहीं काय? जशीं इतर राष्ट्रें संपन्न आहेत, तसें आपल्या राष्ट्रास संपन्न करावें, हें आपलें कर्तव्य आहे, हें तुमच्या कधीं मनांतच येत नाहीं काय? होय. येतें. तुमच्या मनांत तें येतें; पण त्यास आरंभ कसा करावा, हें तुह्मांस ठाऊक नाहीं. तर, तुम्हांला मी खचीत सांगतों कीं, सध्या तुमच्या देशास कलाकौशल्यसंबंधानें जी अवस्था प्राप्त झाली आहे, ती अवस्था

पूर्वी कोणत्या तरी राष्ट्रास केव्हां तरी प्राप्त झालेली असेल; आणि तीं-तून त्यांनीं आपली मुक्तता करून घेतली असेल. ती पाहून तुम्हीं तसें वागावें......सरकारी कचेऱ्यांत काय आणि सावकारी कामांत काय, लेखण्या ताशीत बसण्यापेक्षां, लोकोपयोगी दुसरे धंदे करणें हें चांगलें संभावितपणाचें आहे, हें जर तुम्हां तरुण लोकांच्या मनांत ठसेल, तर केवढें मोठें काम होईल?" खरोखरच फार मोठें काम होईल. नानाप्रकारचे व्यवसाय लोकांस करितां येऊं लागले, म्हणजे त्यांची गर्दी एकाच व्यवसायांत होणार नाहीं; ते एकमेकांच्या उपयोगीं पडतील; आणि तेणेंकरून सर्वांचें कल्याण होईल.

सरकारच्या नौकऱ्या आमच्यांतल्या चांगल्या विद्वान लोकांनीं होतां होईल तों तर पतकरूं नयेतच; कां कीं, त्या नौकऱ्या पतकरल्यानें, सर्वदा त्यांस आपले विचार आपल्या वरिष्ठांच्या विचारांप्रमाणें ठेवावे लागतात, आणि आपले स्वतःचे खरे विचार दाबावे लागतात. ही मोठी हानि आहे. सांप्रतकाळीं आमच्या देशांतल्या लोकांनीं काय केलें पाहिजे, हें आमच्यांतल्या विद्वानांस चांगलें कळतें. तें जर, पराधीनतेमुळें, त्यांस तसेंच मनच्यामनांत ठेवावें लागलें, तर, तें त्यांस कळूननकळून सारखेंच, असें होणार. ह्मणजे, त्यांचें ज्ञान जें राष्ट्राच्या उपयोगीं पडावयाचें, तें व्यर्थ जाणार. म्हणून, आमचे विद्वान लोक सरकारच्या नौकरीच्या बंधनांतून मोकळे असतील, तितके चांगले.

आणखी, देशाच्या किंवा राज्यकर्त्यांच्या उपयोगीं पडण्याच्या हेतूनें सरकारी नौकरी पतकरणें ह्यांतही फारसा अर्थ नाहीं. कां कीं, तें उत्तम प्रकारें साधण्यास सरकारच्या सगळ्या जागा आपणांस मिळण्यासारख्या पाहिजेत. त्या तशा नाहींत. सिव्हिल सर्विस परीक्षेस अट २३ वर्षांची ठेविली आहे, आणि ती विलायतेंतच व्हावयाची, इकडे व्हावयाची नाहीं, अशी आडकाठी घातली आहे. त्यामुळें त्या मोठ्या जाग्यांविषयीं आमच्या लोकांस विचार करितां येत नाहीं; आणि, त्यांत विशेष हें आहे कीं, आह्मां लोकांच्या राजनिष्ठेवर सरकारचा विश्वास नाहीं. त्याचें एक मोठें प्रमाण असें आहे कीं, सांप्रतकाळीं सर्व विद्याचारसंपन्न देशांत "व्हालंटियर" ह्या नांवाचें लष्कर तयार ठेविलें आहे. त्या लष्कराचें मुख्य लक्षण हें आहे कीं, सरकारचा कांहींएक

पगार न घेतां, वेगळ्या वेगळ्या धंद्यांचे सभ्य आणि चांगले कवाईत शिकून तयार राहावयाचे, आणि, प्रसंग पडेल तेव्हा, देशाच्या किंवा राज्याच्या रक्षणार्थ, हातांत शस्त्र घेऊन, कांहींएक पगार न मागतां, सरकारच्या उपयोगीं पडावयाचे. असे व्हालंटियर ग्रेतब्रितन आणि आयर्लंड ह्या देशांत २१५०१५ आहेत. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतही व्हालंटियर पलटणी स्थापित केल्या आहेत. पण त्यांत असा नियम केला आहे कीं, युरोपियन लोक, ह्या देशांतले एतद्देशीय ख्रिस्ती लोक व पार्शी लोक मात्र घ्यावयाचे; इतर कोणास घ्यावयाचें नाहीं. तेव्हां, अशा प्रकारें देशाच्या उपयोगीं पडण्याचा एक मोठा मार्ग सध्या अगदीं खुंटला आहे. म्हणून एकंदरीनें, सरकारी नौकऱ्यांकडे ओढा ठेवणें कोणत्याही प्रकारें इष्ट नाहीं.

**मुख्य कर्तव्यकर्म.**—तर, करावें काय? काय केलें म्हणजे ह्या लाजिरवाण्या स्थितींतून आपण निघूं? ह्याचें उत्तर थोडक्यांत आहे; परंतु, त्याची व्यापकता फार आहे. तें उत्तर एवढेंच कीं, ह्या जगामध्यें स्थितिपरत्वें आपणांस जीं अनेक कर्तव्यकर्मे करावयाचीं आहेत तीं आपण यथाशक्ति बरोबर रीतीनें करावीं. म्हणजे असें. आपणांस कांहीं कामें आपणां स्वतःकरितां करावयाचीं असतात; कांहीं कामें आपल्या कुटुंबाकरितां करावयाचीं असतात; कांहीं कामें इष्टमित्रांकरितां करावयाचीं असतात; आणि कांहीं कामें साधारण आपल्या सर्व लोकांकरितां म्हणजे देशाकरितांच करावयाचीं असतात. ह्यांतलीं सगळीं कामें अगत्याचीं आहेतच; परंतु देशाकरितां करावयाचीं म्हणून जीं कामें आहेत, तीं सर्वांत अत्यंत महत्त्वाचीं आहेत. कां कीं, तीं जर माणसानें बरोबर रीतीनें केलीं, तर, बाकीचीं सर्व कामें केल्याचें श्रेय त्यांस येतें. म्हणून, विद्याचारसंपन्न राष्ट्रांत जे थोर पुरुष आजपर्यंत होऊन गेले, ते, आपल्या देशाच्या हिताचीं कामें करण्यास पुष्कळ झटले; त्यांच्या परिश्रमांनीं त्यांच्या देशाचें कल्याण झालें; त्याच्या योगानें असे पुरुष, पूज्य मनुष्यांस पूज्य झाले आहेत. त्यांचा कित्ता आपण वळविला पाहिजे. त्यांतलीं कांहीं उदाहरणें येथें सांगतों.

ग्रीसदेशांतला सरदार झावेला ह्यानें आपला मुलगा, तुर्क सरदार अली पाच्छा ह्याजकडे ओलीस ठेवून, त्यास स्पष्ट लिहिलें, "माझा

मुलगा प्राणास मुकणार हें तर आतां खचीत आहे. पण, त्याचा सूड घेतल्यावांचून मी मरावयाचा नाहीं. तुझ्यासारखे तुर्कलोक मला निर्दय बाप म्हणतील तर म्हणोत. पण त्याची परवा मी करीत नाहीं. आम्हांला जय मिळाला तर मला मुलें होतील. माझा मुलगा, आपल्या देशाकरितां मरायास जर कांकूं करील, तर त्यानें जगण्यापेक्षां मरावें हें बरें; आणखी तो माझा मुलगा म्हणवून घेण्यास पात्र नाहीं. त्याला जर मरायाचें धैर्य नसेल, तर तो ग्रीसदेशांतला मनुष्य आहे असें म्हणूं नये. विश्वासघातक्या, दुष्टा, चल, पुढें ये, तुझीं हाडें मोडण्यास मी तयार आहें."

रोम शहर बांधिल्यानंतर सुमारें दोनशें शेचाळीस वर्षांनीं, इट्रूरियन लोकांचा राजा पोरसेना ह्यानें त्यास वेढा घातला. आणि आंतल्या रोमन लोकांचे सगळे उपाय थकून मरायाची पाळी आली. त्या प्रसंगीं त्यांतला एक गृहस्थ, म्युशियस स्किव्होला, ह्यानें सर्वांच्या समोर येऊन सांगितलें कीं, "माझें कांहीं होवो, पण मी हरप्रयत्न करून पोरसेना ह्यास ठार मारितों, म्हणजे शहराचा वेढा आपोआप उठेल." त्याप्रमाणें, मोठ्या युक्तीनें त्या राजाच्या छावणींत प्रवेश करून त्यानें त्यास एका तंबूंत गांठिलें. पण त्या वेळेस त्याच्याजवळ जो एक चाकर उभा होता, तो राजापेक्षां देखणा आणि चांगला पोषाक केलेला दिसल्यावरून, तो राजा आहे असें समजून, त्यानें त्याच्या उरांत खंजीर खुपसून त्याला ठार मारिलें. पुढें चौकशीच्या वेळीं त्या मनुष्यानें, जवळच्या झगझगीत जळत्या होमकुंडांत हात घालून, अगदीं शांतपणानें असें सांगितलें कीं, "पहा, मला ह्याचें कांहीं वाटत नाहीं. ह्यावरून देशाभिमान ह्या सद्गुणाची किंमत आह्मी लोक किती समजतों, तें तुम्ही समजा. असा मी एकटाच नाहीं; माझेसारखे तीनशें लोक राजाचा प्राण घेण्यास हातावर शिर घेऊन तयार आहेत." हें ऐकून, समंजसपणानें त्या राजानें त्या शहराचा वेढा उठविला.

स्पार्टन लोकांशीं थीबन लोकांचा सरदार, इपामिनंदास हा हातघाईस येऊन लढत असतां, त्यास उरांत जखम लागली, आणि तो व्याकूळ होऊन जमिनीवर पडला. त्याला त्याच्या मृत्यूविषयीं कांहींएक

वाटलें नाहीं. परंतु, आपलीं शस्त्रें आतां आपल्या शत्रूंच्या हा.. लागतील, आणि तेणेंकरून आपला मोटा अपमान होईल, अशी त्यास मोटी काळजी पडली; आणि त्याविषयीं तो जवळच्या माणसांजवळ बोलूं लागला. इतक्यांत, त्याचीं सगळीं शस्त्रास्त्रें त्याच्या एका मित्रानें त्यास आणून दाखविलीं, आणि असें सांगितलें कीं, "आपला जय होऊन स्पार्टन लोकांचा अगदीं पराभव झाला आहे." हे शब्द कानीं पडतांच, त्यास परमसंतोष झाला. त्याचें मुख प्रफुल्लित दिसूं लागलें; आणि, तो मोठ्या हर्षानें जवळच्या मंडळीस म्हणाला, "मित्रांनो, हा आजचा दिवस माझ्या आयुष्याचा शेवटचा आहे असें समजूं नका. तर, माझ्या सुखाचा आणि पूर्ण वैभवाचा हा पहिला दिवस आहे असें समजा. माझ्या देशास जय प्राप्त झाला आहे; माझ्या देशाचे शत्रु स्पार्टन लोक हे हतवीर्य झाले आहेत; आणि ग्रीस देश पराधीनत्वापासून मुक्त झाला आहे. आतां मी जातों." आपलीं शस्त्रें परांच्या हातीं लागूं नयेत, असा अभिमान इपामिनंदास ह्यास होता. आणि आमच्या सगळ्या राष्ट्राचीं सगळीं शस्त्रें परक्यांनीं घेतलीं आहेत ! इपामिनंदास आणि आम्ही लोक ह्यांच्यामध्यें केवढें अंतर हें !

एके समयीं बर्कले ह्या नांवाचा एक इंग्लिश गृहस्थ बेन्‌जामिन फ्रांकलिन ह्या अमेरिकन स्वदेशाभिमानी पुरुषाशीं बोलत असतां, इंग्लंडच्या सामर्थ्याची स्तुति करून ह्मणाला, "इंग्लिश लोकांचें आरमार फार मोटें आहे. ते तोफा लावून तुमच्या सगळ्या देशाची राखरांगोळी करून टाकितील." त्यावर बेन्‌जामिन फ्रांकलिनानें उत्तर दिलें, "माझी मालमत्ता म्हटली म्हणजे काय तीं घरें आहेत. तीं तुह्मी जाळा कीं त्यांचें काय पाहिजे तें करा, पार्लमेंटाचा जो एवढा हट्ट आम्हांवर अंमल चालविण्याविषयीं आहे, त्याला आड येण्याविषयीं जो माझा निश्चय आहे, तो मी कधींही सोडणार नाहीं."

अशीं आणखी अनेक उदाहरणें देतां येतील. पण, सर्वांत मोटें उदाहरण आमच्या सगळ्या लोकांस निरंतर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तें उदाहरण म्हटलें ह्मणजे जार्ज वाशिंग्टन ह्याचें होय. ह्या पुरुषाची कथा अत्यंत रमणीय आणि अत्यंत बोधपर आहे. ती सांगण्यास आम्हांस येथें अवकाश नाहीं. तरी, त्याच्या अप्रतिम योग्यतेचें

महत्त्व लक्षांत येण्यास त्याविषयीं थोर पुरुषांनीं काय म्हटलें आहे, तें येथें सांगतों. इंग्लंडांतला नामांकित राज्यकारस्थानी पुरुष फाक्स ह्यानें त्यास उद्देशून म्हटलें आहे—"खरा भाग्यवान् पुरुष! ह्याचें जें देव्हारें झालें आहे, तें ह्याच्या अधिकाराच्या मोटेपणावरून झालेलें नाहीं; तर, तें त्याच्या मनाच्या मोटेपणावरून झालें आहे! ह्याच्या मोटेपणापुढें युरोपांतल्या सर्व मोठ्यांचें मोटेपण एवढेंसें आणि कसपटासारखें दिसतें." लार्ड अर्स्किन ह्यानें स्वतः वाशिंग्टनास एका पत्रांत लिहिलें,—"माझा परिचय मोठ्या योग्यतेच्या मोठ्या लोकांत पुष्कळ आहे; पण, माझ्या अंतःकरणांत अत्यंत सन्मानपूर्वक पूज्यबुद्धि खरोखर म्हटली तर केवळ आपणांविषयीं मात्र आहे." लार्ड ब्रौहाम ह्यानें असें लिहिलें आहे कीं, "जार्ज वाशिंग्टन ह्याची खरी योग्यता समजत जाणें हीच विद्याचारसंपन्नतेच्या वृद्धीची खरी कसोटी होय." जगद्विख्यात नेपोलियन बोनापार्टानें असें म्हणून दाखविलें कीं, "राज्यक्रांतीच्या कोल्हाळांत माझें नांव कोणीकडच्या कोणीकडेसच नाहींसें होईल; पण, त्यांत जार्जवाशिंग्टनाचें नांव जशाचें तसें राहील, आणि लोकांस आठवेल." तें निदान आजपर्यंत तर खरें झालें आहे. आपल्या दयाळू महाराणीसाहेबांचे माजी मुख्य प्रधान ग्लाडस्टन साहेब हे, एका मोठ्या सभेमध्यें, व्याख्यानांत, थोर पुरुषांविषयीं बोलत असतां म्हणाले कीं, "प्राचीन इतिहास आणि अर्वाचीन इतिहास जितका मीं पाहिला आहे, तितक्या सर्वांत, जार्ज वाशिंग्टनासारखा खरा थोर पुरुष मला दुसरा एकही दिसत नाहीं." जे ग्लाडस्टनसाहेब वयानें, विद्येनें, आणि वैभवानें, एवढे श्रेष्ठ आहेत, ते ज्या व्यक्तीची स्तुति इतकी करितात, त्या व्यक्तीविषयीं इतर सामान्य जनांनीं काय बोलावें? आणखी त्यास जें एवढें मोटें मानितात, त्यास कारण त्याची संपत्ति आहे काय? त्याची विद्या आहे काय? त्याचा अधिकार आहे काय? नाहीं. मुळींच नाहीं. तो साधारण गरीबसा शेतकरी होता; त्याला विद्याही फार होती असें नाहीं; आणि त्याला अधिकारही असा विलक्षण होता असें नाहीं. तर, त्यास, सगळ्या इतिहासप्रसिद्ध माणसांत जें इतकें श्रेष्ठ मानितात, त्यास मुख्य कारण त्याचा स्वदेशाभिमान होय. तो स्वदेशाभिमानाचा केवळ अवतार होता. तो अवतरला म्हणूनच अमेरिकेंतल्या

संस्थानांस स्वातंत्र्य मिळालें; एरव्हीं कधींही मिळालें नसतें. त्यासारखा पुरुष पूर्वीं कधीं झाला नव्हता. त्याचें अंतःकरण शुद्ध विचारांनीं आणि स्वदेशाभिमानानें अगदीं भरून गेलें होतें असें दिसतें. त्यानें आपलें प्रेसिडेंटाचें काम सोडतेवेळीं, सगळ्या संस्थानांतल्या लोकांस बोध केला आहे; तो बोध स्वदेशाभिमानाची आणि सदाचरणाची केवळ गीता आहे. त्यांत त्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे—"राष्ट्राच्या राजकीय स्थितीस उन्नति प्राप्त होण्यास जीं साधनें अत्यंत आवश्यक आहेत, त्यांत धर्मश्रद्धा आणि सदाचरण हीं मुख्य आहेत. किंबहुना, राज्योन्नतीची सगळी इमारत धर्मश्रद्धा आणि सदाचरण ह्या दोन खांबांवर बांधिली आहे, असें म्हटलें तरी चालेल. जे पुरुष हे दोन खांब उपटून टाकून देशाच्या उन्नतीकरितां श्रम करितील, त्यांचे सगळे श्रम खचीत व्यर्थ जातील. मनुष्याचें सर्व सुख आणि सौजन्य ह्या दोन खांबांच्या आधारावर आहे." त्याप्रमाणेंच, परकीय राष्ट्रांतल्या लोकांच्या कावेबाजपणाविषयीं जपण्याविषयीं त्यानें सांगितलें कीं, "परकीय लोकांचें प्राबल्य आपल्या राष्ट्रांत न व्हावें, ह्याविषयीं फार जपा. कां कीं, त्याच्या पायीं प्राचीन काळच्या पुष्कळ स्वतंत्र राष्ट्रांचा नाश झाला आहे." आणखी त्याचें म्हणणें असें पडलें कीं, "संभाळा; आपल्या राष्ट्रास संभाळा; ह्याचें रक्षण चांगलें करा. संरक्षणाविषयीं दुसऱ्या राष्ट्रांच्या साह्याच्या विश्वासावर जाऊं नका. कोणी कसाही स्नेह दाखविला, तरी हें खचीत लक्षांत ठेवा कीं, तुमच्यापासून त्या साह्याची दुप्पट तिप्पट घेतल्यावांचून तें तुम्हांला कोणी देणार नाहीं." हें किती खरें आहे, ह्याचें प्रमाण हिंदुस्थानाच्या इतिहासांत पाहिजे इतकें आहे. पाल्डिंग ह्या नांवाचा एक ग्रंथकार वाशिंग्टनाच्या स्तुतिस्तोत्राच्या भरांत येऊन असें म्हणतो कीं, "अशी विभूति ज्या राष्ट्रांत होऊन गेली, तें राष्ट्र धन्य होय; आणि जें राष्ट्र अशा पुरुषास आपला केवळ पिता ह्मणवितें, तें परम धन्य होय." खरें आहे.

इतक्या गोष्टी ऐकवून आह्मांस आमच्या वाचणाऱ्या आबालवृद्धांस शेवटीं एवढेंच सांगावयाचें आहे कीं, बापहो, आपल्या ह्या राष्ट्राच्या सध्याच्या निकृष्टावस्थेचा चांगला विचार करा; आणि तींतून त्यास काढावयाच्या उद्योगास लागा; आपल्या देशाची उन्नति ही एक मोठी

इमारत आहे; ही बांधावयास अनेक प्रकारचे कारागीर पाहिजेत आहेत, ते तयार व्हा. कोणी कोलंबस व्हा; कोणी लूथर व्हा; कोणी शिवाजीमहाराज व्हा; कोणी जेम्स वाट व्हा; कोणी सर ऐझाक न्यूटन व्हा; कोणी लार्ड बेकन व्हा; कोणी जार्ज वाशिंग्टन व्हा; कोणी रामशास्त्री व्हा; कोणी विष्णु परशुराम शास्त्री व्हा; कोणी जान हावर्ड व्हा; कोणी विष्णुशास्त्री चिपळूणकर व्हा; कोणी लार्ड क्लैव्ह व्हा; कोणी वारन हेस्तिंग्ज व्हा; कोणी कांहीं व्हा, कोणी कांहीं व्हा, आणि, यथाशक्ति ह्या मोठ्या इमारतीच्या बांधणीच्या कामास लागा. आमच्यानें काय होणार आहे असें म्हणून स्वस्थ बसूं नका. अशा प्रकारच्या इमारती आजपर्यंत ज्यांनीं बांधिल्या, त्यांस चारचार हात नव्हते, कीं सहासहा डोळे नव्हते. ते तुमच्याआमच्या सारखेच लोक होते. तर, त्यांनीं जीं कामें केलीं, तीं तुम्हांआम्हांस कां न करितां यावीं? आणखी, त्यांच्या वेळापेक्षां सध्याचा वेळ सर्वप्रकारीं चांगला आहे; आणि विद्येचा प्रसार पुष्कळ झाला आहे. ह्यास्तव, तीं कामें त्यांच्यापेक्षां आपणांस अधिक चांगल्या रीतीनें करतां आलीं पाहिजेत. तीं जर करतां आलीं नाहींत, तर आपलें जिणें व्यर्थ होय. कोणत्याही काळीं झालें तरी उद्योग करणें हें मात्र माणसाकडे असतें; फलप्राप्ति ईश्वराधीन असते. तोच प्रकार येथें आहे. ह्यास्तव, आपण आपल्या हातचें तेवढें काम आपण करून टाकूं या, फल देणें परमेश्वराकडे आहे. आपल्या उद्योगाचें फल कदाचित् आपणांस न आलें, तर आपल्या मुलांस येईल, नातवांस येईल, पंतवांस येईल, किंवा पुढच्या दहाव्या पिढीस येईल. तें कोणासही येवो; किंवा कोणास कधीं न येवो; आपलें कर्तव्य आपणांस जितकें करवेल, तितकें आपण करून टाकूं या; म्हणजे, निदान आपलें अंतःकरण समाधान पावेल, आणि आपली कृति विश्वंभरास मान्य होईल. हेंच जन्मसार्थक्य होय.

समाप्त.

# विक्रीस तयार.

## प्राकृत.

| | किं० | ट० |
|---|---|---|
| शकुंतलाचरित्र ... ... ... | ऽ— | ऽ॥ |
| शिवलीलामृत. रेशमी ... ... ... | ०॥० | ऽ—॥ |
| श्रीएकनाथचरित्र ... ... ... ... | ०॥।० | ऽ= |
| श्रीमंत पहिले बाजीराव बल्लाळ पेशवे यांचें चरित्र ... | ०॥० | ऽ— |
| श्रीज्ञानेश्वरचरित्र ... ... ... ... | ०॥।० | ऽ= |
| सवाई माधवरावसाहेब ... ... ... | ऽ≡ | ऽ॥ |
| सदाचार ... ... ... ... | १। | ऽ= |
| सद्वर्तन ... ... ... ... | ०॥।० | ऽ—॥ |
| साहा सुलभ संवाद ... ... ... ... | ऽ— | ऽ॥ |
| साम्युएल जान्सन ... ... ... ... | ०।≡ | ऽ— |
| सावित्रीचरित्र ... ... ... ... | ऽ॥ | ऽ॥ |
| सुगम प्रियदर्शिका ... ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| सुलभ विक्रमोर्वशी ... ... ... ... | ऽ≡ | ऽ॥ |
| सुलभशाकुंतल ... ... ... ... | ऽ=॥ | ऽ॥ |
| सुशीलयमुना अथवा वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडाची धामधूम ... ... ... ... | ०॥।० | ऽ—॥ |
| सोपीं गाणीं ... ... ... ... | ऽ— | ऽ॥ |
| सोळासोमवार ... ... ... ... | ऽ— | ऽ॥ |
| स्त्रीशिक्षणबोध ... ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| स्वदेशाभिमान ... ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| श्रीमद्भगवद्गीता, सुबोधचंद्रिका ... ... ... | ०॥= | ऽ— |
| बालबोध पहिलें पुस्तक ... ... ... | ऽ— | ऽ॥ |
| ,, दुसरें पुस्तक ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| हरिविजय. ( ओंवीबद्ध ) ... ... ... | १ | ०॥० |
| निवडक बोधपर पदें व अभंग ... ... | ऽ—॥ | ऽ॥ |
| मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्गार ... ... | १। | ऽ= |
| शनिमाहात्म्य. ( ओंवीबद्ध ) ... ... ... | ऽ= | ऽ॥ |
| देहावरनिराकारी अभंग ... ... ... | ऽ—॥ | ऽ॥ |
| देवीमाहात्म्य. (सप्तश० प्रा० ओ० टीका.) ... | १। | ऽ= |

| | कि० | ट० |
|---|---|---|
| [illegible]मलाकर ... ... ... | ४ | ·।· |
| श्रीधरकृत पांडवप्रताप ... ... ... | ४ | ·।।= |
| स्त्रीगीत भाग पहिला ... ... ... | ८≡ | ८– |
| ,, भाग दुसरा ... ... ... | ·।– | ८– |
| ,, भाग तिसरा ... ... ... | ·।· | ८– |
| नाटकी गंगु ... ... ... ... | ८– | ८।। |
| नागानंदसार ... ... ... ... | ८=।। | ८।। |
| पथ्यापथ्यविचार ... ... ... ... | ८= | ८।। |
| पाळणे ... ... ... ... | ८।। | ८।। |
| प्रपंच आणि परमार्थ ... ... ... | ८– | ८।। |
| फुलांची परडी ... ... ... ... | ·।· | ८।। |
| बाळमित्र ... ... ... ... | ८– | ८।। |
| भाऊबंदांत कलह उत्पन्न होऊन विभक्त होतात त्याचीं कारणें काय व ते न होण्याचे उपाय. ... | ·।· | ८।। |
| भूपाळ्या ... ... ... ... | ८।। | ८।। |
| भ्रमनिरास ... ... ... ... | ·।।· | ८– |
| मनुवचन ... ... ... ... | ८– | ८।। |
| महामारी ... ... ... ... | ·।= | ८।। |
| मुद्राराक्षससार ... ... ... ... | ८≡ | ८।। |
| मुलांस उत्तम बक्षीस ... ... ... | ·।।· | ८– |
| मुलांचें कल्याण ... ... ... ... | ८–।। | ८।। |
| मुंबई युनिव्हर्सिटीचे संस्कृत म्याट्रिक्युलेशन पेपर व त्यांचीं उत्तरें सन् १८६२–१८८८ ... | १ | ८– |
| ययातिराजाची कथा ... ... ... | ८– | ८।। |
| यशोदागीत ... ... ... ... | ८।। | ८।। |
| राजगुरु दादोजी कोंडदेव आणि छत्रपति शिवाजीमहाराज | ·।= | ८– |
| रामनवमी ... ... ... ... | ८– | ८।। |
| रामविजयग्रंथ. ( ओवीबद्ध ) ... ... ... | ३ | ·।।= |
| रुक्मिणीस्वयंवर रेशमी पुठ्यानें बांधलेलें ... ... | ·।।· | ८– |
| वाल्मीकि रामायणाचें मराठी भाषांतर ... ... | २० | १८= |
| वासवदत्ता कथासार ... ... ... | ८– | ८।। |
| विचारसाधन ... ... ... ... | ·।· | ८।। |

श्री.

र. २३२९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

This book belongs
to Sadanand Hari gole
This book belongs
to N. R. Kuchar
a student in the ...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# मुलांस उत्तम बक्षीस.

विनायक कोंडदेव ओक.

ओंवी.

मुखीं सत्य अंगें विनीत तेणें जिंकिले जन समस्त
इहीं सद्गुणीं आलंकृत चतुरीं झालें पाहिजे.

मुक्तेश्वर.

आवृत्ति तिसरी.

मुंबईंत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर'
छापखान्यांत छापविलें.

इसवी सन १८९५.

किंमत ५ आणे.

ह्या पुस्तकाचे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.

---

हिंदुस्थान सरकारच्या इ० स० १८६७ च्या २५ व्या
आक्टाप्रमाणें हें पुस्तक नोंदलें आहे.

# दोन शब्द.

आमच्या प्रिय मुलांनो, घ्या; हें उत्तम बक्षीस घ्या. हें बुद्ध्या तुह्मांकरितां केलें आहे. ह्या जगांत कालक्रमणा करण्याचे उत्तम मार्ग कोणते आहेत हें तुह्मांस दर्शवावें, आणि तुमच्या मनांचें रंजन करावें, हा ह्या पुस्तकाचा हेतु आहे. हें लक्षपूर्वक वाचा; ह्याचा चांगला विचार करा; आणि ह्यांत सांगितलेल्या चांगल्या गोष्टी करण्याविषयीं झटवेल तितके झटा. हेंच सत्कर्म, हेंच पुण्य, आणि हेंच जन्मास आल्याचें सार्थक्य होय.

"सत्कर्मयोगें वय घालवावें
सर्वांमुखीं मंगल बोलवावें."

रामदास.

# मुलांस उत्तम बक्षीस.

## तीन प्रकारचे विद्यार्थी.

विद्यार्थी तीन प्रकारचे असतात. चांगले, मध्यम, आणि वाईट.

चांगले विद्यार्थी गाईसारखे होत. गाईला खायाला प्यायाला थोडें पुरतें, आणि ती दूध पुष्कळ देते. तसें, चांगल्या विद्यार्थ्यांस थोडें शिकविलें, तरी, स्वतः अभ्यास करून आपलें ज्ञान ते पुष्कळ वाढवितात.

मध्यम विद्यार्थी पोपटासारखे होत. ह्मणजे, त्यांस जेवढें शिकवावें, तेवढें मात्र येतें; अधिक येत नाहीं.

वाईट विद्यार्थी फुटक्या भांड्यासारखे होत. फुटकें भांडें पाण्यानें पूर्ण भरलें, तरी तें लागलेंच पुनः पूर्वींप्रमाणें रिकामें होतें. त्याप्रमाणें, वाईट विद्यार्थ्यांस जें शिकवावें, तें ते लागलेंच विसरतात; आणि पुनः जशाचे तसे कोरडे राहातात.

गाय दूध देऊन उपयोगीं पडते, ह्मणून ती सर्वांस आवडते; पोपटापासून उगाच कधीं थोडी करमणूक होते, ह्मणून तो कांहीं लोकांस आवडतो; पण फुटकें भांडें ह्मणजे अगदीं निरुपयोगी, रिकामी अडचण, ह्मणून तें कोणालाही आवडत नाहीं. ह्मणून सर्व मुलांनीं गाईसारखें होऊन, चांगले विद्यार्थी ह्मणवून घ्यावें, हेंच उचित होय.

## अंडें उभें केलें.

कोलंबसानें अमेरिका खंड इ० स० १४९२ त शोधून काढिलें. त्यावरून त्याची फार कीर्ति झाली; आणि स्पेनच्या दरबारीं त्याला मोठा मान मिळाला. हें त्या दरबारच्या कितीएक सरदारांस आवडलें नाहीं. एवढेंच केवळ नव्हे, तर, त्यावरून ते त्याचा मत्सर करूं लागले.

एके दिवशीं एका गृहस्थाचे घरीं मेजवानींत कोलंबस भोजनास बसला होता. त्यास, पंक्तींतल्या एका मोठ्या मानकऱ्यानें मत्सरबुद्धीनें विचारिलें, " कायहो, अमेरिका जर तुह्मांला सांपडली नसती, तर ती दुसऱ्या कोणाच्यानेंही शोधून काढवली नसती काय ?" त्यास कोलंबसानें तेव्हां कांहींएक उत्तर दिलें नाहीं.

पण कांहीं वेळ लोटल्यावर कोलंबसानें एक अंडें हातांत घेतलें, आणि " हें कोणाला उभें करितां येतें काय ?" असें तेथल्या सर्व मंडळीस विचारिलें. त्याविषयीं सर्वांनीं प्रयत्न करून पाहिले; पण तें कोणाला साधेना. तेव्हां तें कोलंबसानें आपल्या हातांत घेतलें, त्याचें एकीकडचें टोंक थोडेंसें फोडून टाकिलें, आणि त्यावर तें अंडें चटकर उभें केलें.

ह्यावरून त्यानें असें दर्शविलें कीं, मनुष्यें तेथून सगळीं सारखीं; पण त्यांत योजक विरळा. हेंच खरें आहे.

---

## वागण्याचे दाहा नियम.

१. जें तुला आज करितां येण्यासारखें आहे, तें उद्यांवर टाकूं नको.

२. जें तुझें काम स्वतः तुला करतां येण्यासारखें अ-

सेल, तें करण्याविषयीं दुसऱ्यास त्रास देऊं नको. ह्यानें तुझा स्वतंत्रपणा वाढेल.

३. तुझा पैसा हातीं येण्यापूर्वीं खर्चाच्या कामास हात घालूं नको. ह्मणजे तुला अडचणी येणार नाहींत, आणि व्यर्थ मोह पडणार नाहीं.

४. वस्तु कितीही सस्ती असो; पण जर तिजवांचून तुझें अडलें नाहीं, तर ती विकत घेऊं नको.

५. क्षुधा, तृषा अथवा शीत ह्यांच्यापेक्षां गर्व हा मनुष्याची हानि अधिक करितो. ह्यास्तव तो सोडून दे.

६. अधिक खाल्ल्याचा पश्चात्ताप करण्याचा प्रसंग कधीं प्राप्त होऊं नये, असा खाण्याचा बेत ठेव. नेमस्तपणा हेंच आरोग्य आहे.

७. आपण जें स्वसंतोषानें करितों, त्यापासून त्रास होत नाहीं. ह्मणून संतोष राहील इतके आणि अशा प्रकारचे श्रम करावे.

८. न टळणारीं पुढें येणारीं संकटें मनांत आणून चिंतांत होऊं नको. कारण, त्याचा कांहीं उपयोग नाहीं.

९. कोणत्याही गोष्टीच्या बऱ्यावाईट परिणामांविषयीं विचार कर. चांगल्या परिणामांपासून सुख होईल, त्याविषयीं आनंद कर. पण, वाईटांविषयीं, उगाच मुंगीचा हत्ती करून, काळजी वाहूं नको.

१०. राग आला, तर बोलण्यापूर्वीं मनांत दाहा अंक मोज; आणि फारच राग आला, तर शंभर मोज. ह्मणजे, रागाच्या योगानें तुझे हातून कधीं पाप होणार नाहीं, आणि तुला कधीं दुःख होणार नाहीं.

# महाराणी व्हिक्टोरिआ.



ह्या भाग्यवान् स्त्रीच्या राज्यांत आपण आहों. ही इ० स० १८१९ च्या मे महिन्याच्या चोविसाव्या तारखेस लंदन येथें जन्मली. ती एक वर्षाची झाली, तेव्हां तिचा पिता निवर्तला.

लहानपणीं ती नेहमीं आपल्या आईजवळ असे. ती लहानपणीं फार नाजूक होती. तरी ती चपळ असे. तिला शिकविण्यास उत्तम उत्तम शिक्षक ठेविले होते. ती जर्मन, फ्रेंच, इतालियन आणि लातिन इतक्या भाषा शिकली. इतिहास, चित्रें काढणें, वाद्यविद्या, पदार्थविज्ञानशास्त्र, आणि त्यांत विशेषेंकरून वनस्पतिविद्या, हे विषय तिला चांगले येऊं लागले. तसें, शिंवण्याचें आणि विणण्याचें व कशिदा काढण्याचें काम ती उत्तम शिकली.

तिचा चुलता चवथा विलियम इ० स० १८३८ त मरण पावला, तेव्हां ती सिंहासनारूढ झाली. त्या वेळीं तिचा चुलता ससेक्साचा ड्यूक हा तिजपुढें गुडघे टेंकून शपथ घेऊं लागला, त्यास ती सद्गदित होऊन ह्मणाली, "काका, मजपुढें तुह्मी गुडघे टेंकूं नका! मी विक्तोरिआ तुमची पुतणी आतां नव्हें काय?"

राणीचें लग्न इ० स० १८४० ह्या वर्षी प्रिन्स आलबर्त ह्याशीं झालें. तिला, चार मुलगे आणि पांच मुली अशीं नऊ मुलें झालीं. प्रिन्स आलबर्त इ० स० १८६१ त मरण पावला.

ही राणी मोठी खर्चीक आहे. हिला दररोज खर्चाची नेमणूक सुमारें दहा हजार रुपयांची आहे. तरी एवढी रकम तिला खर्चास पुरत नाहीं. ती, गरीबगुरिबांच्या येथें औषधपाणी देण्यास स्वतः जाते.

---

## मरणकालीं परोपकार.

इंग्लंदांत इलिझाबेथ राणी राज्य करीत होती; तेव्हां तिच्या दरबारीं सर फिलिप सिदनी ह्या नांवाचा एक सरदार होता. तो मोठा विद्वान्, गुणवान् आणि शूर होता.

स्पानियार्द लोकांनीं दच लोकांवर जुलूम चालविला होता; त्याचें निवारण करण्यास इलिझाबेथ राणीनें सर फिलिप सिदनी ह्यास हालंदांत, इ० स० १५८५ ह्या वर्षी पाठविलें. तो स्पानियार्द लोकांशीं लढत असतां, त्याला एक गोळी लागली, आणि तिच्या योगानें तो व्याकुळ झाला. तेव्हां त्याला उचलून छावणींत नेलें.

छावणींत पोंचल्यावर त्याला अतिशयित तहान लागली. त्यानें पाणी मागितलें. पण तेथें कोठें पाणी मिळेना. शे-

वटीं, मोठ्या श्रमानें पंचपात्रीभर पाणी मिळविलें, आणि तें त्याच्या तोंडाशीं नेलें. तेव्हां त्याच्या जवळ एक साधारण शिपाई, त्याहून अधिक जखमी होऊन पडलेला, आणि तान्हेनें करमळून जाऊन त्या पाण्याकडे आशाळभूतपणानें टक लावून पाहात असलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्या वेळीं, तें पाणी तोंडांत न घेतां, त्या शिपायाकडे पाहून, सर फिलिप सिदनी त्याला ह्मणाला, "बाबा, हें पाणी तूं घे; ह्याची गरज माझ्यापेक्षां तुला अधिक लागली आहे!"

---

## "मीं आपलें काम बजाविलें."

प्रत्येक माणसाला कांहींतरी काम बजवावयाचें असतें. तें जो उत्तम प्रकारें बजावितो, तो धन्य होय. "मीं आपलें काम बजाविलें," असें ह्मणून जे जन इहलोक सोडितात, ते धन्य होत.

स्पेन देशाच्या दक्षिणेस त्राफलगार ह्या नांवाचें एक भूशिर आहे. तेथें इ० स० १८०५ च्या अक्तोबर महिन्याच्या २१ व्या तारखेस फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांच्या आरमारांची एक मोठी लढाई झाली. तेव्हां इंग्लिश आरमाराचा मुख्य अधिकारी लार्द नेल्सन हा होता. लढाईच्या भराच्या वेळीं त्याला एक गोळी लागून, तो अतिशयित व्याकुळ झाला. त्याच्या अंगांतून रक्त वहात होतें, आणि त्याला फार वेदना होत होत्या; तरी त्याचें सगळें लक्ष लढाईच्या परिणामाकडे होतें. शेवटीं, आपल्या पक्षास जय प्राप्त झाला, असें जेव्हां त्याला कळलें, तेव्हां त्याला अत्यानंद झाला; आणि तो वर डोळे करून हर्षित मुद्रेनें ह्मणाला, "मीं आपलें काम बजाविलें! परमेश्वरा, तूं धन्य आहेस!"

---

# आई.

मनुष्याची मोठेपणची स्थिति त्याच्या लहानपणच्या संवईवर आणि शिक्षणावर बहुतांशीं अवलंबून असते. आणि मनुष्यास लहानपणीं जितका सहवास आईचा असतो, तितका दुसऱ्या कोणाचा नसतो. ह्मणून, मनुष्याच्या सगळ्या मोठेपणाचें धोरण त्याच्या आईच्या शिक्षेवर अवलंबून असतें, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.

जार्ज हर्बर्त ह्मणून एक चांगला विद्वान् पुरुष होऊन गेला. त्याचें ह्मणणें असें असे कीं, "मुलांस सुशिक्षण देण्याच्या कामीं एक चांगली आई जितकी उपयोगीं पडते, तितके शंभर चांगले शिक्षक उपयोगीं पडत नाहींत."

फौवेल बक्सतन ह्या थोर पुरुषानें एकदां आपल्या आईस लिहिलें— "मी एकादें मोठें आणि त्यांत विशेषेंकरून परोपकाराचें कृत्य करितों, तेव्हां, तूं मला जें लहानपणीं शिकविलें आहेस, त्याचें मला स्मरण होतें."

लार्द लांगदेल ह्यानें आपल्या आईविषयीं एकदां ह्मटलें, "तराजूच्या एका पारड्यांत माझ्या आईला घातलें, आणि दुसऱ्यांत सगळें जग घातलें, तर, माझ्या आईचें पारडें खालीं राहून जगाचें पारडें वर जाईल."

फ्रान्सदेशाचा प्रसिद्ध बादशाहा नेपोलियन बोनापार्त हा असें ह्मणे कीं, "मुलाचें पुढें बरें होणें किंवा वाईट होणें हें सगळें त्याच्या आईवर असतें." त्याच्या चरित्रांत असें लिहिलें आहे कीं, "तो लहानपणीं आपल्या आईशिवाय दुसऱ्या कोणाचें ऐकत नसे. ममताळूपणा, कडकपणा आणि न्यायानें वागणें, इतक्या गोष्टींचें मिश्रण तिच्या शिक्षेंत स्पष्ट दिसे. त्याच्या योगानें तो तिजवर प्रीति करी,

तिला मान देई, आणि तिच्या आज्ञेंत राही. आज्ञाधारकपणाचा गुण त्यानें तिजपासून संपादिला."

---

## निर्लोभता.

साधूच्या आंगच्या सर्व सद्गुणांमध्यें निर्लोभता हा गुण मुख्य होय. हा प्राप्त झाला, ह्मणजे दुसरे कितीएक सद्गुण सहज येतात. कितीएक संसारी पुरुषांचे ठायींही हा गुण आढळतो.

नेपोलियन बोनापार्तीच्या भरभराटीच्या वेळीं, त्यास पूज्य न मानणारे असे जे थोडेसे लोक होते, त्यांमध्यें आंकेतिल ह्या नांवाचा एक इतिहासकार होता. तो दररोज मेहेनत करून, आणा दोन आणे मिळवून, त्यांवर आपला चरितार्थ चालवी. त्यास त्याच्या एका मित्रानें एकदां ह्मटलें, "तुह्मी जर आजारी पडलां, तर तुमचें कसें चालेल? तुह्मी बादशाहाच्या पक्षाचे व्हा, ह्मणजे तुह्मांला पेनशन मिळेल; मग तुह्मी कितीही दिवस जगलां तरी तुह्मांला कांहीं कमी पडावयाचें नाहीं. तुमचे मनांत जगावयाचें आहे, तर तुह्मी त्याला अनुकूल झालांच पाहिजे." त्यावर आंकेतिल ह्यानें उत्तर दिलें, "पण मरायाला तर मला त्याला अनुकूल व्हावयास नकोना?" हा पुरुष पंचाण्णव वर्षांचा, आणि संपत्तिमान होऊन मरण पावला.

सर जेम्स औत्रम हा लश्करी अंमलदार अशा प्रकारचा होऊन गेला. सर चार्लस नेपियर ह्यानें सिंध प्रांत इ० स० १८४३ ह्या वर्षी काबीज केला, त्याच्या मदतीस ह्यास सरकारानें पाठविलें होतें. त्या वेळीं सिंध प्रांत घेणें हें कृत्य त्याला अगदीं अप्रशस्त वाटलें. तरी तो आपलें

कर्तव्यकर्म करण्यास तिळभरही टळला नाहीं. परंतु सर्व लढाई आटोपल्यावर, लुटीची वांटणी चालली; तेव्हां सर जेम्स औत्रम ह्मणाला, "लढाई झाली ही मला अगदीं अयोग्य वाटते. लुटीच्या पैशाला मी शिवणार देखील नाहीं."

मद्रास इलाख्याचा नामांकित गव्हरनर सर थामस मनरो, ह्यास गव्हरनर जनरलची जागा देत होते. तेव्हां त्यानें एकास लिहिलें, "मला तें काम दोन वर्षांहून अधिक करवणार नाहीं; आणि मी फार थकल्यामुळें, तें जसें व्हावें तसें माझे हातून व्हावयाचें नाहीं, ह्मणून तें मला नको."

रामदासस्वामींस शिवाजी महाराजांनीं भेटीस बोलाविलें. त्या वेळीं त्यांला त्यांनीं कसें निस्पृहतेचें उत्तर दिलें, तें प्रसिद्धच आहे.

---

## दया आणि शौर्य.

हे दोन्ही गुण एका माण[illegible] राहावयाचे नाहींत, असें कितीएकांस वाटतें. पण तें खरें नाहीं. दया आणि क्रौर्य हीं मात्र एकत्र राहावयाचीं नाहींत.

शूर पुरुष दयाळू असतात. सर चार्लस नेपियर हा मोठा शूर पुरुष होता. त्याचे मनांत असें आलें कीं, शिकार करितांना आपण मुक्या जनावरांस दुखवितों हें चांगलें नव्हे; ह्मणून त्यानें शिकार करणें सोडून दिलें.

फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांची लढाई पाइटियर्स येथें इ० स० १३५६ ह्या वर्षीं झाली. तेव्हां इंग्लंदच्या काळ्या राजपुत्रानें फ्रान्सच्या राजाचा पराभव करून, त्याला धरून आपल्या छावणींत नेलें. तेथें सायंकाळीं जेवतेवेळीं त्या

दीन झालेल्या राजावर दया करून, त्यास वाईट न वाटावें ह्मणून, त्याची तजवीज जातीनें त्या राजपुत्रानें इतकी ठेविली कीं, तिच्या योगानें, त्या फ्रेंच राजाचें मन त्याला अगदीं वश होऊन गेलें.

बेर्द साहेब टिपूच्या तुरुंगांत पुष्कळ वर्षें पडला होता. आणि त्यापासून त्याला पुष्कळ त्रास झाला होता. तरी त्या साहेबानें इ० स० १७९९ त, मोठ्या शौर्यानें जेव्हां श्रीरंगपट्टण काबीज करून घेतलें, तेव्हां, टिपूचीं बायकामुलें अनाथ झालेलीं पाहून, त्याच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या, आणि त्यानें त्यांस पुष्कळ साह्य केलें.

दया ही शौर्याची माता आहे, असें कधीं कधीं दिसून येतें. पारिस शहरामध्यें एका मोठ्या वाड्याचें काम चाललें होतें. तें चवथ्या पांचव्या मजल्यापर्यंत चढलें होतें. त्याच्या परांच्या एकाएकीं तुटल्या, आणि त्यांवरचीं माणसें धडाधड खालीं पडलीं. अगदीं वरच्या परांचीवर दोन मनुष्य उभे होते. ती ढांसळली, आणि तिची एक लहानशी फळी कोठें अडकून राहिली. तिजवर त्या दोघांचा भार पडल्यामुळें ती लटलटां हालूं लागली; आणि त्यांस असें स्पष्ट दिसून आलें कीं, त्यांतल्या एकानें जीवाची आशा सोडून जर खालीं उडी टाकली, तरच बाकी राहिलेल्याचा जीव बचावेल. त्या दोघांतला एक उतार वयाचा होता, तो तरुणास ह्मणाला, "अरे बाबा, मी मुलाबाळांचा बाप आहें रे." तरुण मनुष्य ह्मणाला, "असें आहे काय? ठीक आहे. तर मग मी जातों." असें ह्मणून त्यानें खालीं उडी टाकिली. तेव्हां तो लागलाच मरण पावला.

## उद्योग.

कांहींतरी उपयोगी उद्योग करणें हें जगण्याचें उत्तम फल होय. आजपावेतों जे कोणी थोर ह्मणून होऊन गेले, ते सगळे मोठे उद्योगी होते.

रूस देशाचा प्रसिद्ध बादशाहा पीतर धि ग्रेत हा दररोज आठआठ तास काम करीत असे.

जर्मनी देशाचा राजा पांचवा चार्लस हा मोठा पराक्रमी होता. तो राज्यकारभारास कंटाळला, ह्मणून तो सोडून देऊन तो एका मठांत जाऊन राहिला. तेथें त्याच्यानें रिकामें बसवेना, ह्मणून कुलुपें आणि घड्याळें करण्यांत तो आपला वेळ घालवीत असे.

नेपोलियन बोनापार्त स्वतः मोठा उद्योगी असून, उद्योगी मनुष्यांविषयीं त्याला फार अगत्य असे. तो एका कारागिराच्या कारखान्यांत त्याचें काम पाहायास गेला होता. तेथून निघतेवेळीं त्यानें तेथील मुख्य कारागिरास फार लवून सलाम केला. तो सेंत हेलिना बेटांत, आपली बायको बालकोम हिजसहवर्तमान सहल करीत असतां, ओझ्यानें लादलेले कांहीं हमाल एकाएकीं त्यांच्या वाटेंत आले. त्यांस ती बाई रागें भरून एकीकडे होण्यास सांगूं लागली. तीस नेपोलियन ह्मणाला, "त्यांच्या डोक्यांवर ओझीं आहेत, ह्याचा थोडासा विचार करा."

सौदी हा नामांकित इंग्लिश पुरुष १९ वर्षांचा झाला, तेव्हां त्यानें एकास असें लिहिलें:—"एकुणीस वर्षें! ह्मणजे माझ्या आयुष्याचा चौथा हिस्सा. हा व्यर्थ गेला. कारण इतक्या मुदतींत, माझ्या देशबंधूंच्या उपयोगीं पडण्यासारखें असें एक देखील काम माझे हातून झालें नाहीं.....

रोज आणा दीड आणा घेऊन जो कुणब्याचा पोरगा शेतांतलीं पांखरें हांकितो, तो माझ्यापेक्षां पुष्कळ बरा; कां कीं, तो उद्योग करून जे दाणे राखितो, ते मी आळशासारखा स्वस्थ बसून खातों...."

जगांत जितकीं माणसें आहेत, तितकीं सगळीं जर उद्योग करितील, तर कोणाही माणसास अवश्य लागणाऱ्या वस्तूंची ददात पडणार नाहीं. ही गोष्ट मनांत आणून चीन देशाचा एक बादशाहा असें ह्मणत असे कीं, "राज्यामध्यें कोणी एक मनुष्य जर निरुद्योगी राहिला तर कोणीतरी एक मनुष्य क्षुधेनें किंवा थंडीनें पीडित झाला पाहिजे."

---

## पाहांटेस उठण्याची संवय विकत घेतली.

बफान हा एक फ्रेंच विद्वान् पुरुष होऊन गेला. ह्याला घरीं कांहीं कमी नव्हतें. परंतु, उद्योग न करितां वेळ घालविणें हें वाईट आहे, असें तरुणपणीं त्याच्या मनांत भरून उद्योग करण्याची अतिशयित इच्छा त्याला झाली. पण त्याला फार वेळ निजून राहण्याची फार वाईट खोड लागली होती. ती घालवावयाचा त्यानें निश्चय केला. आपण स्वतःच मोठ्या पाहांटेस उठावें, ह्याविषयीं त्यानें पुष्कळ प्रयत्न करून पाहिले, पण ते सगळे व्यर्थ गेले. मग त्यानें, आपला चाकर योसेफ ह्यास असें सांगितलें कीं, तूं मला ज्या दिवशीं साहा वाजायाचे आंत उठविशील, त्या दिवशीं मी तुला अडीच रुपये बक्षीस देईन. त्याप्रमाणें त्या चाकरानें एकदोनदा सामोपचारानें त्यास उठविण्याची खटपट केली. पण, यजमान उठले नाहींत. शेवटीं, त्यांच्याच सूचनेवरून त्यांच्या आंगावर त्यानें गार पाणी शिंपडिलें; तेव्हां ते धडपडून

उठले; आणि त्यांनीं वचन दिल्याप्रमाणें त्यास बक्षीस दिलें.

असा क्रम कितीएक दिवस चालल्यावर, आपोआप लवकर उठण्याची संवय बफान ह्यास लागली. त्यानें वारंवार असें ह्मणावें कीं, "प्राणिविद्येवर मीं जे दोन तीन ग्रंथ लिहिले आहेत, ते, योसेफाच्या श्रमाच्या योगानें तयार झालेले आहेत."

तो सकाळीं पांच तास आणि सायंकाळीं चार तास, असें दररोज नऊ तास काम करी. अशा प्रकारें त्यानें एकसारखीं ४० वर्षें घालविलीं. हा सर ऐझाक न्यूतन ह्यास इतका मान देत असे कीं, काम करतेवेळीं तो त्याची तसबीर आपलेपुढें ठेवी, आणि, आपणास त्यासारखें व्हावयाचें आहे असें मनांत घोकी.

---

## मोठेपण.

मनुष्याला मोठेपण प्राप्त झालें, ह्मणजे त्यांला सुख फार होतें, असें साधारण लोक समजतात. परंतु, तें खरें नाहीं. "ज्याचे अंगीं मोठेपण, तया यातना कठीण" असें तुकारामानें ह्मटलें आहे, तें यथार्थ आहे. ह्याविषयीं इतिहासांतली एक गोष्ट सांगतों.

चेरीन ह्या नांवाचा कोणीएक फ्रेंच सरदार होता. तो कोणे एके समयीं आपलें सैन्य एका कठीण डोंगराळ प्रदेशांतून घेऊन चालला होता; आणि त्याच्या आसपास शत्रु होते, हें त्याला समजलें होतें. ह्मणून तो आपल्या शिपायांस लवकर लवकर पाय उचलण्याविषयीं जलदी करीत होता. ती ऐन दुपारची वेळ होती; आणि उन्हानें जशाकाय दगडांच्या लाह्या होत होत्या. त्यामुळें सगळे शिपाई

अगदीं थकून गेले होते. तरी त्या सरदाराची घाई चाललीच होती. ती त्यांतल्या एका शिपायास न सोसून तो त्याला उलटून ह्मणाला, "घोड्यावर बसून, चला चला ह्मणायाचें फार सोपें आहे; चालायाचें दुःख चालणारांच्या पायांस पुसलें पाहिजे." हें ऐकून तो सरदार घोड्यावरून खालीं उतरला, आणि त्या शिपायास शांतपणानें ह्मणाला, "अहो, तुह्मी क्षणभर माझ्या घोड्यावर बसा पाहिजे तर." ते शब्द कानीं पडतांच तो शिपाई मोठ्या हौसेनें त्या घोड्यावर बसला. तो घोडा एकदोन पावलें चालला न चालला इतक्यांत एकाएकीं एक गोळी सूं सूं सूं करीत आली, आणि त्या शिपायाच्या छातींत शिरली. त्याबरोबर कासावीस होऊन तो खालीं पडला, आणि मरण पावला. त्याजकडे बोट करून चेरीन सर्व शिपायांस ह्मणाला, "पाहिलेंना हें. उंच पदवीच्या मनुष्यांस भय कमी असतें, असें तुह्मी समजूं नका."

---

## विचार करून बोलावें.

पुष्कळ माणसांस अशी संवय असते कीं मनांत येईल तें पटकर बोलावें. ही संवय चांगली नाहीं. हिच्या योगानें एखाद्या वेळीं अतिशयित अपमान होऊन मान खालीं घालावी लागते.

अमेरिकेमध्यें व्हार्जिनिआ ह्मणून एक प्रांत आहे. त्यावर पूर्वी विलियम पेन ह्या नांवाचा एक थोर गृहस्थ सुभेदार होता. तो एके दिवशीं थामस स्तोरी ह्या नांवाच्या गृहस्थास बरोबर घेऊन वाहेर फिरायास गेला. तेव्हां अकस्मात् पावसाची सर आली. ह्मणून ते दोघे जवळच्या एका तंबा-

कूच्या शेतांत गेले, आणि त्यामध्यें एक लहानसें खोपट होतें, त्याच्या छपरांत उभे राहिले. इतक्यांत त्या शेताचा धनी तेथें आला. त्याला न्यायाधीशपणाचा अधिकार नुकताच मिळाला होता, ह्मणून त्याविषयीं त्याला फार गर्व झाला होता. तो त्या दोघांस उगाच उभे पाहून ह्मणाला, "अहो, ह्या माझ्या शेतामध्यें आणि झोंपडींत तुह्मी माझ्या परवानगीशिवाय आलां, हा तुमचा केवढा मूर्खपणा आहे बरें? मी कोण आहें, हें तुह्मांला ठाऊक नाहीं काय?" त्यास त्या दोघांनीं उत्तर दिलें, "नाहीं महाराज; आपण कोण आहां हें आह्मांस ठाऊक नाहीं."

**धनी.**—बरें. ठाऊक नाहीं तर सांगतों ऐका. मी न्यायाधीश आहें.

**थामस स्तोरी.**—फार चांगलें आहे. पण हे मजबरोबर जे गृहस्थ आहेत, ते इतके थोर आहेत कीं, त्यांस तुमचेसारखे पाहिजेत तितके न्यायाधीश करितां येतात. हे ह्या प्रांताचे सुभेदार आहेत.

हें ऐकून त्या शेताच्या धन्यानें, लज्जेनें आपली मान खालीं घातली, आणि उद्धटपणाचें भाषण केल्याबद्दल त्या सुभेदारापाशीं क्षमा मागितली.

हा गर्वाचा परिणाम होय. ह्याकरितां, नेहमीं सर्वांशीं नम्रतेनें गोड बोलावें, हें फार चांगलें आहे.

कविशिरोमणि मोरोपंत ह्मणतातः—

## आर्या.

गलिताहंकृति जाणे बन्धा मोक्षासि अनुभवीं चढला<br>
तो पंडित इतर नव्हे जरि पुष्कळ शास्त्र सर्वही पढला.

---

# शिवाजीमहाराज.



बारा वर्षांचे असतां तोरणा किल्ला घेतला; जशास तसें करून अफजुलखानाला मारिलें; औरंगजेब दांत ओंठ चावीत होता तरी त्याला दाद दिली नाहीं; मुसलमानांना जर्जर केलें; हिंदुधर्म बुडत होता, तो सांवरिला; महाराष्ट्र देशामध्यें मराठ्यांच्या राज्याची स्थापना केली; आणि मोठ्या पराक्रमानें स्वकीर्तीचा ध्वज उभारून अनेक प्रकारीं आपल्या राष्ट्राचें कल्याण केलें; असे जे महान् प्रतापी आपले शिवाजीमहाराज, त्यांचें हें चित्र आहे. त्यांची निर्मल कीर्ति चिरकाल असो.

अफजुलखानाचा समाचार घेण्याकरितां मातुश्रीचा निरोप घेऊन ते जेव्हां निघाले, तेव्हां ते मोठ्या गंभीर मुद्रेनें ह्मणाले, "मला जय मिळाला, तर उत्तमच; पण तसें न होतां जर रणांत पडलों, तरी कीर्ति होईल."

ते, औरंगजेबाच्या एवढ्या कडीकोट बंदोबस्तांतून, दिल्लीहून, आपल्या चिरंजीवासह मोठ्या युक्तीनें दक्षिणेंत निघून आले.

महाराजांचे गुरु रामदास स्वामी होते. ते साताऱ्याजवळ परळीस रहात असत. त्या ठिकाणाला सज्जनगड ह्मणतात.

पुत्र संभाजी ह्याचे हातून राज्य चांगलें चालावयाचें नाहीं, आणि त्याचा शेवट वाईट होईल, असें महाराजांनीं, आधींच भविष्य केलें होतें, तें पुढें खरें झालें.

प्राण सोडितांना मंडळीकडे पाहून महाराज ह्मणाले, "तुह्मी चुकुर होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे. ह्यामागें किती उत्पन्न झाले तितके गेले." नंतर परमेश्वराचें ध्यान करून त्यांनीं देह ठेविला. ही महाराष्ट्र देशाची फार मोठी हानि झाली.

औरंगजेब हा शिवाजी महाराजांचा द्वेष करीत असे. तो त्यांस "डोंगरांतला उंदीर" ह्मणत असे. पण, त्यांच्या मरणांचें वर्तमान त्याच्या कांनीं पडलें तेव्हां तो ह्मणाला, "शिवाजी हा खरा शूर होता." ही शत्रूच्या तोंडची स्तुति; हिची किंमत मित्राच्या तोंडच्या स्तुतीच्या शतपट धरिली पाहिजे !

---

## तोंडपाठ करण्यासारखीं पद्यें.

### आर्या.

भारी लोभ मनुष्या कलिरायाच्या युगांत कनकाचा  
न तसा दार-सुतांचा बंधूचा जननिचा न जनकाचा. १.  
रे कूपदर्दुरा किति दुर दुर करिसी वृथा न भाग रहा  
काय तुझें भाग्य अरे मंदा त्वां पाहिला न सागर हा. २.

भ्रमवी श्रमवी मळवी पळवी सत्कीर्तिला दुराग्रह रे
सेव्य सदुपदेशसुधा ग्रह असदुपदेश हा सुराग्रह रे. ३.
दुःख परासि न द्यावें सत्य वदावें क्षमा न सोडावी
जोडावी कीर्ति अशी कुलरीति तुह्मीं कधीं न मोडावी. ४.
स्नेहें शिशुला देइल मातेहुनि अधिक काय सुख दायी
चंद्रापुढें चकोरा वद होइल अन्य कोण सुखदायी. ५.
विसरति अपकारांतें उपकारांतेंचि साधु आठविती
कीं सोशितां न सा विति होय वपु न सोशितां न आठ विती. ६.
मिरविसि सुज्ञत्व वृथा अन्याला स्वकृत ताप लावूनी
काय न दगड तपस्वी भिजला वृष्टींत तापला ऊनीं. ७.

## आर्यार्द्ध.

धर्म-न्याय-विरोधें कोणाचेंही न इष्ट साधेल.
हांसत कर्म करावें भोगावें रडत-तेंचि परिणामीं.
अरिच्याहि सद्गुणातें प्रेमें वाखाणितात सुज्ञानी.
लागे उपहासास्तव वा मानधना जना हिरा खाया.

मोरोपंत.

---

## शाहाणपण वयावर नसतें.

मागें दुसरा फिलिप ह्या नांवाचा एक राजा स्पेन देशामध्यें होऊन गेला. तो राज्य करीत असतां रोमशहरचा पोप पांचवा सिक्सतस हा सिंहासनारूढ झाला. त्याविषयीं आपला संतोष प्रदर्शित करण्याकरितां, फिलिपराजानें आपल्या दरबारचा एक तरुण सरदार सिक्सतस ह्याच्या दरबारीं पाठविला. तो चांगला शाहाणा होता, पण त्याला दाढीमिशा आल्या नव्हत्या. त्याजकडे पाहून त्यास सिक्सतस ह्यानें ह्मटलें, "अहो, तुमच्या यजमानांच्या पदरीं प्रौढ पुरुष नाहींतच का मुळीं? त्यांनीं आह्मांकडे बिनदाढीचा वकील

पाठविला आहे, ह्याचें आह्मांला मोठें नवल वाटतें." त्यास त्या वकिलानें लागलेंच उत्तर दिलें, "महाराज, शाहाणपण कायतें दाढींत असतें, असें जर आमच्या सरकारास वाटलें असतें, तर, त्यांनीं महाराजांकडे मला न पाठवितां एकाद्या मोठ्या दाढीवाल्या बोकडास पाठविलें असतें!" तें ऐकून सिक्सतस निरुत्तर झाला.

वय आणि शाहाणपण ह्या दोन वस्तु अगदीं वेगळ्या आहेत. त्या एकमेकींच्या धोरणानें चालतात असें नाहीं. वय आपोआप वाढतें; त्याविषयीं परिश्रम करावे लागत नाहींत. तसें ज्ञान आपोआप वाढत नाहीं. तें वाढविण्यास फार परिश्रम करावे लागतात. ह्मणून जो मनुष्य केवळ वयानें थोर झाला आहे, त्यास जगांत मान मिळत नाहीं; पण जो ज्ञानानें थोर झाला आहे, त्यास मान मिळतो. हा मान मिळविण्याचा प्रयत्न करावा.

---

## वेळचेवेळीं काम करणें.

इंग्लंद देशामध्यें नेल्सन ह्या नांवाचा एक फार थोर आणि मोठा शूर पुरुष होऊन गेला. त्याचीं कृत्यें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. तो इ० स० १८०५ च्या आक्तोबर महिन्यांत त्राफलगार येथें फ्रेंचांशीं लढत असतां गोळी लागून मरण पावला. तो पुरुष कित्ता घेण्यासारखा होता. त्यानें एकदा असें ह्मटलें कीं, "मला जें इतकें यश मिळालें आहे, त्याचें मूळ एवढेंच आहे कीं, कोणत्याही कामांत आधीं पाव तास माझी तयारी असते."

फ्रान्स देशाचा राजा पंधरावा लुई हा स्वतः मोठा विलासी होता. तरी तो वारंवार असें ह्मणे कीं, "आपलीं कामें वेळचेवेळीं करणें हें राजांच्या मोठेपणाचें मुख्य लक्षण आहे."

ज्या पराक्रमी प्रख्यात पुरुषानें इ० स० १७७६ त अमेरिकेंतील संस्थानांस स्वतंत्र केलें, तो आपलीं सगळीं कामें इतक्या नियमितपणानें करीत असे कीं, लोक त्याच्या जाण्यायेण्याच्या वेळावरून आपलीं घड्याळें बरोबर लावीत असत, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. एके वेळीं त्याच्या एका चिटणिसास कचेरीस येण्यास किंचित् उशीर झाला. त्यास वाशिंग्तनानें वेळ होण्याचें कारण विचारलें. त्यावर त्यानें, आपल्या खिशांतल्या घड्याळाकडे पाहून उत्तर दिलें, "मजकडे दोष नाहीं. माझ्या घड्याळाप्रमाणें मी अगदीं बरोबर वेळेस आलों आहें." त्यास तो थोर पुरुष शांतपणानें ह्मणाला, "अहो तुमचें घड्याळ बरोबर चालत नाहीं. आतां तुह्मीं घड्याळ नवें घेतलें पाहिजे एक, अथवा आह्मांला नवा चिटणीस ठेवला पाहिजे एक."

टपालांत पत्र टाकायास किंवा आगगाडींत बसायाच्या ठिकाणीं जाण्यास जर थोडा उशीर लागला, तर पत्र रवाना होणें आणि माणसांचें जाणें कसें लांबणीवर पडतें, आणि त्यापासून किती अडचणी कधीं कधीं उत्पन्न होतात, हें बहुतकरून सर्वांस ठाऊक आहे. ह्यास्तव आपलीं सर्व कामें वेळच्या वेळीं करावीं.

---

## शेतकऱ्याचा मुलगा राजाचा मित्र.

गरीब आणि श्रीमंत ह्यांची मैत्री सहसा जमत नाहीं. कारण त्यांच्या स्थितीमध्यें फार अंतर असतें. पण कधीं कधीं तें अंतर विद्येच्या योगानें नाहींसें होतें.

स्कातलंद देशाच्या पूर्वभागीं कीथ ह्मणून एक लहानसें शहर आहे. तेथें इ० स० १७१० ह्या वर्षी जेम्स फर्ग्युसन ह्या नांवाचा एक मुलगा जन्मला. त्याचा बाप गरीब शेतकरी होता. त्याला मुलांस शाळेंत घालण्यास सामर्थ्य नव्हतें. ह्मणून तो त्यांना घरीं आपणच शिकवीत असे. जेम्स हा फार लहान होता, ह्मणून त्याला लिहायास वाचायास शिकविणें त्यानें किंचित् लांबणीवर टाकिलें. परंतु त्याला त्याविषयीं फार उतावळी झाली. तो आपल्या भावंडांचे धडे लक्ष देऊन ऐकूं लागला, आणि फार गुप्तपणें एका ह्मातारीजवळ वाचायास शिकला. तो एके वेळीं एक पुस्तक वाचीत असतां एकाएकीं त्याचा बाप तेथें आला. तेव्हां त्याचें त्याला मोठें नवल वाटलें, आणि फार आनंद झाला.

पुढें जेम्स फर्ग्युसन ह्यास एका गृहस्थाचीं गुरें राखायास ठेविलें. तो गृहस्थ फार चांगला होता. त्याला फर्ग्युसनाची विद्याभ्यासाविषयींची उत्सुकता ठाऊक होती. ह्मणून तो त्याला, फावल्या वेळीं पाणचक्कीचे वगैरे कितीएक नमुने स्वकल्पनेनें करूं देत असे.

त्या खेळांनीं फर्ग्युसनाची तृप्ति झाली नाहीं. त्याचें लक्ष आकाशाकडे लागलें. तो तारे पाहूं लागला. त्याजवळ यंत्रें नव्हतीं. काठ्यांस दोऱ्या बांधून, त्यांत मणी ओंवून त्यानें

त्याकरितां एक लहानसें यंत्र तयार केलें. झाडाखालीं आपल्या घोंगडीवर पडून, त्या यंत्रानें तो आकाशांतील पदार्थ प्रहर प्रहर पाही. त्यावरून त्यानें आकाशाचा नकाशा काढिला. तो प्रसिद्ध होतां होतां विद्वान् पुरुषांचे हातीं गेला. तो त्यांस फार पसंत वाटला. तेव्हांपासून त्याची कीर्ति वाढत चालली. तो लंदनशहरामध्यें हजारों लोकांच्या समाजांत खगोलविद्येवर व्याख्यानें देऊं लागला.

तेव्हां इंग्लंदच्या गादीवर तिसरा जार्ज राजा होता. तो जेम्स फर्ग्युसन ह्यास फार चाहात असे. त्यानें त्याला वारंवार बोलावून न्यावें, आणि त्याजपासून खगोलविद्येसंबंधीं त्याच्या नवीन शोधांची माहिती विचारून घ्यावी. ते दोघे कितीएक तासपर्यंत एकमेकांशीं गोष्टी करीत बसत. फर्ग्युसन ह्याची योग्यता इतकी वाढली, हें त्याच्या ज्ञानाचें फळ होय. हा पुरुष इ० स० १७७६ त मरण पावला.

## सुखाचें खरें साधन.

द्रव्य हें सर्व सुखाचें उत्तम साधन आहे, असें पुष्कळांस वाटतें. तें जर खरें असतें, तर श्रीमंत मनुष्यांस आणि राजांस दुःख कधींही झालें नसतें. परंतु, धनवान मनुष्यें पुष्कळ दुःख करितांना आपल्या दृष्टीस पडतात. ह्मणून तो समज बरोबर नाहीं.

शिकंदरबादशाहानें सगळी पृथ्वी जिंकिली, तेव्हां पुढें आणखी जिंकण्यास कांहीं राहिलें नाहीं, ह्मणून त्यास वाईट वाटून तो रडला, असें ह्मणतात. सुलतान महमूद ह्यानें मरायाच्या वेळाच्या किंचित् आधीं, आपल्या द्रव्याच्या राशींकडे

मराठी ग्रं... ठाणे

पाहिलें, आणि, त्यांस सोडून जावयाचा प्रसंग जवळ ठेपला आहे असें मनांत आणून, खेदानें आंसवें गाळिलीं. ह्मणजे, ह्या दोघां पराक्रमी पुरुषांनीं जरी एवढें वैभव संपादिलें होतें, तरी त्यांस दुःख चुकलें नाहीं.

हे दोन पुरुष जसे वैभवानें फार थोर होऊन गेले, तसे, तुकाराम आणि साक्रेतीस हे ज्ञानानें थोर होऊन गेले. तृप्ति हें सुखाचें खरें साधन त्यांस सांपडलें होतें. तुकाराम ह्या लोकच्या सुखाची परवा मुळींच करीत नव्हता. शिवाजी महाराजांनीं त्याला एकदा बोलावणें पाठविलें होतें. त्यांला त्यानें असें सांगून पाठविलें कीं, "मला तुह्मांपाशीं कांहीं मागावयाचें नाहीं. आणि तुह्मांला मी खरेंच सांगतों, भिक्षेसारखें सुख दुसऱ्या कशांतही नाहीं."

साक्रेतीस हा एके दिवशीं बाजारांतून जात असतां दुकानांतल्या अनेक वस्तु पाहून ह्मणाला, "किती प्रकारच्या वस्तु ह्या! ह्या मला मुळींच कधीं लागावयाच्या नाहींत!" दुसऱ्या एका प्रसंगीं तो बोलला, "मनुष्यास ह्या लोकच्या जितक्या जितक्या वस्तु कमी लागतात, तितक्या तितक्या मानानें तो अधिक सुखी आहे, असें समजावें."

शिकंदरबादशाहा आणि महमूद हे एवढे धनवान होते, तरी ते रडले; आणि तुकाराम आणि साक्रेतीस हे, लोकांचा नानाप्रकारचा छळ सोसून, दरिद्रांत जन्म घालवून, आनंदानें मरण पावले. हल्लीं पृथ्वीमध्यें शिकंदरबादशाहा आणि महमूद ह्यांस जाणणाऱ्यांपेक्षां तुकाराम आणि साक्रेतीस ह्यांस जाणणारे पुष्कळ अधिक निघतील. तेव्हां ह्यांत श्रेष्ठ कोण बरें? आणि सुखाचें खरें साधन कोणाला प्राप्त झालें होतें बरें?

## म्हातारपणीं ज्ञानाची अभिरुचि.

म्हातारपण हें मृत्यूकडचें बोलावणें आहे, असें साधारणपणें सर्व माणसें समजतात. आणि त्या स्थितींत मनुष्यांच्या शक्ति आंखडत जातात. त्यामुळें त्यांचे हातून साधारण संसाराचीं कामें देखील बरोबर होत नाहींत. मग इतर कठीण कामांची गोष्ट कशास पाहिजे? परंतु, ज्ञानसंपन्न देशांतील कितीएक वृद्ध पुरुषांचे हातून आश्चर्य वाटण्यासारखीं कामें, केवळ ज्ञानाच्या अभिरुचीनें झालीं आहेत.

साक्रेतीस हा मोठा तत्त्वज्ञानी होता. तो अगदीं म्हातारपणीं वाद्यें वाजवायास शिकला.

केतो ह्या नांवाचा एक फार नामांकित पुरुष प्राचीन काळीं होऊन गेला. तो जाडा विद्वान् असून मोठा शूर रोमन गृहस्थ होता. तो ऐशीं वर्षांचा झाल्यावर ग्रीक भाषा शिकूं लागला.

प्लेतो आणि आरिस्तातल ह्यांचा शिष्य थिओफ्रातस हा मोठा विद्वान् पुरुष होता. त्यानें, "मनुष्याची स्वाभाविक नीति" ह्या विषयावर एक फार उत्तम ग्रंथ आपल्या वयाच्या नव्वदाव्या वर्षीं लिहिला.

फ्रान्स देशाचा राजा चवदावा लुई ह्याचा प्रधान तेलियर हा मोठा शाहाणा आणि राज्यकारस्थानी पुरुष होता. तो आपल्या वृद्धापकाळीं तर्कशास्त्र शिकला. तें कशाकरितां; तर आपल्या नातवांशीं त्याविषयीं आपणास वादविवाद करितां यावा ह्मणून !

व्होलतेर ह्मणून एक फार मोठा इतिहासकार होऊन गेला. त्यानें आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "ल्युदोव्हिको मोनालदेस्को ह्या नांवाच्या मनु-

घ्यानें आपल्या वयाच्या ११९ व्या वर्षी आपल्या जन्माची सगळी बखर लिहिली."

ह्या गोष्टींवरून असा बोध घ्यावा कीं, वय केवढेंही झालें तरी चांगली गोष्ट शिकण्यास कधींही लाजूं नये. मरणें हें केव्हां तरी आहेच. उद्योग टाकिल्यानें टळतें असें नाहीं, मग उद्योग कां टाकावा?

---

## राजांची विपत्ति.

लक्ष्मी चंचल आहे; तसें इहलोकचें सगळें वैभव अगदीं अशाश्वत आहे. राजकुलांत उत्पन्न झालेल्या मनुष्यांस विपत्ति प्राप्त होण्याचें भय मुळींच नसतें, असें कितीएकांच्या मनांत येतें; परंतु तें खरें नाहीं. सिंहासनारूढ झालेल्या मनुष्यांस नानाप्रकारचे हाल भोगावे लागले आहेत. ह्याचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ आहेत.

जर्मनीचा बादशाहा चवथा हेनरी ह्यास त्याच्या मुलानें पदच्युत करून प्रतिबंधांत ठेविलें, आणि गादी आपण बळकाविली. तेव्हां तो विचारा मोठ्या युक्तीनें आणि संकटानें आपली सुटका करून घेऊन स्पायर येथें गेला. तेथें त्याला खायास मिळेना, ह्मणून तो तेथील धर्मोपदेशकास फार दीनवाणीनें ह्मणाला, "महाराज, मला थोडेंसें गातां येतें आहे. आपण आपल्या देवळांत मला थोडें काम सांगून पोटाला घालाल तर मोठे उपकार होतील." तें बोलणें त्यानें मान्य केलें नाहीं. हा हतभाग्य पुरुष तेथेंच कांहीं दिवसांनीं मरण पावला. त्याचें प्रेत, कांहीं धर्मसंबंधीं कारणांवरून, पांच वर्षेंपर्यंत तसें लोळत पडलें होतें!

मेरी आंत्वानेत, ह्मणजे फ्रान्स देशाचा बादशाहा सोळावा लुई ह्याची राणी, हीस, राज्यक्रांतीच्या धामधुमींत इ० स० १७९३ ह्या वर्षी, शिरच्छेद करून ठार मारिलें. ती वधस्तंभावर चढण्यास जाण्यापूर्वी आपले केंस आपल्या हातानें कातरून टाकायास पाहात होती. पण तिला कातर मिळाली नाहीं!

फ्रान्स देशाचा राजा सातवा चार्लस ह्याचें बहुतेक सगळें राज्य इंग्लंदाचा राजा पांचवा हेनरी ह्यानें घेतलें होतें; तेव्हां चार्लसाकडे फक्त बर्जेस एवढें मात्र ठिकाण राहिलें होतें. त्या प्रसंगीं त्यानें एका चांभाराला एक जोडा करायास सांगितला. त्यास त्यानें साफ 'नाहीं' ह्मणून सांगितलें. ह्मणून त्याला बरेच दिवस जोड्यावांचून काढावे लागले!

"परकीय लोकांनीं जिंकिलेल्या देशांत राजकुलोत्पन्न मनुष्यें अत्यंत दुःसह विपत्तींत पुष्कळ आढळतात," असें एका नामांकित ग्रंथकारानें ह्मटलें आहे. त्याच्या खरेपणाचीं उदाहरणें ह्या आपल्या हिंदुस्थान देशांत पाहिजेत तितकीं आहेत. जे पुरुष आपणांस 'राजे' 'नबाब' ह्मणवितात, त्यांतल्या कितीएकांस खरोखर दुपारची भ्रांति असते. ही स्थिति पाहून मनाला फार दुःख होतें. परंतु, होणारापुढें उपाय नाहीं, असें समजून आणि देव जें कांहीं करितो तें चांगलें करितो, असें लक्षांत ठेवून स्वस्थ राहावें.

## अल्प कारणांवरून मोठीं कार्यें.

परमेश्वरानें ह्या जगांतील वस्तूंमध्यें अनंत चमत्कार करून ठेविले आहेत. ते विचार करून शोधून काढणें आणि

त्यांपासून सुख प्राप्त करून घेणें हें मनुष्याकडे आहे. जे चमत्कार मुळींच माहीत नसतात, त्यांविषयीं शोध करण्यास मनुष्यांस प्रथम मुळींच मार्ग नसतो. परंतु बुद्धिवान् पुरुष अत्यंत अल्प गोष्टींवरून फार मोठे शोध लावितात.

सर ऐझाक न्यूतन ह्यानें, सहज, झाडावरचें फळ तुटून खालीं पडतांना पाहिलें. तेवढ्यावरून त्यानें गुरुत्वाकर्षणाचा, ह्मणजे, मोठा पदार्थ लहान पदार्थास आपणाकडे ओढीत असल्याविषयींचा नियम शोधून काढिला. त्याच्या योगानें पदार्थविज्ञानशास्त्राच्या मूळच्या स्थितींत पुष्कळ फेरफार झाले; आणि तेणेंकरून ज्ञान पुष्कळ वाढलें.

जेम्स वात ह्यानें चाहादाणीवरचें झांकण वाफेच्या जोरानें उडतांना पाहिलें. त्याच्या कारणाचा शोध करितां करितां अनेक चमत्कार त्याच्या अनुभवास आले. त्यांच्या योग्य योजनेनें सांप्रतकाळीं आगगाड्या, आगबोटी, छापखाने, माग, टांकसाळी इत्यादि अनेक सुखोत्पादक कारखाने चालले आहेत.

जेन्नर हा, ग्लूस्तरशायर ह्या नांवाच्या प्रांतांत जन्मला आणि त्याच प्रांतांत सोडबरी ह्या गांवीं एका वैद्याच्या हाताखालीं वैद्यकी शिकायास राहिला. तेथें एके दिवशीं शेतकऱ्याची एक गरीबशी मुलगी आली, आणि औषध मागूं लागली. तिला वैद्यानें विचारिलें, "तुला देवी आल्या होत्या काय पण?" त्यावर तिनें उत्तर दिलें, "मला आतां देवी यायाचें भय नाहीं दादा; कां ह्मणाल, तर, गाईच्या थानाच्या फोडांची लस लागून मला एकदा पुष्कळ खरूज येऊन गेली आहे." ह्या तिच्या उत्तरानें जेन्नर ह्याचें चित्त वेधिलें; आणि, तेव्हांपासून, त्यानें नानाप्रकारचे शोध क-

रून, आणि छळ सोसून, गोस्तनदेवी माणसांस काढण्याची रीति प्रचारांत आणिली. तिच्या योगानें जगांतील सर्व माणसांचें फार हित झालें आहे.

ह्या थोर पुरुषांनीं हे शोध लाविले, हे त्यांचे जगावर फार मोठे उपकार आहेत. वस्तु शोधून काढणारांचे जर आपण इतके आभारी होतों, तर ज्यानें त्या वस्तु निर्माण केल्या आहेत, त्याचे किती उपकार मानावे बरें?

झाडावरचें फळ खालीं पडणें, चाहादाणीचें झांकण उडणें, आणि त्या गरीब मुलीचें बोलणें, ह्या अल्प कारणांवरून गुरुत्वाकर्षण, वाफेची शक्ति, आणि गोस्तनदेवी ह्या मोठ्या कार्यांची सिद्धि झाली.

## बेंजामिन फ्रांक्लिन.



हा पुरुष अमेरिकेंत बोस्तन शहरीं इ० स० १७०६ त जन्मला. त्याचा बाप गरीब होता. तो साबण आणि मेण-

वऱ्या करून आपला निर्वाह करी. बेंजामिन हा लिहायाला वाचायाला शिकून, अभ्यास करून विद्वान् झाला. आणि केवळ आपल्या उद्योगानें मोठी प्रतिष्ठा पावला. तो मोठा संपत्तिमान् झाला. तो फ्रान्सदेशाच्या दरबारीं कितीएक वर्षेंपर्यंत अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांच्या तर्फे वकील होता. तो इ० स० १७९० त निवर्तला.

आपल्या उत्कर्षाची हकीकत त्यानें स्वहस्तें लिहून ठेविली आहे. तींत एके ठिकाणीं असें आहे– "संपत्तिमान् होण्याचीं मुख्य साधनें दोन आहेत; एक उद्योग आणि दुसरें हात राखून खर्च करणें. ह्मणजे, आपला पैसा आणि आपला वेळ हे कधीं व्यर्थ जाऊं न देतां, आपल्याच्यानें होईल तितका त्यांचा चांगला उपयोग करावा. ह्या दोन गुणांच्या खालोखाल, मनुष्याचा उदय होण्यास, वेळच्या वेळीं काम करणें आणि सर्वदा न्यायानें वागणें हे गुण फार उपयोगीं पडतात....उद्योग, खर्चाचा वेतवात आणि तारतम्य ह्या गोष्टी जरी उत्तम आहेत, तरी केवळ त्यांजवरच अवलंबून राहूं नका. कारण, परमेश्वराच्या कृपेवांचून त्या सर्व व्यर्थ होत. ह्मणून, नम्र होऊन ती कृपा तुह्मीं संपादिली पाहिजे."

## नीतिबोध.

### ओव्या.

पुढें ओढवूनि प्रारब्धा जो टाकी प्रयत्न धंदा
तो पुरुष बुद्धिमंदामाजी गणती जाणते. १.
न कीजे कोणाची हेलना न बोलावें दुष्ट वचना
जाणोनि पराची वेदना परोपकारा भजावें. २.

ध्यावे थोरांचे आशीर्वाद भूतीं न करावा विरोध
वर्मस्पर्शाचे कुटिलशब्द न बोलावे कवणातें. ३.
उगेंचि न जावें परसदना विनोदेंही न कीजे परछळणा
दुरुक्ति बोलतां दुर्जना प्रत्युत्तर न द्यावें. ४.
संसर्ग न करावा नीचाचा विश्वास न मानावा मत्सऱ्याचा
क्रोध मद मत्सर यांचा विटाळ मानीं मानसें. ५.
कुटिल असत्य वर्मस्पर्श हेळन छलन हास्य उपहास
जेणें पुढिलां होतसे त्रास ऐसें वाक्य न वदावें. ६.
उपकारियांचें लक्षण अपार आपण केले कोटी उपकार
न बोले तो उत्तम नर उत्तम पुरुष बोलती. ७.
गेलें हृदयीं नाठवावें केलें मुखीं न बोलावें
सत्य सर्वदा न सांडावें साधुवर्तन ह्या नांवें. ८.

मुक्तेश्वर.

---

## दीर्घ प्रयत्न.

मोठीं कामें दीर्घ प्रयत्नांवांचून सिद्धीस जात नाहींत. आणि दीर्घ प्रयत्न करण्यास मनुष्याचे ठायीं शांति आणि धीर हीं आवश्यक आहेत.

अमेरिकेंत आबुदन ह्या नांवाचा एक विद्वान् पुरुष होऊन गेला. तो पक्ष्यांविषयीं निरंतर शोध आणि विचार करीत असे. त्यानें कितीएक वर्षें श्रम करून सुमारें दोनशें उत्तम चित्रें काढून तयार केलीं, आणि तीं एका पेटींत ठेवून तो कांहीं कामाकरितां दुसऱ्या गांवीं गेला. आणि परत येऊन पाहूं लागला तों, त्या पेटींत सहस्रावधि मुंग्या भरून त्यांनीं त्या चित्रांचा नाश केला आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याला फार वाईट वाटलें. आणि कितीएक रात्री त्याला स्वस्थ झोंप देखील आली नाहीं.

त्याविषयीं त्यानें स्वतः असें लिहिलें आहे कीं, "कांहीं दिवस लोटल्यावर मला पुनः उद्योग करण्याची नवी उमेद आली, आणि दोन वर्षांत तीं सगळीं चित्रें पहिल्यापेक्षांही अधिक चांगलीं अशीं मीं तयार केलीं."

सर ऐझाक न्यूतन ह्या तत्त्वज्ञान्यानें कितीएक वर्षेपर्यंत पुष्कळ शोध आणि गहन विचार करून एक पुस्तक रचिलें होतें; तें, त्याचा आवडता कुत्रा मोत्या ह्यानें, तोंडांत धरून दिव्याच्या ज्योतीशीं नेलें, तेव्हां तें जळून गेलें. तेव्हां तो पुरुष त्यावर न संतापतां शांतपणानें ह्मणाला, "मोत्या, तुझे हातून आज केवढी हानि झाली, हें तुला ठाऊक नाहींना?" इतकें बोलून तो पुनः आपल्या उद्योगास लागला.

कार्लाइल ह्या ग्रंथकारानें फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीच्या इतिहासाचा प्रथम भाग बहुत श्रम घेऊन तयार केला, आणि, तो आपल्या शेजाऱ्यास वाचायास दिला. तो त्या शेजाऱ्याच्या मोलकरणीनें, रद्दी कागदांचें पुडकें ह्मणून, चाहा तयार करतेवेळीं चुलींत घालून जाळून टाकिला! हें कार्लाइल ह्याला कळलें तेव्हां त्याला फार वाईट वाटलें. पण तोंडाबाहेर रागाचा एकही शब्द न काढतां, तो ग्रंथ त्यानें तितके श्रम करून पुनः लिहिला.

जिआर्दिनि हा एक अत्यंत वाद्यविद्याप्रवीण मनुष्य होता. त्याला एका तरुण माणसानें विचारिलें, "तुमच्या इतकें शिकायास किती दिवस अभ्यास करावा लागेल बरें?" त्यानें उत्तर दिलें, "दररोज बारातास प्रमाणें एकसारखीं वीस वर्षें."

ग्रीक लोकांनीं दाहा वर्षेपर्यंत तायर शहरास वेढा घातला, तेव्हां तें त्यांच्या हातीं आलें.

# आनंदी वृत्ति.

मनुष्याला सुख होणें हें त्याच्या वृत्तीवर आहे. संपत्ति विपुल आहे आणि जर वृत्ति आनंदी नाहीं, तर माणासाला सुख कधीं व्हावयाचें नाहीं. ह्मणून, थोर पुरुष प्राप्त स्थितींत आपली वृत्ति आनंदी ठेवितात; उगाच कुरकुरत बसत नाहींत.

सिदनी स्मिथ हा विलायतेंत एका प्रांताचा धर्मोपदेशक होता. त्याला तें काम आवडत नव्हतें. तरी, तो ह्मणे कीं, "हें काम मला आवडेसें करण्याचा मीं निश्चय केला आहे." ह्याच पुरुषानें वृद्धापकाळीं आपल्या एका मित्राला लिहिलें, "मला संधिवात, दमा आणि दुसरे सात रोग ह्यांची पीडा आहे. बाकी माझी प्रकृति बरी आहे"!

जर्मी तेलर हा पुरुष इंग्लंदांत होता. राज्यक्रांतीच्या घडामोडींत, इतर लोकांबरोबर, ह्याच्याही घरादाराची आणि कुटुंबाच्या माणसांची वाताहात झाली. त्याचें सर्वस्व गेलें, आणि त्याला सर्व गोष्टींची वाण पडली. अशा स्थितींत असतां, त्यानें आपल्या एका मित्रास लिहिलें, "मी प्रजासत्ताक पक्षाच्या लोकांच्या हातीं सांपडलों आहें, आणि माझें सर्व कांहीं गेलें आहे. आतां काय? तरी बरें. त्यांनीं सूर्य, चंद्र, माझी आवडती वायको, ज्यांस माझी दया येते असे कांहीं मित्र, आणि मला साह्य करण्यास तयार आहेत असे कांहीं मित्र, हीं राहूं दिलीं आहेत, हें फार चांगलें आहे. माझी आनंदी वृत्ति मजपाशीं आहे. त्याप्रमाणें, धर्माच्या योगानें जें समाधान होतें, तें मला आहे........इतक्या सुखांत थोडेंसें दुःख असलें ह्मणून काय झालें? त्याविषयीं कशाला कुरकुरावें?"

यूलर हा मोठा नामांकित गणिती होता. तो म्हातारपणीं अगदीं आंधळा झाला होता तरी, तो दुःखी होऊन कधीं कण्हत बसत नसे. तो त्यांतच होईल तितका अभ्यास करी, आणि मधल्या वेळांत आपल्या नातोंडांस त्यांचे धडे शिकवून आनंदानें कालक्रमणा करी.

## सद्गुणांची प्रशंसा.

सद्गुणांची प्रशंसा करणें हें थोरपणाचें लक्षण आहे. त्यांत खरें बोलणें आणि जनांस सन्मार्गानें वागण्यास उत्तेजन देणें हीं दोन साधतात.

दाक्तर जान्सन असें ह्मणत असे कीं, "दुसऱ्याच्या आंगच्या सद्गुणांची प्रशंसा करण्याच्या संवईच्या योगानें जितके मित्र जोडतात, तितके दुसऱ्या कोणत्याही गुणाच्या योगानें जोडत नाहींत."

महाराणी व्हिक्तोरिआ ह्यांचा भ्रतार प्रिन्स आलबर्त ह्याचे चरित्रांत त्याजविषयीं असें लिहिलें आहे.—"कोणीं एकादें चांगलें भाषण केलें, अथवा चांगलें काम केलें, तर त्याची प्रशंसा वारंवार करावी, हा गुण त्याचे ठायीं फार वर्णनीय होता. त्याविषयीं त्याला मोठा आनंद वाटे, आणि त्याची वाहवा तो पुढें कितीएक दिवस करी. मग तें भाषण अथवा कृत्य एकाद्या लहान मुलाचें असो अगर एकाद्या म्हाताऱ्याचें असो. त्यापासून त्याला हर्ष होई."

चांगला गुण शत्रूच्या ठायीं जरी असला, तरी सुज्ञ पुरुष त्याची तारीफ करितात. इ० स० १८९७–९८ ह्या वर्षी हिंदुस्थानांत जें मोठें बंड झालें होतें, त्यांत, शेवटच्या

बाजीरावाचा दत्तक पुत्र नानासाहेब हा होता; आणि त्यानें शेंकडों साहेब लोक, त्यांच्या बायका आणि त्यांचीं मुलें ह्यांची कत्तल उडविली. तरी, खरें शौर्य त्याच्या ठायीं पुष्कळ होतें, असें कितीएक इंग्लिश ग्रंथकारांनीं अगदीं मोकळ्या मनानें लिहिलें आहे. कस्तूरी कोठेंही असो; तिला सुवास यावयाचाच.

---

## पुत्रास पित्याचा बोध.

इंग्लंदांत लार्ड चेस्तरफील्द ह्या नांवाचा एक फार थोर पुरुष होऊन गेला. त्याला एकच मुलगा होता. तो त्याला प्राणापलीकडे आवडत असे. तरी, विद्याभ्यासाच्या कामीं त्याची शिक्षा फार कठीण असे. आपल्या पुत्रानें चतुरस्त्र व्हावें, अशी त्याची फार इच्छा होती, ह्मणून त्याचा विद्याभ्यास बराच झाल्यावर, त्यानें त्याला युरोपांतले इतर देश पाहण्यास पाठविलें. त्याबरोबर त्याला एक चांगला शिक्षक त्यानें दिला होता. हा मुलगा प्रवासांत असतां त्यास त्याच्या बापानें जीं पत्रें पाठविलीं, त्यांत त्यानें त्याला फार उत्तम बोध केला आहे. तसा बोध आपले मुलास करावा, असें सर्व बापांच्या मनांत येईल; पण तें सामर्थ्य थोडक्यांचे ठायीं आढळेल. त्या बोधांतले कांहीं चुटके "पुत्रास पित्याचा बोध" ह्या सदराखालीं आह्मीं देण्याचें योजिलें आहे.

योग्य वर्तणुकीविषयीं त्याच्या एका पत्रांत असें आहे:— "वेळ पाहून वागणें, हें फार अगत्याचें आहे. कितीएक गोष्टी अशा आहेत कीं, त्या, योग्य स्थळीं आणि

योग्य वेळीं केल्या असतां शोभतात; त्याच भलत्या स्थळीं आणि भलत्या काळीं केल्या तर लज्जेस कारण होतात. पाहा. खेळणें हें अभ्यास झाल्यावर किंवा काम आटोपल्यावर शोभतें; आणि तेंच, शिक्षक शिकवीत असतां, अगदीं वाईट दिसतें........ माझी कृपा संपादावी, अशी जर तुझी इच्छा आहे, तर, आपल्या शिक्षकाची कृपा संपाद, ह्मणजे झालें. तो जें शिकवील तें मनापासून शीक, आणि जें सांगेल तें मनापासून ऐकून, त्याशीं सभ्यतेनें वाग; ह्मणजे त्याची कृपा तुजवर सहज होईल.

---

## भीम आणि दुर्योधन ह्यांचीं भाषणें

हीं भाषणें समरांगणीं अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं झालीं. ह्यांवरून त्या दोघां वीरांचें वैर स्पष्ट होतें.

### आर्या.

**भीम** ह्मणे रे अधमा केलें त्वां आणि जें तुझ्या तातें
चित्तांत आठवावें पदरीं फळ द्यावया कुजाता तें. १.
विष चारिलें बुडविलें डोहांत करावयासि वध मातें
स्मर वारणावतीचें जतुसद्म–छद्मकर्म अधमा तें. २.
कपट-द्यूतें हरिलें सर्वस्व पुढें करोनि कितवातें
नेली सभेंत साध्वी व्हावें शिवतां जिला चकित वातें. ३.
त्वां नागवी करविली सुगुणांची प्रीति-हेतु जी वसती
छळली परोपरि खळा अस्मत्सर्वस्व कीर्ति-जीव सती. ४.
ऐशीं अनेक पापें केलीं त्वां भरतकुलकलंका रे
तूं जेविं दुर्गुणांहीं न अशा दशतुंडें ही अलंकारे. ५.

---

१ कुत्सितापासून उत्पन्न झालेल्या. २ लाक्षागृह-कपट-कर्म. ३ नीचातें, शकुनीतें. ४ रावण.

कुरुराज ह्मणे मंदा मेळविलें वहुविकत्थनें काय
हाय ह्मणवितों युद्ध-श्रद्धेसह भोगितों तुझा काय. ६.
वदलासि दुर्विचेष्टित माझें जें जें खरेंचि भीमा तें
मंदा न तदेक-प्रति-कृत घडलें ह्मणुनि लाज मी मातें. ७.
म्यां करुनि तुह्मां वल्कल-धर दीन सुचिर वनोवन फिरविलें
अज्ञातवास दास्यहि करवुनि निजतेज दुःसह मिरविलें. ८.
तुज लाविलें स्वतेजें म्यांचि कढी-भात-वरण घाटाया
वांटाया प्राज्य[3] पुरण पापड पोळ्या प्रभूत लाटाया. ९.

**मोरोपंत.**

---

## चमत्कारिक रीति.

मनुष्यांच्या रीति त्यांच्या स्वभावानुरूप असतात, असें पुष्कळ गोष्टींवरून स्पष्टपणें दिसून येत असतां, आणि मनुष्यांचे स्वभाव बहुतकरून एकसारखे असतां, भिन्नभिन्न देशांत, भिन्नभिन्न रीति कशा प्रचारांत आल्या, ह्याचें मोठें नवल वाटतें.

मालदीव बेटांतले लोक अगदीं एकटे एकटे बसून खातात. ह्मणजे, पानें वाढिल्यावर, कुटुंबांतल्या प्रत्येक माणसानें आपापलें पान उचलून, आपल्या इच्छेप्रमाणें, एका एका कोपऱ्यांत जाऊन बसावें, आणि तेथें आपलें खाणें कोणाच्या नकळत खावें, अशी त्यांची चाल आहे.

फिलिपैन बेटांतल्या लोकांची रीति, वर सांगितलेल्या रीतीच्या अगदीं उलट आहे. त्यांच्यांतल्या एकाद्यास जर कधीं एकटें जेवायास बसावयाचा प्रसंग आला, तर तो

---

१ दुष्ट आचरण. २. त्यांतून एकाचाही प्रतीकार ( फेडणें ).
३ पुष्कळ.

लवकर लवकर रस्त्यांत जाऊन कोणातरी एकाद्या ओळखी-च्या मनुष्यास मोठ्या आग्रहानें बोलावून आणितो, आणि त्याला आपल्या पंक्तीस जेवायास बसवितो. ह्मणजे, त्या लोकांस एकटें बसून जेवणें मुळींच बरें वाटत नाहीं.

दक्षिण पासिफिक महासागरांत दक्षिण अमेरिकेच्या पश्चिमेस ओताहिती ह्मणून बेटें आहेत. त्यांतले लोक एकमेकांशीं मिळून मिसळून राहणारे आहेत. परंतु, जेवतेवेळीं ते एकमेकांपासून तीन तीन चार चार हातांच्या अंतरावर एकमेकांकडे पाठी फिरवून बसतात. आणि जेवण आटोपे-पर्यंत ते एक शब्द देखील कोणाजवळ बोलत नाहींत.

ब्राझिल देशांत जे इंदियन लोक आहेत, ते जेवतांना किंवा दुसरें कांहीं खातांना मध्यें पाणी पीत नाहींत. त्यां-च्यांतल्या एकाद्यानें जर हा नियम मोडिला, तर ते त्याला पापी आणि मूर्ख समजतात.

अमेरिकेंतले इंदियन लोक, घरीं जेवायास बोलाविलेल्या मेजवान लोकांबरोबर कधीं जेवायास बसत नाहींत. ते मंड-ळीस अतिशयित आग्रह करितात, आणि त्यांची सर्व तज-वीज बरोबर ठेवण्यांत अगदीं मग्न असतात. न्यू फ्रान्स येथील इंदियन लोकांत तर अशी चाल आहे कीं, जेवतांना पाहुण्यांस रंजविण्याकरितां यजमानानें एकसारखें गात बसलें पाहिजे.

तार्तार लोकांत आग्रह करण्याची चाल फार विचित्र आहे. फार परिचित मनुष्यास कांहीं रस पिण्याचा आग्रह करावयाचा असला, ह्मणजे त्याचा मित्र त्याचा कान फार जोरानें धरून उपटितो, आणि त्या वेदनांनीं त्यानें आ के-

ह्मणजे, सगळी मंडळी टाळ्या पिटून गदगदां हंसल्ये; आणि मग तो रस त्याचे तोंडांत ओतितात.

कामश्चातका देशांत मित्रत्वाच्या परीक्षेची रीति जशी विचित्र आहे, तशी कोठेंही नसेल. जिवलग मित्र ह्मणविणाऱ्या मनुष्यास घरीं आणावें; त्याला एका लहानशा खोलींत बसवावें; त्याला अगदीं कढत कढत अन्न खायास लावावें; शिवाय, त्याच्या शरीराचा दाह होण्याकरितां त्या खोलींत मोठा जाळ करावा; त्या उष्णतेच्या योगानें त्यास दाहा पांच उलट्या व्हाव्या; आणि अशा स्थितींत जर तो त्या घरच्या यजमानावर रागावला नाहीं किंवा तळतळला नाहीं, तर तो त्याचा खरा मित्र आहे, असें सर्व लोक समजतात !

---

## विद्वानांस दारिद्य.

धनापेक्षां विद्या पुष्कळ अधिक श्रेष्ठ आहे, ह्याविषयीं कांहीं शंका नाहीं. विद्येनें धन प्राप्त होतें, ह्याही गोष्टीचा अनुभव सर्वत्र दृष्टीस पडतो. परंतु, ज्यांच्या हातून जगावर पुष्कळ उपकार झाले आहेत, असे बहुतेक विद्वान् पुरुष फार गरीबींत होते, असें इतिहासावरून समजतें. त्याचें मोठें आश्चर्य वाटतें.

तुकाराम आणि साक्रेतीस हे महाज्ञानी पुरुष अत्यंत दरिद्री होते; आणि संसारास लागणाऱ्या वस्तु त्यांस मिळवितां येईनात, ह्मणून त्यांच्या बायका त्यांस अतिशयित त्रास देत असत.

क्षैलंदर ह्मणून एक नामांकित विद्वान् पुरुष स्पेन देशांत होऊन गेला. त्यानें एका कठीण ग्रंथावर टीका केली

होती, ती त्यानें एका जेवणाबद्दल एकास दिली. त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, "मी अठरा वर्षांचा होतों तेव्हां ज्ञानवैभव संपादायास शिकलों; आणि पंचवीस वर्षांचा झालों तेव्हां पोटास मिळवायास शिकलों."

सर्व्हेंतिस हा मोठा ग्रंथकार स्पेन देशामध्यें सोळाव्या शतकांत होऊन गेला. त्याला कधीं कधीं निवळ उपास पडत.

पोर्तुगाल देशांतील लोकांस कामोन्स ह्या नांवाच्या त्यांच्या कवीविषयीं मोठा अभिमान आहे. तो सोळाव्या शतकांत होऊन गेला. तो अन्न अन्न करून लिस्बन येथील दवाखान्यांत मरण पावला.

तासो हा एक मोठा कवि सोळाव्या शतकांत इताली देशामध्यें होऊन गेला. तो नेहमीं कर्जबाजारी असे. त्याला लिहायाला वाचायाला दिवा मिळेना. त्यानें आपल्या मांजरांस लक्षून एक लहानशी कविता केली आहे. तींत तो त्यांजपाशीं, रात्रीं काम करण्यास दिसण्याकरितां, त्यांच्या नेत्रांचा प्रकाश मागत आहे, असें दर्शविलें आहे.

आरिओस्तो हा उत्तम इतालियन कवि होता. त्यानें एकदां एक लहानसें घर बांधिलें. त्यांत ठेवायास सामानसुमान त्याजपाशीं कांहींएक नव्हतें. तें पाहून त्याला कोणी एकानें ह्मटलें, "महाराज, आपल्या काव्यांत एवढाल्या उत्तम सुशोभित सामानानें भरलेल्या वाड्यांचें वर्णन आहे; मग आपलें घर असें रिकामें कां?" त्यावर त्यानें उत्तर दिलें, "अरे बाबा, तें सगळें खरें आहे. पण काव्य करणें आणि सामानानें घर भरणें हीं अगदीं वेगळीं आहेत." असें वित्ताचें आणि विद्येचें वैमनस्य कशावरून पडलें असावें, हें

समजत नाहीं. परंतु एका मनुष्यास एका काळीं जशीं दोन कामें करितां येत नाहींत, तशीं जीं मनें ज्ञानसंपादनाच्या व्यवसायांस लागतात, त्यांस द्रव्यसंपादन साधत नाहीं, असें वाटतें.

---

## साक्रेतीस आणि आल्सिबायादीज.

प्राचीन काळीं अथेन्स शहरामध्यें आल्सिबायादीज ह्मणून एक मोठा नामांकित सरदार होता. तो मोठा संपत्तिमान् होता. आणि त्याजकडे जमीनजुमला फार होता. त्याला त्याचा फार गर्व झाला होता. त्याला असें वाटे कीं, माझ्याएवढी जाहागीर दुसऱ्या कोणाची नसेल. त्याचा गर्व उतरावा, ह्मणून एके दिवशीं सर्व पृथ्वीचा नकाशा त्याच्या पुढें ठेवून साक्रेतिसानें त्याला ह्मटलें, “अहो ज्या आत्तिका प्रांतांत तुमची जाहागीर आहे, तो प्रांत ह्या नकाशावर दाखवा बरें.” तो प्रांत त्याला प्रथम दिसेना सुद्धां, इतका तो लहान होता. तो मोठ्या प्रयासानें सांपडल्यावर, साक्रेतिसानें त्याला त्याच्या जाहागिरीची जमीन त्या नकाशावर दाखवायास सांगितली, तिचा त्यावर त्याला मुळींच पत्ता लागेना. तेव्हां तो ह्मणाला, “ती एवढीशी जाहागीर ह्यांत कशी सांपडेल?” तें ऐकून साक्रेतीस त्याला ह्मणाला, “जी वस्तु पृथ्वीच्या नकाशावर दृश्यमान सुद्धां होत नाहीं, तिजविषयीं तुह्मीं इतका गर्व वाहवा, हें योग्य आहे काय?” हें भाषण ऐकून आल्सिबायादीज हा लज्जित झाला, आणि तेव्हांपासून पुढें त्यानें आपले संपत्तीचा आणि जमीनदारीचा गर्व कधीं मिरविला नाहीं.

---

# विश्वनाथ नारायण मंडलिक.



रत्नागिरी जिल्ह्यांत मुरूड ह्मणून एक गांव आहे; तेथें, नाना मंडलिक ह्मणून फार संभावित आणि कुलीन गृहस्थ राहात असत. त्यांचे चिरंजीव हे विश्वनाथ नारायण होत. हे तिकडे अण्णा मंडलिक ह्मणून प्रसिद्ध आहेत. ह्यांचें जन्म मुरूड येथें इ० स० १८३३ ह्या वर्षी मार्च महिन्यांत झालें. ह्यांचा मराठी अभ्यास मुरूडच्या शाळेंत झाला; आणि इंग्रजी अभ्यास मुंबईच्या एलफिन्स्टन हैस्कुलांत आणि एलफिन्स्टन कालेजांत झाला. तेथें त्यांनीं अनेक बक्षिसें मिळविलीं, आणि अठरा वर्षांच्या उमरींत त्या कालेजांत ते गणितशास्त्राचे गुरु झाले. पुढें शाळांवरचे

डेपुटी इनस्पेक्टर, मुनसफ, इत्यादि कांहीं सरकारी हुद्यांचीं कामें केल्यावर, परीक्षा देऊन, इ० स० १८६३ ह्या वर्षी हायकोर्टाचे वकील झाले. इ० स० १८७६ ह्या वर्षी त्यांस त्या कोर्टाचे सरकारी वकील नेमिलें. हे मुंबईच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे सभासद होते; मुंबईकायदेकौंसलचे सभासद होते; आणि व्हाइसरायच्या कायदेकौंसलचे सभासद होते. त्यांस सी. एस. आय्. ही पदवी मिळाली होती.

राष्ट्रास अत्यंत हितावह असा रावसाहेबांचा गुण ह्मटला ह्मणजे त्यांचा सत्यशीलतेविषयीं दरारा हा होता. त्यांच्या मनांत एकादी गोष्ट भरली ह्मणजे ती स्पष्टपणें बोलण्यास ते ब्रह्मदेवाची देखील परवा करीत नसत. इतरांची प्रतिष्ठा काय? कौंसलामध्यें स्वत: गव्हरनरसाहेबांस देखील ते कधीं वचकले नाहींत. त्यामुळें बाकी सगळे लोक त्यांस वचकत असत; आणि मोठमोठे युरोपियन अंमलदार देखील त्यांच्या पुढें बोलत नसत. शिवाय, बोलण्याप्रमाणें चालणें हें त्यांचें ब्रीद होतें. प्रसिद्ध खोतीकज्जा रत्नागिरीस चालला होता त्या वेळीं, कांहीं कारणानें आगबोट चुकली, ह्मणून, रावसाहेब, स्वत: एकट्याकरितां, वेगळी आगबोट काढून, तेथें गेले. तसेंच, त्याच सुमारास पुण्यास एक खुनाचा कज्जा चालावयाचा होता, तेव्हां आगगाडी चुकली ह्मणून वेळेवर हजर होण्यासाठीं स्वत: स्पेशल ट्रेन काढून गेले. ह्मणजे, एकंदरीनें, रावसाहेबांचे विचार आणि आचार ह्यांची अगदीं एक गट्टी असे; ते कधीं एकमेकांपासून वेगळे राहात नसत. ह्या जगामध्यें अत्यंत पूज्य असे जे पुरुष आजपर्यंत होऊन गेले, त्यांचें मुख्य लक्षण हेंच होतें. आणखी आ-

झाला असें वाटतें कीं, आमच्या राष्ट्राचें खरें हित होण्यास अशा विभूति अत्यंत आवश्यक आहेत.

रावसाहेबांच्या चरित्रावरून एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी दिसते. ती ही कीं, पाश्चिमात्य विद्येचा संस्कार झाल्यानें आमचेकडच्या मंडळीचे आचारविचार वदलतात—वाईट होतात, असा जो समज कितीएक लोकांच्या मनांत बहुत दिवसांपासून भरलेला आहे, तो खोटा आहे. रावसाहेबांस पाश्चिमात्य विद्येचा संस्कार उत्तमप्रकारें पुष्कळ झाला होता; तरी, ते, अगदीं जुन्या हिंदूप्रमाणें कर्मठ आणि आपलें मूळ स्मरून चालणारे होते.

रावसाहेब फार बेतावातानें वागत असत. त्यामुळें त्यांची प्रकृति बहुधा निरोगी असे. परंतु, उद्योग हा त्यांचा जीव असे. त्यांस उद्योगावांचून पळभरही चैन पडत नसे. त्यामुळें त्यांस मनस्वी श्रम होत. आणखी त्यांस शेवटचें दुखणें त्या श्रमातिशयानेंच आलें; आणि त्याच्या योगानें, त्यांस इ०स० १८८९ ह्या वर्षीं मुखानें **रामराम** असा नामघोष चालला असतां, देवाज्ञा झाली.

---

## थोर पुरुषांचीं भाषणें.

सत्य भाषणें हीं अभिप्रायांचीं प्रतिबिंबें आहेत. आणि सत्य भाषण करणें हें थोरांचें ब्रीद आहे. ह्मणून त्यांच्या उपयुक्त भाषणांस लोक फार मानितात.

सर ऐझाक न्यूतन हा एक मोठा तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्यानें अनेक प्रकारचे मोठे मोठे शोध लाविले. त्याला ए-

कदां कोणीं विचारिलें, "असे मोठे शोध आपणांस लागतात तरी कसे?" त्यास त्यानें शांतपणानें आणि मर्यादशीलपणानें उत्तर दिलें, "अहो, त्यांविषयीं मी नेहमीं विचार करीत असतों; त्याच्या योगानें मला कांहीं कांहीं गोष्टी कळतात. दुसरें कांहीं नाहीं."

दाल्तन हा एक मोठा पदार्थविज्ञानशास्त्री होता. त्याला लोक फार बुद्धिवान् ह्मणत. त्याविषयीं तो उघड बोले कीं, "लोक मला कांहीं ह्मणोत. मला जें कांहीं येतें आहे, तें सगळें उद्योग आणि ज्ञानसंपादनाची अतिशयित उत्कंठा ह्यांचें फळ आहे."

दाक्तर यंग ह्या विद्वान् पुरुषाचें ह्मणणें नेहमीं असें असे कीं, "जें कृत्य एका माणसानें केलें आहे, तें दुसऱ्या कोणत्याही माणसास करितां येईल."

लैदन ह्मणून एक मोठा विद्वान् आणि उद्योगी पुरुष इंग्लंदांत होऊन गेला. त्यानें एके वेळीं आपल्या टिपणांत असें लिहिलें—"आतां मी वीस वर्षांचा आहें. माझ्या आयुष्याचा कदाचित् तिसरा हिस्सा होऊन चुकला आहे. पण, मनुष्यांच्या कल्याणाकरितां माझे हातून कांहींतरी झालें आहे काय?"

ह्यू ह्मणून एक इंग्लिश मनुष्य होता. तो लहानपणीं अतिशयित व्रात्य होता; परंतु, त्याच्या आईच्या मरणानें त्याचें चित्त ताळ्यावर आलें, आणि तो विद्या शिकून फार उत्तम मनुष्य झाला. त्यानें आपल्या एका मित्रास ह्मटलें, "मी जसजसें अधिकाधिक वाचीत चाललों, तसतसें माझें अज्ञान मला अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागलें. आणि जस-

जसें माझें अज्ञान मला दिसूं लागलें, तसतसें तें नाहींसें करण्याविषयीं मला अधिकाधिक उत्तेजन येत गेलें."

जान हंतर हा एक फार मोठा विद्वान् गृहस्थ इंग्लंदांत होऊन गेला. त्याला कोणीं असें विचारिलें कीं, "आपण हातीं धरिलेलीं सर्व कृत्यें सिद्धीस जातात, ह्यांतलें मूलतत्त्व आहे तरी काय?" त्यावर त्यानें उत्तर दिलें, "बाबारे, माझा नेम असा आहे कीं, कोणत्याही कामास हात घालण्यापूर्वीं तें आपल्याच्यानें होण्यासारखें आहे कीं नाहीं, तें नीट विचार करून पाहावें; न होण्यासारख्या कामाला मी कधीं हात घालीत नाहीं; होण्यासारखें असलें तर आधीं तें करण्याचीं साधनें मिळवितों, आणि मग कामास लागतों; आणि तें काम चांगल्या रीतीनें पूर्ण होईपर्यंत त्याचा पिच्छा सोडीत नाहीं. मला जें माझ्या सगळ्या कामांत यश येतें, त्याचें बीज हें आहे."

अशीं थोरांचीं भाषणें आहेत. ह्यांत ज्ञान फार आहे. ह्यांतलें तात्पर्य लक्षांत ठेवून जर मनुष्यें वर्तूं लागतील, तर त्यांचें कल्याण खचीत होईल.

---

## तोंडपाठ करण्यासारखीं पद्यें.

### श्लोक.

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें
धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें
न जाणे न नेणे अशा पामराला
बुझावूं[1] शकेना विधाता तयाला. १.

जधीं कांहीं कांहीं हरि करि असे शब्द शिकलों
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम[2] मदें याच भरलों

---

१ समजावूं. २ हत्तीप्रमाणें.

जर्धी कांहीं नेणें ह्मणुनि वदले पंडित मला
तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला. २.
विपत्कालीं धैर्य प्रभुपणि सहिष्णुत्व वरवें
सभे पांडित्याचा प्रसर समरीं शौर्य मिरवे
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रतिविद्या-व्यसन जें
तयांचे हे स्वाभाविक गुण सदा सत्पुरुष जे. ३.

वानोत निंदोत सुनीतिवंत
चलो असो वा कमला गृहांत
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं
सन्मार्ग टाकूनि भले न जाती. ४.

सुनीत पथ सेवणें मलिन कर्म मानेचना
घडो मरण नावडे खल जनाप्रति प्रार्थना
विपत्तिसमयीं पर प्रगटवीच ना दीनता
भल्याविण असें असिव्रत[1] करुं शके कोणता. ५.

जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच
जें दे पतीस सुख फार कलत्र तेंच
जो एकरूप सुखदुःखपणीं गडी तो
हा लाभ पूर्वसुकृताविण केंवि होतो. ६.

विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं[2]
तो सर्प काय न डसे खल अंतरंगीं ७.

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्में
वाणी बरेच गुण झांकुनियां कुकर्में
दे आपणास असतां व्यसनीं त्यजीना
सन्मित्रलक्षण असें वदतात जाणा. ८.

---

१ तरवारीच्या धारेसारखें. २ मस्तकीं.

भाग्याला सुजनत्व भूषण असे कीं मौन शौर्यास तें
ज्ञानाला शम त्या शमास विनय द्रव्यास दातृत्व तें
अक्रोधत्व तया क्षमा प्रभुपणा धर्मास निर्व्याजता,
या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सर्वांस हें तत्त्वता.

वामन.

## दोन रत्नें.

सुपुत्रासारखें शोभिवंत आईस दुसरें भूषण नाहीं. ख्रिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकांत कार्नीलिआ ह्मणून एक मोठी नामांकित स्त्री रोम येथें होऊन गेली. तिचे येथें एके दिवशीं एक श्रीमंत बाई आंगावर पुष्कळ जवाहीर घालून आली, आणि तें तिला दाखवून मोठेपणा मिरवूं लागली. कार्नीलिआ हीस त्या जवाहिराचें कांहीं विशेष वाटलें नाहीं. असें पाहून ती बाई किंचित् हिरमुसली, आणि तिच्या जवाहिराविषयीं तिला विचारूं लागली. तीस कार्नीलिआ हिनें उत्तर दिलें, "माझे दोन हिरे आहेत; ते सध्या मजजवळ नाहींत; अंमळ दम खा; ते मी तुह्मांला इतक्यांत दाखवितें."

हें बोलणें होत होतें इतक्यांत कार्नीलिआ हिचे दोन मुलगे, शाळेंतून अभ्यास करून आले, आणि आपले आईपुढें मर्यादशीलतेनें उभे राहिले. त्यांस हातीं धरून कार्नीलिआ त्या बाईस ह्मणाली, "हीं पाहा माझीं दोन रत्नें!" तें ऐकून त्या डौली बाईनें मान खालीं घातली.

ते दोघे मुलगे पुढें मोठ्या योग्यतेस चढले, आणि लोकहिताचीं पुष्कळ कामें करून कीर्तिमान् झाले. परंतु,

त्यांच्या लोकांत दुफळी झाल्यामुळें ते त्यांच्या कटकटींत प्राणांस मुकले. त्या प्रसंगीं कोणी एक गृहस्थ कार्नीलिआ हिचे समाचारास गेला, आणि तिचें समाधान करूं लागला. त्या प्रसंगीं ती ह्मणाली, "माझ्या पुत्रांसारख्या मुलांच्या आईस हतभाग्य कोण ह्मणेल?"

---

## पुत्रास पित्याचा बोध.

"दुसऱ्यावर दया करणें हें थोरपणाचें मुख्य लक्षण आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं. हलकट मनुष्यें असतात, त्यांचे मनांत नेहमीं राग आणि सूड घेण्याची इच्छा हीं भरलेलीं असतात. त्यांस, शत्रूंस त्यांच्या अपराधाची क्षमा करणें, आणि ज्यांवर आपण जय मिळविला आहे, त्यांस ममतेनें वागवून त्यांजवर कृपा करणें, ह्यांपासून जो अप्रतिम संतोष मनास होतो, त्याचा उपभोग घेण्याचें सामर्थ्य नसतें."

"सद्गुणाविषयीं तूं आणि इतर सर्व माणसांनीं विचार करावा, हें योग्य आहे........परोपकार करणें, आणि खरें बोलणें हे मुख्य सद्गुण आहेत, असें तुला आढळून येईल. आणखी सद्गुणाचें मुख्य लक्षण असें आहे कीं, त्यापासून तो ज्याचे ठायीं असतो त्यास आणि इतर लोकांस सुख होतें........सद्गुणाच्या योगानें सद्गुणी मनुष्यास अप्रतिम समाधान वाटतें........संपत्ति, अधिकार आणि वैभव हीं, आपणापासून अन्याय, जुलूम अथवा अपघात ह्यांच्या योगानें नाहींतशीं होतील. परंतु आपल्या आंगचे सद्गुण जे आहेत, ते खरेखरे आपले आहेत. ते कोणाच्यानेंही नाहींतसे करवणार नाहींत."

"विद्या, प्रतिष्ठा, आणि सद्गुण हीं लोकांत मान मिळण्यास आवश्यक आहेत, हें खचीत समज. त्याप्रमाणेंच, लोकांनीं या वसा ह्मणावें आणि तुझें भाषण लोकांस आवडावें असें होण्यास सभ्यपणा हा आवश्यक आहे. विद्यादि थोर सद्गुणांची परीक्षा साधारण लोकांस नसते, कारण, ते त्यांच्यामध्यें नसतात. परंतु, सभ्यपणा, परोपकारीपणा, इत्यादि जे त्यांच्या खालोखाल सद्गुण आहेत, त्यांची पारख त्यांस चांगली असते."

"जें योग्य आहे तें करण्यास तूं कधीं लाजूं नको, असें तुला माझें फार आग्रहाचें सांगणें आहे. हें तूं कधीं विसरूं नको."

"स्तुति करण्यास योग्य अशा पुरुषांच्या तोंडची वाहवा संपादण्याचा प्रयत्न कर. हें तूं जोंपर्यंत करशील तोंपर्यंत तुला पाहिजे तें मी देईन; पण तूं जर असें करीनासा झालास, तर तुला मजकडून कांहींएक मिळणार नाहीं."

---

## धीर.

मोठीं कामें पुष्कळ धीर धरिल्यावांचून होत नाहींत. जीं कामें अल्प कालांत होतात, तीं अल्प काळपर्यंत टिकतात. धने आज पेरले ह्मणजे परवांना कोथिंबीर तयार होते; पण नारळाचें झाड तयार होऊन लागास येण्यास तीन चार वर्षें तरी निदान लागतात.

युरिपिदीज ह्मणून एक ग्रीक ग्रंथकार होता. तो नाटकें लिही. त्याला काव्य करायास फार वेळ लागे; पण त्याचें काव्य सर्वोत्कृष्ट होई. त्याला दुसरा एक अगदीं साधारण

प्रतीचा कवि एके दिवशीं ह्मणाला, "तुह्मांला तुमच्या नाटकांतल्या तीन कविता करायास तीन दिवस लागतात, तितक्या काळांत मी तीनशें कविता सहज करितों!" त्याला युरिपिदीज ह्यानें उत्तर दिलें, "बाबा, तूं ह्मणतोस तें खरें आहे; पण, तुझ्या आणि माझ्या कवितांमध्यें एक मोठें अंतर आहे; तें हेंच कीं, तुझ्या तीनशें कविता तीन दिवसांत लयास जातील, आणि माझ्या तीन कविता तीनशें वर्षे राहातील."

चीनदेशांत फुट्झी ह्या नांवाचा एक महातत्त्वज्ञानी होऊन गेला. त्याला लहानपणीं शाळेंत जाऊन अभ्यास करण्याचा फार कंटाळा आला; आणि त्याचे मनांत असें आलें कीं, विद्वान होण्याकरितां असें कितीएक दिवसपर्यंत रखडावें, त्यापेक्षां एकादा दुसरा मोलमजुरीचा धंदा पतकरून पोट भरावें तें बरें. ह्मणून, पुनरपि शाळेंत न जाण्याचा निश्चय करून परत घरीं येत असतां, एक ह्मातारी साधीभोळी बाई, बोटाएवढा लोखंडाचा एक लहानसा गज, निसण्यावर मोठ्या जोरानें घांसतांना त्यास आढळली. तीस त्यानें विचारिलें, "बाई, हें तुह्मी काय करीत आहां!" तिनें उत्तर दिलें, "बाबा, माझी विणायाची सूय होती, ती हरवली; ह्मणून मी हा गज झिजवून त्याची नवी सूय तयार करीत आहें." हें ऐकून स्वतःच्या उतावळेपणाचा त्याला पश्चात्ताप झाला आणि तेव्हांपासून तो मोठ्या नेटानें विद्याभ्यास करूं लागला. त्याच्या मनांत जेव्हां पहिल्यासारखे उतावळेपणाचे आणि निराशेचे तरंग उठत, तेव्हां तो आपणाशीं ह्मणे, "साध्याभोळ्या ह्मातारीला, गज घांसून त्याची सूय करण्यास पुरण्याइतका धीर अ-

सावा, आणि मला पुढें एवढाले लाभ होण्याची खातरी असून विद्याभ्यास पूर्ण करण्यास पुरण्याइतका धीर नसावा, ही गोष्ट मोठी लज्जास्पद आहे!"

---

## वेळेस जपलें पाहिजे.

ह्या जगांतील सर्व प्रकारच्या लहान मोठ्या व्यवहारांत अशा कांहीं गोष्टी असतात कीं, त्या करण्यास मनुष्यानें वेळेस जपलें पाहिजे. तसें जर झालें नाहीं, तर कधीं कधीं मोठी हानि होते. रोग लहान असतो, तों औषध घ्यावें हें बरें; तें चुकून तो वाढला ह्मणजे माणसाच्या प्राणाशीं गांठ घालितो.

प्राचीन काळीं अथेन्सकर आणि सैराक्युसन लोक ह्यांचें युद्ध चाललें होतें. त्यांत एके वेळीं अथेन्सकर अगदीं टेंकीस आले, आणि त्यांनीं गलबतांत बसून पळून जाण्याचा विचार केला. परंतु, त्या सुमारास सूर्यग्रहण आल्यामुळें, त्यांचें निघून जाणें नऊ दिवस लांबणीवर पडलें. तितक्यांत सैराक्युसन लोकांनीं त्यांवर हल्ला करून त्यांचा अगदीं पराभव केला. त्यांत त्यांचा अतिशयित नाश झाला

ज्या विचारी पुरुषांनीं रोमन लोकांच्या राज्याचा इतिहास लिहिला आहे, ते असें ह्मणतात कीं, केनी येथील लढाई आटोपल्यावरोबर जर हानिबाल हा रोम शहरावर जाता, तर तें शहर त्याला सहज घेतां आलें असतें.

इंग्लंदाचा राजा साहावा जेम्स ह्यानें थामस हामिल्तन ह्यास विचारिलें, "तुह्मीं ही एवढी संपत्ति कशी संपादिली?" त्यानें उत्तर केलें, "महाराज, जें काम मला आ-

ज करितां येण्यासारखें असतें तें मी कधीं उद्यांवर टाकीत नाहीं; आणि जें काम मला स्वतः करतां येण्यासारखें असतें, तें कधीं दुसऱ्यावर सोंपीत नाहीं. हें माझें संपत्तिसाधन आहे."

---

## अल्प कारणें आणि मोठीं कार्यें.

मोठीं कार्यें करायास फार श्रम करावे लागतात, असें आपण नेहमीं पाहातों; त्यावरून, मोठ्या कार्यास कारणेंही मोठीं असलीं पाहिजेत असें मनांत येतें. पण, तें सर्वदा तसें नसतें. कधीं कधीं अल्प कारणांवरूनही मोठीं कार्यें घडतात.

नेपोलियन बोनापार्त लहान असतां त्याला एक पितळेची लहान तोफ कोणीं बक्षीस दिली; तीवरून त्याचे‐ठायीं शौर्य आणि युद्धाची आवड उत्पन्न झाली, असें बेनस नामक ग्रंथकारानें ह्मटलें आहे.

नेपोलियन बोनापार्त हा बादशहा झाल्यावर, एके दिवशीं, आपली पत्नी जोजफीन हिजसहवर्तमान नाटक पाहण्यास जावयास निघाला. तेव्हां राणी जोजफीन हिच्या आंगावरची शालजोडी, मिसरी बायकांप्रमाणें दिसेशी पांघरविण्यास, तिला जनरल राप ह्यानें सुमारें दोन अडीच पळें खोळंबविलें. त्यामुळें, त्या बादशहास ठार मारण्यासाठीं मोठ्या तोफेसारखें जें एक विलक्षण यंत्र त्याच्या शत्रूंनीं नेमिल्या जागीं आणि नेमिल्या वेळीं उडविलें, तें, तो तेथें पोंचण्यापूर्वीं दोन पळें आधीं उडालें; आणि त्याचा जीव बचावला. ज्याला सर्व युरोपखंड थरथरां कांपत

होतें, त्याचा प्राण, शालजोडी तऱ्हेवाईक रीतीनें पांघरण्याच्या लहरीनें वांचला!

इंग्लंदचा राजा दुसरा चार्लस ह्यास रैहौस ह्या शेताशीं गोळी घालून ठार मारण्याचा कट त्याच्या वैऱ्यांनीं केला; आणि त्याचा वेळ, तो न्यूमार्केताहून अमुक वेळीं निघून अमुक वेळीं त्या ठिकाणाजवळ येईल तेव्हां साधावयाचा, असा संकेत ठरविला. परंतु, न्यूमार्केत येथील राजवाड्यास एकाएकीं आग लागल्यामुळें, राजा, नेमल्या वेळाच्या आधीं कांहीं तास तेथून निघाला, आणि रैहौस शेतावरून सुरक्षितपणें पार गेला !

सुल्ला हा रोमन सरदार दिसण्यांत फार कुरूप होता. तो अथेन्स येथें असतां एका अथेन्सकरानें त्याला माकडतोंड्या किंवा दुसरें असें कांहीं ह्मटलें. तेव्हां त्याला अतिशयित संताप आला; आणि त्याचा सूड उगविण्याकरितां त्यानें सगळ्या अथेन्स शहराचा नाश केला !

"तुह्मी जीवंत आहां तोंपर्यंत माझ्या कुटुंबाचीं बायकामाणसें पुण्यांत यावयाचीं नाहींत," असें उत्तर गंगाधर शास्त्र्यानें बाजीरावास दिल्यावरून त्यानें त्याला पंढरपुर येथें ठार मारविलें. तेव्हांपासून त्याचें आणि इंग्लिशांचें वांकडें आलें. हेंच पेशवाई नष्ट होण्याचें मूळ.

---

## पुत्रास पित्याचा बोध.

"दिमास्थनीज हा एक अप्रतिम ग्रीक वक्ता होऊन गेला. तो प्रथम तोंतरा होता; आणि बोलतांना त्याला फार वेळ दम छाटवत नसे. तरी, चांगलें बोलतां येणें हें

अत्यंत आवश्यक आहे, असें समजून त्यानें त्या खोड्या घालविल्या. त्यास त्याला पुष्कळ श्रम करावे लागले. तोंतरेपण घालविण्यास त्यानें तोंडांत गोट्या धरिल्या आणि बोलतांना पुष्कळ दम छाटतां यावा, ह्मणून तसा एकसारखा पुष्कळ दिवस अभ्यास केला. मोठ्या गलबल्यांत देखील भाषण करितां यावें, ह्मणून तो समुद्रकांठीं जाऊन तेथें मोठ्यानें बोले. आणखी, तो नेहमीं उत्तम ग्रंथकारांचे ग्रंथ वाची. ह्या उपायांनीं तो उत्तम वक्ता झाला. त्यासारखा तूं हो."

"बोलण्याप्रमाणें वाग. तसें न वागणें हें मूर्खपण, अप्रामाणिकपण, आणि मोठा अपराध आहे, हें तुला ठाऊक आहेच. तूं बोलण्याप्रमाणें वागलास नाहींस तर तुजवर कोणी विश्वास ठेवणार नाहीं. आणि धर्माच्या व नीतीच्या संबंधानें तें मोठें पाप आहे........ज्याचेठायीं सत्य नाहीं, त्याचेठायीं दुसरा कोणताही सद्गुण असावयाचा नाहीं, असें सर्व लोक समजतात. आणि अशा मनुष्याचा वीट, मनुष्य आणि देव ह्या दोघांसही येतो. ह्मणून माझी अशी फार इच्छा आहे कीं, तूं जें एकदा करतों ह्मणशील तें करायास कधीं चुकूं नको; मग त्यांत तुझें हित असो किंवा नसो........मी तुझेएवढा होतों तेव्हां माझेएवढा एकादा मुलगा विद्याभ्यासांत किंवा खेळण्यांत जर माझेपुढें गेला असता, तर मला बरें वाटलें नसतें, आणि त्या दोन्ही गोष्टींत त्याला मागें हटवीपर्यंत मी कधींही स्वस्थ राहिलों नसतों. जुलियस सीझर ह्यास मोठेपणाची आवड अतिशयित होती. तो असें ह्मणत असे कीं, मी

रोमशहरामध्यें दुसऱ्या प्रतीचा मनुष्य होण्यापेक्षां एकाद्या लहानशा खेड्यांत पहिल्या प्रतीचा मनुष्य होईन. शिकंदर बादशाहाचा पुतळा त्यानें पाहिला, तेव्हां किंचित् थांबून तो रडला, आणि ह्मणाला, "ह्या पुरुषानें तीस वर्षांच्या वयांत जी कीर्ति आणि जें वैभव संपादिलें होतें, ती कीर्ति आणि तें वैभव त्यापेक्षां मी वयानें इतका मोठा झालों आहें, तरी मला संपादितां येत नाहीं!"..........जे सर्वांहून अधिक योग्यतेचे होण्याचा प्रयत्न करितात, ते पुष्कळ लोकांस मागें टाकितात, ह्यांत संशय नाहीं."

---

## क्रोध.

### ओंव्या.

नीच बोले नीच वचनें तेणेंच लघुत्व पाविजे तेणें
हें परिसोनि विचक्षणें खेद कांहीं न मानावा. १.
क्रोध आधीवीण आधी क्रोध तोचि महाव्याधी
क्रोधें सूदले कीं प्रमादीं सारासारजाणते. २.
क्रोध तोचि अपस्मार क्रोध तोचि भूतसंचार
क्रोधें कीजें पिशाच नर परम चतुर विवेकी. ३.
शांति पीयूषरसाचें पात्र तुझे हृदयीं अति पवित्र
तेथें क्रोधश्वान अपवित्र स्पर्शों नेदी सर्वथा. ४.

**मुक्तेश्वर.**

### आर्या.

नसतो विवेक कांहीं वा घडतो आत्मघातही कुपिता
सुपिताहि क्रोधाच्या आवेशेंकरुनि होतसे कु पिता.

**मोरोपंत.**

---

# नीतिबोध.

## ओंव्या.

परवर्मभेदनीं दुरुक्ती ते अवलक्ष्मी अकीर्ति अवगती
ते प्रत्यक्ष राक्षसी व्यक्ती हिंसा करी अशस्त्रें. १.
ह्मणोनि दुर्वाक्य न बोलावें पराचें आपण साहीत जावें
याहूनि श्रेष्ठ साधन बरवें भुवनत्रयीं असेना. २.
साधु सद्भावें पुजावे सज्जन संकटीं रक्षावे
खळापवाद साहोनि जावें तेंचि वर्तन श्रेष्ठाचें. ३.
सत्य विनीत मधुरभाषी सकळ प्राणी वश त्यासी
कोणापासून तयासी अपाय कांहीं असेना. ४.
मुखें सत्य अंगें विनीत तेणें जिंकिले जन समस्त
इहीं सद्गुणीं अलंकृत चतुरें झालें पाहिजे. ५.
जया सर्वभूतीं वाणव तया नमस्कारिती सकळ देव
अक्षयी सुख सर्व वैभव चढावोढी ओपिती. ६.
यालागीं अवाच्य परुष वचन न बोलावें गेलिया प्राण
करावें पूज्याचें पूजन कोण्हा कांहीं न मागावें. ७.

मुक्तेश्वर.

# जार्ज वाशिंगटन.

मराठी ग्रंथ संग्रहालय



स्वदेशाचें हित साधून ज्या महात्म्यांनीं आपल्या जन्माचें सार्थक्य केलें आहे, ते अत्यंत वंदनीय होत. जे इंग्लिश लोक इंग्लंडांत त्रासून स्वेच्छेप्रमाणें स्वस्थपणानें कालक्रमणा करण्याकरितां, कितीएक वर्षेंपर्यंत अमेरिकेंत जाऊन राहिले होते, त्यांस, इंग्लंडांतील सरकाराच्या सेवकपणांतून मुक्त करून, स्वतंत्र करण्याच्या कामीं अगदीं निरपेक्षबुद्धीनें परिश्रम केल्यावरून, जार्ज वाशिंगटन ह्याचें नांव अजरामर झालें आहे. त्याचा संक्षिप्त वृत्तांत येथें लिहितों.

जार्ज वाशिंगटन हा उत्तर अमेरिकेंत वेस्टमोर्लंड प्रांतांत इ० स० १७३२ ह्या वर्षी जन्मला. तो सात वर्षांचा होता, तेव्हां त्याला शाळेंत घातलें. तेथें तो आपल्याएवढ्या मुलांच्या पलटणी करून लढायांचे खेळ खेळत असे. आणि तो मोठा उद्योगी, सत्यशील, आणि निर्लोभ, अशी त्याची

ख्याति होऊन, त्याच्या विसाव्या वर्षीं त्याला त्या प्रांताच्या लष्करांत एक लहानशी अमलदारी मिळाली. त्यानंतर थोडक्या दिवसांनीं फ्रेंच लोकांशीं लढण्याचा प्रसंग आला. त्यांत ह्या तरुण योद्धयाचें चातुर्य दिसून आलें, आणि त्याची कीर्ति चोहोंकडे पसरली. पुढें, इंग्लंडांतलें सरकार अमेरिकेंतल्या इंग्लिश लोकांवर कर बसवूं लागलें; आणि ज्यापक्षीं आमच्या वतीचे लोक पार्लमेंटांत नाहींत, त्यापक्षीं आह्मी कर देणार नाहीं, असा आग्रह त्या लोकांनीं धरिला. त्यावरून फार मोठें युद्ध माजलें. इंग्लंडच्या सरकारास जर्मन सरकारानें साह्य केलें. आणि अमेरिकेंतल्या इंग्लिश लोकांस फ्रेंच सरकारानें साह्य केलें. ह्यांच्या लढाया आठ वर्षेंपर्यंत चालल्या होत्या. त्यांत जार्ज वाशिंग्टन ह्यानें अनेक पराक्रम केले. शेवटीं, त्याला मुख्य सेनापति नेमिल्यावर, इंग्लंडच्या सैन्याचा अगदीं पराभव झाला; आणि, आपण इंग्लंडापासून अगदीं स्वतंत्र आहों, असा जगविख्यात जाहीरनामा अमेरिकन लोकांनीं इ० स० १७७६ त प्रसिद्ध केला; आणि तें त्याचें स्वतंत्रपण, इ० स० १७८३ त इतर सर्व राष्ट्रांनीं कबूल केलें. नंतर वाशिंग्टनानें आपले कामाचा राजीनामा दिला.

ह्या प्रकारेंकरून अमेरिकेंतलीं जीं संस्थानें स्वतंत्र झालीं, त्यांचा राज्यकारभार चालविण्यास कांहीं नियमित कालपर्यंत त्यांतलाच कोणी थोर पुरुष सर्वानुमतें नेमावा असें ठरलें. त्याप्रमाणें वाशिंग्टन ह्यास इ०स० १७८९ त त्या कामावर नेमिलें, आणि त्यास "अध्यक्ष" असें ह्मणूं लागले. हें राज्यकारभाराचें काम ह्या पुरुषानें इ०स० १७९६ पर्यंत

फार उत्कृष्ट रीतीनें चालवून, मग राजीनामा दिला. ह्यानंतर त्यानें आपलें आयुष्य, स्वस्थपणें, आपल्या वडिलोपार्जित जमीनजुमल्यांत शेतपोत करून घालविलें. तो इ०स० १७९९ त मरण पावला. तेव्हां त्याचें वय ६७ वर्षांचें होतें.

हा पुरुष अत्यंत सद्गुणी आणि धर्मशील होता. ह्याची निर्लोभता वर्णनीय होती. मुख्य सेनापतीच्या आणि अध्यक्षाच्या कामावर असतां, त्यानें आपल्या देशाच्या सरकाराकडून, खाणेंपिणें आणि वस्त्रप्रावर्ण ह्यांस जेवढा अगदीं नक्की खर्च लागला, तेवढा मात्र घेतला,- शिल्केस ठेवण्यास एक पै देखील अधिक घेतली नाहीं. **स्वदेशाभिमान** हा त्याच्या सद्गुणमणिमालेचा मेरु होता. कायावाचामनेंकरून तो आपल्या राष्ट्राचें हित करण्यास झटला; आणि त्यांत त्याला उत्तम यश आलें. ज्यांस जगाचा इतिहास येत आहे, ते सर्व, वाशिंग्टनाचें नांव ऐकून पूज्यबुद्धिपूर्वक माना तुकावितात. आमच्या ह्या राष्ट्राचें खरें हित होण्यास ह्यामध्यें वाशिंग्टनासारखे महात्मे निर्माण झाले पाहिजेत.

---

## निस्पृहता.

मनाला जसें योग्य वाटतें, तसें उघड बोलणें आणि वागणें हें निस्पृहतेचें लक्षण आहे. ज्यांस कोणत्याही प्रकारें दुसऱ्याची जरूर नसते, ते निस्पृह असतात. असे पुरुष ह्मटले ह्मणजे विरक्त वृत्तीचे साधु किंवा जनांतून उठलेले बहकलेले लोक होत. दुसऱ्याची मर्जी संपादून पोट भरणाऱ्या मनुष्यांचे अंगीं निस्पृहता कधींही यावयाची नाहीं.

राघोबादादा पेशव्यानें आनंदीबाईच्या आग्रहावरून नारायणराव पेशव्यास ठार मारविलें. नंतर राघोबादादास त्या कर्माचा फार पश्चात्ताप झाला. ह्मणून त्यानें रामशास्त्री-बुवांस त्याचें प्रायश्चित्त काय ह्मणून विचारिलें. त्यावर त्या निस्पृह पुरुषानें उत्तर दिलें; "ह्या पापकर्माबद्दल तुह्मांला देहान्त प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. दुसरा उपाय नाहीं."

कोणे एके समयीं एका चांचास चोरी करितांना पकडून शिपायांनीं शिकंदर बादशाहाकडे आणिलें. त्यास बादशहानें विचारिलें, "अरे, तूं लोकांस लुटावें असा तुला काय अधिकार आहे रे?" त्यावर त्यानें उत्तर दिलें, "महाराज, आपणांस जसा देश काबीज करण्याचा अधिकार आहे, तसा मला चोऱ्या करण्यास अधिकार आहे. आपणां दोघांमध्यें अंतर एवढेंच कीं, मजपाशीं थोडे लोक आहेत, ह्मणून मी लोकांस उपद्रव थोडा देतों; आणि आपणांबरोबर मोठालीं सैन्यें आहेत, ह्मणून आपण लोकांस उपद्रव अतिशयित देतां."

रामशास्त्रीबुवांच्या निस्पृहतेस कारण असें होतें कीं, आपण निरंतर परमेश्वरास भिऊन वागतों आणि त्याच्या आज्ञा पाळितों, त्यापक्षीं आपला सर्वस्वीं सांभाळ करणारा तो आहे, आणि त्याच्या सामर्थ्यापुढें मनुष्याचें कांहीं चालावयाचें नाहीं, असा त्यांचा पूर्ण भरंवसा होता. आणि तो चांचा दुष्टपणानें परिपूर्ण भरला होता, आणि आपण कसेंही बोललों तरी आपल्या कपाळाची शिक्षा चुकत नाहीं, हें त्याला पक्कें समजून आलें होतें; हें त्याच्या निस्पृहतेचें कारण होतें.

# दृढनिश्चय.

कोणतेंही मोठें काम सिद्धीस नेण्यास मनुष्याचे अंगीं दृढनिश्चय असला पाहिजे. "अहो निश्चयाचें बळ, तुका ह्मणें तेंचि फळ" असें जें ह्मटलें आहे तें खरें आहे. अडचणींस आणि संकटांस भिणाऱ्या मनुष्यांच्या हातून मोठीं कामें कधींही शेवटास जावयाचीं नाहींत.

विलियम केरी ह्या नांवाचा फार चांगला एक धर्मोपदेशक कितीएक वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत आला होता. त्याच्या लहानपणची एक गोष्ट अशी सांगतात कीं, तो एके वेळीं एका झाडावर चढत असतां, त्याचा पाय निसटला, आणि त्यासरसा तो खालीं पडून त्याचा पाय मोडला. त्यामुळें तो इतका आजारी झाला कीं, कितीएक आठवडेपर्यंत त्याला त्याच्या आंथरुणावरून हालवलें नाहीं. परंतु, औषधोपचारांनीं बरा झाल्याबरोबर आधीं प्रथम तो त्या झाडावर चढला आणि त्याच्या टिटाळीस गेला. हा त्याचा दृढनिश्चय त्याला पुढें धर्मोपदेशाच्या कामांत फार उपयोगीं पडला.

प्राण्यांच्या शरीरांतलें रक्त नदींतल्या पाण्याप्रमाणें नेहमीं वहात असतें, ही गोष्ट प्रथमतः हार्व्हे ह्या नांवाच्या एका विद्वान् पुरुषाच्या लक्षांत आली. ती लोकांच्या मनांत भरविण्यास त्यास एकसारखे एकवीस वर्षेपर्यंत परिश्रम करावे लागले. त्या अवकाशांत वितंडवादी लोकांनीं त्याचा नानाप्रकारीं छळ केला; तो त्यानें शांतपणानें सोशिला. परंतु शेवटीं त्याचें मत खरें ठरलें, आणि तें वैद्यविद्येंत फार उपयोगीं पडलें.

तसेंच गोस्तन देवींची युक्ति काढणारा जेन्नर ह्याचें

झालें. लोक त्याला वेडा समजूं लागले, त्याचा व्यवसाय अगदीं बसला, आणि त्यास वेळेची भ्रांति पडली. ह्याशिवाय पाखांडी लोकांनीं त्याजवर नानाप्रकारचीं कुभांडें रचून त्याला त्रास दिला तो वेगळाच. ह्या गोष्टीच्या शोधांत आणि त्याच्या संबंधाच्या विपत्तींत त्याचीं सबंध पंचवीस वर्षे गेलीं. शेवटीं, त्याचें ह्मणणें विचारी पुरुषांस पसंत वाटलें; त्याचा सर्व लोकांत प्रसार झाला; आणि त्याच्या योगानें मनुष्याच्या एका मोठ्या घातक रोगाचा पुष्कळ बंदोबस्त झाला आहे.

हें जसें नवीन शोधांच्या प्रकरणांत आहे, तसें लोकांमध्यें नवी चांगली रीति चालू करण्यांतही आहे. चांगल्या रीति लोकांमध्यें चालू करण्यास जे कोणी प्रयत्न करितात, त्यांस अशींच नानाप्रकारचीं संकटें भोगावीं लागतात. मोठीं कामें अल्प प्रयासानें कधींही व्हावयाचीं नाहींत.

---

## कवि आणि राजा.

राजे संपत्तीनें आणि सामर्थ्यानें थोर असतात खरे; परंतु, शहाणपणांत आणि चतुरस्रपणांत त्यांच्यानें बुद्धिमान् पुरुषांची बरोबरी करवत नाहीं. द्रव्याच्या आशेनें आणि सामर्थ्याच्या भयानें बुद्धिमान् पुरुषांस राजांशीं मनःपूत बोलतां येत नाहीं, हा विचार वेगळा; परंतु जर तसा प्रसंग प्राप्त झाला, तर बुद्धिमान् पुरुष राजांस निरुत्तर करितील ह्याविषयीं कांहीं संशय नाहीं.

इंग्लंदाचा राजा पहिला चार्लस ह्याचा वध इ० स० १६४९ त झाल्यावर इंग्लंदामध्यें कांहीं दिवसपर्यंत प्रजा-

सत्ताक राज्य होतें; त्याचा सगळा अधिकार ओलिव्हर क्रामवेल ह्याच्या हातीं होता. आणि त्याजपाशीं मिल्तन हा महाकवि चिटणिशीच्या कामावर होता. तो प्रजासत्ताक राज्याचा पक्षपाती होता. पुढें तें प्रजासत्ताक राज्य मोडून पहिल्या चार्लसाचा मुलगा दुसरा चार्लस हा इ० स० १६६० त सिंहासनारूढ होऊन राज्य करूं लागला. तेव्हां मिल्तन हा अगदीं वृद्ध आणि दोन्ही डोळ्यांनीं आंधळा झाला होता. त्याला बुद्ध्या भेटण्याकरितां एके दिवशीं दुसरा चार्लस राजा त्याच्या घरीं गेला; आणि, तो प्रजासत्ताक राज्याचा पुरस्कर्ता होता, तें मनांत आणून त्यास ह्मणाला, "अरे लुच्चा, निमकहरामा, तुझ्या पापांमुळें देवानें तुला आंधळें केलें बरें का." त्यास त्या कवीनें शांतपणानें उत्तर दिलें, "महाराज, माझ्या पापांबद्दल जर मला देवानें आंधळें केलें आहे, तर त्यानें तुमच्या बापास ज्या पातकांवरून मरणाची शिक्षा दिली, तीं पातकें केवढीं असावीं?" तें उत्तर ऐकून, एकही अक्षर न बोलतां राजा तेथून उठून गेला.

---

## मध्यमस्थिति बरी.

प्रत्येक स्थितींत सुख आणि दुःख हीं सारखीं असतात, असें विचारी पुरुषांचें मत आहे, तें प्रथमदर्शनीं खरें वाटत नाहीं. परंतु, बराच अनुभव आल्यावर त्याविषयींची शंका नाहींशी होते. जी गोष्ट आपणांस अत्यंत सुखावह वाटत असते, ती प्राप्त झाल्यावर तितकी सुखावह वाटेनाशी होते, हें नेहमीं आपल्या अनुभवास येतें. ह्मणून, सुज्ञ पुरुष जे आहेत, ते प्राप्त झालेल्या स्थितींत तृप्त असतात;

अथवा, देवापाशीं मध्यमस्थिति मागतात. कारण त्या स्थितीमध्यें सुखें आणि दुःखें हीं फार मोठीं नसतात, आणि फार अल्पही नसतात; बेताचीं असतात.

लुटारू लोकांनीं जर एकादे गांवावर हल्ला केला, तर, आधीं प्रथम जे कोणी रस्त्यांत उघडे वाघडे सांपडतात, त्यांस लुटण्याविषयीं त्यांस बुद्धि होते, आणि मग त्यांची नजर मोठ्या घरांवर जाते. ह्मणजे, अशा वेळीं अगदीं गरीब आणि श्रीमंत ह्यांस फार भय असतें. आणि मध्यम स्थितीचे जे लोक असतात, ते आपल्या लहान लहान घरांत स्वस्थ असतात.

एक कल्पित गोष्ट आहे. दोन ओढे होते. त्यांतला एक दुसऱ्यास मोठ्या गर्वानें ह्मणाला, "अरे, तूं अझून असाच का रोडका आहेस? तुझें आपलें पहिलें रेंगाळणें चाललेंच आहे आं? अरे, कांहीं दिवसांपूर्वीं आपण दोघे एकसारखे असून, मी आतां तुजपेक्षां एवढा मोठा झालों आहें, लोक मला नदी ह्मणूं लागले आहेत, आणि हल्लींच्या प्रमाणेंच जर आणखी कांहीं दिवस पावसानें कृपा केली, तर मी शोणभद्रासारखा महानद होईन, हें पाहून तुला लज्जा वाटत नाहीं काय!" त्यास दुसऱ्यानें उत्तर दिलें, "होय भाऊ. तूं ह्मणतोस तें सगळें खरें आहे. तूं आतां खराच मोठा झाला आहेस, आणि चिखलानें माजून उन्मत्त झाला आहेस. तें तुझें वैभव तुला लखलाभ होवो. मी मध्यम स्थितींत आहें, आणि माझें शरीर निर्मल आहे, हें मला वस आहे. ह्याहून अधिक मला कांहीं नको."

आगर ह्मणून एक कोणी मोठा विचारी पुरुष होऊन

गेला. तो देवाची प्रार्थना अशी करी कीं, "देवा, मी तुजपाशीं पदर पसरून दोन गोष्टी मागतों. त्या दोन गोष्टी मला मरण येईपर्यंत कमी पडूं देऊं नको. त्यांतली पहिली गोष्ट ही कीं, असत्य आणि गर्व हीं माझ्या अंतःकरणापासून निरंतर दूर ठेव. आणि दुसरी ही कीं, मला फार श्रीमंत करूं नको आणि फार गरीबही करूं नको; माझ्या स्थितीस योग्य असें बेताचें अन्नवस्त्र देऊन माझें पोषण कर. मला फार संपत्ति नको ती अशाकरितां कीं, तिच्या योगानें मी उन्मत्त होऊन तुला ओळखीनासा होईन, असें मला भय वाटतें; आणि फार गरीब करूं नको ह्मणून ह्मणतों ह्यांतला हेतु एवढाच कीं, पोटांत आग पेटली ह्मणजे, दुसरें कशाचें भान न राहून माझे हातून चोरी होईल, अशी मला भीति वाटते. ह्मणून, हे परमेश्वरा, ह्या दोन गोष्टी तूं कृपा करून मला दे."

मोठा वृक्ष असतो, त्याच्या शेंड्याचे हाल वाऱ्यानें होत असतात, आणि येत्याजात्याचे धक्के बुंधाला सोसावे लागतात; परंतु मधलें खोड नेहमीं अलग आणि स्वस्थ असतें.

---

## कुपुत्रलक्षणें.

### अभंग.

मायबापें केली आस, झाला बायकोचा दास. १.
झाला बायकोच्या बोला, सख्या भावाशीं अबोला. २.
बायकोच्या ऐकुनि गोष्टी, लागे वहीणीच्या पाठी. ३.
बायकोला पितांबर धटी, आईच्या लुगड्याला बारा गांठी. ४.
मेहुणीला भरी चूडा, आईच्या हातांत कांकडा. ५.
मावळणीला आशा गाळी, मेहुणीला पुरणपोळी. ६.
आपण लावी रेशीमकांठी, बापा लावीतो लंगोटी. ७.

गुरुशिष्या वैरकार, लेंक धांवे बापावर. ८.
आपण जेवी दूधभात, बाप देखुनि धुतो हात. ९.
बापाच्या गळ्या दोरी, सासऱ्याला जवळ करी. १०.
तुका ह्मणे ऐशा नरा, मोजुनि माराव्या पैजारा. ११.

तुकाराम.

---

## शरीरप्रकृतीशीं मनाचा संबंध.

मनुष्याची शरीरप्रकृति आणि त्याचें मन ह्यांचा फार निकट संबंध आहे. मन स्वस्थ नसलें तर शरीरप्रकृति चांगली राहात नाहीं; आणि शरीराला कांहीं इजा होत असली तर मन स्थिर नसतें. चांगलें अन्न जसें शरीराला, तसें चांगलें ज्ञान मनाला आहे. चांगल्या अन्नानें जसें शरीर पुष्ट होतें, तसें चांगल्या ज्ञानाच्या योगानें मन प्रशस्त होतें. चांगलें अन्न खाणारास कदन्न खाण्याचा प्रसंग आला ह्मणजे जशी त्याची प्रकृति बिघडते, तसें, ज्यास ज्ञानसंपादनाचा हव्यास असतो, त्यास तो करूं दिला नाहीं ह्मणजे तें त्याला दुखण्यासारखें होतें.

पित्रार्क हा इतालियन कवि एकदां व्हाक्लूज येथें गेला; त्याला बरें वाटत नव्हतें. तेथें त्याचा मित्र क्याव्हेलनचा बिशप होता. त्याला असें वाटलें कीं हा विद्वान् कवि विद्याभ्यास फार करितो ह्मणून ह्याची प्रकृति बिघडली आहे. ह्मणून त्यानें त्याच्या खोलींत जाऊन त्याचीं पुस्तकें, कागद, आणि दऊतलेखणी हीं सगळीं एका पेटींत घालून, ती बंद करून, तिची किल्ली आपणाजवळ ठेविली आणि त्यास सांगितलें कीं, “ तुह्मीं दाहा दिवसपर्यंत पुस्तकें

आणि दऊतलेखणी ह्यांस स्पर्श करितां कामास नये." तें त्या रोग्यास कबूल करावें लागलें. त्यानंतर पहिला दिवस त्यानें मोठ्या कष्टानें घालविला; दुसरे दिवशीं त्याचें कपाळ मनस्वी दुखूं लागलें; आणि तिसरे दिवशीं त्याला थोडासा ज्वर आला. हें पाहून त्या बिशपास भय वाटलें; आणि लागलींच त्याचीं पुस्तकें आणि दऊतलेखणी कागद वगैरे लिहिण्याचीं साधनें त्याला परत दिलीं. तेव्हां त्याला लागलेंच बरें वाटलें.

ज्यांचीं मनें विद्येनें चांगलीं प्रशस्त होतात, ते पुष्कळ दिवस वांचतात असें आढळतें. प्राचीन काळचे सात तत्त्ववेत्ते म्हातारे होऊन मेले. त्यांतला क्लुओब्युलस हा मरणकालीं सत्तर वर्षांचा होता, सोलन आणि पेरिअंदर हे दोघे एक्यायशीं एक्यायशीं वर्षांचे होते, पिताकस, चिलो आणि बियास हे तिघे पंचायशीं पंचायशीं वर्षांचे होते; आणि थेल्स हा एक्याण्णव वर्षांचा होता. आमचे महाज्योतिषी भास्कराचार्य ६५ वर्षांचे, आणि आमचे तत्त्वज्ञानी विद्यारण्य हे ९० वर्षांचे होऊन निवर्तले.

लार्ड बेकन हा मरणकालीं ६५ वर्षांचा आणि सर ऐझाक न्यूतन हा ८५ वर्षांचा होता.

ख्रिस्ती धर्मोपदेशक हे बहुतकरून फार चांगले शिकलेले असतात; ते बहुधा पुष्कळ वर्षेंपर्यंत वांचतात.

# नीतिबोध.

## आर्या[1].

भज सन्मार्गातें तूं दैवज्ञांची[1] करूं नको गर्हा[2]
स्वप्नींहि देवहेलन न करावें रीति हे तुला अर्हा[3]. १.
वा कोप लोभ शठता असदाग्रह पिशुनता कुटिलभाव
उद्वेग दंभ यत्नें सोडीं जोडीं महाजनीं भाव. २.
हें न तुवां विसरावें स्त्री मृगया द्यूत पान यांत सदा
अत्यासक्ति नसावी स्त्रीजित अविनीत जे तशांत कदा. ३.
सुखसंपन्नीं मैत्री नित्य दया दुःखितीं जनींहि करीं
संतोष पुण्यवंतीं वा औदासीन्य दुर्मती न धरीं. ४.
विद्योत्साह श्रद्धा स्मृति पुण्यख्याति धैर्य हें आधीं
अनघा मन घालुनियां मतिपूर्वक षट् पदार्थ तूं साधीं. ५.
सक्रोध हो अरिजनीं स्वकलत्रीं हो सकाम तूं बापा
सकृप सलोभहि चित्तीं हो स्वजनांच्या हरावया तापा. ६.
हो द्वेषी पाखंडीं साधुजनीं हो सराग[4] तूं वा गा
दुर्मंत्रीं केवळ जड पिशुनोक्तीं बधिर हो महाभागा. ७.
नास्तिक धूर्त पतित शठ षंढ कितव चपल खल जड क्रूर
निजकल्याणाकरितां वत्सा सोडूनि यांसि दे दूर. ८.
जननी जनक सती स्त्री गुरु सज्जन यांचिया वचा साधो
विश्वास पदाहि धरीं न अविश्वासें तुला व्यथा बाधो. ९.
सावध सदा असावें संसारीं स्वहित कृत्य लक्षावें
पुरुषार्थाचें साधन वा धनसें हें शरीर रक्षावें. १०.
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका
प्राणहि वेंचुनि रक्षीं वृद्धा बाळा सुदुर्बला रंका. ११.
यत्नें कीर्तिच जोडीं वा होय पदार्थ हाचि बहु धन्य
राजे पंडित यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य. १२.

**मोरोपंत.**

---

१ ज्योतिष्यांची. २ निंदा. ३ योग्य. ४ प्रीतिवंत.

## अडचण आली ह्मणजे युक्ति सुचते.

असा माणसाचा स्वभाव आहे. ह्याचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ आढळतात.

हानिबाल ह्यास सैन्यासहवर्तमान आल्पस्पर्वतावरून जाणें जेव्हां भाग पडलें, तेव्हां, त्यांतील अति उंच टेंकाडें खणून काढून आणि फार खोल दऱ्या, दगड झाडें वगैरे पदार्थांनीं भरून काढून रस्ता साफ करण्याची युक्ति त्याला सुचली. तिच्या योगानें असें झालें कीं, जेथें मनुष्यास नुसतें जातां येत नव्हतें, तेथें ओझ्यांनीं लादलेले गाडे सहज जाऊं लागले.

हानिबाल हा सरदार एके वेळीं अवघड डोंगराच्या चक्रांत सैन्यासहवर्तमान रोमन लोकांस सांपडला. त्यांनीं त्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला. इतक्यांत रात्र पडली तेव्हां हानिबाल ह्यानें आपल्या लष्करांतल्या बैलांच्या शिंगांस पेटविलेल्या मशाला बांधिल्या; आणि त्यांस खूब मारून डोंगराच्या चढणीवर हांकून लाविलें. त्या मशाला रोमन लोकांच्या दृष्टीस पडल्या, तेव्हां त्यांस असें वाटलें कीं, कार्थेजीनियन लोक, ह्मणजे हानिबाल आणि त्याचें सैन्य, हीं पळून जात आहेत. ह्मणून मोठ्या आवेशानें त्यांनीं त्यांचा पाठलाग केला. ते त्या बैलांच्या मागें मूर्खांप्रमाणें धांवायास लागल्याबरोबर, इकडे हानिबाल हा आपल्या सैन्यासहवर्तमान सुरक्षितपणें निघून गेला.

दुधाच्या भांड्यांत मांजराचें तोंड जाईनासें झालें, ह्मणजे तें आपला पाय आंत घालून, त्याला लागलेलें दूध चाटतें.

लहान तोंडाच्या एका बरणींतलें खोबरेल दोन उंदरांनीं खाल्लें, तें असें. तिचें तोंड लहान होतें, त्यामुळें त्यांत त्यांचें

तोंड जाईना; ह्मणून प्रथम कांहीं वेळा एकानें आपलें शेंपूट त्यांत घालून, तें तेलानें भरून आल्यावर दुसऱ्यापुढें केलें, तें त्यानें चाटिलें; असें कांहीं वेळ झाल्यावर, दुसऱ्यानेंही तसेंच केलें.

---

## संवय प्रतिस्वभाव आहे.

स्वभाव हा मनुष्यास जन्मतःच असतो; आणि संवई ह्या सहवासानें जडतात. परंतु नित्याच्या सहवासानें त्या संवई स्वभावाप्रमाणें होऊन जातात.

पांतसाचा राजा मित्रिदेतस ह्यानें सर्व प्रकारचीं विषें खाऊन तीं जिरविण्याची आपणास इतकी संवय लावून घेतली कीं, त्याचा पराभव पांपीनें केल्यावर त्याला आत्महत्या करून घेण्याचा प्रसंग जेव्हां प्राप्त झाला तेव्हां कोणतेंही विष त्याच्या उपयोगीं पडेना. ह्मणून त्यानें दुसऱ्या माणसाकडून आपलें शिर तोडविलें, आणि प्राण सोडिला.

कौन्त दी लार्ज ह्या नांवाचा एक फ्रेंच मानकरी, कांहीं राजकीय कारणांवरून, फ्रान्सांतल्या बास्तिली किल्ल्यामध्यें एकसारखा तीस वर्षें आंधारकोठडींत ठेविला होता. त्याला इ० स० १७८९ च्या जुलै महिन्याच्या १४ व्या तारखेस सरकारानें सोडिलें. त्याला बाहेर बरें वाटेना. त्याला अरण्यांत पडल्यासारखें वाटूं लागलें ह्मणून त्यानें आपण होऊन त्या अंधारकोठडींत पुनः परत जाण्याच्या परवानगीसाठीं विनंती केली. ती मान्य झाली नाहीं. त्यामुळें तो महिना दीड महिना अजारी होऊन मरण पावला.

लेदन येथें एक बाई पुष्कळ वर्षेंपर्यंत तुरुंगांत पडली

होती. ती सुटली तेव्हां तिला बाहेर गोड लागेना. ह्मणून तुरुंगांतल्या आपल्या खोलींत परत जाण्यास तिनें सरकाराच्या अधिकाऱ्यांपाशीं परवानगी मागितली; आणि त्यांस असें कळविलें कीं, "सामोपचारानें जर ही परवानगी मला तुह्मी न द्याल, तर मी बुद्ध्या अपराध करीन, आणि पुन: तुरुंगांत जाण्याचा प्रसंग साधीन."

---

## कुटुंबसुख.

आप्तजन, स्त्री आणि मुलेंबाळें ह्यांशिवाय घराला शोभा नाहीं; आणि अशा घरांत राहण्यासारखें मनुष्यास दुसरें सुख नाहीं. त्याप्रमाणेंच अशा कुटुंबांत राहिल्यावांचून मनुष्याचें हृदय सदय, मृदु आणि आनंदी असें राहात नाहीं.

इंग्लंदचा राजा तिसरा जार्ज हा, आपला मुख्य प्रधान पित्त ह्यासहवर्तमान एके वेळीं एका दिवाणखान्यांत बसला होता. तेव्हां त्यानें आपला चिटणवीस विलबिफोर्स ह्याजपाशीं कांहीं कामाचा कागद मागितला. तो कागद तो जवळच्या खोलींत शोधूं लागला, इतक्यांत त्याच्या मुलांनीं तेथें रडून मोठा गोंगाट मांडिला. तें पाहून राजा पित्त ह्यास हळूच ह्मणाला, "आतां विलबिफोर्स किती संतापतो तो क्षणभर पाहा बरें का." तें विलबिफोर्स ह्यानें ऐकिलें, आणि, त्या दोघांस सहज ऐकूं जाईल असें मोठ्यांनीं ह्मटलें "हा मुलांच्या तोंडचा ध्वनि मला किती मधुर लागतो! हा जर ह्या वेळीं माझे कानीं न पडता, तर, तो कागद अद्याप सांपडत नाहीं ह्मणून मला अतिशयित संताप झाला असता."

इंग्लंदचा राजा तिसरा जार्ज हा आपल्या दिवाणखान्यांत

एके वेळीं आपल्या मुलांशीं घोडा खेळत होता. ह्मणजे, तो घोड्यासारखा चार पायांवर उभा राहिला होता, त्याचा एक मुलगा त्याच्या पाठीवर बसला होता, तो घोडा चौपाई मोठाल्या उड्या मारीत होता, आणि तें पाहून, त्याचा दुसरा एक लहान मुलगा, त्याला चाबुकानें हांकून, गदगदां हंसत होता. इतक्यांत, त्याचा एक मंत्री एकाएकीं तेथें आला. त्याजकडे पाहून राजा त्याला ह्मणाला, "या, बसा; तुह्मांला कांहीं मुलें आहेतना!" असें ह्मणून त्यानें तो खेळ तसाच पुढें चालविला.

फ्रान्साचा वादशाहा चवदावा लुई ह्याचीही अशीच एक गोष्ट इतिहासांत सांगितली आहे.

ह्याच्या उलट उदाहरणें पाहा. नेपोलियन बोनापार्त हा एवढा शूर, एवढा बुद्धिमान्, आणि एवढा पराक्रमी होता खरा; पण, तो कुटुंबी नसल्यामुळें त्याचे ठायीं अंतःकरणाची सदयता, मृदुत्व आणि रसिकता हीं मुळींच नव्हतीं. त्याप्रमाणेंच, लग्न वगैरे न करितां जे कोणी आपलें आयुष्य तसेंच घालवितात, त्यांचा स्वभाव बहुतकरून तुसडा, कठोर आणि रुक्ष असा असतो.

---

## तोंडपाठ करण्यासारखीं पद्यें.

### श्लोक.

वनचरांसह शैलवनांतरें
निजसुखें फिरणें तरि तें बरें
जरि घडे सहवासचि पामरीं
तरि जळो असणें सुरमंदिरीं. १.

द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश
कीं दान भोग अथवा तिसरा विनाश
जो घेत भोग जरि पात्र करीं न देही
त्याच्या धनास मग केवल नाश पाहीं. २.

असे जयाला धन तोचि पंडित
कुलीन तो तोचि गुणी बहुश्रुत
तो मान्य तो सुंदर तो विचक्षण
धनाश्रयें राहति सर्वही गुण. ३.

फुका कोरडें वैर कीं निर्दयत्व
परस्त्री परद्रव्य हें मुख्य तत्त्व
अनिष्टत्व चित्तीं सुहृद्बांधवांचें
स्वतःसिद्ध हें रूप पैं दुर्जनाचें. ४.

दे दान गुप्त उपकार कधीं न बोले
मानी प्रमोद जरि मान्य घरासि आले
दावी न गर्व विभवें गुण घे पराचे
खड्गाग्रतुल्य विषमव्रत हें भल्याचें. ५.

बरें तें या देहीं महिवरि कडेलोट करणें
महासर्पाच्या कीं वदनिं तरि हा हात धरणें
उडी कीं वन्हींत त्वरित जरि घालूनि मरणें
जळो तें जें लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें. ६.

वृक्ष फार लवती फलभारें
लोंबती जलद घेउनि नीरें
थोर गर्व न धरी विभवाचा
हा स्वभाव उपकारपराचा. ७.

वाणी खरी दान बरें अहिंसा
नसे परद्रव्यसतीपिपासा
दया अतृष्णा नति भाव जो कां
सन्मार्ग हा धोपट सर्व लोकां. ८.

**वामनपंडित.**

---

# शंकर पांडुरंग पंडित.




शंकर पांडुरंग पंडित ह्यांचें जन्म इ. स. १८४० ह्या वर्षी सावंतवाडीसंस्थानांत झालें. त्यांचे वडील कुळकर्णी होते. त्यांनीं ह्यांस लहानपणीं घरींच लिहिणेंवाचणें व थोडे बहुत हिशेब शिकविले.

पुढें ते कारकुनीची जागा मिळविण्यासाठीं उमेदवारी करूं लागले. परंतु ती त्यांस लवकर मिळेना. तेव्हां त्यांस कांहीं महिनेपर्यंत कुळकर्ण्याचें काम करावें लागलें. हें काम

करीत असतां त्यांस इंग्रजी शिकण्याची इच्छा झाली. ती तृप्त करण्यासाठीं ते इ. स. १८५८ सालीं घराहून एकदम निघून बेळगांवास आले, आणि तेथल्या इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. बेळगांवास त्यांची शिकण्याची सोय चांगली होती, परंतु, त्यांस दुसरा कांहीं आधार नव्हता. ह्यासाठीं त्यांस शिकवण्या धरून पैसे मिळवावे लागत, आणि आपल्या हातांनीं स्वैंपाक करावा लागे. तरी हे सर्व कष्ट शांतपणें सोसून त्यांनीं अभ्यास चांगला केला. तो इतका कीं, चार वर्षांनीं, ह्मणजे इ. स. १८६२ ह्या वर्षीं त्यांची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा उतरली. पुढें इ. स. १८६५ ह्या वर्षी त्यांच्या बी. ए. व एम्. ए. ह्या दोन्ही परीक्षा उतरल्या. ह्या परीक्षांमध्यें त्यांनीं दुसरी भाषा ल्याटिन घेतली होती. ह्मणजे ह्यांनीं, इंग्रजी शिकण्यास लागल्यापासून सात वर्षांत युनिव्हर्सिटीचा सगळा अभ्यासक्रम संपविला. आणि त्यांत आणखी एक विशेष हें कीं, त्यांनीं जी एवढी मोठी विद्या संपादिली तिजबद्दल एका पैशाचा देखील खर्च त्यांनीं घरच्या माणसांवर किंवा मित्रमंडळीवर पडूं दिला नाहीं.

युनिव्हर्सिटीचा क्रम आटपल्यावर ह्यांस दक्षिणा प्रैझ कमिटीचे सेक्रेटरी नेमिलें. आणि नंतर ह्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू केला. तो त्यांनीं इतका उत्तम केला कीं, तीन चार महिन्यांत, भगवानदास संस्कृत स्कालरशिपच्या परीक्षेस त्यांस बसतां आलें! संस्कृताबरोबर त्यांनीं जर्मन भाषेचाही अभ्यास केला. पुढें इ. स. १८६८ सालीं त्यांस डेक्कन कालेजांत असिस्टंट प्रोफेसर नेमिलें, आणि तेथून त्यांस वरचेवर मोठमोठ्या सरकारी जागा मिळत गेल्या. शे-

वर्टी इ. स. १८८९ सालीं त्यांस सरकारानें पोरबंदर संस्थानाचे व्यवस्थापक नेमिलें. तेथें उत्तम रीतीनें मोठ्या नेकीनें काम करीत असतांना ते इ. स. १८९४ सालीं मरण पावले.

ह्यांचीं लोकहिताचीं मुख्य कामें ह्मटलीं ह्मणजे "**वेदार्थयत्न**" आणि "**अथर्व**"वेदाची आवृत्ति हीं होत. आमच्या वेदांत काय आहे तें आमच्या भाषेंत आह्मांस समजूत देण्याचा प्रयत्न वेदार्थयत्नांत केला आहे. त्यांत सुमारें अर्धा ऋग्वेद आला आहे. अथर्ववेदाची चांगली शुद्ध आवृत्ति आजपर्यंत निघाली नव्हती ती ह्यांनीं मोठा परिश्रम करून काढिली. परंतु ती पुरी झालेली पाहाण्यास ते जगले नाहींत.

ह्यांचें नांव ऐकून आमच्या ह्या देशांतच नव्हे, तर इंग्लंद, जर्मनी, फ्रान्स इत्यादि विद्याचारसंपन्न देशांत देखील मोठमोठे पंडित माना डोलवितात.

ह्यांचे ठायीं निस्पृहता मूर्तिमंत उभी असे. त्यामुळें त्यांचा सर्वत्र दरारा असे.

ह्यांचें अनुकरण आमच्या होतकरू मंडळीनें अवश्य करावें.

---

## खरें थोरपण.

खरें थोरपण हें मनुष्यास मोठें भूपण आहे. पण तें फार थोड्या मनुष्यांस प्राप्त होतें. आणि त्याचा आणि वयाचा कांहीं संबंध नसतो.

फ्रान्स देशांतील राज्यक्रांती झाल्यावर राजा सोळावा लुई, ह्याचा आठ वर्षांचा एक मुलगा त्याच्या शत्रूंनीं एका चाह्माराच्या स्वाधीन केला, आणि त्यास त्याला पाहिजे त्या रीतींनें

टार मारण्यास सांगितलें. तो चाह्मार त्याला अतिशयित वाईट रीतीनें वागवीत असे. पुरतें अन्नवस्त्र देखील देत नसे. त्या मुलास त्या चाह्मारानें एके दिवशीं विचारिलें, "कायरे पोरा, जर दैववशात् तुझ्या बापाची गादी तुला प्राप्त झाली, तर तूं माझें काय करशीलरे ?" त्या मुलानें उत्तर दिलें, "मी तुला तुझ्या अपराधांची क्षमा करीन" !

आस्त्रिआदेशाचा बादशाहा फ्रान्सिस ह्याविषयीं अशी एक गोष्ट सांगितली आहे कीं, व्हायना शहरामध्यें महामारीचा प्रलय चालला असतां, कोणा एका गरीब मनुष्याचें प्रेत, बरोबर कोणी पोंचवायास नसतां, एकदोघांनीं स्मशानांत चालविलें होतें, तें त्याच्या दृष्टीस पडलें. आणि चौकशीअंतीं त्याला असें कळलें कीं, तो रोग आपणांस लागेल ह्या भयानें त्याचे आप्तजन त्याबरोबर आले नाहींत. तेव्हां त्याला फार वाईट वाटलें; आणि तो आपल्याबरोबरच्या शिपायांस ह्मणाला, "चला तर मग आपण ह्याचे बरोबर जाऊं; शेवटचा योग्य मान मिळाल्यावांचून माझ्या राज्यांतल्या कोणत्याही माणसानें स्मशानांत जाऊं नये, अशी माझी इच्छा आहे." त्याप्रमाणें तो तेथें गेला, आणि त्याचे सर्व विधि त्यानें उभें राहून आपणासमक्ष यथास्थित करविले.

स्पेन देशांत करूना येथें फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांची लढाई झाली, तेव्हां इंग्लिशांकडचा सरदार चार्लस नेपियर हा जखमी होऊन फ्रेंचांच्या हातीं सांपडला. त्याचा शोध लावण्यास बारन क्लोत हा गृहस्थ फ्रेंच सैन्याच्या छावणींत आला; तेथें मुख्य सेनापति ने हा होता. त्यानें आपल्या शिपायांस ह्मटलें, " चार्लस नेपियर ह्यास त्याचे मित्र भेटूं द्या; त्यांस

हरकत करूं नका." तरी बारन क्लोत तेथें किंचित रेंगाळला; तेव्हां ने ह्यानें त्यास विचारिलें, "तुह्मांला आणखी काय पाहिजे?" क्लोत हळूच नम्रतेनें ह्मणाला, "त्याची आई विधवा, वृद्ध आणि अगदीं अंध आहे—" ने ह्मणाला—"असें आहे काय? बरें तर, चार्लस नेपियर ह्यास सोडा, त्याला आपल्या आईला जाऊन भेटूं द्या." ह्याप्रमाणें, नेपोलियनाच्या इतराजीची भीति न धरितां, त्यानें त्याला सोडून दिलें. तें त्याचें करणें नेपोलियनानेंही फार पसंत ह्मटलें.

---

## पुत्रास पित्याचा बोध.

"कोणाचेंही मन वळवावयाचें असल्यास, त्याच्या वृत्तीस काय विशेष आवडतें हें नीट समजून त्याच्या अनुरोधानें उद्योग केला पाहिजे; कारण, मनुष्यांचे सर्व व्यवहार त्यांच्या वृत्तीप्रमाणें चालतात. फार्सालिआ येथील लढाईच्या वेळीं सीझरानें पांपीच्या लोकांवर हल्ला करण्याविषयीं आपल्या लोकांस लक्षून जें भाषण केलें, तें ह्याप्रकारचें होतें; ह्मणूनच त्या प्रसंगीं त्याला यश आलें. ह्मणून, तुला मी असें सांगतों कीं, तूं, सीझराप्रमाणें, सर्व व्यवहारांत लोकांच्या वृत्ति पाहून, त्या स्वाधीन होतील अशा रीतीनें वाग, ह्मणजे तुला दुसऱ्याचें मन वळविण्यास श्रम पडणार नाहींत. एकदां लोकांचें मन वश करून तूं त्यांचे ठायीं आपणाविषयीं प्रीति, अभिमान, दया किंवा असा कांहीं मनोभाव उत्पन्न केलास, ह्मणजे त्याजपुढें त्यांच्या स्वतःच्या विचारांचें देखील कांहीं चालावयाचें नाहीं."

"मी अल्प वयाचा असतां ज्या ठेंचा मला लागल्या,

आणि ज्या अदती मला घडल्या, त्या ठेंचा तुला लागूं नयेत, आणि त्या अदती तुला घडूं नयेत, ह्मणून माझा सर्व प्रकारचा अनुभव मी तुला, बापाच्या नात्यानें नव्हे, तर मित्राच्या नात्यानें सांगतों. त्यावरून, तूं सुख भोगूं नयेस, असा माझा हेतु आहे, असें तूं समजूं नको."

"ज्ञान हें संतोषदायक, उपयोगी आणि आवश्यक आहे, असें जें मी तुला वारंवार सांगतों, तें सर्व ज्ञान पुस्तकांत आहे, असें तूं समजूं नको. तर, त्यांत व्यवहारज्ञानाचाही समावेश होतो; आणि हें व्यवहारज्ञान पुस्तकांतल्या ज्ञानापेक्षां फार उपयोगी आहे. खरोखर ह्मटलें तर हें दोन प्रकारचें ज्ञान असें आहे कीं, ह्यावांचून त्याची पूर्णता होत नाहीं, आणि त्यावांचून ह्याची पूर्णता होत नाहीं. व्यवहारज्ञान जें आहे, तें केवळ लोकांशीं व्यवहार केल्यानें मात्र प्राप्त व्हावयाचें; तें पुस्तकांत कधीं आढळावयाचें नाहीं...."

---

## अप्रबुद्ध बुद्धिवान्.

ह्या दोन शब्दांचीं संगति फार चमत्कारिक दिसते. परंतु, तिच्या अर्थाचीं प्रदर्शक उदाहरणें जगांत पुष्कळ आढळतात.

सर ऐझाक् न्यूतन शाळेंत होता, तेव्हां अगदीं साधारण प्रतीचा मुलगा होता. त्यानें वर्गांतलें शेवटचें बांक सहसा कधीं सोडिलें नाहीं.

शेरिदन ह्मणून जो मोठा नामांकित वक्ता इंग्लंदांत होऊन गेला, तो लहान असतां त्याच्या आईनें साधा एका गुरूकडे शिकावयास पाठविलें; तेव्हां [illegible] त्याच्या पत्रांत

लिहिलें, "हा मुलगा अगदीं दगड आहे. हा चांगला होण्याची फारशी आशा नाहीं."

जगद्विख्यात इंग्लिश कादंबरीकार सर वाल्तर स्कात हा लहानपणीं अगदीं दगड होता. एदिनबरो येथील महापाठशाळेचा मुख्य गुरु दालझेल ह्यानें त्याविषयीं एकदां असें ह्मटलें कीं, "हा मुलगा अगदीं शुंभ आहे, आणि हा असाच शुंभ राहायाचा."

लार्द क्लैव हा लहानपणीं त्याच्या आप्त माणसांस देखील इतका मूर्ख आणि निरुपयोगी वाटला कीं, त्याचें कांहीं-तरी होवो, असें ह्मणून त्यांनीं त्याला मद्रासेस पाठवून दिलें. त्यानेंच हिंदुस्तानांत इंग्लिशांच्या राज्याचा पाया घातला.

ड्यूक ऑफ वेलिंग्तन आणि नेपोलियन बोनापार्त हे दोघे लहानपणीं अगदीं मंद बुद्धीचे मुलगे होते. ड्यूक ऑफ वेलिंग्तनास त्याची आई लहानपणीं "बैल" ह्मणत असे. आणि नेपोलियन बोनापार्ताविषयीं दचेस दी आब्रांती हिनें असें लिहिलें आहे कीं, "त्याची शरीरप्रकृति चांगली असे; पण बुद्धीनें तो इतर साधारण मुलांसारखा होता."

ह्यावरून बुद्धि ही, विजेप्रमाणें, मनुष्याच्या हृदयांत गुप्त असते, आणि प्रसंगीं, योग्य स्थिति आली ह्मणजे प्रकट होते, असें दिसतें.

---

## कर्ज.

जगांत सुखानें नांदण्यास जे उपाय थोरांनीं सांगितले आहेत, त्यांत, कर्ज कधीं काढूं नये, हा एक आहे.

ह्याविषयीं दाक्तर जान्सन ह्यानें असें लिहिलें आहे—

"कर्ज काढणें ही एक साधारण अडचण आहे, असें मानण्याची संवय तूं आपणास लावून घेऊं नको; तर, तें मोठें विघ्न आहे, असें समज. दरिद्राच्या योगानें, मनुष्याच्या आंगचें परोपकार करण्याचें आणि दुर्गुण टाकण्याचें सामर्थ्य इतकें कमी होतें कीं, त्याचें वर्णन देखील करितां येत नाहीं; ह्यास्तव, होतील तितक्या चांगल्या उपायांनीं गरीबी टाळावी, हा उत्तम मार्ग होय............ह्मणून, कधीं कोणाचें कर्ज काढावयाचें नाहीं, हा नियम तूं आधीं धर. गरीब व्हावयाचें नाहीं, असा निश्चय कर. जें जवळ असेल तें हात राखून खरच. दारिद्र्य हा मनुष्याच्या सुखाचा मोठा शत्रु आहे........."

जार्ज हर्बर्त नेहमीं ह्मणत असे कीं,—"जितके कर्जबाजारी, तितके सगळे लबाड. ह्याचें तात्पर्य एवढेंच कीं, कर्जभऱ्याजवळ जें कांहीं असतें, तें सगळें त्याचें असें खरोखर नसून, तो तें आपलें आहे असें लोकांस दाखवितो.

लोकांचें देणें आपणाकडे न ठेवण्याविषयीं ड्यूक ऑफ वेलिंग्तन हा फार जपत असे. तो ग्लीक साहेबाला एकदां ह्मणाला, "लोकांचें देणें जें आहे, तें मी स्वतः देतों, दुसऱ्यावर सोंपीत नाहीं. आणि प्रत्येक माणसानें असें करावें असें माझें सांगणें आहे.........कर्ज हें मनुष्यास गुलाम करितें. मला पैशाच्या अडचणी कितीएक प्रसंगी आल्या होत्या, पण मीं कधीं कर्ज काढिलें नाहीं...."

# बुद्धिवानांची विपत्ति.

बुद्धीचें मोठेपण आणि संपत्ति ह्यांचा नेहमीं मेळ असतो, असें नाहीं. एवढेंच केवळ नव्हे, तर, मोठमोठ्या बुद्धिवान् पुरुषांस नानाप्रकारच्या विपत्ति भोगाव्या लागल्या आहेत.

साक्रेतीस, कोपर्निकस, गालिलिओ इत्यादिकांची किती दशा होती, हें सर्वांस ठाऊक आहे.

फ्लारेन्स येथील प्रख्यात कवि देंती ह्यास, त्याच्या प्रतिपक्ष्यांनीं देशाबाहेर हांकून दिलें होतें. त्याला कोणीं सांगितलें कीं, तूं आपल्या प्रतिपक्ष्यांच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास जर तयार असलास, तर तुला ते परत स्वग्रामीं येऊं देतील. त्यास त्यानें उत्तर दिलें, "नाहीं नाहीं, अशा उपायानें मी स्वदेशीं येणार नाहीं. माझ्या इच्छेप्रमाणें वर्तण्यास मोकळीक देऊन जर ते मला परत येऊं देत असले, तर मी तसें करण्यास एका पायावर उभा आहें."

बुद्धिवानांची विपत्ति जगाच्या कल्याणास कारणभूत होते. कितीएक विचारी ग्रंथकारांनीं असें ह्मटलें आहे कीं, साक्रेतिसाची बायको जर कजाग नसती, तर तो तत्त्वज्ञानी आणि जनहितकर्ता झाला नसता. दाक्तर दार्विन ह्या नांवाच्या एका नामांकित ग्रंथकारानें आपल्या स्वतःच्या विपत्तीविषयीं असें लिहिलें आहे—"जर मी व्यंग आणि विपत्तींत नसतों, तर इतकें काम माझे हातून कधींही झालें नसतें."

राज्यकारणांवरून कितीएक बुद्धिवान् पुरुष कारागृहांत पडले होते. तेथें त्यांनीं उत्तमोत्तम ग्रंथ लिहून जगावर उपकार केले. दानियल दीफो ह्यानें राबिन्सन क्रूसो ह्याची कथा कारागृहांतच लिहिली.

एद्मंद् बर्क ह्यानें एके ठिकाणीं विपत्तीविषयीं असें लिहिलें आहे—"जो प्रभु आह्मांस आह्मां स्वतःपेक्षां अधिक जाणतो, आणि जो आमचें खरें हित कोणतें तें आह्मांपेक्षां अधिक चांगल्या रीतीनें समजतो, त्यानें, आमच्या हितासाठींच, विपत्काल हा उत्तम उपदेशक आह्मांस दिला आहे.... जो आह्मांशीं झगडतो, तो आह्मांस अधिक बळकट करितो. ह्मणजे, आमचा शत्रु आमचा हितकर्ता होतो."

## पुत्रास पित्याचा बोध.

"एकादा ग्रंथ चांगला समजण्यास ज्याप्रमाणें त्याजकडे फार लक्ष द्यावें लागतें, आणि दृढ निश्चयानें त्याचा अभ्यास करावा लागतो, त्याप्रमाणेंच जनाची चांगली माहिती करून घेण्याविषयीं समजावें. आणखी शिवाय ह्या कामास चातुर्य लागतें तें वेगळेंच. आज कितीएक वृद्ध मनुष्य माझ्या ओळखीचे आहेत; त्यांचें बहुतेक आयुष्य जरी ह्या अवाढव्य जगांत गेलें आहे, तरी, पंधरा वर्षांचे असतां त्यांस जें ज्ञान होतें, त्यापेक्षां आतां काडीभर देखील अधिक नाहीं. ह्याचें कारण एवढेंच कीं, त्यांनीं आपला सर्व काल हलकटपणांत आणि शुद्ध आंधळेपणांत घालविला."

"तूं लोकांच्या बाह्यस्वरूपाकडे पाहा, आणि त्यांच्या अंतःकरणांकडेही लक्ष दे. मनोभाव जे आहेत, ते, जन्मतः सर्व माणसांस बहुतकरून एकसारखे असतात. पण, त्यांमध्यें, प्रत्येक माणसाच्या अंतःकरणांत कोणत्या तरी एका मनोभावाचें प्राबल्य इतर मनोभावांपेक्षां अधिक असतें. ते इतर मनोभाव त्या प्रबल मनोभावाच्या तंत्रानें वर्ततात."

"कोणत्या माणसांत कोणता मनोभाव प्रबल आहे, हें तूं विचारानें शोधून काढ, आणि त्याची व्याप्ति कशी काय आहे ती नीट लक्षांत आण. हा प्रबल मनोभाव तुला सांपडला, म्हणजे, त्या मनोभावाच्या संबंधानें त्या मनुष्याचा तूं कधीं विश्वास धरूं नको. तुझी इच्छा असल्यास, त्या मनोभावास संतुष्ट करून तूं त्या माणसांशीं वाग. पण, त्यानें तुला जरी कितीही वचनें दिलीं, तरी, त्या मनोभावाच्या संबंधानें तूं त्यांशीं फार सावधगिरीनें राहा. भुलूं नको."

"मंडळी कितीही हलकट असो; पण जोंपर्यंत तूं तिजमध्यें असशील, तोंपर्यंत, तूं तिला हलकट समजतोस, असें कोणत्याही प्रकारें दर्शवूं नको. तितक्या वेळापुरता क्षणभर त्यांच्यासारखा हो; त्यांचा तिरस्कार करूं नको."

"तूं आपल्या वेळाचा उपयोग चांगला करीत असशीलच. प्रत्येक क्षणापासून तूं कांहीं तरी आपलें हित साधून घेत असशील, असें मी समजतों. हें फार थोड्या लोकांस साधतें....वेळ व्यर्थ घालविणें हा अपराध फार मोठा आहे, असें मी समजतों; आणि ह्याबद्दल माझ्यानें कोणालाही क्षमा करवणार नाहीं. कां कीं, आयुष्य हें फार मोलाचें आहे; आणि तें एकदां हातचें गेलें, म्हणजे पुनः हातीं लागावयाचें नाहीं."

---

## तुकारामाचे अभंग.

किति सांगूं तरी नाइकती बटकीचे, पुढें शिंदळीचे रडतील. १.
नका नका करूं रांडेची संगती, नेउनि अधोगतीं घालिल यम. २.
तुका म्हणे जरी देवीं नाहीं चाड, म्हणूनि थोबाड फोडिल यम. ३.

पापाची वासना नको दाऊं डोळां, त्याहुनी आंधळा बराच मी. १.
निंदेचें श्रवण नको माझे कानीं, बधिर करुनी ठेवीं देवा. २.
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा, त्याजहुनी मुका बराच मी. ३.
नको मज कधीं परस्त्रीसंगती, जनांतुनी माती उठतां भली. ४.
तुका ह्मणे मज अवघ्यांचा कंटाळा, तूं एक गोपाळा आवडशी. ५.

झाली गाढवी दुभाळ, महिमा गाईची पावेल. १.
श्वान जालेंसें चांगलें, तरि का सांगा तें जेवील. २.
झाली शिंदळ चांगली, तरि का पतिव्रता झाली. ३.
तुका ह्मणे ऐशा जाती, काय उंचपण पावती. ४.

पक्षीयाचे घरीं नाहीं सामुगरी, त्याची चिंता करी, नारायण. १.
अजगर जनावर वारुळांत राहे, त्याचेकडे पाहे पांडुरंग. २.
चातक हा पक्षी नेघे भूमिजळ, त्यासाठीं घननीळ नित्य वर्षे. ३.
तुका ह्मणे आह्मी पिप्पिलिकांची जात, पुरवीं मनोरथ पांडुरंगा. ४.

---

## गुह्यगोष्ट न सांगणें.

गुह्य गोष्टी सर्व प्रकारच्या व्यवहारांत असतात. त्यांत राज्यप्रकरणांत फार; त्यांविषयीं कारभाऱ्यांस आणि प्रधानमंडळीस फार जपावें लागतें. कारण, त्या कळवून घेण्यासाठीं लोक सहस्रावधि रुपये खरचिण्यास तयार असतात.

इ० स० १८०३ ह्या वर्षी असईची लढाई शिंदा आणि इंग्लिश ह्यांच्यामध्यें झाली, ती प्रसिद्ध आहे. ती झाल्यानंतर, सर आर्थर वेलेस्ली हा मराठ्यांशीं तह करण्याच्या कामांत गुंतला असतां, निजामाचा मुख्य प्रधान एके दिवशीं प्रातःकाळीं त्याकडे आला, आणि, त्या तहावरून, त्याच्या धन्यास ह्मणजे निजामास कोणकोणते प्रांत आणि कोणकोणत्या दुसऱ्या गोष्टी मिळण्याचें घाटत होतें, तें त्यास गुप्तपणें विचारूं लागला; आणि त्याबद्दल त्याला तो दाहा लक्ष

रुपये देण्यास तयार झाला. त्याजकडे कांहीं वेळपर्यंत शांत मुद्रेनें पाहून आर्थर वेलेस्ली ह्मणाला, "तुह्मांलाही गुह्य गोष्ट गुप्त ठेवितां येत असेल." त्यानें उत्तर दिलें, "होय, मला येते." त्यावर सर आर्थर वेलेस्ली ह्मणाला, बरें; "तशी मलाही येते." असें बोलून, आणखी एकही शब्द तोंडावाहेर न काढितां, किंचित् हंसून, त्यानें त्याला निरोप दिला.

---

## तुकारामाचे अभंग.

परिमळ ह्मणून चोळूं नये फूल, खाऊं नये मूल आवडतें. १.
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद, यंत्र भेदुनि नाद पाहूं नये. २.
कर्मफल ह्मणुनि इच्छूं नये काम, तुका ह्मणे वर्म दावूं लोकां. ३.
कानडीनें केला ह्मराटा भ्रतार, एकाचें उत्तर एका नये. १.
तिनें पाचारिलें इल वा ह्मणून, येरू पळे आण जाली आतां. २.
तैसें मज नको करूं कमळापती, देई या संगति सज्जनाची. ३.
तुका ह्मणे येरयेरां जें विच्छिन्न, तेथें वाढे सीण सुखापोटीं. ४.
दुर्जनाची गंधी विष्टेचिये परी, देखूनियां दूरी व्हावें तयां. १.
आइका हो तुह्मी मात हे सज्जन, करूं संघट्टन नये बोलों. २.
दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ, वाणी रजस्वला स्रवे तैशी. ३.
दुर्जनाचें भय धरावें त्यापरी, पिसाळले वरी धांवे श्वान. ४.
दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग, वोलिलासे त्याग देशाचा त्या. ५.
तुका ह्मणे किती सांगावें पृथक, अंग कुंभीपाक दुर्जनाचें. ६.
दया तिचें नांव भूतांचें पालन, आणिक निर्दाळण कंटकांचें. १.
पाप त्याचें नांव न विचारितां नीत भलतेंचि उन्मत्त करी सदा २.
तुका ह्मणे धर्म रक्षावयासाठीं, देवासही आटी जन्म घेणें. ३.
नलगे चंदनाचा सांगावा परिमळ, वनस्पति मेळ हाकारूनि. १.
अंतरींचें धांवे स्वभावें वाहेरी, धरीतांही परी आंवरेना. २.
सूर्य नाहीं जागें करीत या जना, प्रकाश किरणा कर ह्मणून. ३.
तुका ह्मणे मेघ नाचवी मयूरें, लपवितां खरें येत नाहीं. ४.

---

# पुत्रास पित्याचा बोध.

"सद्गुण ह्मणजे काय हें तुला ठाऊक आहे; तुझी इच्छा असली ह्मणजे ते तुला संपादितां येतील. तसे ते कोणत्याही माणसाला संपादितां येतील. असें असून ते जो संपादित नाहीं, तो खरोखर हतभाग्य होय."

"उद्योग क्रमाक्रमानें करावे. एका माणसास दोन उद्योग एकदम करितां यावयाचे नाहींत. जेवितेवेळीं सिद्धांताचा विचार जर कोणी करूं लागला, तर तो पंक्तींत वेडगळासारखा दिसेल. त्याप्रमाणेंच गणित करितेवेळीं जर कोणी सतारीचे ठोके तालावर धरील, तर त्याचें उदाहरण कधींही सुटावयाचें नाहीं. क्रमाक्रमानें उद्योग केला, तर सर्व कामें यथास्थित एका दिवसांत करितां येतील. पण, एकदम, दोन दोन उद्योग करूं लागल्यास, सगळ्या वर्षांत एक देखील काम पुरतें होणार नाहीं."

"तरुणानें तरुणास बोध करावा, हें आंधळ्यानें आंधळ्यास वाट दाखवावी ह्यासारखें आहे. ह्मणजे, ते दोघे एकदम फसावयाचे. जो ज्या रस्त्यानें गेलेला आहे, तो त्या रस्त्यांत वाटाड्या असावा. तसा, जगाच्या राहाटींत मी तुझा वाटाड्या होतों. बहुतकरून मी सर्व मार्गांनीं गेलों आहें; ह्मणून त्यांतला उत्तम कोणता हें मी तुला तेव्हांच दाखवीन. मी वाईट मार्गानें कां गेलों असें तूं मला विचारशील, तर त्याचें उत्तर एवढेंच कीं, मला चांगला मार्ग दाखवायास कोणी नव्हतें. सन्मार्गाविषयीं मला उपदेश करण्याची इच्छा माझे बापास नव्हती, आणि सामर्थ्यही नव्हतें; तसें तुझें नाहीं, असें मला वाटतें."

"ज्ञान ही वृद्धापकाळीं फार उत्तम आणि सुखाची आश्रयाची जागा आहे. ही जर आपण तरुण आहों तोंच बांधिली, तर म्हातारपण सुखाचें जाईल; पण ती बांधण्याला जर आळस केला, तर उतारवयांत फार हाल होतील."

---

## तुकारामाचे अभंग.

चंदनाचे हात पायही चंदन, परिसा नाहीं हीन अंग कोणी. १.
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार, सर्वांगें साकर अवघी गोड. २.
तुका म्हणे तैसा सज्जनापासून, पाहातां अवगुण मिळेचिना. ३.
साधूनी वचनाग खाती तोळा तोळा, आणिकांतें डोळां न पहावे. १.
साधूनी भुजंग धरितील हातीं, आणिकें कांपती देखोनियां. २.
असाध्य तें साध्य करितां सायास, कारण अभ्यास तुका म्हणे. ३.

एक तटस्थ मानसीं, एक सहजचि आळसी. १.
दोन्ही दिसती सारिखीं, वर्म जाणे तो पारखी. २.
एक ध्यानीं करिती जप, एक बैसुनि घेती झोंप. ३.
एकां सर्वस्वाचा त्याग, एकां पोटासाठीं जोग. ४.
एकां भक्ति पोटासाठीं, एकां देवासवें गांठी. ५.
वर्म पोटीं एका, फळें दोन म्हणे तुका. ६.
वैद्य वांचविती जिवा, तरी कोण ध्यातें देवा. १.
काय जाणो कैसी परी, प्रारब्ध तें ठेवी उरी. २.
नवसें कन्या पुत्र होती, तरि कां करणें लागे पती. ३.
जाणे हा विचार, स्वामी तुकयाचा दातार. ४.

अन्नाच्या परिमळें जरी जाय भूक, तरी कां हे पाक घरोघरीं. १.
आपुलालें तुम्ही करारे स्वहित, वाचे स्मरा नित्य रामनाम. २.
देखोनि जीवन जरी जाय तान, तरी कां सांठवण घरोघरीं. ३.
देखोनियां छाया सुख न पाविजे, जंव न बैसीजे तया तळीं. ४.
तुका म्हणे होसी भावेंची तूं मुक्त, काय करिसि युक्त जाणिवेचि. ५.

---

# सुखाचे दिवस थोडे.

बगदाद शहर आशिआ खंडातील तुर्कस्थानांत आहे.. तेथें कोणी एक अवदलरहिमान ह्या नांवाचा एक राजा राज्य करीत होता. त्याजपाशीं संपत्ति अपरिमित होती. त्याच्या कचेरीचा दिवाणखाना रुपें, सोनें, मोत्यें, आणि जवाहीर ह्यांनीं मढविला होता. त्यानें आपल्या एका राणीकरितां एक उत्तम बंगला बांधविला. त्यास अडीच कोटि रुपये खर्च लागून त्याचें काम एकसारखें पंचवीस वर्षें चाललें होतें. त्याच्या दरबारांत नुसते चोपदार सातशें होते.

ह्या पुरुषाचें सगळें आयुष्य उत्तम सुखांत गेलें असेल, असें सहज मनांत येतें; परंतु तें खोटें आहे. त्यानें स्वतः मरण्याच्या आधीं, एक टिपण लिहून ठेविलें होतें; तें त्याच्या बिछान्याखालीं सांपडलें. त्याचें तात्पर्य असें आहे–"आज मी राज्य करूं लागल्यास पन्नासांहून अधिक वर्षें झालीं. माझ्या राज्यांत कधीं दंगाधोपा झाला नाहीं; आणि शत्रूंशीं लढून मीं जयही पुष्कळ मिळविले. माझे ठायीं माझ्या प्रजेची पूर्ण भक्ति आहे; माझे शत्रु मला थरथरां कांपत आहेत, आणि माझे मित्र मला साह्य करण्यास एका पायावर उभे आहेत; ही स्थिति आजची नाहीं; तर मी राज्य करूं लागल्या दिवसापासून एकसारखी चालत आली आहे. संपत्ति, सन्मान, सामर्थ्य आणि सुखदायक वस्तु, हीं सगळीं पहिल्यापासून माझ्या अर्ध्या वचनांत आहेत. ह्या स्थितींत जो माझा इतका काल गेला, त्यांतले, दुःखचिंतामिश्रित नाहींत, असे निवळ सुखाचे दिवस मीं बुद्ध्या टिपून ठेविले आहेत. ते मोजून पाहतां सगळे चवदा भरतात! मनुष्या,

बाबा, इहलोकच्या सुखदायक वस्तूंपासून निवळ सुख मिळविण्याची आशा धरूं नको!"

अबदल रहिमान ह्याचें ह्मणणें खरें आहे. तें मनुष्यांनीं नेहमीं लक्षांत ठेवावें. ज्या पुरुषाचें वैभव एवढें होतें, त्याला पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत शुद्ध सुखाचे असे सगळे जर चवदाच दिवस प्राप्त झाले होते, तर, असे दिवस पुष्कळ प्राप्त होण्याविषयीं साधारण प्रतीच्या मनुष्यांनीं आशा कशास करावी? तरी, समाधानांत सुख आहे, ह्याविषयीं एक गोष्ट मागें लिहिली आहे. तें सुख विचारी पुरुषांस कांहीं कालपर्यंत तरी प्राप्त होण्यासारखें आहे.

---

## सज्जनपणाचें मुख्य लक्षण.

सज्जनपणाचीं लक्षणें पुष्कळ आहेत. त्यांत, आपणाबद्दल दुसऱ्यास तिळमात्रही दुःख न होऊं देण्याविषयीं जपणें, हें एक मुख्य आहे.

ग्रीस देशांत अथेन्स ह्मणून एक शहर आहे. तेथें प्राचीन काळीं एक बलाढ्य संस्थान होतें. त्या वेळीं पेरीक्लीज ह्या नांवाचा एक मोठा शाहाणा आणि फार थोर कारभारी होऊन गेला. त्यानें चाळीस वर्षें राज्यकारभार फार उत्तमरीतीनें चालविला. तो इ० स० पूर्वी ४२९ वे वर्षी पटकीच्या उपद्रवानें मरण पावला. तो प्राण सोडितेवेळीं ह्मणाला, "अथेन्स संस्थानांतल्या कोणत्याही मनुष्याला माझ्यानिमित्त कधीं मरणदुःख करावें लागलें नाहीं, हेंच माझें मोठें भूषण आहे, असें मी समजतों."

मिसर देशाच्या वायव्येस अबौकर ह्मणून एक ठिकाण आहे. तेथें इ० स० १८०१ ह्या वर्षी इंग्लिश आणि फ्रेंच ह्यांची एक बरीच मोठी लढाई झाली. तींत इंग्लिश सैन्याचा मुख्य सरदार सर राल्फ अबरक्रांबी हा होता. त्यानें फ्रेंचांचा पराभव केला. परंतु, लढाईच्या गर्दींत त्याला एक गोळी लागली, आणि तिच्यायोगानें तो फार व्याकुळ झाला. तेव्हां त्याला तेथून उचलून डोळींत घालून गलबतावर नेलें. तेथें त्याला निजविलें त्या वेळीं त्याला उशाला एक बनात दिली. तिच्यायोगानें त्याला अंमळ बरें वाटलें. किंचित् सावध झाल्यावर, त्यानें बनातीस हात लावून, "हें काय आहे?" असें विचारलें. त्यास जवळच्या माणसांनीं उत्तर दिलें, "ती आपल्याच एका शिपायाची बनात आहे." त्यावर अबरक्रांबी, किंचित् डोकें उचलून ह्मणाला, "पण तो कोणता शिपाई?" त्यावर जवळच्या माणसांनीं उत्तर दिलें, "आपला दंकनराय हा, ह्याची आहे ही. त्याविषयीं आपण काळजी करूं नये." त्यावर तो सरदार बोलला, "बरें, पण ही त्याची त्याला आज रात्रीं परत द्या बरें, विसरूं नका; नाहीं तर त्याचे हाल होतील."

पेरीक्लीज आणि अबरक्रांबी ह्यांचीं भाषणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. आपणानिमित्त विनाकारण कोणास इजा होऊं नये. असें जर मनुष्यांनीं मनांत वागवून आचरण केलें, तर ह्या जगांतलें पुष्कळ दुःख कमी होईल.

---

## आईची ममता.

मनुष्यास आईसारखें दुसरें दैवत नाहीं, असें ह्मणतात

तें खरें आहे. मुलाचे अपराध सांठविण्यास आईच्या मनाएवढें मोठें भांडें दुसरें कोठें सांपडावयाचें नाहीं. मुलाचा पर्वताएवढा अपराध आईस मोहरीपेक्षां लहान वाटतो; आणि मोहरीएवढा गुण पर्वतापेक्षां मोठा दिसतो. त्याला कांटा लागला ह्मणजे हिच्या डोळ्यांस पाणी येतें; आणि त्याला सुख झालें ह्मणजे हिचा हर्ष त्रैलोक्यांत मावेनासा होतो. ह्याविषयींचीं उदाहरणें वारंवार दृष्टीस पडतात.

मुलाच्या सुखाकरितां आई केवढेंही मोठें संकट असलें तरी तें सोसण्यास संतोषानें सिद्ध होते. क्लादियस द्युसस ह्या नांवाचा एक रोमन बादशाहा होऊन गेला. त्याच्या राणीचें नांव आग्रिपिना असें होतें. क्लादियस ह्यास नीरो ह्या नांवाचा मुलगा होता. त्यास राज्यपद प्राप्त व्हावें अशी आग्रिपिना हिची फार इच्छा होती. ती त्याविषयीं नवससायास करीत असे. त्या वेळीं खालदी लोक ज्योतिषामध्यें फार निपुण होते. त्यांच्यांतले कांहीं जोशी एकदा रोमशहरीं आले. त्यांस, नीरोस सिंहासन प्राप्त होईल किंवा नाहीं, असें त्या राणीनें विचारिलें. त्या जोशांनीं गणित करून पाहून साफ सांगितलें कीं, "नीरो बादशाहा होईल, पण तो तुह्मांला ठार मारील." तें ऐकून आग्रिपिना हिला तिळभरदेखील वाईट वाटलें नाहीं. एवढेंच केवळ नव्हे; तर ती आणखी ह्मणाली, "मारूंद्या परती मला ठार; पण त्याला बादशाहा होऊंद्या."

भविष्यें सांगणारांवर विश्वास ठेवूं नये, हें खरें आहे. परंतु नीरोबादशाहाच्या गोष्टींत फुलावोलास गांठ पडली. ह्मणजे, त्या जोशांनीं भविष्य केल्याप्रमाणें त्यानें आग्रिपिना

हीस ठार मारिलें. हें त्यानें फार वाईट काम केलें. तरी, मुलाच्या सुखाविषयीं मातुश्रीचें अंतःकरण कसें असतें, तें ह्या गोष्टीवरून स्पष्ट दिसून येतें.

---

## लहान चुकीनें मोठी हानि.

चुकीपासून हानि व्हावयाची, हें खचीत आहे. परंतु लहान चुकीनें लहानच हानि होते, मोठी होत नाहीं, असें समजूं नये, शस्त्रक्रिया करितांना वैद्याचा हात जरा चळला, किंवा, औषधांचें मिश्रण करितांना एका कुपीवरून दुसऱ्या कुपीवर गेला, तर लागलीच प्राणाशीं गांठ पडते. ह्याकरितां, कोणतीही चुकी क्षुल्लक न समजतां, मनुष्यानें आपलीं सर्व लहानमोठीं कामें सांगितलेल्या रीतीनें जपून करावीं.

बेलजम देशामध्यें वातर्लू ह्या नांवाचें एक ठिकाण आहे. तेथें इ० स० १८१९ ह्या वर्षी फ्रान्स देशाचा बादशाहा नेपोलियन बोनापार्त आणि इंग्लिश सरदार ड्यूक ऑफ् वेलिंग्तन ह्यांची मोठी लढाई झाली. तेव्हां दोन्ही पक्षांकडे सैन्यें पुष्कळ होतीं, आणि तीं एकमेकांचा पराभव करण्यास मोठ्या आवेशानें सिद्ध झालीं होतीं. ड्यूक ऑफ् वेलिंग्तन हा मोठा धूर्त पुरुष होता. त्याला पुढें होणाऱ्या गोष्टीचें अनुमान फार चांगलें करितां येत असे. ज्या ठिकाणीं लढाई होण्याचा संभव होता, त्या ठिकाणापासून कांहीं अंतरावर एक लहानसा पूल होता; तो फ्रेंचांकडच्या बाजूस होता; आणि त्यावरून त्यांस पळून जाण्यास मार्ग सांपडावयाजोगा होता. हें पाहून, तो मार्ग त्यांस वेळेस न सांपडावा, ह्मणून

त्यानें आपल्या हाताखालच्या एका लहानशा अंमलदारास, कांहीं सैन्यासहवर्तमान, तें नाकें धरून बसण्यास पाठविलें, आणि, कांहीं झालें तरी, दुसरी सूचना जाईतोंपर्यंत तेथून न हालण्याविषयीं त्यास ताकीद दिली. नंतर कांहीं वेळानें इकडे लढाई सुरू झाली. उभयपक्षांकडच्या तोफा धडाधड सुटूं लागल्या; आणि चारी दिशा त्या आवाजांनीं दणाणून गेल्या. ते आवाज त्या अंमलदारास जेव्हां ऐकूं आले, तेव्हां त्याचें चित्त स्थिर नाहींसें झालें. तो आपल्या मनांत ह्मणाला, "इतके शूर शिपाई तिकडे मोठ्या शौर्यानें लढत असतां आपण असें उगाच येथें बसावें, हें फार लाजिरवाणें आहे." ह्मणून तो लागलाच तेथून निघून, आपल्या लोकांसहवर्तमान, समरांगणांतल्या सैन्यास येऊन मिळाला. पुढें लागलीच इंग्लिशांची सरशी होऊन फ्रेंच मागें हटले, आणि पराभव पावून, ड्यूक ऑफ् वेलिंग्तनाच्या अजमासाप्रमाणें त्या पुलावरून पळून गेले. त्या प्रसंगीं तो इंग्लिश अंमलदार जर तें नाकें धरून राहिलेला असता, तर सर्व फ्रेंच लोक इंग्लिशांच्या हातीं लागले असते.

हें वर्तमान ड्यूक ऑफ् वेलिंग्तन ह्यास कळलें, तेव्हां त्याला अतिशयित राग आला, आणि त्यानें सगळ्या सैन्यासमक्ष त्या अंमलदाराचा त्याबद्दल फार निषेध केला. तें त्याचें बोलणें त्याच्या अंतःकरणास इतकें वज्रासारखें लागलें कीं, त्याच्यायोगानें तो आजारी पडून लागलाच मरण पावला.

हा मनुष्य ड्यूक ऑफ् वेलिंग्तनाच्या आज्ञेप्रमाणें जर ती जागा धरून राहता, तर फ्रेंच लोकांस पाडाव केल्याचें यश

त्याला सहज मिळालें असतें. त्याच्या लहान चुकीनें दोन गोष्टी घडल्या. ह्मणजे फ्रेंच लोक निसटून गेले ही एक; आणि तो बिचारा लज्जित होऊन प्राणास मुकला, ही दुसरी. ही गोष्ट लक्षांत ठेवून, जो आपला अधिकारी आहे, त्याच्या आज्ञेप्रमाणें वागण्याविषयीं सर्वांनीं जपावें.

---

## स्वदेशप्रीति.

मातुश्री कितीही निर्धन आणि कितीही अडाणी असली, तरी, दुसऱ्या कोणत्याही मोठ्या धनवान् आणि चतुर स्त्रीपेक्षां ती मनुष्यास अधिक प्रिय आणि अधिक पूज्य वाटते. त्याप्रमाणेंच तो ज्या देशांत जन्मतो, आणि लहानाचा मोठा होतो, तो देश कितीही अडचणींचा आणि निकृष्ट अवस्थेचा असला, तरी तो त्यास इतर कोणत्याही देशापेक्षां अधिक आवडावा, अशी योजना परमेश्वरानें करून ठेविली आहे.

उत्तर अमेरिका आणि ऐसलंद ह्यांच्यामध्यें ग्रीनलांद ह्मणून एक देश आहे. तेथें थंडी अतिशयित असते. तेथलें बर्फ कधीं नाहींसें होत नाहीं. हिंवाळ्यांत कितीएक आठवडेपर्यंत सूर्य मुळींच उगवत नाहीं. सगळा देश विलक्षण उंच डोंगरांनीं आणि मोठमोठ्या मैदानांनीं भरला आहे. त्या पर्वतांवरून बर्फाच्या मोठमोठ्या धोंडी गडवडां लोळत जाऊन आत्लांतिक महासागरांत पडतात. हें त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या गलवतांस भयंकर विघ्न आहे.

ग्रीनलांद देशांत धान्यें आणि फळें मुळींच होत नाहींत; आणि लहान खुरट्या झुडपांशिवाय झाड असें मुळींच

[library stamp]

दृष्टीस पडत नाहीं. तरी तेथें प्राणी पुष्कळ आहेत. तेथले लोक कुत्रे पाळितात; त्यांस ते गाड्या ओढण्यास शिकवितात. ते आपला निर्वाह समुद्रांतील प्राण्यांवर आणि पशुपक्ष्यांवर करितात. ते अगदीं ठेंगणें, काळे आणि नकटे आहेत.

लोकांस घरें बांधण्यास लांकडें नाहींत; आणि दगड पुष्कळ आहेत, परंतु, त्यांस त्यांचीं घरें बांधितां येत नाहींत; तर मग ते आपलीं घरें कशाचीं करितात? ह्याचें उत्तर सांगितलें तर तें प्रथम कोणाला खरेंदेखील वाटावयाचें नाहीं. ज्या बर्फास आपणाच्यानें हात देखील लाववत नाहीं, अशा वर्फाचीं ते आपलीं घरें करितात, आणि त्यांत राहातात! त्यांस पांघरायास रेनदियरांचीं कातडीं घ्यावीं लागतात, कांकीं त्यांस वस्त्रें मिळत नाहींत. अशी त्या देशाची स्थिति आहे. तरी, तो तेथील लोकांस फार आवडतो, आणि त्यामध्यें ते आपला काळ आनंदानें घालवितात. त्यांस कोणी इंग्लंदासारख्या सुधारलेल्या देशांत जाऊन राहावयास सांगितलें तर त्यांस तें आवडत नाहीं, आणि ते ह्मणतात, "अहो, कशीही झाली तरी ही आमची जन्मभूमि आहे. ही जितकी आह्मांस प्रिय आहे तितका दुसरा कोणताही देश प्रिय व्हावयाचा नाहीं!"

---

## अंतकाळीं देखील थोर.

संतति, संपत्ति, आणि शरीरप्रकृति यथास्थित असतां थोरपणाचीं कृत्यें करणें ह्यांत कांहीं विशेष नाहीं. परंतु, आपण स्वतः अत्यंत संकटांत असतां थोरपणाचें आचरण

करणें हें मनुष्यास फार शोभतें, आणि लोकांत त्याची फार प्रशंसा होते.

इ० स० १८०५ ह्या वर्षी त्राफलगार येथें फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांच्या आरमारांची एक मोठी लढाई झाली. त्या प्रसंगीं इंग्लिश आरमाराचा मुख्य सरदार नेल्सन हा होता. तो आपल्या देशाचा एकनिष्ठ भक्त होता. तो आपल्या जीवाकडे न पाहतां शत्रूंशीं लढत असतां, एक मोठी गोळी जी सूं सूं सूं करीत आली, ती एकाएकीं त्याच्या डाव्या खांद्यांत घुसली, आणि तिच्या योगानें तो व्याकुळ होऊन धाडकर खालीं पडला. त्या वेळीं त्याला वेदना अतिशयित होत होत्या; तरी त्याचें सगळें लक्ष लढाईच्या परिणामाकडे होतें. तो मुख्य अधिकारी होता, ह्मणून आरमारांतला मुख्य वैद्य त्याच्याजवळ अगदीं बसून राहिला होता. परंतु, आपण आतां खचीत जगत नाहीं असें जाणून त्यास नेल्सन ह्मणाला, "वैद्यबुआ, येथें बसून तुमचा मला कांहीं उपयोग नाहीं. आतां माझी जगण्याची आशा नाहीं. ह्मणून तुह्मी, जे जखमी लोक बरे होण्यासारखे असतील, त्यांजकडे जा, आणि त्यांस औषधपाणी करा." त्याप्रमाणें तो वैद्य तिकडे गेला, आणि पुढें थोडक्या वेळानें तो थोर पुरुष शांतपणानें मरण पावला.

अगदीं प्राण जातेवेळीं त्याचें लक्ष परलोकाकडे आणि आपल्या स्थितीकडे गेलें. आणि त्याविषयीं तो थोडा विचार करून जवळच्या आपल्या धर्मोपदेशकास ह्मणाला, "महाराज, मी कांहीं महान् पातकी नाहीं बरें!"

अंतकाळीं देखील असे थोर विचार सुचणें, हें थोरपणाचें खरें लक्षण आहे.



---

# वैभवाची अशाश्वति.

ह्या लोकिं सुख कायतें संपत्तींत आहे, असा साधारण समज आहे; ह्मणून ती मिळविण्यास पुष्कळ लोक नानाप्रकारचे प्रयत्न करितात, आणि ती ज्या माणसांस विपुल प्राप्त होते, त्यांस फार सुखी आणि भाग्यवान् मानितात. परंतु, ही मोठी चूक आहे. संपत्तींत सुख नाहीं, हें मागें एका गोष्टींत दाखविलें आहे; आणि संपत्ति अशाश्वत आहे हें आतां सांगावयाचें आहे. हिंदुस्थानांतले मोठमोठे राजेरजवाडे अन्नास महाग झाले होते, ह्यांचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ आढळतात. तें असो. अर्वाचीन इतिहासामध्यें फार मोठा पराक्रमी जो नेपोलियन बोनापार्त ह्मणून एक पुरुष गाजत आहे, त्याची आई लेतिशिआ हिची गोष्ट फार चमत्कारिक आहे.

लेतिशिआ ही चार्लस बोनापार्त ह्या नांवाच्या एका साधारण शिपायाची बायको होती. ती कोर्सिका बेटांत राहत असे. त्या बेटाची स्वतंत्रता स्थापण्याकरितां ज्या लढाया झाल्या, त्यांमध्यें ती आपल्या नवऱ्याबरोबर, घोड्यावर बसून भरसमरांगणांत जात असे. तेव्हां ती नेपोलियनाच्या वेळेस गरोदर होती. इतकी तिची गरीबी होती.

पुढें नेपोलियन स्वपराक्रमानें फ्रान्स देशाचा बादशाहा झाला. त्याला आणखी चार भाऊ होते; जोसेफ, ल्युसेन, लुई, आणि जीरोम. ह्यांपैकीं जोसेफास त्यानें स्पेनदेशाचा राजा केलें, ल्युसेन ह्यास युवराज केलें, लुई ह्यास हालंदाचा राजा केलें, आणि जीरोम ह्यास वेस्तफालिआचा राजा केलें. ह्याप्रमाणें एक मुलगा एका मोठ्या देशाचा

बादशाहा, आणि चार मुलगे चार देशांचे राजे, एवढें ऐश्वर्य लेतिशिआ हिला प्राप्त झालें. असें ऐश्वर्य प्राचीन किंवा अर्वाचीन इतिहासांत दुसऱ्या कोणत्याही स्त्रीस प्राप्त झालेलें आढळत नाहीं. पण हें फार दिवस टिकलें नाहीं. युरोपांतल्या इतर राष्ट्रांनीं एकत्र होऊन नेपोलियनाचा पराभव केला, आणि त्यास सेंत हेलिना बेटांत कैद करून ठेविलें. तेव्हांपासून त्याची आणि त्याच्या कुटुंबाच्या माणसांची अगदीं वाताहत झाली. नेपोलियन आजारी असल्याचें वर्तमान लेतिशिआ हीस कळलें. तेव्हां तिनें, इ० स० १८१८ ह्या वर्षी, एक्सलाचापेल येथें जमलेल्या युरोपांतल्या राजांस, एक विनंतीपत्र लिहिलें. त्यांत असें होतें.—"महाराज, मी नेपोलियन बोनापार्ताची आई आहें. त्याचा जीव मला माझ्या जीवापेक्षां अधिक प्रिय वाटत आहे. परमेश्वर अत्यंत थोर आणि अत्यंत दयाळू आहे; आणि आपण सगळे त्याच्या अंशाच्या मूर्ति आहांत. मी आपणांस हात जोडून पदर पसरून मागतें कीं, कृपा करून माझ्या मुलाचा बंद खुला करा, आणि त्याला विपत्तींतून काढा. महाराज, आपण परमेश्वराचे प्रत्यक्ष प्रतिनिधि आहांत; ही माझी अनाथाची विनंती मान्य करा. ह्मणजे, आपल्या उदारपणाची कीर्ति जगांत निरंतर गाजत राहील; आणि ती आपणांस अत्यंत भूषणप्रद होईल."

आरंभीं एका साधारण शिपायाची बायको; मग एक प्रबळ बादशाहा आणि चार राजे ह्यांची मातुश्री; आणि शेवटीं, आपल्या पराक्रमी पुत्राच्या दुःखाच्या निवारणार्थ, दीन होऊन, हात जोडून पदर पसरून अर्ज करणारी,

अशी लेतिशिआ हिची स्थिति झाली. ह्मणून वैभव कधीं-ही शाश्वत मानूं नये.

---

## प्रामाणिकपणा.

प्रामाणिकपणा हा फार चांगला सद्गुण आहे. तो संपादण्यास फारसा अभ्यास करावा लागत नाहीं. आणि तो अंगीं वसत असला, ह्मणजे मोठ्या संकटांतही मनुष्यास साह्य मिळतें. आणि कधीं कधीं पुष्कळ माणसांचें हित होतें. ह्याचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ आहेत. तीं वाचिलीं ह्मणजे ह्याविषयीं चांगली खातरी होते. आह्मीं ह्या ठिकाणीं त्यांतलें एक मोठें उदाहरण सांगतों.

फ्रेंच सैन्याचा पराभव करून ड्यूक ऑफ् वेलिंग्टन फ्रान्स देशामध्यें गेला. तेव्हां तेथें सगळी पळापळ चालली होती. कोणाचा जोडा कोणाच्या पायांत नव्हता. तरी, चमत्कार असा झाला कीं, फ्रेंच शेतकरी लोक आणि सावकार लोक आपापली सगळी जिंदगी आपणांबरोबर घेऊन, आपल्या स्वजातीय, ह्मणजे फ्रेंच, सैन्याच्या आश्रयास न जातां इंग्लिशांच्या ह्मणजे ड्यूक ऑफ् वेलिंग्टनाच्या आश्रयास येऊन राहिले. ह्यांतलें बीज एवढेंच होतें कीं, आपले सगळे लोक बेइमान आणि लुटारू आहेत, आणि ड्यूक ऑफ् वेलिंग्टन आणि त्याच्या हाताखालचे लोक हे प्रामाणिक आणि दुसऱ्याच्या वस्तूस विनाकारण धक्का न लावणारे आहेत, अशी त्यांची पूर्ण खातरी झाली होती.

ड्यूक ऑफ् वेलिंग्टन हा त्या वेळीं ह्मटला ह्मणजे परदेशांत होता; आणि त्याच्या जवळचा पैसा अगदीं सरला होता.

तरी, परदेशांतले सावकार लोक त्याला पाहिजे तितका पैसा उसना देत असत. कारण, आपल्या रकमा सव्याज परत येतील, अशी त्यांस पक्की खातरी होती. ह्या सावकारांस "नाहीं" ह्मणून जर तो धुडकावून लाविता, तर त्याचें कोणाच्यानें कांहीं एक झालें नसतें, हें खचीत होतें. तरी, त्या वेळीं इंग्लंदच्या प्रधानमंडळीस त्यानें असें लिहिलें कीं, "आह्मांस येथें कर्ज अतिशयित झालें आहे. तें इतकें कीं सावकार लोक मला माझ्या तंबूबाहेर तोंड काढूं देत नाहींत. ह्याकरितां पैसा लवकर पाठविण्याची मेहेरबानी करावी." त्याप्रमाणें इंग्लंदाहून पैसा आला, आणि ती अडचणीची वेळ निघून गेली. प्रसंग चांगला असो किंवा वाईट असो, तो निघून जातो. परंतु त्या प्रसंगीं मनुष्यें जें आचरण करितात, त्यांचा बरावाईट लौकिक मागें बहुत दिवस राहातो.

---

## शूरत्व आणि दयालुत्व.

लढाई करणें हें शूराचें काम आहे. त्यामुळें लढाईच्या वेळीं त्याचे हातून शत्रूकडचे हजारों लोक मरतात. पण एवढ्यावरून त्यास निर्दय ह्मणणें हें योग्य नाहीं; कारण, तो बुद्ध्या दुष्ट बुद्धीनें कोणास मारीत नाहीं; तर त्याचें कर्तव्यकर्म करितांना त्याचे हातून माणसें मारलीं जातात, त्यास त्याचा उपाय नसतो. शूर पुरुषांच्या अंतःकरणांत दयाही पुष्कळ असते.

जनरल बेर्द ह्या नांवाच्या एका इंग्लिश सरदारास टिपू सुलतानानें आपल्या कैदेंत ठेवून अतिशयित छळिलें होतें.

त्याच शूर पुरुषानें पुढें, टिपू मेल्यावर, श्रीरंगपट्टण घेतलें. तेव्हां, टिपू सुलतानाचीं वायकामुलें गाय होऊन हंबरडा फोडतांना त्याच्या दृष्टीस पडलीं; त्या प्रसंगीं त्याला अतिशयित वाईट वाटून त्याचे डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या असें सांगतात. हें मागें सांगितलेंच आहे.

धोंड्या वाघ ह्मणून एक मोठा त्रासदायक बंडवाला पूर्वी हिंदुस्थानांत होऊन गेला. त्याचें बंड मोडण्यास सर आर्थर वेलस्ली ह्यास पराकाष्ठेचे श्रम करावे लागले. तो ह्या इंग्लिश सरदारास ठार मारण्यास टपला होता, हें सर आर्थर वेलस्ली ह्यास माहीत होतें; तरी, तो मारला गेल्यावर त्याच्या मुलांच्या पालनपोषणाकरितां त्यानें आपल्या पदरचा पुष्कळ पैसा दिला.

बेसैरी ह्मणून एक मोठा पराक्रमी सरदार नेपोलियन बोनापार्ताच्या हाताखालीं होता. तो मारेंगो येथील प्रसिद्ध लढाईंत, आपल्या विजयी सैन्यासहवर्तमान, मोठ्या आवेशानें आस्त्रियन लोकांशीं लढत असतां, एक आस्त्रियन स्वार घोड्यावरून खालीं पडला. त्याच्या जवळ फ्रेंच सैन्य येऊन ठेपलें, तेव्हां तो हात जोडून ह्मणाला, "महाराज, मला पायांखालीं तुडवून मारूं नका." ते शब्द बेसैरी ह्याच्या कानीं पडले. त्याबरोबर तो आपल्या लोकांस ह्मणाला, "माझ्या मित्रांनो, आपल्या रांगांत थोडीशी खिंड करा, आणि ह्या गरीबास जीवदान द्या." ह्याप्रमाणें त्या आस्त्रियन स्वाराचा बचाव झाला.

मास्को शहरांतील घरांस आग लागून जेव्हां मोठा भडका झाला, तेव्हां गरीब लोक, वायकामुलें बरोबर घेऊन, आ-

श्रय मिळविण्याकरितां सैरावैरा धांवूं लागले, त्या प्रसंगीं बेसैरी हा, आपल्या मंडळीसहवर्तमान, एका मोठ्या इमारतींत जेवावयास बसायाच्या बेतांत होता. तींत ते गरीब लोक भराभराभरा शिरले. त्यांजकडे पाहून बेसैरी ह्यास त्यांची फार दया आली, आणि तो आपल्याजवळच्या मंडळीस ह्मणाला, "अहो, चला आपण दुसरीकडे कोठें जाऊन जेवूं; ह्या गरीबांस येथें ह्या पात्रांवर बसून पोटभर जेवूं द्या." आणि लगेच त्याप्रमाणें त्यानें केलें.

---

## बोध कोणापासूनही घ्यावा.

चांगला बोध हा अमोलिक रत्नासारिखा आहे. हिरा कितीही वाईट जागेंत पडलेला असला, तरी त्याची किंमत कमी होत नाहीं; त्याप्रमाणें चांगला बोध हा कोणाच्याही मूखांतून निघो, त्याची योग्यता कमी होत नाहीं. ह्मणून खरे थोर जे असतात, ते चांगला बोध कोणापासूनही घेतात.

आपला मराठी प्रख्यात कवि मोरोपंत, हा कारकून असतां, एका अल्प रकमेची चूक काढण्याकरितां रात्रभर जागल्यावरून त्याची लहान मुलगी जें त्यास बोलली, त्यावरून त्याची वृत्ति फिरून तो कवितेच्या रचनेच्या मार्गानें ईश्वरभक्ति करूं लागला, ही गोष्ट बहुतकरून सर्वांस ठाऊक आहे.

इ० स० १७९४ त नेपोलियन बोनापार्तांचे सरदार मोठालीं सैन्यें बरोबर घेऊन दान्यूब नदीच्या आजूबाजूस इतर राष्ट्रांच्या सैन्यांशीं लढत होते. त्यांत मार्सो ह्मणून एक होता. त्यानें आस्त्रियन लोकांवर हल्ला केला, तेव्हां

त्याचा मोड झाला. तेणेंकरून त्याला फार वाईट वाटलें, आणि, आपलें गेलेलें नांव पुनः मिळविण्याचा प्रयत्न करण्याकरितां, तो, मुख्य सेनापति जनरल लीव्हेर ह्मणून होता त्याजपाशीं आणखी चार पलटणी साह्यास मागूं लागला. परंतु, तेव्हां तितक्या पलटणी देण्याची सवड नव्हती. तें पाहून मार्सो फार संतापून ह्मणाला, "मला पलटणी द्या, नाहीं तर मी गोळी घालून घेऊन प्राण देईन." हें त्याचें बोलणें, मुख्य सेनापतीबरोबर सूल्त ह्मणून जो एक लहानसा अंमलदार होता त्यानें ऐकिलें, आणि त्यास लागलेंच ह्मटलें, "तुह्मी असें कराल तर तुमच्या सगळ्या सैन्यास मोठें संकट प्राप्त होईल, ह्याचा विचार करा." तें ऐकून, मार्सो ह्याला अधिकच संताप झाला; कारण सूल्त ह्यानें लहान तोंडीं मोठा घांस घेतला, असें त्याला वाटलें. आणि त्यानें त्यास विचारिलें, "अरे तूं रे कोण?" सूल्त ह्यानें उत्तर दिलें, "मी कोणीही आहें. त्याचें तुह्मांला काय? पण मी शांत आहें, आणि तुह्मी शांत नाहीं, हें खरें आहे. तुह्मी आत्महत्या करून घेऊं नका. तुह्मी आपलें सैन्य घेऊन धैर्यानें शत्रूवर जा, इतक्यांत चार पलटणी, सवड झाल्याबरोबर तुह्मांस येऊन मिळतील." हें त्याचें ह्मणणें त्याच्या मनांत भरलें. आणि तो मोठ्या आवेशानें शत्रूशीं लढला. तेव्हां त्यास जय प्राप्त झाला. त्या वेळीं मार्सो ह्याला सूल्त ह्याच्या बोलण्याची किंमत समजली; आणि तो मागचें बोलणें आठवून त्यास ह्मणाला, "मित्रा, मी जें तुला बोललों, तें आतां सगळें पोटांत घाल. तें मनांत ठेवूं नको. तुजपासून मला फार चांगला बोध प्राप्त झाला

आहे; हा मी जीवांत जीव आहे तों कधींही विसरणार नाहीं. ह्या बोधाबद्दल मी तुझे उपकार मानितों."

## आचरणाचा किस्सा.

तोंडानें मोठमोठ्या गोष्टी सांगणारे पुष्कळ असतात. परंतु, आपल्या सांगण्याप्रमाणें आचरण करून दाखविणारे फार थोडे आढळतात. आणि जे असे थोडे असतात, तेच खरे थोर होत. त्यांचे हातून व्हावयाचें कृत्य लहान असो अथवा मोठें असो, ते आपलें ब्रीद सोडीत नाहींत.

सर चार्लस नेपियर हा शूर पुरुष अशा प्रकारचा होता. त्यानेंच मियानी येथें, इ० स० १८४३ त, २००० लोकांनिशीं मोठी लढाई मारून ३५००० बलुची लोकांचा पराभव केला. तो नेहमीं असें ह्मणत असे कीं, "सेनापति होऊन समरांगणीं जय मिळविणें, ह्याचें मुख्य साधन हें आहे कीं, त्यांत आपण स्वतः श्रमांचा वांटा उचलिला पाहिजे, आणि काम कसें करावें हें स्वतः अंगीं खपून दाखविलें पाहिजे." हें खरें आहे. असें केल्याशिवाय काम करण्यास दुसऱ्यांस आवेश येत नाहीं. सर चार्लस नेपियर ह्याचें वागणें असेंच आवेशाचें असे. त्याविषयीं त्याच्या जवळच्या एका अंमलदारानें एकदां असें ह्मटलें कीं, "त्या वृद्ध पुरुषास, घोड्यावर बसून, विजेप्रमाणें इकडे तिकडे फिरतांना मी जेव्हां पाहतों, तेव्हां मला स्फुरण चढल्यावांचून राहत नाहीं. तें इतकें कीं, तो जर अशा प्रसंगीं मला एकाद्या दारूगोळा भरलेल्या तोफेच्या तोंडांत शिरायास सांगेल, तर, मागें पुढें न पाहतां मी एकदम तींत शिरेन."

तो सेनापति सिंधप्रांतीं असतां, एका गोपाळानें त्यास एक खेळ करून दाखविला. त्यांत त्यानें, दुसऱ्या एका सोबत्याच्या हातावर लिंबू ठेवून, तें तरवारीनें बरोबर अर्धो-अर्ध कापिलें. त्यांत कांहीं हातचलाखी किंवा लबाडी आहे, असें सर चार्लस ह्यास वाटलें, आणि तो त्या गोपाळास ह्मणाला, "अरे, तूं माझ्या हातावर लिंबू ठेवून कापशील काय?" त्यानें उत्तर दिलें "होय महाराज." मग लागलाच त्यानें आपला उजवा हात त्या गोपाळाच्या पुढें केला. तो न्याहाळून पाहिल्यावर तो त्यास ह्मणाला, "महा-राज, हें ह्या हातावर होणार नाहीं." हें ऐकून नेपियर साहेबाला किंचित् हंसें आलें. त्यावरोबर तो गोपाळ त्यास ह्मणाला; "महाराज, आपला डावा हात पाहूं." तो पाहून तो ह्मणाला, "ठीक आहे. ह्यावर सहज होईल." मग लागलेंच त्याजवर लिंबू ठेवून, त्या गोपाळानें पहिल्या सपाट्यास तें मधोमध कापून त्याचीं दोन शकलें केलीं. त्याविषयीं सर चार्लस नेपियर ह्यानें मोकळ्या मनानें असें बोलून दाखविलें कीं, "लिंबू माझ्या हातावर ठेविलें, तेव्हां खरोखर मला फार भय वाटलें. मीं जर प्रथम त्याची थोडी कुचेष्टा केली नसती, किंवा हात पुढें करण्याविषयीं वचन दिलें नसतें, तर खचीत मी त्या अडचणीच्या खेळांत पडलों नसतों."

ह्या दोन्ही गोष्टींवरून, सर चार्लस नेपियर हा बोलण्या-प्रमाणें वागण्याविषयीं किती जपत होता, तें स्पष्ट दिसून येतें. ह्याचा कित्ता सर्वांनीं घ्यावा.

# तुकारामाचे अभंग.

स्त्रिया पुत्र कलत्र हे तव मायावंत शेवटींचा अंत नाहीं कोणी १.
यमाचिये हातीं बांधोनियां देती भूपणेंही घेती काढूनियां. २.
ऐशिया चोरांचा कैसा हा विश्वास धरली तुझी आस तुका ह्मणे. ३.

सोइरे धाइरे दिल्या घेतल्याचे अंत हे काळींचे नाहीं कोणी. १.
सख्या गोत्रवहिणी सुखाचे संगति मोकलून देती अंतकाळीं. २.
आपलें शरीर आपणा पारिखें परांचीं होतिल नवल काई. ३.
तुका ह्मणे आतां सोड त्यांची आस धरींरे या कास पांडुरंगा. ४.

क्षमा शस्त्र जया नराचिये हातीं दुष्ट तयाप्रती काय करी. १.
तृण नाहीं तेथें पडला दावाग्नी जाय तो विझून आपसया. २.
तुका ह्मणे क्षमा सर्वांचें स्वहित धरा अखंडीत सुखरूप. ३.

पानें जो खाई बैसोनी कथेसी घडेल तयाशीं गोहत्या. १.
कीर्तनीं वडवड करील जो कोणी वेडूक होऊनी येइल जन्मा. २.
जयाचिये मनीं कथेचा कंटाळा होती त्या चांडाळा वहु जाच. ३.
जाच होती पाठी उडती यमदंड त्याचें काळें तोंड तुका ह्मणे. ४.

वृंदावना केलें साकरेचें आळें न सांडे वेगळें कडूपण. १.
कावळ्याचें पिलूं कौतुकें पोशिलें न राहे ऊगलें विष्ठेवीण. २.
क्षेम देतां अंगा गांधलाची पोळी करवी नादाळी महाशब्दें. ३.
तुका ह्मणे ऐसे न होती ते भले घालिते जे घाले साधुजना. ४.

# रायबहादर क्रिस्तोदासपाल.



ताजमहालासारखी उत्तम इमारत तयार होण्यास चतुर कारागीर पाहिजेत; तसें, देशाचें खरें हित होण्यास देशामध्यें स्वदेशाभिमानी पुरुष पाहिजेत; ते नुसते देशाभिमानी उपयोगी नाहींत; तर, त्यांच्या ठायीं विद्वत्ता पाहिजे. असे पुरुष ह्मणजे केवळ अमोलिक रत्नें होत.

रायबहादर क्रिस्तोदासपाल हे गृहस्थ ह्या प्रकारचे होऊन गेले. हे बंगाली होते. हे चांगल्या संभावित कुळांतले असून, ह्यांची घरची स्थिति साधारण होती. परंतु, ह्यांनीं लहानपणीं फार मेहनतीनें पुष्कळ अभ्यास करून, आपली योग्यता वाढविली. आलीकडच्या चाळीस पन्नास वर्षांत कलकत्त्यामध्यें जे कोणी फार नामांकित एतद्देशीय गृहस्थ होऊन गेले, त्यांत ह्यांची

बरोबरी करणारे मुळींच नव्हते, असें ह्मटलें तरी चालेल. स्वदेशाचें हित कशांत आहे, हें त्यांस चांगलें कळलें होतें; आणि तें साधण्याविषयीं ते अखंड झटत असत. इंग्लिश भाषा ह्मणजे त्यांच्यापुढें जशी हात जोडून उभी होती. ते, इ० स० १८६० ह्या वर्षी **"हिंदु पेट्रिअट"** नामक वर्तमानपत्राचे कर्ते झाले. तेव्हांपासून त्या पत्राची योग्यता वाढतां वाढतां शेवटीं इतकी वाढली कीं, हिंदुस्थानांतल्या राज्यप्रकरणाविषयीं त्या पत्रांतले लेख विलायतच्या पार्लमेंटसभेंत कधीं कधीं वाचीत असत. अशी त्यांची आख्या झाल्यावर त्यांस प्रथम बंगाल्याच्या लेफ्टेनेंट् गव्हरनराच्या कायदेकौंसिलाचे सभासद नेमिलें, आणि नंतर कांहीं दिवसांनीं लार्ड नार्थब्रुक ह्यांच्या वेळीं गव्हरनर जनरलाच्या कौंसलाचे सभासद नेमिलें, नंतर त्यांस रायबहादर व सी. आय्. ई. ह्या पदव्या मिळाल्या. त्यांनीं कायदेकौंसलाचें काम उत्तम प्रकारें, अगदीं कोणाची भीड न धरितां केलें, त्यावरून त्यांचें वजन फार वाढलें.

स्वदेशहित हें आपल्या स्वतःच्या घरच्या कामापेक्षां त्यांस अधिक वाटे. त्याप्रमाणेंच, गरीबगुरिबांच्या उपयोगीं पडणें ह्यासारखें दुसरें पुण्यकर्म नाहीं, असें त्यांच्या मनांत ठसलें होतें. त्याप्रमाणें ते नित्य वागत असत; आणि तेणेंकरून ते, सर्व जातींच्या आबालवृद्धांस अत्यंत प्रिय आणि पूज्य वाटत असत.

ते इ० स० १८८४ च्या जुलै महिन्यांत, कांहीं दिवस आजारी पडून, सुमारें ४९ वर्षांचे होऊन मरण पावले. त्यांच्या योगानें स्वदेशहिताच्या कामास मोठी खळी पडली आहे; ती सहसा लवकर भरून यावयाची नाहीं. ते मोठे

पापभीरु आणि ईश्वरभक्त होते. त्यांचें आचरण निर्मळ होतें. त्यांच्या मरणाचें वर्तमान ऐकून, सर्वांस अतिशयित वाईट वाटलें. नामदार लार्ड रिपन, कौंसलामध्यें ह्मणाले, "क्रिस्तोदासपाल ह्यांची आह्मांला फार मोठी मदत होती. त्यांनीं स्वदेशाची सेवा मोठ्या आस्थेनें आणि स्वदेशाभिमानानें केली. त्यांस जें श्रेष्ठत्व प्राप्त झालें होतें, तें केवळ त्यांच्या परिश्रमांचें फळ होतें. ते मोठे वक्ते होते." हें वर्णन सामान्य नव्हे. लार्ड रिपनसारख्या थोरांनीं ज्यांस थोर ह्मणावें, त्यांच्या थोरवीचें वर्णन किती करावें?

असे क्रिस्तोदासपाल आमच्यांत उत्पन्न व्हावे. आणि त्यांच्या बुद्धिवैभवानें लार्ड रिपनांसारख्यांच्या मनांत हिंदुस्थानाच्या कल्याणाविषयीं विचार उत्पन्न व्हावे, हेंच परमेश्वरापाशीं मागणें आहे.

## रत्नें.

ऐहिक व्यवहारांच्या पलीकडे ज्याला कांहीं दिसत नाहीं, तो आंधळा; आणि सुबोध ऐकत असतां जो आपलीं दुष्कर्में सोडीत नाहीं तो बहिरा.—**एक संस्कृत कवि.**

अगदीं बेताचें बोल; त्याचा अर्थ स्पष्ट कळूं दे; उगाच पुष्कळ बोलून कानांला कंटाळा आणूं नको.—**हारेस.**

ज्याला थोडेंसें ज्ञान होतें, तो मला इतकें कळतें ह्मणून गर्व करितो; आणि ज्याला पुष्कळ ज्ञान होतें, तो मला इतकेंसें कळतें ह्मणून नम्र होतो.—**कौपर.**

ह्या जगांत मनुष्यास प्रत्येक दिवशीं कांहीं तरी काम करावयाचें असतें. दररोज सूर्य उगवतो तो आपणांतल्या प्रत्येकास असें विचारितो कीं, "आज मी मावळण्याच्या आधीं तूं काय करशील?"—**राबर्तसन.**

मनुष्य ह्या जगांत एकटा येतो; तसा तो एकटा जातो; त्याप्रमाणेंच, जें कांहीं बरेंवाईट तो करितो, त्याचीं फळें त्याला एकट्याला भोगावीं लागतात.—**एक संस्कृत कवि.**

जें योग्य आहे तें करतांना तुला कोणी हंसेल ह्मणून भिऊं नको; त्याप्रमाणेंच, लोकांच्या तोंडची स्तुति संपादण्यास अयोग्य कृत्य करूं नको.—**एक इंग्लिश ग्रंथकार.**

जें योग्य आहे तें कर, आणि मग कोणास भिऊं नको. तुझ्या कृत्यांचा सर्व हेतु, स्वदेशहित, परमेश्वराची इच्छा, आणि सत्य ह्यांस लक्षून असावा.—**शेक्स्पियर.**

मोठ्या सभा, सुरस भाषणें, आणि लोकांच्या मनाची उचल, ह्यांनीं एकादें महत्कृत्य घडत नाहीं. तर, परमेश्वर आपणास पाहात आहे, असें नेहमीं लक्षांत ठेवून शांतपणानें एकांतीं उद्योग करणें हें महत्कृत्यांचें बीज आहे.—

**लिव्हिंग्स्तन.**

मनुष्यास शिक्षण दोन प्रकारचें मिळतें. ह्मणजे, त्याला इतरांपासून मिळतें तें, आणि त्याला स्वतःपासून मिळतें तें; त्यांत, दुसऱ्या प्रकारचें शिक्षण विशेष महत्त्वाचें होय.—

**गिबन.**

शत्रूनें हानि करण्यास आरंभ केला, ह्मणजे आपण लागलेंच त्याचें हित करायास आरंभ करावा. ह्या जयाची बरोबरी दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या जयाच्यानें करवणार नाहीं.—**तिलतसन.**

आपण लोकांस जसें दिसावें अशी आपली इच्छा असते, तसें खरोखर होण्याविषयीं प्रयत्न करणें, हें कीर्ति संपादण्याचें उत्तम साधन आहे.—**साक्रेतीस.**

परमेश्वरास ओळखणें हा विद्याभ्यासाचा मुख्य हेतु

होय. त्याला ओळखिलें ह्मणजे त्याला भजावें, आणि त्याला भजूं लागलें ह्मणजे सद्गुणांनीं त्यासारखें होण्यास झटावें.—

**मिल्तन.**

आपलें मन स्वाधीन ठेविल्यावांचून मनुष्यास कोणताही सद्गुण प्राप्त होत नाहीं. आणि घस घेतल्यावांचून जें प्राप्त होतें, त्याला कांहीं किंमत नसते.—**दी मेस्त्री.**

शाहाणा असतो तो आधीं विचार करून मग बोलतो; आणि मूर्ख असतो तो आधीं बोलून जातो, आणि मग विचार करीत बसतो.—**एक फ्रेंच ग्रंथकार.**

निंदा फार उपयोगीं पडते, ती पतकरावी आणि स्तुति नेहमीं फसविते, ती वर्जावी, असें समजणारे आणि त्याप्रमाणें वागणारे फार थोडे.—**लारोशी फूको.**

आपण आपल्या आचरणाविषयीं जसे सावध असतों, तसें आपल्या वाचेविषयींही सावध असावें. ह्मणजे, जसें दुराचरण वर्जावें, तसें दुर्भाषणही वर्जावें.—**सिसरो.**

सज्जन जे आहेत, ते, आपणांपेक्षां थोरांशीं आपली तुलना करून, त्यांहून आपण किती कमी आहों हें जाणतात, आणि नम्र होतात; आणि मूर्ख जे आहेत, ते, आपणांपेक्षां नीचांशीं आपली तुलना करून, आपण किती थोर आहों ह्याचा गर्व वाहातात.—**बीचर.**

मशाल खालीं तोंड करून धरिली, तरी तिची ज्वाळा वरच जात असते; त्याप्रमाणें, थोरांस जरी निकृष्टदशा आली, तरी ते धैर्य सोडीत नाहींत.— **भर्तृहरि.**

वाईट संगति असण्यापेक्षां मुळींच कोणाची संगति नसावी तें बरें; कारण, दुसऱ्याच्या आंगच्या सद्गुणांपेक्षां दुर्गुण

आपणांस लवकर लागतात. स्पर्शानें रोग जडतात; आरोग्य प्राप्त होत नाहीं.—कोल्तन.

## लार्ड रिपन.



जे गव्हरनर जनरल आजपर्यंत ह्या आपल्या देशावर आले, त्यांत माजी गव्हरनर जनरल लार्ड रिपन हे फार उत्तम, किंबहुना अप्रतिम होत. येथें त्यांचें चरित्र सांगतों.

हे लार्ड रिपन इ० स० १८२७ ह्या वर्षी जन्मले. त्यांनीं लहानपणीं फार चांगला अभ्यास करून मोठा लौकिक मिळविला. ते, इ० स० १८५३ ह्या वर्षी पार्लमेंट सभेचे सभासद झाले. आणि मग त्यांनीं कितीएक मोठमोठीं सरकारी कामें पतकरून तीं चांगल्या प्रकारें बजाविलीं. तेणेंकरून विलायतच्या दरबारांत त्यांचें वजन पुष्कळ

वाटलें. आणि, लार्ड लिटन हे आपलें गव्हरनर जनरलाचें काम सोडून गेल्यावर, महाराणी सरकारांनीं ह्यांस त्या जागेवर नेमिलें. त्याप्रमाणें ते इ० स० १८८० ह्या वर्षीं कलकत्त्यास दाखल होऊन आपलें काम पाहूं लागले.

आह्मीं ह्या गृहस्थांस अप्रतिम ह्मटलें आहे, ह्याचें कारण असें आहे कीं, ह्या देशांत जे इंग्लिश लोक येतात, ते बहुतकरून आपलें व आपल्या लोकांचें मात्र हित पाहतात, आणि ह्या देशांतल्या लोकांस हलके आणि तुच्छ समजून त्यांच्या हिताकडे मुळींच लक्ष देत नाहींत, असें आढळतें. परंतु लार्ड रिपन ह्यांची वर्तणूक ह्याच्या अगदीं उलट होती. ह्मणजे त्यांनीं आपल्या लोकांस आणि हिंदुस्थानच्या लोकांस एकसारखे समजून जे कितीएक हक्क इंग्लिश लोकांपेक्षां हिंदुस्थानच्या लोकांस कमी आहेत, ते सर्व त्यांस देऊन सर्वांस एकसारखे करण्याचा प्रयत्न केला.

ह्या थोर गृहस्थांनीं आह्मां हिंदुस्थानवासी जनांच्या कल्याणाकरितां इतक्या गोष्टी केल्या आहेत कीं, त्यांचें वर्णन करण्यास एक मोठा ग्रंथ लिहिला पाहिजे. त्या गोष्टींपैकीं ठोकळ ठोकळ मात्र आह्मी येथें सांगतों.

१. अफगाणिस्थानाशीं लढाई लार्ड लिटन ह्यांच्या वेळेपासून चालली होती, ती मोठ्या चातुर्यानें बंद करून हिंदुस्थानांतल्या पुष्कळ लोकांचे जीव वांचविले.

२. गोरे लोक आणि काळे लोक ह्यांस न्यायाच्या कामांत अगदीं एकसारखें मानावें, काहींएक भेद ठेवूं नये, असा कायदा ठरविण्याचा प्रयत्न केला.

३. वायव्य प्रांतांत आणि अयोध्या प्रांतांत पटवारीकर ह्मणून जो कर होता, तो बंद केला.

४. मिठावर सरसकट दरमणीं दोन रुपये जकात घेण्याचें ठरवून, बाकीचे कमजास्त दर मोडून टाकिले. त्याच्या योगानें लोकांवरचें १४०००००० रुपयांचें ओझें कमी झालें.

५. कापसाचें कापड व दुसरा कांहीं माल विलायतेहून ह्या देशांत आल्याबरोबर त्यावर जकात पडत असे, ती कमी केली.

६. ईजिप्तच्या लढाईचा सगळा खर्च हिंदुस्थानावर पडत होता. तो प्रकार योग्य नव्हता, असें लार्ड रिपन ह्यांनीं विलायतसरकारास आग्रहानें आणि स्पष्टपणें दर्शविल्यावरून, त्या रकमेच्या फेडीकडे त्या सरकारानें पन्नास लक्ष रुपये दिले.

७. ह्या देशांतल्या एतद्देशीय वर्तमानपत्रांवर सक्त नजर ठेवण्याविषयींचा कायदा लार्ड लिटन ह्यांनीं ठरविला होता, तो फार वाईट होता; तो ह्यांनीं रद्द केला.

८. ह्या देशांतल्या लोकांचे आंगीं कलाकौशल्य यावें, त्यांचे कारखाने वाढावे, आणि त्यांस संपत्ति मिळावी, ह्मणून ह्यांनीं असा ठराव केला कीं, सरकारी कामाकरितां, जें सामानसुमान विलायतेहून आणविण्याची वहिवाट पडली आहे, त्यापैकीं जितकें सामानसुमान ह्या देशांत तयार झालेलें मिळेल तितकें विकत घ्यावें.

९. स्थानिकस्वराज्याची स्थापना देशांतल्या सर्व मोठमोठ्या शहरीं कराविली त्याच्या योगानें प्रजेचे हक्क ह्मणजे काय, बहुमत ह्मणजे काय, आणि राज्यव्यवस्थेचा मुख्य हेतु काय, हें लोकांस कळूं लागलें आहे.

ह्या ठरावांवरून व अशा दुसऱ्या ठरावांच्या योगानें आमच्या लोकांचें पुष्कळ हित झालें आहे; आणि हे ठराव करणें व अमलांत आणणें हें गोऱ्या लोकांस अगदीं आव-

डलें नाहीं. ह्मणून लार्ड रिपन ह्यांस पुष्कळ त्रास आणि अपमान सोसावा लागला. तो किती हें आमच्या वाचणाऱ्यांच्या मनांत थोडें तरी येण्यास आह्मी त्या संबंधानें एवढेंच सांगतों कीं, एके वेळीं, लार्ड रिपन हे बाहेरून, कलकत्ता शहरांत येत असतां, शेंकडों गोरे लोकांनीं, त्यांच्या गाडीभोंवतीं धांवून त्यांची हुर्यो केली; आणि एके ठिकाणीं तर, त्यांचा कागदाचा पुतळा करून जाळिला! इतका अपमान झाला तरी, त्यांनीं आपला वर्तनक्रम सोडिला नाहीं. हे गृहस्थ इ० स० १८८४ ह्या वर्षी स्वदेशीं गेले.

---

## तुकारामाचे अभंग.

निंबाचिया झाडा साकरेचें आळें आपलीं तीं फळें न संडीच. १.
तैसें अधमाचें अमंगळ चित्त वमन तें हित करुनी सांडी. २.
परिसाचे अंगीं लाविलें खापर पालट अंतर नेघे त्याचें. ३.
तुका ह्मणे वेळू चंदना संगतीं काय ते नसती जवळीकें. ४.

हिरा ठेवितां ऐरणी वांचे मारीतां जो घणीं. १.
तोचि मोल पावे खरा ऐरणीचा होय चुरा. २.
गोहरा होय तोचि अंगें सूत न जळे ज्याचे संगें. ३.
तुका ह्मणे तोचि संत सोशी जगाचे अघात. ४.

मुंगीचीया घरा कोण धाडी मूळ देखोनियां गूळ धांव घाली. १.
याचकाविण काय खोळंवला दाता तोचि धांवे हिता आपुलिया. २.
उदक अन्न काये ह्मणे मज खा ये भूकेला तो जाये चोजवीत. ३.
व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा दुःखाच्या परिहारा आपुलिया. ४.
तुका ह्मणे जया आपुलें स्वहित करणें तोचि प्रीत धरी कथे. ५.

**समाप्त.**